
# आठवणींची



REFBK-0011422

सौ. विजया जोशी

# आठवणींचीं कोरीव लेणीं

[ भारत ते इंग्लंड व युरोप ते परत भारत
या प्रवासवर्णनात्मक स्मृतींचीं लेणीं ]

: लेखिका :

सौ. विजया जोशी,
मुंबई ५२.

: प्रास्ताविक :

प्रा. अनंत काणेकर

१९८०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. २७१

मूल्य
साडेतीन रुपये

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

: प्रकाशक :

दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

● ● ●

प्रथमावृत्ति
सप्टेंबर, १९६०

● ● ●

प्रथमावृत्तीचे सर्व हक्क
मातोश्री सौ. सीताबाई भावे
मुंबई ७६
यांचेकडे आहेत.

● ● ●

: मुद्रक :

दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
लोकसंग्रह छापखाना,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मुंबई सोडली ... | १ |
| २ | नेपल्स ते लंडन ... | १९ |
| ३ | मी लंडनला आलें ... | ३७ |
| ४ | इंग्लिश पाहुणचार ... | ५५ |
| ५ | सणांचा राजा नाताळ ... | ७३ |
| ६ | महिला व महिला मंडळें ... | ९० |
| ७ | आठवणींची करितां मृगया | १०८ |
| ८ | परतीचे वेध ... | १२५ |
| ९ | पॅरिस कीं इंद्रनगरी ... | १४१ |
| १० | म्युनिक आणि इस्तंबूल ... | १६१ |
| ११ | ती रात्र व तो दिवस ... | १७५ |
| १२ | बगदाद–बसरा–मुंबई ... | १९३ |



सौ. सीताबाई भावे

सामान्य आयुष्य असामान्यतेने जगण्याची कला
संपूर्णपणे अवगत असलेल्या माझ्या आईच्या
चरणीं हें प्रवास-निवेदन सादर अर्पण

—लेखिका



## आईचा आशीर्वाद

कवीला काव्य कल्पना । लेखकासी भाषा रचना ।
मी तों केवळ निरुपमा । कांहीं नेणें ॥
बहुविध क्षेत्रीं तुझा उल्हास । पाहूनि स्फूर्ति ये मन्मनास ।
वाटले चार ओळींस । लिहावेंच ॥
काळरात्र बोटीवरची । निभावलीस कृपा देवाची ।
लेण्यांमध्यें लेणें हेंची । सर्वश्रेष्ठ ॥
नाना तुजला देऊनि धीर । प्रोत्साहन देती वारंवार ।
हें तो कौतुक वाटलें अपार । न वर्णवे माझिया ॥
अशी ही प्रेमळ दंपती । लाभो दीर्घायु सुखसंतती ।
बाळेंही उत्तम निघोत पुढती । हाच आईचा आशीर्वाद ॥

—सौ. सीताबाई भावे

# प्रास्ताविक

‘आठवणींचीं कोरीव लेणीं’ हें सौ. विजयाबाई जोशी यांनीं आपल्या पुस्तकाला दिलेलें नांव अत्यंत औचित्यपूर्ण आहे. परदेशांतल्या आपल्या वर्षभराच्या वास्तव्यांतल्या इतक्या आठवणी, इतकी आत्मचरित्रात्मक माहिती, इतकीं गांठीभेटी झालेल्या माणसांचीं रेखाचित्रें त्यांनीं या पुस्तकांत शब्दांनीं कोरलीं आहेत कीं, वाचकाला भरीव लेण्यांचीच आठवण होते; आणि लेखिकेच्या निरीक्षणाचें, स्मरणशक्तीचें आणि लिहिण्याच्या उत्साहाचें कौतुक वाटतें. आठवणींचीं किंवा प्रवासवर्णनाचीं पुस्तकें पुष्कळ आहेत; पण या पुस्तकाचा विशेष हा कीं, तें एका स्त्रीनें लिहिलें आहे आणि तेंहि एका वेगळ्या व्यक्तित्वाच्या स्त्रीनें लिहिलें आहे, याचा पदोपदीं प्रत्यय येतो. पुरुष आठवणी सांगायला लागले म्हणजे बहुधा विशिष्ट काळांतल्या कांहीं विशिष्ट गोष्टीच त्यांना आठवतात; याच्या उलट बायकांना कित्येक वर्षांपूर्वींच्या बहुतेक सर्व गोष्टी विस्तृत तपशिलासह आठवतात. आपल्या चाळीस-पन्नास वर्षांच्या मुलाच्या किंवा मुलीच्या जन्माच्या वेळच्या गोष्टी अशिक्षित म्हातारीसुद्धां सांगायला लागली तर तो दिवस कसा होता, तेव्हां माणसें कोण आलीं होतीं, तीं काय बोललीं इत्यादि इत्यादि हजार गोष्टी, त्या कालच घडल्या कीं काय, इतक्या ताजेपणानें ती सांगूं शकते. असें कांहीं सांगूं शकणारा पुरुष मला तरी अजून भेटलेला नाहीं. सौ. विजयाबाईंच्या या आठवणींत हाच स्त्री-सुलभ ताजेपणा

आहे. अशा गोष्टी स्त्रिया एकदां सांगूं लागल्या म्हणजे त्या किती सांगतील आणि काय सांगतील याला सुमार नसतो. 'आठवणींच्या कोरीव लेण्यां'-तहि असेंच झालें आहे. पुष्कळशा बहारीच्या आणि मजेदार आठवणीं-बरोबरच कोणत्याहि प्रवाशाच्या नेहमींच वांट्याला येणारे कांहीं सुखदु:खांचे अनुभव आणि प्रसंग त्यांनीं सांगून टाकले आहेत.

पण हें सर्व त्यांनीं अत्यंत मोकळेपणानें आणि अत्यंत अकृत्रिमपणें सांगितलें आहे. हाच त्यांच्या व्यक्तित्वाचा विशेष आहे. आपण एखाद्या दूरच्या प्रवासाहून अनेक दिवसांनीं आल्यानंतर भोंवतीं बसलेल्या आई-वडील, भाऊ-बहीण, मुलें-माणसें इत्यादि प्रियजनांना ज्याप्रमाणें किती सांगूं आणि किती नको, अशा उत्साहानें आणि जिव्हाळ्यानें सर्व कांहीं सांगत असतों,—काय सांगतों, किती सांगतों, कमी सांगतों, कीं जास्त सांगतो याचा विचारहि करीत नाहीं—त्या प्रकारची सौ. विजयाबाईंची निवेदन-शैली आहे. थंडीबिंडी असा बोलभाषेंतला शब्दप्रयोग त्या सहज करून जातात. मौल्यवान् वस्तूंनीं भरलेली त्यांची पर्स इंग्लंडमध्यें दोनदां हरवली; पण दोन्ही वेळां ती बिनबोभाट त्यांना परत मिळाली, हें सांगतांना इंग्रजांच्या मोठेपणाची त्या तोंड भरून स्तुति करतात, आणि आपल्या समाजाची तुलनेनें निर्भर्त्सना करतात. याच इंग्रजांची चप्पल दुरुस्त करावयाला सात शिलिंग घेतल्याबद्दल, किंवा त्या पाहुण्या असतांना एक वेडसर मुलगी त्यांच्या सोबतीला देण्याचा निर्घृणपणा केल्याबद्दल यथास्थित खरडपट्टी काढावयाला त्या कमी करीत नाहींत. इंग्लंडमधून युगोस्लाव्हियांत आल्यानंतर बेलग्रेडचें वर्णन त्यांनीं असेंच निर्भीडपणें केलें आहे. त्या म्हणतात, '...तेथील शेतकरी वगैरे आपल्याकडील शेतकऱ्यांसारखेच; शेतकीची पद्धतीहि तशीच. लोकांची रहाणी, बग्यांची गर्दी, आळशांचे तांडे, निरुद्योगी टवाळांचे थवे, कळकट लोकांचे पुंजके, सर्व कांहीं अगदीं आपल्या परिचयांतल्यासारखेंच... '

त्यांची वर्णनशैली धांवती, पण खोंचक आहे. त्यांना भेटलेल्या नॅन्सी, ओल्गा, कॅथरीन, रोझी, मेरी इत्यादि इंग्रज, वेल्श, स्पॅनिश मुलींचीं छोटीं छोटीं शब्दचित्रें या दृष्टीनें वाचनीय आहेत. भूमध्य-समुद्राचें वर्णन करतांना कुणातरी लेखकानें त्याला शाईसारखा निळाशार म्हटलें आहे. सौ. विजयाबाई त्याला शनीच्या खड्यासारखा म्हणतात. बोटीवर डॉ. जानकीराम वारले त्या रात्रीचें, किंवा तुर्कस्थानमधल्या एका आडवळणा-वरल्या भकास स्टेशनांत एकटीनें काढलल्या रात्रीचें लेखिकेनें केलेलें वर्णन वाचकांच्या मनांत कित्येक दिवस रेंगाळेल. असें असूनहि लेखिका एके ठिकाणीं प्रांजळपणें म्हणते कीं, ' ... घडलेल्या घटनांच्या ढोबळ रंगांचें आविष्करण मीं केलें आहे. सूक्ष्म, लहानसहान, भिन्न, वैचित्र्यपूर्ण छाया किंवा छायाचित्रणाच्या नाजुक छटा मला सविस्तरपणें सांगतां आलेल्याच नाहींत.....'

या प्रांजळपणामुळेंच पुस्तक वाचनीय झालें आहे.

—अनंत काणेकर

दा. ११४२२

# लेण्यांच्या प्रवेशद्वारांत

विलायतची वारी करण्यापूर्वी मी असें कांही लिहीन अशी मला किंचितशीहि कल्पना नसल्यामुळे टिपणें तयार करणें, डायरी लिहिणें, अनेक गोष्टींच्या उल्लेखासंबंधाने नोंद करून ठेवणें असल्या आवश्यक गोष्टी मी पद्धतशीर मार्गाने केल्या नाहीत. परत आल्यानंतरहि कित्येक दिवस कुतुहलाने प्रश्न विचारणाऱ्या ओळखीच्या लोकांना तितक्याच आत्मीयतेने स्वानुभव वर्णन करून सांगणें येवढेंच मी केलें; पण " हं पुढें सांग, मग काय झालं ? " अशा उत्सुकतेने कोणी गोष्ट ऐकणारा श्रोता मिळाला तर सांगणाऱ्या व्यक्तीला उमेद येते व खुलवून गोष्ट सांगितली जाते व आपोआप रंग चढत जातो तसंच कांहीसं माझं झालं.

प्रसंगाच्या अनुरोधाने आणि विचारणाऱ्या व्यक्तींच्या परिचयानुसार वेळोवेळीं सांगत गेलेल्या अनेकविध कथा–उपकथा एकत्र आणून मी लिहून ठेविल्या त्याला कित्येक तरी दिवस लोटले. मला छापण्याचा मोह होई; पण कुणा मासिकाकडे पाठविण्याचा धीर होईना. कोणी छापील, की नाही म्हणून माझा विरस करील ? छापलेंच तर कोणी वाचील की नाही ? कोणी वाचलें तर त्यांना आवडेल की नाही, कोणास ठाऊक ? अशा संदिग्ध मनःस्थितींत मीं कांहीच न करतां लिखाण तसेंच ठेविलें होतें. माझ्या आनंदासाठी लिहिलें होतें मी. लोकांनीं वाचावं अशी इच्छा होई; पण पुन्हा

वाटे गाइलेलें प्रत्येक गाणें जनरंजनासाठीच असतें असें कुठे आहे ? मन-रंजनासाठींच तें अधिक गाइलें जातें; तसेंच माझेंहि लिखाण माझ्यापुरतें, माझ्याचसाठी राहिलें तर काय बिघडलें ? माझीं मुलें मोठीं झाल्यावर वाचतील तेव्हा त्यांना तर मजा वाटेल; पण आला, धीर करून अनु-राधेच्या संपादकांना दोन प्रकरणें दाखविण्याचा दिवस आला. तत्पूर्वी माझ्याच ओळखींतल्या एक-दोन मराठी लेखनकला जाणणाऱ्या मित्रांना मीं तीं दाखविलीं होतीं. त्यांना तीं आवडलीं असावीं. कारण त्यांनी न कंटाळतां शेवटपर्यंत वाचून काढलीं. अनुराधेच्या अंकांत लेखमाला सुरू होत असल्याची घोषणा पहिल्या प्रकरणाबरोबर छापून येतांच मला आपण हें खुळ्यासारखं तर करीत नाही ना, अशी कसली तरी चमत्कारिक भीति वाटत होती; पण पुढे पुढे छापून येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाबद्दलचे रिपोर्टस वाचक थेट माझ्यापर्यंत पोहोंचवूं लागले, तेव्हा माझा आत्मविश्वास वाढला. अनुराधेच्या संपादकांना ह्या सर्वांचें श्रेय द्यावयाला हवें. केवळ दोन प्रकरणें वाचून सबंध लेखमाला छापण्याचें श्री. ब्रह्मानंद नाडकर्णी यांनी अंगावर घेतलें व कोणत्याहि तऱ्हेने पूर्वी कधीहि लिखाण न करणाऱ्या माझ्या-सारख्या अगदी त्या प्रांतांत अनभिज्ञ अशा बाईकडून पुस्तक काढण्या-पर्यंत मजल मारवून घेतली. अनुराधेच्या संपादकांनी आढेवेढे घेऊन नाही म्हटलें असतें तर कदाचित् हें कोरीव लेणीं खोदण्याचें काम मी तसेंच सोडून दिलें असतें व दोन्ही प्रकरणांना माळ्यावर फेकून दिलें असतें आणि लिहिण्याच्या प्रांतांत परत कधीकाळीं पाऊल टाकलें असतें की नाही, याची शंकाच आहे.

आठवणींचीं कोरीव लेणीं हें माझें पहिलेंच लिखाण पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून वाचकांच्या हातीं देतांना मला आनंद होणें साहजिकच आहे. परंतु अकल्पितपणें, अभावितपणें हातून घडलेली अशी कलाकृति माझ्या आईला अर्पण करण्याची संधि कल्पना नसतांना आलेली पाहून

माझा आनंद शतगुणित झाला आहे. " न मातुः परमदैवतम् " हें वर्णन अक्षरशः जिला लागू करतां येईल अशा माझ्या आईच्या चरणीं ही पहिली ( आणि कदाचित् शेवटचीच ) साहित्यकृति प्रकाशनाच्या अधिकारासह कृतज्ञतापूर्वक अर्पण करून अंशतः उतराई होण्याचा प्रयत्न मीं केला आहे.

हीं लेणीं शक्य तितकीं ठळक, सुस्पष्ट व रेखीवपणें कोरण्याची मीं कोशीस केली आहे; परंतु तसें करण्याच्या भरांत क्वचित् जास्त जोरदार-पणें हत्यार चालविलें गेलें असण्याचा संभव आहे. अर्थात् कोणत्याहि व्यक्तीवर मला कोणत्याहि तऱ्हेची टीका किंवा मर्माघात करावयाची अजिबात इच्छा नाही; तरी माझ्या दृष्टिकोनांतून वाचकांनी ह्या लेण्यांकडे पाहावें; म्हणजे तीं स्पष्ट व तपशिलवार दिसतील येवढीच नम्र सूचना.

ही लेखमाला अनुराधेंत छापून येऊं लागली तेव्हापासून ज्या माझ्या असंख्य मित्रमंडळींनी वेळोवेळीं कौतुक केलें, लिहून कळविलें त्या सर्वांची मी आभारी आहें. विशेषतः साहित्यक्षेत्रांत आघाडीवर असणाऱ्या माझ्या कांहीं लेखक व लेखिका मित्रमैत्रिणींच्या उत्स्फूर्त उत्तेजनाबद्दल मीं त्यांची सदैवच ऋणी आहें. त्यांनी माझ्या साहित्यक्षेत्रांत प्रवेश करण्याची दखल घेतली म्हणूनच हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा धीर मला आला. प्रा. अनंत काणेकर ह्यांनीं माझ्या ह्या अध्यांकच्या साहित्यकृतीला सुरेखशी प्रस्तावना लिहून मला कायमचें उपकृत केलें आहे.

जितक्या हौसेने मीं लिहिलें तितक्याच हौसेने आणि त्वरेनें, पुस्तक प्रसिद्ध करण्याचें कार्य प्रा. पां. श्री. घारे व अ. वि. गृह प्रकाशनाचे व्यवस्थापक ह्यांनी करून मला उपकृत केले आहे. सुबक छपाई आणि आकर्षक बांधणीबद्दल त्यांचे आभार मानूनच केवळ मोकळें होतां येणार नाही.

गणेशचतुर्थी शके १८८२<br>२६ ऑगस्ट १९६०

सौ. विजया जोशी

# प्रकाशकाचें निवेदन

अ. वि. गृह प्रकाशनातर्फे आज वेगळ्याच धर्तीचें पुस्तक आम्ही वाचकांच्या हातीं देत आहोंत. स्वाध्यायमालेची पुस्तकें, क्रमिक पुस्तकें, महाविद्यालयीन ग्रंथ यांमध्यें आज या प्रवासवर्णनात्मक पुस्तकाची भर आम्ही घालीत आहोंत. बऱ्याच वर्षांपूर्वी 'युरोपच्या अंतरंगांत' या नांवाचें एक प्रवासवर्णनात्मक पुस्तक आम्हीं प्रकाशित केलें होतें; आज सौ. विजया जोशी यांचें 'आठवणींचीं कोरीव लेणीं' हें पुस्तक वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला अत्यंत आनंद होत आहे.

सौ. विजया जोशी बोटीने इंग्लंडला गेल्या. येतांना जवळजवळ ६००० मैलांचा प्रवास त्यांनीं आगगाडीनें केला. नाना देश व नाना समाज त्यांनीं पाहिले. पाश्चात्य समाजांतील गुणदोष त्यांना जे आढळले ते त्यांनीं यांत सांगितलेले आहेत. त्यांच्या विचारांत सामाजिक दृष्टि व जबाबदारीची भावना दिसून येते. त्याचप्रमाणें अभिजात रसिकता, सौंदर्यदृष्टि यांचाहि आढळ त्यांच्या लेखनांत होतो. एका भारतीय स्त्रीनें एवढा लांबचा प्रवास एकटीनें केला, आलेल्या बऱ्यावाईट प्रसंगांना धीटपणानें तोंड दिलें ही गोष्ट भारतीय स्त्रियांना (व नागरिकांनाहि) खचितच अभिमानास्पद वाटेल. प्रवासांतले अनुभव त्यांनीं चटकदार शैलींत लिहिले आहेत. अनुभवाशीं त्या प्रामाणिक राहिल्या आहेत. उपदेश करणाऱ्या संताची वा तत्त्ववेत्त्याची भूमिका न घेतां साध्या प्रसंगांतून त्यांनीं भारतीय समाजाचे दोष दाखवून दिले आहेत. वाचकांना हें पुस्तक आवडेल अशी आम्हांला आशा आहे. सौ. विजया जोशी यांनीं हें पुस्तक प्रकाशनार्थ आम्हांला दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

प्रा. अनंत काणेकर यांनीं मार्मिक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. श्री. नाडकर्णी यांनीं अल्पावधींत मुखपृष्ठ तयार करून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानून हें निवेदन संपवितों.

गणेशचतुर्थी १८८२ | व्यवस्थापक
२६ ऑगस्ट १९६० | अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २७७३५ वि:
क्रमांक २७९ नों: दि: २४/११/८०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# १
# मुंबई सोडली

९ सप्टेंबर १९५६ रोजीं दुपारीं बरोबर १२ वाजतां लॉइड्स ट्रिस्टीनोच्या "एशिया" ह्या सुखसोयींनी परिपूर्ण असलेल्या बोटीने मीं मुंबई सोडली, म्हणजे देहाने मी बोटींत बसून जातांना लोकांना दिसलें. वास्तविक २२ ऑगस्टला पासपोर्ट मिळाल्यापासून मी हवेंतूनच हिंडत होतें व किती तरी वेळां मनांतल्या मनांत विश्वाला फेऱ्या मारून येत होतें. माझ्या छोट्या दोन मुलांना सोडून जायचं, आईवडील, नाना (माझे पति) ह्या सर्वांना येथें सोडून एकटीनेच इतक्या लांब जाण्याच्या कल्पनेने मला इतकं कांही वाईट वाटायचं कीं जाण्याचा आनंद मी प्रत्यक्ष इंग्लंडला जाईपर्यंत खरं म्हणजें मला झालाच नाही. "कशाला एवढं आतांच जायला पाहिजे आहे? बसलेली घडी विसकटून, मुलांना आजोळीं, नवऱ्याला एकटा सोडून इतक्या लांब जाऊन असं काय मिळवायचंय आणि पहायचंय", असा वडिलांचा सल्ला व "कांही नाही जायचंच असलं तर आतांच जा. नवरा अन् मुलें करीत बसलीस तर कधीच जाणार नाहीस, सध्या मी मुलांना बघायला आहें तोंवर जाऊन ये" हा आईचा अनुभविक आग्रह, अशा द्विधा अवस्थेंत "तुझ्या मनांत फार दिवसांपासून जायचं आहे, तूं जा, मी इकडे सारं बघेन", असा ह्यांचा पाठिंबा मिळतांच मीं जाण्याचं ठरविलं आणि खट-

पटीस लागलें. मला पासपोर्टहि फार लवकर मिळाला. मग मात्र मी नक्की जाणार असं सान्यांनाच वाटूं लागलं. मी रजा घेऊन जाणार असल्याने एक-एक दिवस मोजीत होतों आम्ही. रजा फुकट जाऊं द्यायची नव्हती. लवकरांत लवकर म्हणून ९ सप्टेंबरचा पॅसेज मिळविला. बोटीवर मला निरोप द्यायला जवळजवळ तीसजण आले होते. माझीं भावंडें, आई-वडील, मुलगी धनवन्ती व तिचे वडील, दोन पुतणे, भाची, शिवाय ओळखीची मंडळी, -- मला जातांना फार वाईट वाटलें. पुण्या-मुंबईपलीकडे प्रवास न केलेली, कोणाहिकडे फार करून न राहिलेली मी साता-समुद्रापलीकडे एकटीच जाणार, राहणार; सर्वांनाच हें जरा अवघड वाटत होतें. बोटीवरील माझी खोली व तीमधील सर्व व्यवस्था हें बघून आल्यानंतर नाना व भाऊसाहेब ह्या दोघांनाहि आनंद वाटला व प्रवास सुखाचा होणार, एका घरांतून दुसऱ्या घरांत पाऊल टाकण्याइतकें हें सर्व सोपें दिसतें असेंहि त्यांना वाटलें. आपणच कधी नव्हे ते जातों म्हणून आपल्याला वाटतें. बाकी वरचेवर जाणारे लोक आहेतच ना ? बोट म्हणजे मरीन ड्राइव्हच्या बंगल्यापेक्षाहि उत्तम आहे. ही अशीच्या अशीच इटलीपर्यंत जाणार. १२ दिवसांचा प्रश्न, असं मी माझं समाधान करून घेत होतें.

आमची बोट " मुंबई ते जिनोव्हा " अशी जाणारी होती. पण मी वाटेंत नेंपल्स म्हणजे जिनोव्हापासून एक बंदर अलीकडे उतरून रोमवरून स्वित्झर्लंड, फरान्स ते इंग्लंड अशी जाणार होतें. बरोबर मी इतरांच्या मानाने फारच थोडें सामान घेंतलें होतें. मला नेहमी लागणाऱ्या सामानाखेरीज खास इंग्लंडला जाण्यासाठीं म्हणून फारच थोडया वस्तु मी खरीदल्या होत्या. मी कांही कोणाच्या स्कॉलरशिप वगैरेवर जाणार नव्हतें, त्यामुळें साहजिकच जरूर तेवढाच खर्च करण्याचें ठरवून निघालेली होतें. जेवढं पाहतां येईल तेवढं पहावं, व जरुरीपुरत्याच वस्तु खरीदाव्या, असें धोरण मनाशीं ठरविलं होतें.

भोंगा झाला. पोहोंचवावयाला आलेल्या मंडळींना बोटीवरून उतरण्याची सूचना मिळाली. आम्ही रंगीबेरंगी फितींचीं बंडलें घेऊन किनाऱ्यावरील आपापल्या माणसांकडे फेकीत होतों. एक टोक आपल्या हातांत व दुसरें खालीं बंदरावरील व्यक्तीच्या हातांत, अशा या इंद्रधनुष्यानीं वेढलेली बोट

जमिनीपासून दूरदूर सरकूं लागली. बंदरावर तीस माणसें आणि बोटींत मी फक्त एकटी. माझा जीव माझ्या प्रत्येक नातलगांत गुंतून होता. मला जावेंसें वाटेना, उतरावेंसेंहि वाटेना. मी विलायतेला जाणार, ह्या अवस्थेंत गेले पंधरा दिवस काढले तेहि सुखाचे वाटले नव्हते. लहानपणीं हरि नारायण आपटे ह्यांच्या कादंबऱ्या वाचतांना मी रडत असें आणि तरीहि वाचत असें. आई म्हणें, “ अग रडतेस कां आणि मग वाचतेस कशाला ? ” मुंबईचा किनारा सोडतांना मी म्हणत होतें, “ तूं रडतेस कां, आणि मग जात आहेस तरी कशाला ? ” आई मुलाला कडेवरून उतरवितांना तें नाराजीनें उतरतें, तशी त्या इतक्या मायापाशांच्या नाजुक बंधनांना तोडून बोट दूरदूर होत होती. बंदरांतील सर्व माणसें हळूहळू लहान लहान होत होतीं. खळखळत्या चिखलट रंगाच्या पाण्यांतून बोट खोल पाण्यांत शिरत होती. दुरून रुमाल हालत होते. हात उंचउंच करून लोक निरोप देत होते. बोटीवर मिश्र भावनांनी अस्वस्थ झालेले उतारूच जास्त होते. आतां बोटीवरून किनाऱ्यावर असलेलीं आपलीं अशीं माणसें ओळखून काढतां येत नव्हतीं. किनाऱ्यावर दूरवर दिसत होतीं तीं सर्वांचीं माणसें, मुंबईचीं माणसें दिसत होतीं. आम्ही घरच सोडून जात नव्हतों, आम्ही मुंबईच सोडून चाललों नव्हतों. आतां हिंदुस्थान सोडला होता. मी फार वेळ रडलें नाही. समुद्राची हवा लागल्याबरोबर आपोआप मी सावरलें. माझ्या ओळखीचें असें बोटीवर कोणीहि नव्हतें. नसलें तर नसलें. ही बोट हेंच आपलें घर, हींच आपलीं माणसें, आता ह्यांच्यांतच आपण राहून आहेत ते दिवस घालवावयाचे आहेत, ही भावना हळूहळू मनांत धरूं लागली. प्रवाशांना बोट पाहण्यास एखादा दिवस पुरे होतो. जे सराईत असतात किंवा पूर्वी ज्यांनी प्रवास केलेला असतो ते लागलीच आपापल्या उद्योगास लागतात चारपांच मुलांच्या आईनें पहिलटकरणीला सांगावें तशा आवाजांत आपल्या पूर्वीच्या ट्रिपचें वर्णन करूं लागतात. लोकलगाडींत रोज चढणारे लोक जसे धूर्तपणें सावलीच्या जागेंत बसणें, खिडक्यांजवळची जागा पटकावणें, कोण माणूस रोज कोठें उतरतो हें हेरून त्याच्या जागेवर डोळा ठेवून राहणें ह्या गोष्टी करतात तितक्याच सहाजिकपणें बोटीवरील सराईत उतारू डेकवरील खुर्च्या रिझर्व्ह करणें, जवणाचें टेबल ठरविणें, आपल्या टेबलावर कोणकोण माणसें पाहिजेत

त्यांची निवड करणें, गेम्स कोणत्या आहेत तें पहाणें, या गोष्टी आपणांस पाहिजेत तशा प्रकारें करून घेतात मात्र मला ह्यासंबंधी कांहीहि माहिती नव्हती, व माझें मनहि कशांतच लागत नव्हतें त्यांतून मी जात्याच थोडीशी भिडस्त व संकोची असल्यानें एकदम अनोळखी लोकांशी कितीसें बोलणार व बोलावें काय, ह्याचा अनुभव नसल्याने मी एकान्तवासच पसंत करीत असें. फार दिवस कोंडून ठेविलेल्या माणसाला बाहेर सोडलें तर तो एकदम पळत न सुटतां आजूबाजूला पाहून अंदाज घेतो, तसंच मला वाटतं माझं झालं असावं. मुंबईमध्यें गेल्या दोन चार महिन्यांत मी इतकी कंटाळलें होतें, —— आणि विशेषतः त्या कालांत मानवाच्या दुष्टतेचे इतके नमुने माझ्या दृष्टिपथांत आले होते —— कीं असल्या लोकांत राहणें नको, असा माझा निग्रह होत होता. मला होत असलेला मानसिक त्रास पाहूनच मला वाटतें नानांनी माझ्या इंग्लंडला जाण्याच्या बेताला रुकार दिला. घर सोडून स्वतःच्या कर्तबगारीवर बाहेरच्या जगांत पाऊल टाकणाऱ्या स्त्रीला केवळ दुष्टबुद्धीने कोणी तिच्या विरुद्ध सत्तेचें हत्यार उगारूं पहात आहे, असें दिसून आलें तर तिची होणारी मानसिक कुतरओढ ज्या त्या परिस्थितींतून गेल्या आहेत त्याच जाणूं शकतील. आपण सरळ असलों तर लोक आपलें कांहीहि वांकडें करूं शकत नाहींत, असल्या भोळसट व पंगू तत्त्वज्ञानानुसार मी वाढलेली व वागलेली असल्याने लोकांना तुमचें चांगलें झालेलें बघवत नाही, अथवा तुम्ही फार सरळ म्हणून मुद्दामच आपला रस्ता वाकडा करून तुमच्या वाटेस जाऊन तुमच्या मार्गास खीळ घालावी, अशा मानवी मनाचा अनुभव मला अद्याप यावयाचा होता. कसेंहि असो, मी बोटींतून त्या दिवशीं जगूं कांही माझें मीच स्वतःला पाण्यांत लोटून दिलें आहे अशा भावनेंत व विषण्ण मनःस्थितींतच होतें. केबिनमधील व्यवस्था राजेशाही होती. माझ्या केबिनमध्यें आणखी एक सहप्रवासी होती. ती मूळची गोव्याची राहणारी; पण एका इटालियन माणसाशीं लग्न केलें असल्याने तिला आतां इटालियन नागरिकत्व प्राप्त झालेलें होतें. तिचा पति जवळच्याच कॅबिनमध्यें होता. ती आपल्या पतीबरोबर प्रवास करीत असल्याने तीं उभयतां खूपच मौज करीत होते. हिंदुस्थान सोडून इटालींत कायमचें वास्तव्य करण्याकरितां तीं निघालीं होतीं. तीं सांगत

होती कीं, हिंदी लोकांनी तिच्या पतीला फारफार फसविलें. धंद्यांत बुडविलें. इटालींत गेल्यानंतर कायकाय करावयाचें, पुढें कशा प्रकारें रहावयाचें, कोठें रहावयाचें यासंबंधीं बेत करीत करीत या दांपत्याचा प्रवास चालला होता. हळूहळू बोटीवरील प्रवाशांच्या ओळखी होत होत्या, पण त्या वाढविण्याची धडपड मात्र मी करीत नव्हतें. बोटीवर देण्यांत येणारें अन्न अतिशय चांगलें होतें, पण मला बोट लागत असल्याने मी थोडी बेचैनच होतें, आणि बोटीचा वास मला मळमळ उत्पन्न करीत असल्याने खाण्यावर फारशी इच्छा नव्हती. या प्रवासांत माझी किरण नांवाच्या एका महाराष्ट्रीय (ख्रिश्चन) बाईशी मैत्री झाली होती. तिच्यामुळे मात्र वेळ चांगला जाण्यास फार मदत झाली. तिनेहि तिचीं दोन मुलें तिच्या आईकडे ठेवलेलीं होतीं व तीहि माझ्याप्रमाणेच नेपल्सला उतरून रोमवरून इंग्लंडला जाणार म्हणत होती. आम्ही दोघीहि मजेखातर प्रवासास निघालेल्या असल्याने आमची जरा अधिक मैत्री झाली. किरण मला भेटली तें फार बरें झालें. मला बोलायला तरी मिळाले. माझी उपासमार होत असलेली पाहून तिला फार वाईट वाटे. "तुला हें खाल्लें पाहिजे. खाल्लें नाहीस तर तुझें कसें होणार?" असें ती वरच्यावर म्हणे आणि त्यांतल्यात्यांत मला आवडतील असे पदार्थ शोधून काढून ते जेवणाच्या वेळीं पुरविले जावेत याबद्दल ती दक्षता घेत असे. अंडीं, मासे, मांस अशांसारखे मांसाहारी पदार्थ तर माझ्या घशाखालींच उतरत नसत. जन्मभर मी शाकाहारी राहिलें असल्याने, व मुंबई सोडतांना अथवा त्यापूर्वी इतर आहारांची सवय करण्यास सवड न सापडल्याने उत्कृष्ट खाद्य-पेयांची विपुलता असूनहि मी मात्र अर्धपोटीच असें. मी ज्या बोटीने प्रवास करीत होतें त्या बोटीवर खाण्याच्या वस्तूंचीं चंगळ होती, आणि त्यांतील कन्सॉमी सूप, स्फगेटी व आइस्क्रीम हे पदार्थ माझ्या चांगलेच लक्षांत राहिले आहेत.

१२ सप्टेंबरला सायंकाळीं ६–३० वाजतां आम्ही कराचीस पोहोंचलों. कराचींत माझ्या ओळखीचें असें कोणीच नव्हतें. परंतु किरणच्या ओळखीचें एक अमेरिकन कुटुंब तेथें रहात होतें. त्याच्याकडे आम्ही गेलों व ती रात्र राहिलों. त्या अमेरिकन पतिपत्नींनी आम्हांला कराचींत हिंडवून आणिलें व खरें तर नवीन नवीन देश बघण्यास आमची खरी सुरवात कराचीपासूनच

झाली असें म्हणावें लागेल. कराचींत कांही वेगळें असें फारसें आढळणार नव्हतेंच; परंतु त्या दिवशीं "जिना डे" असल्यामुळें मिरवणुकी मात्र पहावयास मिळाल्या. हा सुट्टीचा दिवस असल्याने बहुतेक सर्व व्यवहार बंदच होते. कराचींत नाही म्हणावयास रस्ते तेवढे फार मोठे व चांगले आढळले. उंटांच्या लांबट आकाराच्या गाड्या पाहून गंमत वाटली. बाकी दारिद्र्य मात्र हिंदुस्थानासारखेंच तेथेहि दिसून आले.

पाकिस्तानच्या राजधानींत आम्ही एकच दिवस काढला; पण तो तेवढाच पुरे असें वाटलें. कराची सोडल्यानंतर एडनकडे सर्वांचे डोळे लागून राहिले. बोटीवरील लोक एडनला मिळणाऱ्या वस्तूंचें रसभरीत वर्णन एकमेकांना सांगत होते आणि तें ऐकून त्या वस्तूंपैकीं कोणत्या वस्तु घ्याव्यात आणि कोणत्या न घ्याव्यात असें मला झालें होतें. खरं म्हटलें म्हणजे मला सामान वाढवून चालण्यासारखें नव्हतें व मी एडनला ज्या कांही थोड्या वस्तु खरेदी केल्या होत्या त्या परत हिंदुस्थानांत परत येईपर्यंत मला बरोबर बाळगाव्या लागणार होत्या. एडनला दुर्बिणी, कॅमेरे, टाईपरायटर्स फारच स्वस्त मिळतात. वस्तूंवर जकात नसल्यामुळें खेळणीं, कपडे, चैनीच्या वस्तु म्हणजे रेशमी कव्हर्स, प्रवासी घड्याळ, एकदोन स्कार्फस्, कोलन वॉटर, आणि अशाच इतर कांहीं लहानसहान वस्तु मीं खरीदल्या. प्रवासांत सहप्रवाशांविषयी आपुलकीची भावना कशी नैसर्गिकरीत्याच उत्पन्न होते याबद्दल मला आलेला अनुभव सांगतें. एडनला जो तो आपापल्यापरीने कांहीनाकांही तरी खरेदी करून हौस भागवून घेत होता. परंतु माझी सहसोबतीण जी होती तिच्या मनांत असूनहि तिला कांही वस्तु घेणें शक्य नव्हतें. पैशाच्या अभावीं ती मुळी बंदरावर उतरलीच नाही. आमची बोट तिन्हीसांजेला एडनला आलेली. तेथे उत्तम डॉज गाड्या टॅक्सीज् म्हणून वापरतात. अशाच प्रकारच्या एका टॅक्सीमधून आम्ही घोळके करून एडन गांवांत गेलों. बंदरपासून एडन गांव हें जवळजवळ तीन साडेतीन मैल आंत आहे. वेळींअवेळीं येणाऱ्या प्रवाशांच्या रहदारीने बाजारांत कोणी ना कोणी कांही ना कांही जिन्नस विकीत असतातच. आमच्या कल्पनेपेक्षाहि अधिक दुकानें उघडीं होतीं. जमेल ती खरेदी करून आम्ही घरीं—म्हणजे बोटीवर आलों. मध्यरात्रीचे १२ वाजून गेले असावेत त्या वेळीं. खोलीवर आल्या-

नंतर मी फारच आनंदांत होतें. खरेदी मनासारखी झाली होती. पण मी जेव्हां माझ्या सहसोबतीणीचें हिरमुसलेलें तोंड पाहिलें तेव्हां मात्र माझ्या आनंदावर थोडेंसें विरजण पडलें. तिची मनःस्थिति मी जाणत होतें, व किंचित्काल विचार करून मी खरेदी करून आणिलेल्या वस्तु तिच्यापुढे मांडल्या आणि म्हटलें, तुला यांतील जी कोणती वस्तु आवडेल ती तुझ्याकरितां ठेव. मुळीच संकोच करूं नकोस. वास्तविक मी खरीद-लेल्या वस्तु मोठ्या आवडीने आणिल्या होत्या. त्या मला हव्याहव्याशा वाटत होत्या; पण त्याजबरोबर मला माझ्या सहसोबतिणीची निराशा व मनोभंग पहावत नव्हता. तिचा उतरलेला चेहरा पाहून माझं मन तिच्याकडे ओढलें गेलें. तिने एक स्कार्फ स्वतःसाठी ठेवून घेतला. आणि या घटने-नंतर तिला माझ्याबद्दल इतकी आपुलकी वाटूं लागली की, आमचा प्रवास पुरा होईपर्यंत आमची फारच गट्टी जमली. मी परत मायभूमीस आल्या-नंतरहि मुंबईच्या पत्त्यावर तिचीं पत्रें अगदीं आतांआतांपर्यंत येत होतीं. आतां ती कोठें असेल कोण जाणे, पण त्या स्कार्फमुळे आमचा प्रवास व माझी स्मृति ही तिच्या मनांत किती खोलवर रुजलेली आहे, या सुखद कल्पनेने सुद्धा मला अजून इतके दिवस लोटल्यानंतरहि किती आनंद होत आहे. स्वतःच्या घरांत बारक्या-सारक्या वस्तूवरून पानपत-सोनपत करून लहानपणीं आम्ही भावंडें घर गाजवीत असूं; पण प्रवासांत निर्माण झालेल्या स्नेह्यासोबत्यांविषयींची आस्था व त्याग पाहिला म्हणजे माझें मलाच आश्चर्य वाटूं लागतें. असो. एडन शहर फार चांगलें वाटलें. हवा चांगली होती. कदाचित् आम्ही ज्या वेळीं गांवांत गेलों ती वेळ रात्रीची शांत वेळ असल्याने आम्हांस तसें वाटलें असावें. तेथें मिळणारीं खेळणीं इतकी विपुल आणि नानाविध प्रकारचीं होतीं कीं, मोठ्या माणसांनाहि खेळण्याचा मोह व्हावा. मार्केटिंग, शॉपिंग करीत मुंबईच्या निरनिराळ्या बाजारांतून हिंडण्याची संवय असलेल्या बायकांना एडन येथील बाजार म्हणजे नुसती चंगळ, खरेदीची पर्वणीच.

एडन सोडल्यानंतर सतत तीन दिवसांच्या प्रवासानंतर आम्ही सुएझला पोहोंचलों. त्या दिवशीं सप्टेंबरची १८ तारीख होती. सुएझ बंदर म्हणजे सुएझच्या कालव्याचें प्रवेशद्वार. बोटीवरच्या दैनंदिन कार्यक्रमाला

मी एव्हापर्यंत चांगलींच रुळलें होतें. एडन सोडल्यानंतर चांगला प्रवास झाला. बोटीवर सगळाच आराम. आठ वाजेपर्यंत झोपावें. उठल्यावर आयत्या तयार असलेल्या छोटया हजेरीला (ब्रेकफास्टला) जावें. खाऊन झालें कीं डेकवर हिंडावें, वाटल्यास खेळावें; नाहींतर खुशाल आरामखुर्चीवर पडून नजर पोंचत नाही अशा क्षितिजापर्यंत पसरलेल्या सागराच्या लाटांचीं मजा पहात वेळ घालवावा. समुद्राच्या अफाट विस्ताराची कल्पना येण्यास बोटींतूनच प्रवास करावयास हवा. श्रावणामध्यें पुणें-मुंबई प्रवास करतांना खंडाळयाच्या घाटांत एकामागून एक अशा हिरव्या रंगाच्या किती तरी विविध छटा बघावयास मिळतात. रंगाच्या पेटींतील रंग तर त्या मानानें अगदींच अपुरे, असं मला लहानपणीं चित्रें काढतांना वाटे. आतां समुद्राचे बघावे तों तीच तऱ्हा. एकच निळा रंग परंतु इतक्या अगणित छटा कीं, असल्या रंगकामाला निसर्गच चित्रकार हवा. समुद्राचा विशालपणा इतका विस्तृत आहे कीं, आमची एवढी मोठी बोट केवळ कागदाची होडी सरोवरांत टाकावी तशी दिसे. अधूनमधून इकडून तिकडे जाणाऱ्या दुसऱ्या बोटी भेटत. बोटीवर नकाशे असत. आपली बोट कोठें आहे, तें रोजच्या रोज दाखविणारा नकाशा असे. कोणती बोट कोठें आपल्याला भेटणार त्याची माहिती मिळे. बोटीचेहि फोटो मिळत व ते प्रवासी लोक आपापल्या घरीं भेट म्हणून पाठवीत. नानाविध व्यवसायांतील अनेक लोक बोटीवर असतात, भेटतात व महिना पंधरा दिवस एकमेकांच्या सान्निध्यांत घालवून नवे धागे जोडतात. पुन्हा उतरून दाही दिशांना गेलें कीं कोणाचा कोणाला पत्ता नाही. बोटीवरचें वातावरण मोठें गमतीचें असतें. एशिया बोटीवर जेवणा-खाण्याची व्यवस्था होती हें मी मागे सांगितलेंच आहे. दुपारीं १२ ते १ वाजतां आम्ही सर्वजण जेवणासाठीं (लंचसाठीं) जमत असूं. जेवणानंतर जरा वामकुक्षी, पत्रें लिहिणें, वाचणें, गप्पा मारणें, पुढील बेत ठरविणें, इत्यादि गोष्टी. दुपारीं ४ ही आमची चहाची वेळ होती. चहानंतर ऑर्केस्टा वाजत असे तो ऐकणें, आणि सायंकाळीं जेवण (डिनर) झाल्यानंतर डेकवर सर्वांनीं चांदण्यांत गर्दी करणें असा नुसता चैनीचा कार्यक्रम असे. रात्री कधी सिनेमा, कधी गेम्स, कधी गाणें-बजावणें, तर कधी इतर कांही मनोरंजनाचे कार्यक्रम केले जात असत. आमच्या बोटीवरील

प्रवाशांपैकीं पुष्कळसे प्रवासी रात्रीं आंघोळ करीत. मला मात्र सकाळीं आंघोळ करणेंच बरें वाटे ही संवय लंडनला पोहोंचल्यावर मोडली. तों पर्यंत मी सकाळींच आंघोळ करीत असें. सुएझला पोहोंचेपर्यंत मी पुष्कळच सरावलें होतें, व प्रवास मला मानवणार असें मला वाटूं लागलें. खाण्या-पिण्याच्या बाबतींत प्रगति जरी फारशी नसली तरी बोटीचा त्रास ( सी-सिकनेस ) वा आपण घरापासून दूर असून त्या योगानें वाटणारी खिन्नता (होम-सिकनेस) वाटेनाशी झाली होती. बोटीवर रंगीत फोटोग्राफी करणारे श्री नालावाला या नावाचे गृहस्थ होते. त्यांनी इतके सुरेख फोटो घेतले होते कीं, त्याचें वर्णनच अपुरें पडेल. ते जर्मनीत भरणाऱ्या फोटोग्राफीच्या प्रदर्शनांत भाग घेण्यासाठीं चालले होते बोटींत खुद्द मुंबईंत राहणारे बरेच उतारू होते. बोटींतून आम्हांला एडन दिसलें तेव्हां तें हुबेहूब विल्सन कॉलेजवरून मलबारहिलवर जातांना जसा देखावा दिसतो तस्से दिसलें. दिवे पुष्कळ, रस्ते आखीव व संध्याकाळची वेळ त्यामुळे बंदर फारच शोभिवंत दिसतें. सुएझ गांवांत गेल्यावर स्वस्त वस्तु असूनहि उतारू लोक इतकी घासाघीस घालीत की, नारळ स्वस्त मिळण्यासाठीं समुद्रकाठीं झाडा-वर जाऊन चढणाऱ्या लोभी ब्राह्मणाची आठवण व्हावी. मी घेतल्या त्या वेगळ्याच वस्तु. पण मला खऱ्या घ्यावयाच्या होत्या त्या निराळ्याच. एक मोठा ८×१०चा गालिचा मात्र मला फार आवडला होता. रडणाऱ्या मुलाला हिंडवणारी व दूध पाजणारी बाहुली, उड्या मारणारें व दूध पिणारें मांजर, भुंकणारा कुत्रा इत्यादि किल्लीचीं मजेदार खेळणीं घ्यावयाचीं राहिलीं. एडनच्या भूमीला पाय लागल्यानंतर मला बोटींत पाय टाकावयास नको असें वाटत होतें; पण सुवेझपर्यंत बोट अगदी सुद्धां हालली नाही. प्रवास बरा होत होता पण एक नवीनच काळजी सर्वांना लागली होती. एडन सोडल्यानंतर पी. अ‍ॅण्ड ओ. कंपनीच्या बोटी सुएझमार्गें न जाता केप ऑफ गुडहोपला वळसा घालून जात आहेत, या बातमीनें आम्ही ता. १५ तारखेपासून बेचैन होतों. नासरच्या ठाम धोरणानें युरोपीय बड्या राष्ट्रांना चांगलाच हादरा बसला. पी. अ‍ॅण्ड ओ. ही इंग्लिश कंपनी असल्यानें तिच्या बोटी सुवेझमधून नासर जाऊं देईल हें शक्यच नव्हतें आफ्रिकेला वळसा घालून जावयाचें म्हणजे आणखी दहा दिवस जास्त व आमचा

इटली-स्विर्त्झलंडमधून जाण्याचा बेत रद्द हें ओघानेंच आलें. बोटीवरील कुणाचे कांही कुणाचे कांही सर्वांचे कार्यक्रम विघडणार होते. कोणाला कॉलेजमध्यें प्रवेश मिळेल कीं नाही याची चिंता पडली, पैशांचें कसें करावें ह्याची पंचाईत पडली. श्रीयुत् नालावाला हे प्रदर्शनाची तारीख चुकणार कीं काय, ह्या फिकिरींत पडले. परंतु आपल्या हातीं कांही नाही ह्याची खात्री पटल्यामुळें म्हणा किंवा इतर कशामुळें म्हणा प्रत्येकजण मुक्या-मुक्याने हताश मनाने आपले रोजचे उद्योग उरकीत होता. गेले दोन-तीन दिवस असणारे खेळीमेळीचें उत्साहाचें वातावरण जाऊन त्याची जागा चिंतेने घेतली होती. प्रत्येकजण फिकिरींत होता. आम्ही दोघी--किरण व मी--आपण असेच अडकून पडलों तर काय होणार, कशाला ती मुंबई सोडून प्रवासाच्या मजेला निघालों, आतां होणार तरी काय देव जाणे अशा विवंचनेंत होतों. एवढ्यांत ता १७ ला आमची इटालियन बोट म्हणजे तटस्थ राष्ट्राची असल्याने सुएझमधून जाण्याची तिला परवानगी मिळाली आहे असें कळतांच बेशुद्ध पडलेल्या कुबड्याच्या घशांतलें हाड न्हाव्याने काढल्यानंतर तो जसा ताडकन् उठून बसला तद्वत् आम्ही सर्व भानावर आलों. (अरेबिअन नाईट्स् मधील न्हाव्याच्या कुबड्या भावाची गोष्ट) त्या दिवशीं बोटीवर इतका हर्षकल्लोळ झाला कीं सांगावयाची सोय नाही. आमचें दैव चांगलें म्हणून इटालियन बोटीवर येण्याची सुबुद्धि झाली असें म्हणून जो तो देवाचे आभार मानूं लागला. त्या रात्रीं बोटीवर फॅन्सी ड्रेस बॉल ठेवला गेला लोकांनी खाण्यापिण्याची, गाण्याची मजा करण्याची धमाल उडवून दिली १७ तारखेला पहाटे दोन वाजतां सुएझ कॅनॉलच्या मुखावर आमची बोट आली. आम्ही ती रात्र जवळजवळ जागूनच काढली. सकाळीं ९ वाजतां डेकवर नुसता बाजार भरून राहिलेला होता. अनेक-विध वस्तूंनी भरलेल्या लहान लहान बोटींनी आमच्या बोटीभोवतीं गराडा घातला चामड्याच्या इतक्या वस्तु विकण्यासाठी आल्या होत्या कीं डेकवर जिकडे तिकडे चामड्याच्या जिनसाच जिनसा झाल्या होत्या मोठाल्या सूट केसीस, बॅग्ज, बसावयाचीं आसनें, चामड्याचें उंट, मनिबॅग्ज, हॅन्डबॅग्ज पादत्राणें, एक ना दोन हजारों वस्तु आल्या होत्या व घासाघीस घालून स्वस्तांत स्वस्त वस्तु मिळविण्याचे आटोकाट प्रयत्न प्रवाशांचे व जास्तींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ...... वि: ......
नों: दि:



जास्त पैसे काढावयाचे दुकानदारांचे अशी चुरस चालू होती कधी न बघितल्याप्रमाणें वस्तूवर तुटून पडण्याची धनिकांची धडपड पाहून मला गंमत वाटत होती आणि पैसेच बेताचे असल्यामुळे सामानाचा हव्यास करणें मला अशक्य होतें. बोटीवरील आम्ही सर्वजण आतां खुश होतों एवढें खास.

सुएझवरून बोटीवरील कांही लोकांनी कैरोला ट्रिप काढली होती. कैरोला पिरामिडस् बघून नंतर त्यांनीं पोर्टसय्यदला बोट गांठावयाची असें ठरलें होतें. मला सुवेझ कॅनॉलमधून जाण्याची तीव्र इच्छा होती. म्हणून पिरामिडस् पहाण्याचा मोह टाकून मी बोटीवरच राहिलें. शिवाय अशा तंग वातावरणांत बोट सोडून जाण्यास मन धजेना हें तर खरेंच! आणखी एक कारण होतें, तें असें कीं, परत येतांना मी मध्यपूर्वेतून ( Middle East ) मधून येण्याचें जवळजवळ नक्कीं ठरविलेंच होतें. त्यामुळें परत येतांनाहि मला सुएझ कॅनॉलमधून येणें शक्य होणार नव्हतें. कैरो बघणें व सुएझमधून जाणें या दोन्हीपैकी एकच जमणें शक्य होतें. आणि यांतील मी दुसराच मार्ग पसंत केला

प्रवासाने माणूस पंडित होतो असें म्हणतात. कारण कधीतरी घडलेल्या घटनांचा अर्थ आणि कुठेंतरी आणि केव्हांतरी वाचलेल्या किंवा कानावरून गेलेल्या गोष्टींचा प्रत्यय त्याला प्रवासांत येतो हेंच असेल. सुएझच्या प्रसिद्ध कालव्यामधून जेव्हा आमची बोट आंत शिरली तेव्हा जागतिक महत्त्वाच्या बिंदूवरून जाणारीं सामान्य माणसेंहि मोठेपणाच्या कल्पनेने किती भारून जातात तें मला समजलें. ज्या सुएझच्या कॅनॉलवर अखिल जगाचे डोळे व कान खिळून राहिले होते त्या सुएझमधून मी जात होतें. लोकांना ज्या बिंदूपासून परतावें लागलें होतें त्या बिंदूवरून आम्ही तरंगत जात होतों. तांबडा समुद्र व भूमध्य समुद्र यांना जोडणारा सुएझ फारच रम्य आहे. दोन्ही बाजूंना केवळ ४०–५० फुटांवर जमीन आहे व कालव्याला असणाऱ्या समांतर रस्त्यांवरून मोटारी जात व ते लोक आमच्या बोटीकडे बघून रुमाल हवेंत उडवीत हात हालवीत आहेत, असलें दृश्य आज ८ दिवसांत कधींच बघावयास मिळालें नव्हतें. अतिशय रुक्ष असें वाळवंट बराच वेळ तुडविल्यानंतर एकदम हिरवळ (ओॲसिस Oasis) दिसली तर काय

अवर्णनीय आनंद होतो त्याची भूगोल वाचून कल्पना येणार नाही. पण रुक्ष प्रदेशानंतर मानवी चेहरे दृष्टीस पडल्यानंतर मात्र मला त्याची पूर्ण कल्पना आली. चोवीस तास पाणीच पाणी पाहून चक्करलेले डोळे इतक्या नजीक जमीन दिसल्यानंतर तिच्यावर स्थिर झाले तर नवल तें काय ? सुएझ कॅनॉल १२० मैल लांब आहे आणि तो ओलांडण्यास बरोबर एक दिवस लागला. तोंडाशींच ७–८ तास अडकून पडलों होतों तरी सुएझमधून जावयाला मिळणार, ह्याचाच आनंद झाला असल्यामुळे ती शिक्षा कांहीच नाही असें वाटलें. बोट हालत नव्हती. कालव्यांतून जाण्याचें औत्सुक्य होतें, सुरेख सृष्टिशोभा दिसत होती आणि बोटीवरच्या लोकांना काय करूं आणि काय नको असें झालें होतें. रात्र तर आम्ही जागूनच काढली. डेकवर बसून कालव्याकडे बघत बघत आम्ही पुढें जात होतों. पुन्हां हें पहावयाला मिळणार नाही म्हणून एक मिनिटसुद्धा खालीं केबिनमध्यें जाण्याची तयारी नव्हती. कालव्याचा कांही भाग फारच अरुंद असल्यामुळे रहदारी एकमार्गीच आहे. अर्थात् कालव्याच्या मुखांतून एका बोटीनें कालवा पार करण्याकरितां प्रवेश केल्यास ती बोट दुसऱ्या मुखानें बाहेर पडेपर्यंत इतर बोटींना कालव्याच्या मुखाजवळ थांबावें लागे. कालवा अरुंद असल्यानें एका वेळीं एकापेक्षा अधिक बोटींना त्यांतून प्रवास करणें अशक्यप्रायच आहे. दोन्ही बाजूंना इतक्या नजीक जमीन व मधून मोठ्या बोटी जाण्यासारखी पाण्याची वाट ही कल्पनाच करणें अशक्य. वसईच्या खाडीवरून छोट्याशा पुलावरून आगगाडी जाते तेव्हां वाटणारें सुखद भय व दोन्ही बाजूंस दूरवर वाळवंट व मधूनच पाण्याची पाउलवाट व त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या अजस्र बोटींतून जातांना अनुभवास येणारी दिङ्मूढ मन:स्थिति ह्या दोहोंचें वर्णन करणें कठीण. मानवाची कमाल आहे. निसर्गावर जय मिळविण्याची त्याची कर्तबगारी किती थोर !

कॅनॉल ओलांडून पोर्टसय्यदला आलों तों पहाटेचे २ ते २॥ वाजले होते. पहाटेच्या अंधुक प्रकाशांत असंख्य दिव्यांच्या पंगती मरीन ड्राइव्हच्या "क्वीन्स नेकलेसची" आठवण करून देत होत्या. लेसेप्सचा पुतळा बोटींतून दिसत होता. प्रत्येक जाणारी येणारी बोट पाहून लेसेप्सला किती धन्यता वाटत असेल असें मला उगीचच वाटलें. प्रत्येक प्रवाशाला मात्र

सुएझ ओलांडल्यानंतर लेसेप्सचा पुतळा पाहून गर्दिवरून आल्याखेरीज रहात नाही.

पोर्टसय्यदला पुन्हा सुएझसारखेंच तराफ्यावरून दुकानें घेऊन लोक आले व त्यांनी आमच्या बोटीला वेढा दिला. भराभर बोटीवर जिनसा चढविल्या व डेकवर बाजार मांडला. तुटपुंज्या शिदोरीवर प्रवास करणाऱ्यांचा लोंढा आपल्या खिशांत काय बसतें तें पहात हिंडूं लागला. पुनः पुनः वस्तु पहाणें, किंमत विचारणें, घासाघीस करणें आणि शेवटीं कांहीच न घेणें हें चालूच होतें. आमच्या बोटीवर एक मिस्टर व मिसेस जानकीराम नांवाचें कुटुंब होतें. त्यांच्या बरोबर दोन वर्षांचा मुलगाहि होता. तीं दोघें सुद्धां इतक्या पहाटे उठून बाजारहाट करण्यांत गर्क झालीं होतीं, रात्रीं बेरात्रीं शॉपिंग करणें आमच्या परिचयाचेंच झालें होतें, नव्हे तें भागच पडत होतें. कारण बोटीचीं बंदरें घेण्याची वेळच नेमकी अशी येई कीं, भलत्या वेळीं भलतें करणें असें कांही वाटतच नाहीसें झालें होतें. मनांत यईल तेव्हा जें शक्य असेल तें करणें असाच सर्वांचा कार्यक्रम असे. डॉ. जानकीराम हे हृद्रोग विशारद (Heart Specialist) होते. आणि त्याच विषयांतील एम. आर. सी. पी. ची पदवी घेण्यासाठी ते मद्रास सरकार-तर्फे इंग्लंडला निघाले होते. मी, त्यांची बायको व ते स्वतः, बोलत बोलत जिनसा बघत होतों. नंतर तीं दोघे खोलीवर गेलीं. मीहि माझ्या व्यवसायास लागलें. दुपारीं चार वाजतां योगायोगाने एकाच टेबलावर पुन्हां आम्ही चहासाठीं जमलों. गप्पा मारल्या व रात्रीं सिनेमाला गेलों. मिसेस जानकीराम आली नव्हती. कारण मुलगा झोपला होता. डॉक्टर थोडा वेळ बसले व नंतर निघून गेले. रात्रीं १० वाजतां सिनेमा चालू असतांनाच बोट इतकी हालूं लागली कीं, सिनेमा पहाणें मुष्कील झालें. सुएझ कॅनॉल संपल्यानंतर शनीसारखा निळा दिसणारा नयनमनोहर भूमध्यसमुद्र एका-एकीं खवळला. बोटीवरच्या खलाशांनी जेव्हा आमची बोट समुद्रवादळांत सापडली असल्याचें सांगितलें तेव्हा आणखी पांचावर धारण बसली, हें सांगणें नकोच! जीव मुठींत धरून आम्ही आपापल्या खोल्यांतून झोपलों होतों. झोपलों होतों म्हणण्यापेक्षा झोपण्याचें सोंग करीत असहाय स्थितींत पडून राहिलों होतों. एरवी मऊ वाटणाऱ्या गाद्यांचा आतां राग येत होता.

खोलींत लटकणाऱ्या लाइफबेल्टसकडे शून्य नजरेनें बघत, ते वापरण्याची वेळ येऊं नये म्हणून मी देवाची सारखी प्रार्थना करीत होतें. अगोदर तुफान, त्यांतून भयंकर कसले कसले आवाज, लाटांचा बोटीवर आपटणारा धडाका आणि रात्र असल्यामुळे बाहेर पडणें अशक्य. अशा स्थितींत डोक्यांत विचारांचा कल्लोळ उठला. माझीं मुलें, नाना, आई, वडील, भावंडें, पुन्हां मुलें, परत एकदां नाना यांचे चेहरे माझ्या मनःपटलावरून झपाट्यानें सरकत होते. अशाच स्थितींत मी केबिनमध्यें पडून राहिलें होतें. बोटीच्या एका कुशीवर तडाका बसला कीं बोट कलंडून उपडी होते कीं काय, असें वाटून पोट पिळवटून निघे. सर्वजण आपापल्या खोल्यांतून निपचित पडले होते; पण झोप कुणाला नव्हतीच, चित्त थाऱ्यावर नव्हतें. रात्रीचे १२ वाजले. तुफानाने अधिकच रौद्रावतार धारण केला. सर्वत्र काळोख माजला व त्यामुळें रस्ता दिसेना म्हणून बोटीवरील मोठ्या घंटा वाजूं लागल्या. त्यांचा आवाज आणखीच भयानक वाटूं लागला. माझ्या केबिनमधून डेकवर जाणारा रस्ता मी मनांतल्या मनांत आठवून वेळ पडल्यास त्यावरून किती जोरांत धावावयाचें हें अजमावून पहात होतें. इतक्यांत १२।–१२॥ च्या सुमारास केबिनवर थाप वाजली. दार लोट-लेलेंच असल्याने चटकन दिवा लावला गेला व किरण आली. तिच्याबरोबर आणखी दोन सहप्रवासी होते. ते बाहेर उभे होते. “ विजया, ऊठ. माझ्या बरोबर चल. कांहीं तरी विशेष घडलें आहे ” असें तिने म्हणतांच मी ताडकन् उठलें. कपडे चढविले. किरणने सांगितलें कीं, डॉ. जानकीराम हृदयक्रिया बंद पडून मरण पावले आणि त्यांच्या पत्नींस हे दुःखद वृत्त कसें सांगावें, हें न कळल्यामुळे केबिनच्या बाहेर उभे असलेले ते सहप्रवासी आम्हांस बोलावण्यास आलेले होते. आम्ही बाहेर पडलों. माझ्या केबिन-पासून जानकीराम कुटुंबाची केबिन बरीच लांब होती. ज्या रस्त्यावरून मघाशीं मी पळत जाण्याचा विचार करीत होतें त्या रस्त्यावर नुसतें चालतां येणेंहि मुष्कील झालें होतें. बोटीचा तांडव नाच चालूच होता. समुद्राचा धडाका सुरूच होता. आम्ही झोकांड्या खात खात झपाट्याने मिसेस जानकीरामकडे चाललों होतों. वाटेंत या बातमीची खातरजमा करण्यासाठी ऑफिसमध्यें डोकावलें व चौकशी केली. तो माणूस कांहीतरी गुळमुळीत

सांगत असतांनाच एका झोळींत गाठोडचासारखें बांधून दोघाजणांनी कांही तरी आणलें आणि समोरच असलेल्या स्ट्रेचरवर टाकलें. तोंडावर पांघरूण घातलेल्या डॉ. जानकीरामांना ते घेऊन गेलें. बोटीच्या अधिकाऱ्यांकडून आतां उत्तराची अपेक्षा करण्याचें कारणच नव्हतें; परंतु बोटीवरील शिरस्त्यास अनुसरून कप्तानाचा हुकूम येईपर्यन्त हें वर्तमान त्याच्या वायकोला सांगू नका असें त्याने बजाविलें व आम्ही मिसेस जानकीरामांकडे आलों. अवघी ३२ वर्षांची एम. ए., बी. टी. झालेली सोज्वळ मिसेस जानकीराम आमच्याकडे, "काय झालें. सांगा ना ?" म्हणून पृच्छा करीत होती आणि आम्ही एकामागोमाग एक खोटचा गोष्टी तिला सांगत होतों. तिला स्वत:ला "सी-सिकनेस"मुळे उलटचा होत होत्या, मुलगाहि नीट झोपत नव्हता. तिच्या खोलींत ती नव्हती. तिच्या शेजारच्यांनी आपली खोली तिला बसायला-उठायला दिली होती. तिच्या केबिनमध्ये क्लोरोफॉर्मचा वास येत होता. सामान तसेंच पडलें होतें. डॉ. जानकीरामांचा पार्थिव देह तर केव्हांच प्रेतालयांत नेऊन ठेवण्यांत आला होता. आणि आम्ही तिला सांगत होतो कीं, "त्यांना रुग्णालयांत नेलें आहे आणि सकाळीं काय तें आपण पाहूं. तुम्ही आमच्या खोलींत निजावयास चला." बिचारी मिसेस जानकीराम आपल्या दोन वर्षांच्या मुलाला घेऊन माझ्या खोलींत आली." १२ वाजतां डॉक्टर जानकीरामांना हृद्रोगाचा झटका ( Heart Attack ) आला. मिसेस जानकीरामला उलटचा होत असल्याने त्यांनी उठवत नव्हतें. जरा वेळ तसाच गेला आणि डॉक्टरना फारच अस्वस्थ वाटूं लागलें व ते छातींत दुखत असल्यानें ओरडूं लागले. मिसेस जानकीराम. उठली व तिनें बोटीवरील डॉक्टरांना बोलावणें पाठविलें व शेजारच्या केबिनवर थापा मारावयास सुरवात केली. वेळ तरी अशी कीं कोणाला कांही आंत ऐकूं येईना. बरेचजण ओकाऱ्यांनी बेजार होऊन हताश पडले होते. कांही सिनेमाच्या जाग्रणामुळे गाढ झोपेंत होते तर इतर दूर असल्याने येऊं शकत नव्हते. एकूण काय कीं, बराच वेळ कोणी बाहेर आलें नाही. मिसेस जानकीरामाला नवऱ्याजवळ बसावें, बाहेर जाऊन लोकांना उठवावें कीं डॉक्टरांसाठीं थांबावें कांहीच कळेना. डॉक्टर जानकीराम जास्तच ओरडूं लागले. डॉक्टर आले आणि सी-सिकनेसचा उपचार करूं लागले

डॉक्टर जानकीरामांनी स्वत:च स्टेथॉस्कोप लावला व हृद्रोगावर कोरॅमिन, अथवा मॉर्फिया द्या असें सांगण्याचा प्रयत्न केला पण त्या इटालियन डॉक्टरला, डॉक्टर जानकीराम काय म्हणत होते तें कळेना. "काय, काय" करण्यांतच आणखी पांच मिनिटें—अत्यंत महत्त्वाचीं पांच मिनिटें—गेलीं. ब्लडप्रेशर घेऊन एक इंजेक्शन दिलें गेलें; पण तें बोथट सुईमुळें आंत गेलें नाही. डॉक्टर व नर्स ह्यांची वाचाबाची होऊन दुसरी सुई आणून आणखी कसलें तरी इंजेक्शन दिलें गेलें. याच कालांत डॉ. जानकीरामांना अतिशय जोराचा झटका आल्याने ते मोठ्यांदा ओरडले. त्यांना रडूं आलें आणि मिसेस जानकीरामांना बाहेर नेण्यांत आले. आम्ही तिला " त्यांना हॉस्पिटलांत नेलें आहे," असें सांगत होतों पण; तिला तें कसें खरें वाटणार ? तिचा सासरा डॉ. सद्गोपन एक नामांकित हृद्रोग-प्रवीण डॉक्टर होता व त्याच्याच हाताखालीं डॉ. जानकीराम शिकला होता. हजारों केसेस तिच्या नवऱ्याचें हातांतून गेलेल्या तिने पाहिल्या होत्या. काय झालें असावें, हें तिला बरोबर समजत होतें; पण बिचारी सकाळपर्यंत कशी तरी धीर धरून होती.

"काय झालें, तें नक्की विचारून येतों", असें सांगून मी व किरण माझ्या केबिनमधून बाहेर आलों तें सकाळपर्यंत मिसेस जानकीरामाकडे जाण्याची हिंमत नव्हती. लाटांचा पिंगा चालूच होता. निसर्गावर जय मिळविणाऱ्या मानवाच्या कर्तबगारीचा मला वाटलेला गर्व केव्हांच वरील घटनांनी उतरला होता. निसर्गाने आपलें अक्राळविक्राळ रूप दाखविलें कीं, माणूस शेळीपेक्षांहि शेळपट बनतो हें मीं पाहिलें होतें. बोटीच्या हेलकाव्यामुळें पूर्णपणें हवालदिल झालेल्या आम्हां दोन बायकांची स्थिति अकस्मात् झालेल्या त्या भयानक घटनेमुळे आणखीच केविलवाणी झाली. शांत दिसणाऱ्या त्या भूमध्य-समुद्रांत हें अचानक वादळ आलें तरी कसें आणि केवळ एका जीवाच्या अशा असहाय्य अवस्थेमध्ये वळी घेण्यासाठीच आलें होतें कीं, आम्हां सर्वांचीच आहुति त्याला पाहिजे आहे, हें आम्हांला कळेना. ह्या वेळेपर्यंत बोटीच्या डेकवरूनसुद्धां पाणी वाहूं लागलें होतें. केप ऑफ गुडहोपला वळसा घालून जाण्यासाठी वळविलेली एक डच बोट नऊशें उतारूंसकट बुडाली, हें वर्तमान आम्हांला सकाळीं कळलें होतें आणि जवळ जवळ आमचें नशिब काय तें ठरलें आहे, अशी खात्री होत होती. फक्त

तसं बाहेर कबूल करवत नव्हतें. आपल्या माणसावर आपलें किती प्रेम असतें हें प्रवासांत ह्या अशा प्रसंगीं समजतें. ह्या वादळाला आणि ह्या बोटीला काय करावें हेंच आम्हांला समजेना. जर धोक्याची सूचना मिळाली तर निदान आपणाला लवकर तरी डेकवर जातां यावें म्हणून कोणीच झोप घेऊं शकत नव्हतें. बोटीवर आतांपर्यंत डॉ. जानकीरामच्या बातमीने थोडेसे लोक जागे झाले होते—ते भयभीत होतेच. घड्याळांत किती वाजले, तें बघावयासमुद्धां भीति वाटत होती. होतां होतां ती काळरात्र संपली. सकाळचें ६–६ा। वाजले. समुद्र पूर्णपणें शांत झाला नव्हता तरी दृष्टीला दिसत होता. दूर अंतरावर जमीन दिसत होती. रुक्ष खडकाळ काळे खडकसुद्धां आम्हीं अंतराचा अंदाज घेऊन नजरेच्या प्रेमाने गोंजारीत होतों. सकाळीं मिसेस जानकीरामला तें भयंकर वृत्त सांगण्यांत आलें. सगळीकडे सगळयांना समजलें. लोकांचा उत्साह साफ मावळला. सगळयांना तिला बघण्याची घाई झाली होती. एवढ्या बारा दिवसांत जिच्याशीं केवळ बाराहि लोक बोलले नसतील तिचा समाचार घेण्यास जवळ जवळ १२०० लोक आले. नेपल्स येथें गेल्यानंतर रोम-वरून मिसेस जानकीराम विमानाने परत मद्रासला जाणार होती. आपल्या मुलाला वाढविणार होती. आपल्या नवऱ्याचें शव विमानानें परत मायभूमीला न्यावें; हा मायेचा मोह तिने कठोर मनाने मुलाच्या भवितव्याकडे लक्ष देऊन दूर सारला. रोममध्येच त्याचें दहन करून मुलासह घरीं जावें, असा विचार तिने कायम केला.

"काळरात्र" या शब्दाचा अर्थ आम्हांला समजावून देऊन समुद्र शांत झाला. बोट डौलांत चालूं लागली आणि मनावर बसलेले आघात सहन न होऊन डोक्यांत उठलेलें काहूर मीं कागदावर ओतून टाकलें. सकाळीं उठल्यावर (म्हणजे आपलं तसं म्हणायचं. खरं म्हणजे आम्ही झोपलोंच नव्हतों) मी घरीं आईला सर्व हकीगतीचें सविस्तर पत्र लिहून टाकलें. १९ सप्टेंबर १९५६ ची रात्र. ज्या रात्रीं मंगळ पृथ्वीच्या जास्तींत जास्त जवळ आला. ती रात्र मी आयुष्यांत विसरणार नाही. मिसेस जानकीरामला विसरणार नाही. कुंडली वर्तविण्यावर विश्वास न

ठेवणारी मिसेस जानकीराम ३२ वें वर्ष स्वत:ला वाईट आहे; तेव्हा नवऱ्याबरोबर रहावें, ह्या विचाराने हट्टाने त्याच्याबरोबर निघाली आणि भविष्य खरें ठरवून परत गेली! जानकीरामची कथा संपली. दैवाच्या विचित्र लीलेचा पडताळा मला पटवून देणारी ही भयानक कथा त्या रात्रीबरोबरच संपली.

आयुष्यांत न विसरतां येण्यासारख्या दिवस-रात्री मीं बऱ्याच अनुभविल्या. १४ एप्रिल १९४४ च्या मुंबईच्या प्रसिद्ध गोदीस्फोटांत मी सांपडलें होतें. पुण्याहून जे. जे. स्कूलमध्यें पेंटिंगच्या परीक्षेसाठीं पाहुणी म्हणून मुंबईला आलेली मी, त्या स्फोटाने हादरून कित्येक दिवस खिळखिळी झालें होतें. त्या रात्रीं मी दुपारीं चार वाजतां बसलेल्या धक्क्याने दचकून जागी होत होतें. कोणाच्या चालण्याचा आवाज मला सहन होत नव्हता. साधें बोलणें कानठळ्या बसल्यासारखें लागत होतें. अन्नाला भुशासारखी चव लागत होती. झोप येऊन सुद्धां डोळ्यांच्या पापण्या मिटत नव्हत्या. त्यावेळचें माझें वय, माझी घराच्या घरट्याबाहेर पडण्याची पहिलीच वेळ, त्या मानाने तो धक्का फारच मोठा होता. डोक्यांतला कांचेचा भुगा पुढे कितीतरी दिवस मला भोंवला होता. मुंबईच्या वादळांतहि मी सांपडलें होतें. तेव्हाहि वादळाचा जोर ताशीं ऐंशी मैल, झाडें अगणित पडलेलीं, ती रात्र मी जागूनच काढली. भूकंपाचा धक्का बसल्याइतका तो धक्का सर्वांना बसला. असलें वादळ कधीच कुणीं पाहिलें नव्हतें. कमीअधिक साहसाच्या प्रसंगांतून जाणें मला नवीन नव्हतें; तरीहि जानकीरामाची रात्र मला सर्वांत भयाण म्हणून चांगली दीर्घ कालपर्यंत लक्षांत राहील.

• • •

# २

# नेपल्स ते लंडन

२१ तारखेला दुपारीं अंदाजें पांच वाजतां आमची बोट नेपल्सला आली. बोटींतून दिसणारें नेपल्स फारच सुरेख होतें. छोटयाशा किल्ल्यावर बरीचशीं घरें बांधावींत व पायथ्याशीं समुद्राच्या किनाऱ्यावर शंखशिंपल्याप्रमाणें माणसांचे ठिपके विखुरलेले दिसावेत तसें कांहीसें नेपल्स दिसलें. जन्माला यावें आणि नेपल्स पहावें असें म्हणतात. तितकें मात्र मला तें वाटलें नाही. खरं म्हणजे त्यासाठीं रिव्हेरा (Reveira) वर रहावयाला पाहिजे. इटालियन लोकांच्या बरोबर नेपल्समध्ये रहावयास पाहिजे; तर कदाचित् नेपल्सची खरी कल्पना आली असती; परंतु हें सर्व जमणार नव्हतें. नेपल्सच्या किनाऱ्याला बोट लागली तेव्हा जमिनीवर उतरून बोटींतील ती दुर्दैवी घटना विसरण्याची, मागे टाकण्याची घाई प्रत्येकाला झाली होती. बरेचसे उतारू पुढे जिनोआपर्यंत जाणार होते. तरी एक दिवस बोट तेथे थांबणार होती. बोटीवरील इटालियन नोकरवर्ग घर आलें म्हणून फारच आनंदांत होता. वास्तविक अशा फेऱ्या मारणें ही त्यांच्या नित्याची गोष्ट; तरीहि त्यांना नेपल्सच्या जवळ जवळ जसजशी बोट येऊं लागली तसतसें आनंदाचें भरतें आलें. नपल्सला बोट येतांना सिसिली बेटाजवळ काप्री म्हणून अतिसुंदर हवेचें, विसाव्याचें, मजेंत सुट्टी

घालविण्याचें एक बेट आहे. त्याला वळसा घालावा लागतो. आमच्या कप्तानाने अगदीं किनाऱ्याजवळून काप्रीलगत बोट चालविली होती. त्या खाडीमध्ये आपोआप बनलेल्या दगडी कमानी होत्या. त्यांमधून लहान लहान बोटींमध्ये बसून इटालियन तरुणतरुणी मनमोकळेपणाने हिंडत होत्या. समुद्राच्या लाटांचा अवखळपणा जास्त कीं त्या तरुण मनांचा जास्त, असा प्रश्न पडत होता.

बाळबोध वळणाने वाढलेल्या, सदा मनाला वळण लावण्याच्या प्रयत्नांत असणाऱ्या व रोजच्या दैनंदिन जीवनांतल्या साध्यासुध्या मन मोकळ्या हंसण्यांतहि संयम राखणाऱ्या मला स्वतःला त्या इटालियन लोकांचा दिलखुलासपणा पाहून फारच अचंबा वाटला. मोकळ्या वातावरणांत मोकळेपणाने वावरणारें युरोपियन लोक असें मी पहिल्यांदाच बघत होतें. बोटीवरून उतारू साद घालीत त्याला ते टुरिस्टस् (Tourists) प्रतिसाद देत आणि हे सगळे आवाज प्रतिनिनादित होत. बोटीच्या कप्तानाने मुद्दाम प्रतिध्वनि येण्यासाठी दोन-तीनदां भोंगा वाजविला कीं, त्याचा केवढातरी निनाद त्या कमानीमधून येई व दोन-तीनदां पुनरुच्चार करून दूरदूर कोठेतरी विरून जाई. आम्ही युरोपमध्यें आलों आणि अगदीं खूपखूप मोकळेपणा वाटूं लागला. आपल्या जराशाहि हालचालीवर, किंचित् बदल केलेल्या वेषभूषेवर, किंबहुना कांहीहि केलें (किंवा न केलें तरी) त्यावर स्वतःच्या देशांतल्या लोकांचें म्हणजे समाजाचें सारखें लक्ष असतें. युरोपांत कोणी कोणाच्या उचापती करावयाच्या प्रयत्नांत पडत नाही. ह्याचें प्रत्यंतर येण्यास सुरवात झाली. पंख फुटलेल्या पिलागत मला वाटत होतें. आतां माझ्यावर सतत देखरेख करणारें कोणीहि आवती-भोवती नाही. काय करावयाचें, कुठें जावयाचें, हें सर्व मी ठरविणार, कोणाला न विचारतां करणार, ह्याचा मला आनंद होत होता. बोटीवर सगळे तिऱ्हाईत, तरी होते भारतामधलेच बरेचसे. मनावरचें दडपण कां व कोण जाणे बोटीवरल्या प्रवासांत तितकेंसें दूर झालें नाही; पण काप्रीच्या नजीक मात्र बरणीचें झाकण काढल्याप्रमाणें मनाची उल्हसित स्थिति झाली.

नेपल्स येणार असें दिसतांच दुपारपासूनच चांगले कपडे वगैरे घालून लोक तयार होऊन बसले होते. खाणेंपिणें, चांगले कपडे करणें, इकडे तिकडे हिंडणें, गप्पा मारणें हा कार्यक्रम बोटीवर नवा नव्हताच. मीहि कपडे वगैरे करून डेकवर उभी राहून संपणाऱ्या बोटीच्या प्रवासाची शेवटची घटका अनुभवीत होतें. नेपल्सला खालीं उतरून बंदरानजीकच इकडे तिकडे आम्ही भटकत होतो. इंडिआना असें म्हणून इटालियन लोक आमच्याकडे माना वळवून बघत असत. इटलींत पाय ठेवल्याबरोबर लोक बदललेले दिसतात; परंतु इटालियन लोकांची चेहरेपट्टी, रंग वगैरे तितकासा वेगळा वाटत नाही. रस्त्यावरून हिंडतांना पुण्याच्या बुधवार चौकांतून जात असल्याचा भास बऱ्याच वेळां होई. रस्त्यांतून लहानसहान वस्तु, खाण्याच्या जिनसा विकणें हें अगदीं आपल्या इकडल्या सारखेंच. चैनीच्या समजल्या जाणाऱ्या वस्तु पुष्कळ. इटलींतील चालू नाणें लिरा. लिरामध्यें किंमत सांगितली कीं तिचा पौंडाच्या हिशेबानें रुपयाशीं मेळ घालतांना आमची फार तिरपिट उडे व वस्तु स्वस्त कीं महाग, हें मनाशीं ठरवावयालाच कितीतरी वेळ लागे. नेपल्सच्या बंदरापासून गाव लांब नाही. आम्ही रात्रीं बोटीवर राहणार होतो. फक्त हिंडण्यासाठी बाहेर पडलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नेपल्सपासून पॉम्पि म्हणून दोन हजार वर्षांपूर्वींचे खणून काढलेलें रोमकालीन शहर आहे तें पहावयास जाणार होतों. म्हणून बोटीवरील सामान रात्रींत उतरवून लगेजरूममध्ये ठेवून दिलें व फक्त थोडेंसें सामान जवळ ठेवलें. एका संध्याकाळमध्ये फारसें नेपल्स पहावयाला मिळालें नाही हें मात्र खरें. दुसऱ्या दिवशीं पॉम्पिला गेलों. मुंबईला पाहिलेल्या क्वो वाडिस आणि सॅमसन-डॅलिआ ह्या चित्रपटाची आठवण पॉम्पि पाहून ताजी झाली. ह्या चित्रपटांतील पुष्कळशी सेटिंग्स पॉम्पीवरून तयार केलीं असावींत. रोमन कालांतील रहाणीची कल्पना त्या अवशेषांवरून येत होती. ज्वालामुखीच्या राखेखालीं बुडालेलें तें गाव मात्र खणून काढीत आहेत व अजूनहि तें काम चालूच आहे. पॉम्पीला जातांना वाटेंत एक पोवळ्याच्या जिनसा तयार करण्याची फॅक्टरी लागते. ती पाहून मात्र डोळे निवले. पोंवळ्यावर केलेलें अतिनाजुक नक्षीकाम व शिंपल्याचीं खोदून काढलेलीं नयनमनोहर चित्रें पाहून मन थक्क झालें. अगदीं बारीक कठीण टोकाच्या हत्याराने शिंपांच्या

पाठी कुरतडून त्यांतून फक्त पाहिजे त्या आकाराचें चित्र वगळून बाकीचा भाग खोदून काढावयाचा यामध्यें भलतेंच कसब व कष्ट आहेत.

संध्याकाळीं आम्ही पॉम्पी पाहून परत आलों ते थेट स्टशनवर जाऊन रोमला जाणारी गाडी पकडली. बोटीवर मी व किरणने इटली स्वित्झर्लंड-मधून जाण्याचें ठरविलें. दुसऱ्या एका बोटीवरच्या आमच्या मित्रांनाहि ही कल्पना पसंत पडल्यामुळे तेहि आमच्यांत सामील झाले. आम्ही तिघे रोमला निघालों. रोमच्या आमच्या वास्तव्यांत आम्ही किती मैल चाललों आणि किती पायऱ्या चढलों तें सांगवत नाही. दोन दिवसांच्या रोमच्या वास्तव्यांत अतोनात हिंडलों. पहाण्यासाठी हपापलों होतों तर खरेच, परंतु रोम शहरहि इतकें सुंदर आहे, भव्य आहे कीं चालण्याचे कष्ट मुळींच वाटले नाहीत. रोम इतकी छाप माझ्या सर्व प्रवासांत मी पॅरिसला येई-पर्यंत कोठल्याहि शहरान माझ्यावर पाडली नाही. रोम मला व्यक्तिश: जे अतिशय आवडलें त्याचें कारण थोडे निराळें आहे. आमच्या घरीं माझ्या वडिलांना प्लॅस्टर्स, पोर्सलेन व मार्बल ह्यांचे पुतळे जमविण्याचा फार नाद होता व सर्वसाधारण लोकांच्या घरीं दिसणार नाहीत इतके पुतळे, चित्र, फ्लॉवरपॉट्स, नकशीच्या वस्तु, ज्याला क्युरिओस म्हणतात तसल्या वस्तु त्यांनी जमविल्या होत्या. लहानपणापासून रसग्रहण, गुणग्रहण करण्याची शिकवण मला नकळत मिळत गेली होती. चित्रकलेंत माझी थोडीफार प्रगति असल्याने चित्रांचेंहि मला फार वेड. तेव्हां रोमला आल्यावर जिकडे तिकडे पुतळेच पुतळे, प्रचंड पण प्रमाणबद्ध, अवाढव्य इमारती, विस्तृत रस्ते व जिकडे तिकडे चौकाचौकांतून कारंजीं पाहिल्यावर माझें मन हर-खून गेलें. आमच्या घरीं पुतळे लहान होते; पण त्यांपैकी प्रत्येकाची मानवी आकाराइतकी मोठी किंबहुना त्याहूनहि मोठी आकृति मला माझ्या रोम-मधील भ्रमंतीमध्यें कोठे ना कोठे तरी पहावयास सांपडली होती. मानवी देहाच्या हालचालींतील विलोभनीय सौंदर्य रोममधील शिल्पाकृतींत बद्ध-परिकर करून ठेविलेलें आहे त्या कालांतील शिल्पकारांच्या तीक्ष्ण दृष्टींतून मानवी शरिराची कोणतीहि लहानसहान हालचाल सुटलेली नाही, अशी रोममधील शिल्पाकृति पाहिल्यानंतर खात्री होते. मुंबईच्या फ्लोरा-फौंटनचा चौक पुण्याच्या अप्पाबळवंतांच्या चौकाएवढा व फ्लोराफौंटन हे

घरगुती बागेंतील कारंजाएवढे मला वाटूं लागले. रोममधील बागाहि फार भव्य. Three coins in the fountain ह्या सिनेमांतील प्रसिद्ध ट्रिव्हिटी कारंजें पाहून त्यांत एक नाणें टाकून आलें. त्यांत नाणें टाकलें तर पुन्हां रोमला आगमन होतें अशी समजूत आहे. रोमन राजे ज्या शाही नाट्यगृहांत (Amphi theatre) बसून जिवंत सिंह गुलामांच्या अंगावर सोडून सिंहाकडून गुलामांच्या किंवा ख्रिश्चनधर्मपंथीयांच्या देहांच्या चिंधड्या उडविलेल्या निर्दय अंतःकरणाने पहात असत व आनंद मानीत असत, तें नाट्यगृह आम्हीं पाहिलें. तें अद्याप शाबूत आहे. ख्रिश्चन लोकांचा छळ होत असतांना त्यांनी आपल्या मृत बांधवांना सुरक्षितपणें पुरतां यावें म्हणून भूगर्भांत बांधलेल्या चार मजली इमारती आहेत. त्यांनाहि आम्ही भेट दिली. मुंग्यांच्या वारुळांप्रमाणेंच ती मला वाटली. त्यांना रोममध्ये कॅटॅकोम्ब्स (Catacombs) अथवा मानवी वारुळेंच म्हणतात. पण रोम-मधील वास्तव्यांत जर मला कोणत्या गोष्टी अधिक आवडल्या असतील तर पहिली गोष्ट म्हणजे इटालियन लोकांच्या अंगांत मुरलेली जन्मजात रसिकता आणि दुसरी म्हणजे अतिशय भव्य प्रमाणावर बांधलेल्या इमारती व प्राचीन रोमन साम्राज्याचें काळजीपूर्वक जतन करून ठेवलेलें अवशेष. रोमची निर्मिति कांही एका दिवसांत झाली नाहीं. (Rome was not built in a day) असं फक्त रोमच्याच बाबतींत म्हणावे इतकें तें मोठें आहे.

प्रसिद्ध सेंट पीटर्सचें चर्च पाहिलें. त्याची उंची इतकी आहे कीं, मला खरोखरच वर बघून चक्कर आली. मी त्या चर्चच्या शेवटच्या टोकांपर्यंत गेलें होतें. शेवटच्या टप्प्यावर १५ मिनिटांत फोटो काढून देण्याची व्यवस्था आहे. सेंट पीटर्सच्या कळसाच्या पार्श्वभूमीवर आम्ही आमचा युरोपांतील पहिला फोटो काढून घेतला. सेंट पीटर्स चर्चमध्यें प्रार्थना व प्रवचन चालू होतें. अनेक लोक जात-येत होते. प्रवासी लोकांचें उत्पन्न रोममध्यें फार आहे. सेंट पीटर्समध्यें वाजणारा ऑर्केस्ट्रा अतिशय मधुर म्हणून नांवाज-लेला आहे. प्रार्थनामंदिरांतील भिंतीवर, खिडक्यांत, छतावर फार काय जेथे जेथे शक्य आहे अशा ठिकाणीं बायबलमधील प्रसंगांवर आधारलेली चित्रें काढलेलीं आहेत. त्या चर्चची बांधणीहि कौशल्यपूर्ण व अप्रतिम

आहे. सेंट पीटर्समध्यें सर्वात उंच असलेल्या कळसामध्ये जाऊन खालीं पाहिलें तर मुंग्याएवढीं माणसें दिसतात. शिवाय मायकेल अँजेलो ह्यानें काढलेलीं चित्रें अगदीं जवळून पाहतां आलीं.

रोमला व्हिला बोर्गिस म्हणून एक अतिसुंदर व भव्य राजवाडा आहे. नेपोलियनची बहीण होती तिने अर्ल ऑफ बोर्गेसशीं लग्न केलें होतें व अतिसुंदर अशा राजवाड्यांत तीं दोघे रहात होतीं. त्यांनीं एकापेक्षा एक संदर वस्तु जमविल्या होत्या. त्या अद्याप तेथेच ठेविलेल्या असून प्रवाशां-कडून अल्प मोबदला घेऊन त्या त्यांना दाखविण्यांत येतात. तो राजवाडा म्हणजे प्रवाशांकडून रोमला मिळणाऱ्या उत्पन्नाची एक जागा आहे. त्या राजवाड्यांतील भव्य आणि सुंदर चित्रें व पुतळे पाहून थकलेले, खुपऱ्या आलेले डोळेंहि बरे व्हावे. डोळ्यांना दिलासा देणारी मैलच्यामैल घेरांची राजवाड्याच्या भोवतालची बाग पाहिल्यानंतर तेथेच रहावेंसें वाटूं लागलें. त्या राजवाड्यांत एका दिवाणखान्यांत डचेस ऑफ बोर्गेसचा संगमरवरी बैठा पुतळा आहे. तो पुतळा मात्र तेथील सर्व निर्जीव वस्तूंना सजीवपणा आणतो. सेंट पीटर्समधील मायकेल अँजेलोने काढलेलीं चित्रें, बोर्गेस पॅलेस-मध्ये व युफेजी गॅलरीमध्ये राफेल, डिओडिमो, लिओनार्ड डि व्हिन्सी या जगद्विख्यात चित्रकारांचीं चित्रें म्हणजे नुसती मेजवानीच आहे.

सिटी गॅलरी बंद होती; पण तेथील बाग उघडी होती. ती इतकी सुंदर होती कीं, मला तेथून परत येववेना. सिमेंट कॉंक्रीटच्या किंवा दगडाच्या लांबचलांब कमानी असलेल्या इमारती सबंधच्या सबंध झाडा-वेलींनी मढवून काढल्या म्हणजे जशा दिसतील तशी ती बाग केलेली आहे. पावसाळी हवा, खूपच लांबरुंद रस्ते, आखीव उद्यान-रचना, सुंदर सुंदर कारंजीं व तलाव ह्यामुळें तेथें अगदी सुखद व विलोभनीय वातावरण निर्माण झालेलें आहे. त्यांतून सगळीकडे शांतशांत असे. डिओ डिसीच्या चित्रांतून नुकत्याच पाहिलेल्या राण्या सजीव होऊन ह्या बागेंतून हिंडल्या तर कशा दिसतील, ही काव्य-कल्पना करीत मी किती वेळ तरी दुसऱ्याच कोणत्या जगांत वावरत होतें. फ्लॉरेन्सला पुतळे व कलाकुसरींच्या वस्तु विपुल. फ्लॉरेन्स शहर इतकें सुरेख वाटलें नाही.; परंतु घरगुती वाटलें. मिलानला आल्यानंतर तेथील कॅथेड्रल पाहिलें; पण तें बाहेरून. त्या दिवशीं

तें बंद होतें. बाकी बघण्यासारखें कांही नव्हतें आणि "अंतिम भोजन" (Last Supper) हें लिओनार्ड डि व्हिन्सीचें अप्रतीम चित्र पहावयास जाणार होतें; पण उशीर झाल्याने तें पहावयास मिळालें नाही.

माझा इतका जलद प्रवास चाललेला होता कीं, त्यामध्ये घरून पत्रें मिळण्यासारखीं नव्हतींच. बोटीवर पत्रें बंदरांतून मिळण्याची सोय असते. मला शेवटचें पत्र नेपल्सला आमची बोट आली तेव्हा मिळालें होतें. वेळ मिळेल तेव्हां मीच घरीं पत्रें पाठवीत होतें. उत्तरांची अपेक्षा न करतां जमेल त्याप्रमाणें रंगीत भेटकार्डें पाठवीत होतें. नेपल्सला मिळालेल्या पाकिटांत पत्राबरोबर मुलांचे फोटो मिळाले. ते पाहून मला इतका आनंद झाला कीं विचारतां सोय नाही. इतक्या लांब इतके दिवस आपल्या माणसांपासून मी कधींच कोठें गेलेली अगर राहिलेली नव्हतें.

नेपल्स ते रोम व रोम ते फ्लॉरेन्स हा प्रवास फारच छान झाला. जमिनीवरचा प्रवास, समुद्रप्रवासाच्या-मानाने किती सुखाचा वाटला. दुतर्फा द्राक्षांचे मांडव, हारीने फरचीं झाडें, रेखीव शेतें व मुबलक पाणीपुरवठ्यामुळे सर्वत्र प्रसन्न अशा वातावरणांत अगदीं बेछूटपणे द्रुतगतीने धावणारी आमची गाडी यामुळे प्रवास फारच सुखकर झाला. जमिनीवर झोपलों असलों तरी तोंडाने अलगद खाता येतील असे जमिनीलगतचे द्राक्षांचे घोंस पाहून कुतूहल वाटलें आणि मनांत असा प्रश्न उभा राहिला कीं भर रस्त्यावर आणि आगगाडीच्या दुतर्फा असलेल्या शेतांतून हें द्राक्षांचे घोंस चोऱ्या न होतां सुरक्षित रहातात तरी कसे? लाललाल सफरचंदांनी ओथंबलेले वृक्ष, पीअर्स, पीच यांची झुबकेदार लागवड बघून मला माझ्या मुलांची आठवण झाली व तीं फळांनी बहरलेलीं झाडें पाहून त्यांना बेहद्द आनंद झाला असता व ती फारच खुश झालीं असतीं, असा विचार मनांत आला. इटालियन लोक फार रंगेल आहेत. रंगीबेरंगी कपडे घालून शेतांतून काम करणारे लालबुंद शेतकरी पाहून समाधान वाटतें. त्यांची कींव येत नाही. त्यांचा हेवा करावासा वाटतो. संध्याकाळीं विसाव्याच्या वेळीं जोडप्याने फिरत फिरत गाणीं गात गात ते जाऊं लागतात तेव्हा आपल्यालाहि नकळत रुक्षपणाचा बुरखा टाकून देऊन त्यांच्यांत मिसळावेंसें क्षणभर वाटतें. बहुतेक इटालियन्स गाण्याचे शौकीन आहेत. कला तर त्यांच्या

रक्तांतच आहे आणि रसिक दृष्टि पहिल्या दर्जाची आहे. रोम पाहून माझे डोळे निवले. रोम नुसतेंच भव्य नाही तर सुंदरहि आहे, कोरीव आहे, रेखीव आहे आणि तरी जिवंत आहे. रोमहून फ्लॉरेन्सला आल्यावर हॉटेल मेट्रो-पोलमध्यें आम्ही राहिलों व एक दिवस तेथे राहून मिलानला गेलों. रोम-पुढे फ्लॉरेन्स, मिलान म्हणजे मुंबईपुढे जळगांव, धुळें तशीं वाटतात. मिलान हें औद्योगिक केंद्र असल्यामुळें गांव तसें बरें आहे. रोम-फ्लॉरेन्स-मिलान हा प्रवास सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने नमुनेदार आहे. ठाण्याजवळच्या पारसिकच्या बोगद्यापेक्षां कितीतरी मोठमोठे बोगदे ह्या मार्गावर आहेत. फ्लॉरेन्स-मिलान मार्गावरील एक बोगदा तर सबंध जगांत मोठा असावा. मिलान ते ल्यूसर्न हा प्रवास तर प्रवासीमंडळी कधीहि चुकवीत नाहीत. स्वित्झर्लंडवर निसर्गाची कृपा अतिशय हें खरेंच; पण लोकहि तसेंच अशा कृपेस पात्र आहेत. येथील निसर्गाचें वर्णन मीं काय करावें ! कदाचित् आपल्याकडील दार्जिलिंगशीं तेथील कांही सृष्टिशोभेची तुलना करतां येईल. लोकरीचे गालिचे अंथरावे अशीं मोठालीं अलग कुरणें, मेंढयांच्या अंगावर लोकर असते इतक्या दाटीदाटीने उगवलेली झाडें, डोंगरच्या डोंगर लोकरीचे कोट घालून बसले आहेत असें वाटावें इतकी झाडांची गर्दी, उंच शिखरावर बर्फ पडलेलें दिसे. दुलईतून छोटया बाळाने तोंड बाहेर काढून सूर्य किती वर आला आहे तें पहावें अशासारखी डोकावणारीं छोटीं-छोटीं घरें खोल दरीच्या खोऱ्यांमध्ये मधून मधून दृष्टीस पडत. कडयावरून उडया मारणारे धबधबे, फरचीं झाडें आणि सोसाटयाने पळत जाणारी आमची गाडी. वॉल्ट डिस्नेचें Wonder land म्हणजे स्वित्झर्लंड, म्हणजे युरोपचें काश्मीर. त्यांतील स्वर्ग म्हणजे लुगानो प्रांत, म्हणजे किती रम्य निसर्ग असणार ह्याची कल्पना करा. लुगानो प्रांत ओलांडून फ्लुएलिनला उतरून मोठ्या सरोवरांतून तीन-साडेतीन तासाचा रम्य प्रवास करून आम्ही इंटरलाकनला पोहोंचलों. सरोवरांत दोन्ही बाजूंनी हंस फिरत आहेत. दोहोंबाजूस दूरवर रमणीय निसर्गाचीं नवीं नवीं दालनें उघडतांना दिसत आहेत. रंगीबेरंगी होडयांतून मजेसाठी विहार करणारे खुशालचेंडू रंगेल लोक बेदरकारपणें हिंडत आहेत व आरशावरून मोती घरंगळत जावा तशी आमची सुंदर बोट वळणें घेत घेत सगळीं सरोवरें पालथीं घालत आहे, अशा वेळीं मला घरच्या

लोकांची फारच आठवण होणें साहजिकच होतें. फ्लुएलिन ते इंटरलाकन हा प्रवास आगगाडीनेंहि करतां येतो. "तिळा दार उघड" म्हटल्यानंतर गुहेच्या आंत जशीं एकामागून एक दालनें अलिबाबाला दिसलीं तशीं दालनें निसर्गानें आम्हांला ह्या सरोवरांतून प्रवास करतांना दाखविलीं म्हटलें तरी अतिशयोक्ति बिलकुल होणार नाही. अर्थात् सभोंवतीच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्यास माणूस रंगेल हवा. हें खरें असलें तरीहि ह्या भागावर निसर्ग इतका बेहद्द खुश आहे कीं, स्वभावनिष्ठ रूक्षपणा, वा बोजडपणा रहाणेंच शक्य नाही. निसर्गाशीं किती बेदरकारपणे व फटकून वागतों आपण. नित्यनेमाच्या व्यावहारिक कटकटीमुळें आपण आपल्याच क्षुल्लक गोष्टींच्या कैफांत धंद असतों. स्विन्झर्लंडमध्ये निसर्गाशीं मिळतें-जुळतें धोरण ठेवून आपल्या सुखांत भर कशी पाडावयाची हें त्या लोकांना चांगलेंच माहीत आहेसें दिसलें.

मुंबई सोडल्यापासून एक-दोन दिवस सोडले तर कोणत्या ना कोणत्या कारणाने बोटीवरचा प्रवास सुखकर असा वाटलाच नव्हता. तें बोटीचें हालणें, तें खाणें-पिणें, कोणकोणते तरी लोक भेटणें व त्यांचें औपचारिक आणि केविलवाणें वाटणारें वागणें. मला अगदीच कसंतरी वाटत होते. कदाचित् मीं पहिल्यांदाच असा प्रवास केला म्हणूनहि कदाचित् तसं झालं असेल. कारण बाकीचे लोक मजा करीतच होते. बोटीवर सुरू झालेलें "लागे हृदयीं हुरहुर" हें गाणें नेपल्सला उतरल्यानंतर थांबलें आणि फारच भयंकर अशा त्या जानकीरामाच्या काळरात्रीनंतर नेपल्सला उजाडलेली पहाट इतकी सुंदर वाटली कीं, "प्रिये पहा, रात्रीचा समय सरुनि येत उषःकाल हा" हें गाणें म्हणायला फक्त नानाच जवळ नाहीत असें वाटलें. रोम शहर पाहून मात्र मला दिपल्यासारखं झालं खास. माझा आत्मा मूळचा रसिकतेचाच. व्यवहाराची झळ त्याला मानवत नाही, रुचत नाही, बाधत नसेल इतकेंच, परंतु चमत्कारिक वस्तु पाहण्यांत मनानेंच नवी सृष्टि कल्पून त्यांत दंग होण्यांत तो जास्त रमतो. जेथे जेथे भव्यता आणि दिव्यता सांपडेल तेथे तेथे मन रिझविण्याची त्याची मूळ प्रवृत्ति. ह्या अशा रोमसारख्या ठिकाणीं तें जागृत होतें. (आणि मागून विझतें हा व्यावहारिक दक्षतेचा प्रभाव आहे). रोममध्यें मानवी कर्तृत्वाच्या साक्षी-

पुराव्याने ठेविलेल्या भव्य कृति पाहून झालेला दर्प मिलान ओलांडून स्वित्झर्लंडमध्यें आल्यानंतर निसर्गाच्या दिव्य भव्यतेने खाडकन् उतरतो. टेक्निकलरमध्यें अतिशयोक्तीने तर राहोच; परंतु खऱ्याखुऱ्या दिसणाऱ्या निसर्गशोभेचे देखावेसुद्धा तितक्या प्रामाणिकपणें चित्रित होऊं शकत नाहीत, हा नवा शोध मला स्वित्झर्लंडमध्यें लागला. रंगाच्या पेटींतले बावीस रंगहि ढोबळ व प्रामाणिक स्वरूपाचे रंग वाटूं लागावेत इतकें सुंदर सृष्टीचे रम्य देखावे एकापाठोपाठ एक, हारीने ओळीने एकापेक्षां एक वरचढ असे मांडून ठेविलेले आहेत आणि ह्या एक-मानव-देखाव्याचा (One man show) कर्ता कोण तर निसर्ग ही शक्ति. एकापेक्षां एक सरस गालिचे विणून तयार झाल्यानंतरहि अजून नवे नवे प्रयोग करून ह्या निसर्ग-शक्तीला आजपर्यंत न दिसलेला कसलातरी नवा गालिचा अजून अंथरावयाचाच आहे, हें स्वित्झर्लंडमध्यें हिंडून समजतें. त्याचप्रमाणें तिच्या मनांत आहे तसला गालिचा मानवाला या जगाच्या अंतापर्यंत करून दाखविणें जमणार नाही हें सत्य उमगतें तें तिथेच. चित्रकला ओझरती शिकण्याचा आनंद आणि ती पेटी तशीच मिटून ठेविल्याचें दुःख मला आजपर्यंत इतक्या तीव्रतेने कधी झालें नव्हतें. हिंदुस्थानांत दार्जिलिंगला अशी वेड लावणारी निसर्गशोभा आहे म्हणतात. असेलहि; मला माहीत नाही; परंतु ल्यूसर्न ते फ्लूएलिन मात्र असला जादूचा प्रदेश आहे हें खास. हें मीं पाहिलें आहे. बालकवि ठोमरे ह्यांना स्वित्झर्लंडांत आणिलें असतें तर त्यांनीं काय कविता केल्या असत्या ह्याचा मी विचार करीत होतें. (कागदावर एकहि कल्पना उतरली गेली नाही हें खरेच).

इटली, स्वित्झर्लंड येथील प्रवासामध्ये गाड्या छान, वेळेवर येणाऱ्या-जाणाऱ्या, बिनगर्दीच्या, थोड्याशा महाग—परंतु सोयीमुळे त्या स्वस्त वाटल्या आणि मानवी श्रमाची सांगड घालण्यासाठीच जणूं निघाल्या आहेत, अशा डौलांत जाणाऱ्या भेटल्या. आगगाड्या इतक्या छान आहेत कीं, वर्णन करून कल्पनाच येणार नाही. मोठ्या नदीच्या खालून बोगदे खणून आगगाड्या जातात व त्या आगगाड्यांच्या खालून आणखी खोल बोगदे खणून आणखी दुसऱ्या आगगाड्या चालवितात. त्यांत बसावयाला जावयाचें म्हणजे आपण जिने चढावयाचे किंवा उतरावयाचे नाहीं; तर फिरणारे जिने असतात.

त्यावर नुसतें उभें रहावयाचें कीं, आपण आपोआप वर किंवा खालीं जाऊं शकतों. ह्या जिन्यांना "ॲक्स्केलेटर्स" असें म्हणतात. स्वित्झर्लंडांतील लोक म्हणजे केवळ दृष्टीला आनंद देणारे आहेत. प्रकृतीनें उत्तम, गोरा रंग, सफरचंदासारखे गाल व नटवेपणा नाही म्हटलें तरी चालेल. एकूण रहाणी महागाईचीच, वस्तु वगैरे सर्व महाग, परंतु अति सुंदर. इंटरलाकन येथें आम्ही २–३ तास होतों. तेवढ्यांत मी एक लोंकरीची लहान मुलींना घालावयाची टोपी धनवंतीसाठी घेतली. प्रसिद्ध म्युझिक बॉक्स घेतली. कक्‌ क्लॉक्स पुष्कळच होती; पण मी घेतलें नाही. स्विस लोक फार कल्पक आहेत. घड्याळांमध्येंहि कल्पकता दिसून येते. आम्ही बर्न म्हणून एक गांव आहे तेथे गेलों होतों. तेथें एका चौकांत खूप मोठें टॉवर क्लॉक आहे. त्यांत दर तासाला एक कोंबडा ओरडतो. एक शिपाई तलवार हालवितो व अस्वलांची परेड म्हणजे,—बाबा अस्वल, आई अस्वल, ताई अस्वल, बाळ अस्वल अशीं बाहेर येतात, परत आंत जातात आणि नंतर राजा सिंहासनावर बसून मान हालवितो आणि मग सर्वांची हालचाल थांबते. दर तासाच्या ठोक्याला हा सर्व कार्यक्रम होतो. दूर देशांहून आलेले आमच्यासारखे प्रवासी इकडे तिकडे घुटमळतात व नेमके तासाच्या ठोक्याला त्या चौकांत गर्दी करून उभे रहातात. स्वित्झर्लंडमध्ये ल्यूसर्नपासून फ्यूएलिन, इंटरलाकन, बर्न, बाल ते जिनिव्हा असा शक्य तेवढा मोठा वळसा घेऊन आम्ही जिनिव्हाला पोहोंचलों, तेव्हा एखाद्या सुंदर स्वप्न-सृष्टींतून वावरत असल्यासारखें वाटत होते. सेंट गोथार्डस पाथ म्हणून आल्प्सचा एक अतिशय सुन्दर भाग आहे; तोहि आम्ही ओलंडला. पुष्कळसे लोक येथें उतरून अगदी वर माथ्यावर जातात. तेथून बर्फाच्छादित आल्प्सची शोभा कांही अवर्णनीय आहे असें जाऊन आलेले प्रवासी सांगत; पण आम्हांला वेळ नव्हता. वेळ नव्हता असें म्हणावयाचें कारण आम्हाला १ ऑक्टोबरच्या आंत लंडनला पोहोंचावयाचें होतें. स्वित्झर्लंडमध्ये आम्ही फारच रमून गेलों होतों. हवा इतकी छान कीं कांहीहि व कितीहि श्रम केले तरी दमल्यासारखें वाटू नये. अंगांत सारखे गरम कपडे घालणें भाग होतें. गरम कोट घालून खिशांत चॉकोलेट टाकून हिंडूं लागलो कीं वेळाचें भान रहात नसे. खाण्यापिण्याची स्वित्झर्लंडमध्यें चंगळ. सफरचंद, चीज,

लोणी, चॉकोलेट्स खाण्याची पद्धत मला फारच मानवली. सफरचंदाच्या माळा (आपल्याकडे कांद्यांच्या करतात त्याप्रमाणें) करून विकण्याची पद्धत इकडे दिसली. स्वित्झर्लंडमध्ये बहुतेक करून इतर देशांचेच लोक जास्त दिसतात. कोणीहि प्रवासी युरोपच्या कोणत्याहि भागांत जावयाचें असले तरी स्वित्झर्लंड ओलांडल्याशिवाय जात नाही. तरीहि स्वित्झर्लंडमध्ये सुबत्ता पुष्कळच वाटली. प्रवासी लोकांकडून उत्पन्नाचा फार मोठा भाग मिळत असल्यामुळे प्रवाशांबद्दल तेथे आस्था फार आहे. सगळ्याच देशो-देशींचे लोक येत जात असल्याने इटली वगैरे देशांत इंडिआना म्हणून ज्या कुतुहलाने लोक आमच्याकडे एकसारखे येतां-जातांना बघत तसें येथे दिसलें नाही. इटलीपेक्षांहि स्वित्झर्लंडमध्ये आल्यावर मात्र माझ्या डोक्यांत जसें युरोप असेल असें वाटलें होतें तसें तें दिसूं लागलें हें निश्चित.

जिनिव्हाला आम्ही आलो. तेथे किरणच्या ओळखीचे इंटर नॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचे डायरेक्टर श्रीयुत राव म्हणून होते. मिसेस राव फ्रेंच व श्रीयुत राव इंडियन. ह्या दोघांनी आमची चांगली विचारपूस केली. त्यांची मुलगी सीता म्हणजे केवळ चित्र. भारतीय माणसाची संपूर्ण-पणें पाश्चिमात्य संस्कृतींत वाढलेली माझ्या पाहण्यांतील ती पहिलीच मुलगी होती आणि म्हणून मला तिच्याबद्दल फार कुतूहल वाटलें हिंदुस्थानाबद्दल तिला आपुलकी वाटावी म्हणून मि. व मिसेस राव ह्यांचा प्रयत्न चालू होता व त्यासाठी मधून मधून ते तिला हिंदुस्थानांत आणीत. तिचे केसहि त्यांनी वाढविले होते, नांवहि संपूर्णपणें भारतीय पद्धतीचें ठेविलेलें होतें. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा तिचे ठायी झालेला संगम पाहून मी त्या वेळेस किती दिङ्मूढ झालें होतें ह्याची अजूनहि मला पक्की आठवण आहे.

जिनिव्हाला आम्ही यंग वुइमेन्स ख्रिश्चन असोसिएशनच्या ऑफीस-मध्ये गलों होतों. बायकांची इतक्या मोठ्या प्रमाणावर सर्व जगांत विखुर-लेली अशी ही एकच संघटना आहे. तिचें मध्यवर्ति कार्यालय जिनिव्हाला आहे. त्यांची इमारत नुसतीच भव्य व सुंदर नाही; तर ती जिनिव्हा सरोवराच्या लगत असल्यामुळे पहाण्यासारखें ठिकाण झालेली आहे. तेथील कार्यालयामध्यें काम करणाऱ्या बायकांनी आम्हांला चहासाठीं थांबवून

घेतलें. आम्हीं सर्वांबरोबर चहा घेतला. तिथे जगभर प्रवास एकदा नव्हे अनेकदा करून आलेल्या युरोपियन बायकांशी गप्पागोष्टी केल्यानंतर मी इतकी वर्षें स्वतःला किती कोंडून घेतलें होतें, ह्याची मला फार तीव्रतेने जाणीव झाली. खरं म्हणजे ऑफिसांत काम करणाऱ्या स्त्रियांसाठी ती रोजची चहाची व्यवस्था आहे ह्यावर माझा विश्वास बसला नाही. इतकी सुंदर कलात्मकतेने सजविलेली खोली नेमक्या वेळेस सर्व स्टाफ मेंबर्सनी भरून गेली. एकमेकींशी गप्पा मारीत सरोवराची शोभा बघत सर्वांनी चहा घेतला व अर्ध्या-पाऊण तासाने सर्वजणी आपापल्या कामाला निघून गेल्या. त्यांच्या सेक्रेटरीने आम्हांला सर्व माहिती, जरूर त्या मदतीचें आश्वासन, पत्रें वगैरे देऊन आमची इतकी आस्थापूर्वक बोळवण केली कीं मला वाटलें कीं, परत मुंबईला गेल्यावर ह्यांच्या संघटनेंत शिरलेंच पाहिजे. पुन्हा जास्त लघटपणा नाही, तुटकपणा नाही. आपल्या संघटनेच्या दृष्टीने करतां येईल तितकें जास्त काम करण्याची तिची इच्छा. मला ती वागण्याची पद्धत फार आवडली. जिनिव्हाला पाहिलेल्या बायकांचे चेहेरे मला आतां आठवत नाहीत; पण माझी यंग वुइमेन्स ख्रिश्चन अ‍ॅसोसिएशनला दिलेली पहिली भेट मात्र चांगलीच लक्षांत आहे.

जिनिव्हांतून आम्ही फ्रान्समध्ये शिरलों. पॅरिसला जाण्याच्या कल्पनेने मन भारावून गेलें होतें. इटलींतील रंगेलपणा, कलासक्ति, स्वित्झर्लंड-मधील सृष्टिसौंदर्य, सुबत्ता व साधेपणा, आतां फ्रान्स कसें असेल अशी कल्पना करीतच प्रवास झाला. पॅरिसमध्ये आम्ही काय काय बघणार, ह्याची चर्चा आम्ही करीत नव्हतों. कारण पॅरिसला आम्ही थांबणार नव्हतों. लगेचच्या गाडीने पुढे जाऊन लंडन गांठणार होतों. तरीहि पॅरिस तेवढ्या अर्ध्यापाऊण तासांत कसें दिसेल, ह्याचे नकळत विचार येत होते. २८ सप्टेंबर १९५६ रोजीं मी पॅरिसला पाय ठेवला होता. पॅरिस बघण्यास वेळ नव्हता; तरीहि गाडीला अर्धापाऊण तास होता तेवढ्यांत कांहीं तरी पॅरिसचें दिसेल अशा अपेक्षेने आम्ही स्टेशन बाहेर आलों आणि हरे राम ! टॅक्सी मिळविण्यासाठी काय ती झुंबड. तशांत पाऊस पडतच होता. लोक ओळी लावून उभे होते. पॅरिसला चार स्टेशन्स आहेत. मुंबईला जशीं बॉम्बे सेंट्रल आणि व्हिक्टोरिया टर्मिनस अशीं दोन मुख्य स्टेशन्स आहेत, तशीं पॅरिसला

चार आहेत. आम्ही पॅरिस डी नॉर्डला जाणार होतों व तेथे जाइतों तेवढेंच पॅरिसचें दर्शन आम्हांला घडणार होतें. पण ही वर सांगितलेली टॅक्सीसाठी झिम्मड पाहिल्यानंतर व सगळीकडे एक प्रकारचें अव्यवस्थित वातावरण पाहिल्यानंतर माझा फार विरस झाला. स्वित्झर्लंडच्या समाजाच्या अत्यंत व्यवस्थित वागणुकीमुळें पॅरिसचा गोंधळ मला अनोळखी वाटला. आम्ही उभे होतों तेथून दिसणारें पॅरिसचें स्वरूप अगदींच सामान्य किंवहुना ओंगळ होतें म्हटलें तरी चालेल. काळया मिचकुट इमारती, लहान लहान रस्ते, भोवताली अगदी आपल्याकडे दिसतात तशाच प्रकारचे हमाल, टॅक्सी-वाले व गोऱ्या कातडीची परंतु अगदीं सामान्य वाटणारी फ्रेंच जनता! पॅरिस पॅरिस म्हणतात तें हेंच काय ? मला मोठा संभ्रम पडला. त्यांतून बऱ्याचशा उभे राहण्याच्या तपश्चर्येनंतर आम्हांला एक टॅक्सी मिळाली व तिने आम्हांला चांगलें लांबून लांबून नेऊन पाहिजे तेथे नेऊन पोहोंच-विले. किरण सारखी म्हणे फ्रेंच लोक लुच्चे, परदेशीय उतारूंना फसवितात. पॅरिसमधून कसे एकदा बाहेर पडतों तो सुदिन. तिला सारखा संशय कीं, हा टॅक्सीवाला फसवितो आहे. इतका वेळ कशाला हिंडवितो आहे? इटालियन्सहि फारसे प्रामाणिक आढळले नव्हते. ट्रॅममध्यें खुशाल चुकीचें तिकिट देऊन जास्त पैसे घेणें, भाव वाढवून सांगणें, नाण्यांच्या बदलीमध्ये गोंधळ करून घोटाळयांत पाडणें असे अनेक अनुभव इटलींत आम्हांला आले होते. स्वित्झर्लंडमध्यें सर्वच जण प्रामाणिक. भाव महाग सांगतील; पण फसविण्याची वृत्ति नाही. आतां फ्रेंच लोक फसविणारे व स्त्रियांना त्रास देणारे असें आम्हांला सांगितलेलें. ती टॅक्सी पॅरिस डी नार्ड पुढे येऊन उभी राहिली. आम्हीं चार-पाचशें फ्रँक्स दिले. किरणची कुरकुर चाललीच होती कीं 'उगाच लांबून लांबून आणलें, लुच्चा, चोर.' शेवटीं तिला न राह-वून तिने लगेजरूममध्यें विचारलें कीं, अमुक अमुक ठिकाणाहून येथे येण्यास कितीसे पैसे द्यावे लागतात ? आणि केवळ पंधरा-वीस मिनिटांचा रस्ता आहे, हें कळतांच तिला जो संताप आला तो विलक्षण. आपल्याला बनविलें हें कळत असूनहि आम्ही तेव्हा कांही करूं शकत नव्हतों. टॅक्सींत बसलों होतों तेव्हाहि करूं शकणार नव्हतों. कारण आम्हांला रस्ताच कोठें माहीत होता ? शिवाय बरोबर सामान होतें त्याचें काय ? तें घेऊन

मराठी ग्रंथ संग्रहालय

अनुक्रम ............ वि: ............
नों: दि: ............

काय आम्ही चालणार होतों? खरं म्हणजे मी सात-आठ महिने राहण्यास आलेली; तर माझ्याबरोबर एक सूटकेस व एक हॅण्डबॅग व दुसरें छोटें बंडल होतें. सामान वाहण्याचे प्रसंग आमच्यावर इटली ते फ्रान्सच्या प्रवासांत जागोजागीं आले व असली कधीहि संवय नसलेल्या मला सामान वाहणें जडहि गेलें. शक्यतों लगेजरूममध्यें सामान ठेवून आम्ही बारक्याशा बॅगेंत वस्तु घालून भिरवीत होतों; तरीहि गाडींतून बाहेर येणें, बाहेर आलों तर टॅक्सी, नाही तर ट्रॅममध्ये तें चढविणें असली हालचाल करतांना स्वतःचे बोजे उचलीत असूं; तरीहि बोजे उचलणें म्हणजे काय, तें मला ह्या प्रवासांत चांगलेंच समजलें. बोजे वाहण्याच्या कल्पनेने अजूनहि माझ्या अंगावर शहारे येतात. जिनिव्हाहून आम्हीं सामान परस्पर पॅरिससाठी बुक करून पाठवून दिलें होतें. तें पॅरिसला ताब्यांत घेतल्याने टॅक्सीवाल्यांवर अवलंबून राहणें भागच पडलें.

ह्या सर्व जिगजिगीने पॅरिसमधील तो अर्धा तास म्हणजे अगदीच वाईट वाटला. त्यावेळेस मी जें पॅरिस शहर पाहिलें त्यावरूनच केवळ पुढे आठ महिने पॅरिसला येण्याचा मोह मी टाळूं शकलें. बाह्यदर्शनीं किंवा सकृत्‌दर्शनीं जें मत होतें तें अनेकदां कसें खोटें ठरतें, हें कळावयास मला आणखी आठ महिन लागले. पॅरिस ते कॅले हा प्रवास चांगला झाला. कारण बहुतेक झोपेंतच वेळ गेला. कॅलेहून खाडी ओलांडून आम्हीं इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाय ठेवणार होतों. ज्या दिवसाची मुंबई सोडल्यापासूनच वाट पहात होतों, ज्या ठिकाणीं येण्यासाठी गेले चार महिने जिवाचा आटापीटा करून मी तयारी करीत होतें तें इतक्या नजीक आलें आहे, ह्या कल्पनेने मात्र गहिंवरून आलें. मुंबई सोडून आम्हाला बावीस दिवस झाले होते. मैलोंमैल जमीन तुडवीत व सातासमुद्रांना पालथे घालीत आम्ही इंग्लंडला पोहोचणार होतों. किरणला निदान तिचे पति तरी भेटणार होते. मला मात्र कोणीच माहीत नव्हतें. तरीहि मी तेथें पोहोचण्यास आतुर होतें. कॅले बंदर सोडून आमची बोट इंग्लंडच्या दिशेने जाऊ लागली तेव्हा बोटीवरच्या लोकांनी एकच गिल्ला केला. इंग्लंड ते पॅरिस प्रवास करणारे लोक फारच आहेत. पुणें-मुंबई प्रवास करण्यासारखाच हा प्रवास मानतात. बोटीवर

गाणीं म्हणणें, एकमेकांशीं हंसत खिदळत गप्पा मारणें ह्यांना ऊत आला होता. आम्ही परदेशी लोक प्रत्येक ठिकाणीं पासपोर्ट सामान तपासणी असल्या गोष्टीसाठी अडखळत होतों. एक गोष्ट मात्र खरी कीं, युरोपमध्यें पाय ठेवल्यापासून आम्हांला कोणत्याहि सामान-तपासणी वगैरे बाबत कोठेहि त्रास झाला नाही. मुख्य म्हणजे वाया माणसांना कोणी त्रास देत नाहीत. गेल्या दहा दिवसांच्या शर्यतीच्या वेगाने केलेल्या प्रवासाने आम्ही शिणून गेलों होतों व आता थोडा विसावा मिळाला तर पाहिजे होता. इंग्लंडच्या जवळ जवळ येतों आहों त्या कल्पनेपेक्षां किरणला आपले पति भेटणार, ह्याचा फार आनंद होत होता व स्वतःच्या जबाबदारीवर इतक्या लांब आल्यानंतर तें ओझें आता कोणाच्या तरी खांद्यावर देण्यास ती उत्सुक झाली होती. श्रीयुत गोडक भेटले कीं मग फक्त ते म्हणतील तिकडे जाण्याखेरीज मी कांही करणार नाही, असें ती म्हणत होती. पण माझी गोष्ट वेगळी होती. आता किरण जाणार होती. मिस्टर दुआटी पण आपल्या उद्योगाला लागणार होते. मला माझे उद्योग करावयाचे होते आणि एकटीलाच करावयाचे होते. ह्यापुढे मी अगदी एकटी एकटी सारें करणार होतें; तरीहि देवावर श्रद्धा ठेवून मी स्वतःला अगदी शांत ठेवलें होतें. मुंबईपासून एकटीच निघालें होतें; तरी बोटीवर किरणची सोबत मिळालीच कीं नाही ? तो केवळ दैवयोग होता. आता किरणची व माझी फाटाफूट होणार होती. तरीहि देव बरोबर आहे; ह्या कल्पनेच्या आधारावर मी पुढचें सर्व साहस करणार होतें. पुण्याहून १९४५ सालीं मुंबईंत मीं पाऊल ठेविलें तेव्हाहि मी एकटीच होतें. टोपलीखाली वाढलेल्या कोंबडीच्या पिल्लाला मोठ्या माळरानावर सोडून द्यावें, तशी माझी तेव्हाहि अवस्था होती. मुंबईसारख्या ठिकाणीं अनेक नातेवाईक असूनहि मी अगदी एकटीने मार्ग काढला आणि पुन्हा आतां सात वर्षांनी माझ्यावर तसाच प्रसंग आला होता. खरं म्हणजे मीं आणविला होता. पुण्याहून मुंबईस आलें तोहि माझाच हट्ट व मुंबईहून लंडनला आलें तीहि माझीच हौस. १९४८ सालींच खरं म्हणजे मी अमेरिकेला जाण्याची सिद्धता केलेली होती. कोणत्या ना कोणत्या कारणाने तो योग त्या वेळेस फिसकटला ! पुढें माझें लग्न झालें, दोन मुलें झालीं. माझीं भावंडें एक एक मुंबईला आलीं. मी स्वतः सोला-

पूरला बदली घेऊन माझ्या पतीबरोबर राहाण्यासाठी गेलें; तरीहि परदेशीं जाण्याची इच्छा त्या गुरफटून गेलेल्या अवस्थेंतहि नाहीशी झाली नाही. मी जितक्या हिरीरीनें नोकरीचा पेशा अवलंबिला तितक्याच उद्विग्नतेनें नोकरींत मी पडलें नसतें तर वरें झालें असतें, असें वाटावें इतका वाईट अनुभव मला ह्या पेशांतील लोकांचा आला. मी जात्याच भीरु स्वभावाची होतें. तरीहि कोणाच्याहि सांगण्याने माझ्या मनांत ठरलेलें असेल तें न वदलण्याइतकी खंबीर व परिस्थितीपासून पळून जाण्याऐवजी तिला तोंड देण्याइतकी धीट मी हळू हळू झालें होतें. भोवतालच्या मुली करीत असतील त्यापेक्षां मी जरा इकडे तिकडे कांही करावें ह्याचें मी वावरत होतें त्या थरांतील समाजामध्ये, माझ्या निकटवर्तीय नातेवाईकांमध्ये कोणाला कौतुक नव्हतें. माझ्या आतांपर्यंत घालविलेल्या आयुष्याचा चित्रपट हा कॅले ते फोकस्टोन ह्या प्रवासांत इंग्लिश खाडीमध्ये माझ्या दृष्टीसमोर सरकून गेला. तें विहंगमावलोकन फार मजेदार वाटलें, उद्बोधक वाटलें. माझ्या त्या वयांत माझ्याइतके आयुष्याचे विविध पैलू फार कमी लोकांनी पाहिले असतील. धकाधकीचें जीवन माझ्याइतकें जवळून किती जणांनी पाहिलें असेल ह्याची शंका आहे. माझ्याइतकी धडपड केलेल्या मुली तर फारच विरळच्या! किंबहुना मुलेंहि किती सांपडतील कोण जाणे. मी अनुभविलेलीं सुखें अनेकांना त्यांच्या लहानपणीं मिळाली असतील, किती तरी पटींनी सुखासीन आयुष्य जगलेल्या मुली माझ्या पाहण्यांत होत्या. बुद्धीने हुशार तर अनेकच होत्या. तरीहि माझ्याइतके सर्वव्यापी अनुभवाने युक्त आयुष्य, जबाबदारीनें मीं केल्या त्याच्या दशांशानेंहि केलेल्या गोष्टी, कमींत कमी आर्थिक झीज सोसून जास्तींत जास्त चीज करण्याचा प्रयत्न असा समन्वय क्वचित् ठिकाणीं आढळून येईल. कोणाचें कधीहि वाईट न करणें व न चिंतणें ह्यामुळेच सर्वसाक्षी परमेश्वराचा पाठिंबा सतत मिळतो, असा माझा ग्रह होता आणि तो पुढच्या प्रवासांत आणखी दृढ होणार होता. मी आणि किरण एकमेकींचा निरोप घेण्याच्या कल्पनेनें अवस्थ झालों होतों.

दिसूं लागताच बोटींतील लोक डेकपासून हालेनात. दूर अंतरावर इंग्लंडचा किनारा दिसत होता. आम्ही फोकस्टोनला आलों तेव्हा दुपारचे

दोन ते अडीच वाजले होते. तीन वाजतां लंडनला जाणारी गाडी सुटणार होती. श्रीयुत मोडक फोकस्टोनला आले होते. आम्ही चौघेजण गाडींत बसलों व श्रीयुत मोडक त्यांच्या अनुभवाने इंग्लंडच्या गोष्टी सांगत होते. तीं दोघें हॉटेलमध्ये राहणार होतीं व श्रीयुत मोडक यांनी सर्व व्यवस्था आधीच करून ठेवलेली होती. मी कोठें जाणार, ह्याची त्यांनी चौकशी केली. मी ठोकून दिलें कीं, इंडियन स्टुडण्टस् होस्टेलमध्ये मी माझी अगोदरच व्यवस्था करून ठेविली आहे म्हणून. खरं म्हणजे त्या होस्टेलला लिहून ठेविलें होतें कीं, माझ्यासाठी जागा ठेवा म्हणून; परंतु त्यांच्याकडून तसें केल्याचें उत्तर येण्यापूर्वीच मीं मुंबई सोडली होती. त्यामुळे खात्री नव्हती कीं, जागा मिळेलच अशी. तरीहि आता त्या इतक्या दिवसांनी भेटलेल्या जोडप्याला त्रास देण्याची माझी इच्छा नव्हती. म्हणून मीं माझी व्यवस्था करण्याचें ठरविलें होतें. संध्याकाळी साडे पांच वाजतां आम्ही लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर आलों. मी व श्रीयुत टुआटी मोडक-दांपत्याचा निरोप घेऊन एक टॅक्सी करून माझ्या होटेलवर निघालों. श्री. दुआटी ह्यांनाहि इंडियन स्टुडंटस होस्टेलवर जागा मिळेल तर बघावयाचें होतें. म्हणून ते माझ्या बरोबर आले. लंडनला तर आम्ही पोहोंचलों; पण तेथे मी स्थिरस्थावर होईपर्यंत मला आणखी काय काय तरी करावें लागणार होतें, ह्याची मला कल्पना कोठे होती ?

● ● ●

# ३

## मी लंडनला आलें

लंडनमध्यें येऊन तर थडकलें. खास भारतीयांसाठी स्थापन केलेल्या होस्टेलमध्यें जाऊन दाखल झालें. येथेहि देशी हिसका बसावयाचा होता आणि तो बसलाच. तेथे गेलें तेव्हा मुख्य व्यवस्थापिकेचा पत्ताच नव्हता. दुय्यम अधिकारी होती; परंतु माझी कांहींहि व्यवस्था करण्यासंबंधीचा आदेश तिला मिळालेला नव्हता. बऱ्याच हुज्जतीनंतर व खाणाखुणानंतर विजया जोशी ह्यांच्याकडून कांही तरी पत्र महिन्या-दीड-महिन्यापूर्वी आल्याचें आठवतें खरें; परंतु जागा नाही हा खुलासा मिळाला. मी मुंबईहून ह्या होस्टेलला असें पत्र लिहिलें होतें कीं, माझ्यासाठी एक जागा ठेवावी व तसें शक्य नसल्यास ९ सप्टेंबरच्या आंत कळवावें, वगैरे, वगैरे; पण पत्राला उत्तर येतें आहे कशाला ? किंबहुना, पत्राला न उत्तर पाठविणेंच—वेळेवर तर नाहींच--हेंच आमचें वैशिष्टय. आम्हाला बरेच उद्योग असतात, ह्याची खात्री पटविणारें एकमेव साधन. मला लंडनमध्यें आणखी एक दोन होस्टेल्सचे पत्ते माहीत होते; परंतु तेथे जाऊन माहिती विचारून सोय करून घेईतों मला ह्या होस्टेलमध्यें राहणें भाग होतें. शेवटीं एकदोन दिवस राहण्याची सोय करण्याचें आश्वासन देऊन त्या दुय्यम व्यवस्थापिकेने मला माझ्या बॅगसकट खोलींत घुसविलेंच. मी जेमतेम सामान टाकून

जेवणाची वेळ कधी आहे, हें विचारून खालीं आमच्याबरोबर सहप्रवास केलेले आमचे मित्र उभे होते तेथे आलें. ह्या गृहस्थांना लंडनमधील कशाचीच कल्पना नव्हती व रहावयाची सोय कोठेतरी करणें भागच होतें. पांच-सहा होस्टेल्समध्ये हिंडून कशीबशी एकदा त्यांना जागा मिळाली व मी माझ्या बिऱ्हाडीं म्हणजे होस्टेलवर चार मुलींच्या खोलींतील एका चौपाईची भाडोत्री मालकीण म्हणून परत आलें. पहातें तों, मला जी कॉट अवघ्या पाऊण एक तासापूर्वीं दिलेली होती तीवर दुसरीच मुलगी पहुडलेली म्हणजे काय? मला अर्थच कळेना. मी ७–८ वाजतां आले त्यावेळीं तेथें एक जागा होती, आणि आता ९ वाजतां खोलींत जागा नाही, ही काय भानगड? मला तर इतकी झोंप आली होती कीं कधी एकदां आडवी होतें असें झालेलें. तो हा नवाच प्रकार. पुन्हा दुय्यम व्यवस्थापिकेकडे गेलें तो तिचें ऑफिस बंद. आता आटोपलेंच. उद्या सकाळीं ती येणार. खोलींत तर चार मुली आपापले उद्योग आटोपून व्यवस्थित झोपून गेलेल्या. मी ह्या अशा रात्रीं १० वाजतां जाणार तरी कोठें? मला तर ह्या अव्यवस्थित, गवाळ कारभाराचा अर्थच कळेना. आम्ही भारतीय कोठेहि गेलों तरी स्वत्व सोडीत नाही, हें खरेंच तर. शेवटी एका डॉक्टर मुलीची एकटीसाठीं खोली होती तिने एक शिलकी गादी आणून आपल्या खोलींत घालून माझी सोय केली. ही डॉक्टर मुंबईचीच होती. तिची व माझी मैत्री मी लंडन सोडीपर्यंत कायम राहिली. तिने जर आपल्या राखीव खोलींत त्यावेळीं मला घेतलें नसतं तर पहिल्याच रात्रीं लंडनमध्ये मला जागेसाठी वणवण हिंडावें लागलें असतें.

सकाळीं उठून सर्व आवरून मी माझ्याजवळ जे एकदोन पत्ते होते त्यांपैकी बरासा वाटला त्यावर जाण्याचें ठरविलें. कसें जावयाचें तें विचारून घेतलें आणि ८ वाजतां सकाळींच कोट घालून, हातमोजे चढवून आणि जामानिमा करून आमची स्वारी लंडनमध्यें राहण्याची जागा शोधण्याच्या मोहिमेवर बाहेर पडली. लंडन शहर अगदी मुंबईसारखें वाटतें. मुंबईसारख्याच इमारती, तसेच रस्ते, तेच जुनाट पद्धतीचें शिल्पकाम—सहा हजार मैल लांब येण्यासारखें कांही मला वाटलें नाही. त्या मानानें रोमने मला किती चकित केलें होतें. जिनिव्हा लंडनइतकें मोठें नसलें तरी प्रसन्न

होतें. मला आवडलें होतें. मी रसेल स्क्वेअर ह्या टय़ूब स्टेशनवरून केन्सिग्टन विभागांत जाणार होतें. टय़ूबमधून पहिल्यांदाच माझा प्रवास होता. तरीहि अगदी चर्चगेटवरून खारला जावें तितक्या आत्मविश्वासानें मी रसेल स्क्वेअर स्टेशनांत शिरून, तिकिट काढून, जमिनीच्या खालीं ६०–७० फूट जाऊन टय़ूबमध्ये बसलें. लंडनमधील टय़ूब्स म्हणजे एक विलक्षण गोष्ट आहे. लंडन शहर वरून इतकें विस्तीर्ण व प्रचंड इमारतींनी भरून गेलेलें दिसतें. त्याच्या खालीं खरोखरी एक पाताळ नगरीं वसलेली आहे, मात्र नुसतें कोणी सांगून पटलें नसतें. अक्षरशः ६०–७० फूट खाली जातांना आज तेहि अॅक्सिलरेटवरून. आपण मगरीच्या तोंडांत तर आपला घांस देत नाही ना, अशा शंकेनेच नवा मनुष्य जातो. आपल्याला श्वास घेण्यास त्रास होतो आहे असें उगीचच त्याला वाटतें. खाली गेल्यावर अगदी व्यवस्थित लोकल स्टेशन बघून फार आश्चर्य वाटतें. दोनच लाईन्स व दोनच प्लॅटफॉर्म्स असतात. पण हें सर्व बांधून काढलेल्या बोगद्यांत. सबंध रेल्वेमार्गच बोगद्यांत असतो व स्टेशनांत गाडी उभी राहते तेथेच तेवढा जरा मोठा मोकळा भाग असतो. बोगद्यांतून गाडी येतांना मोठा आवाज करते व प्लॅटफॉर्मवर उभी राहतांच आपोआप तिचीं एका बाजूचीं सर्व दारें उघडतात. लोक उतरतात, दुसरे चढतात आणि सर्वच्या सर्व दारें आपोआप बंद होऊन गाडी बोगद्याच्या पुढील मार्गांत शिरते. प्रत्येक तिसऱ्या मिनिटाला गाडी आहेच. कारण आपोआप सिग्नल पद्धति असल्यानें एक गाडी पुढच्या स्टेशनवर पोहोंचली कीं मगच मागची गाडी आपलें स्टेशन सोडते. पुढची गाडी थांबली तर सर्व गाडया जेथेच्या तेथे थांबतात. ती अडलेली गाडी हालल्याखेरीज बाकीच्या हालूं शकणार नाहीत. सर्व गाडयांना फक्त एकच वर्ग. श्रीमंत गरीब सर्वांना एकच वर्ग. तरीहि गाडयांना बेसुमार गर्दी फार क्वचित् होते.

मी माझ्याजवळ असलेल्या पत्त्यावर येऊन पोहोंचले. तेव्हा सकाळचे ९ वाजले होते. मला होस्टेल एकदम पसंत पडलें. शेक्सपिअरचें घर अथवा बर्नार्ड शॉ चें जन्मस्थळ अशा प्रकारचें जें नमुनेदार इंग्लिश घराचें चित्र येतें त्याप्रमाणें हुबेहूब दिसणाऱ्या तीन इमारती मिळून आमचें होस्टेल होतें. जवळ जवळ २०० मुलींची सोय त्यांत होती. त्यांत युरोपियन्स सगळयाच.

दोनतीनच हिंदी होत्या. बहुसंख्य इटालियन व स्पॅनिश मुली. मला खरं म्हणजे हिंदी मुलींमध्यें रहावयाचेंच नव्हतें. सारा जन्म भातभाजी खाण्यांत गेला असला तरी तेथील आहारच अंगवळणीं पाडून घ्यावयाचा, असें मीं ठरविलें होतें. बेताचे पैसे देऊन राहण्याची सोय आणि तीहि अगदी आरशासारख्या स्वच्छ होस्टेलमध्यें. मला देवाचे किती आभार मानावे हेंच कळेना. होस्टेलची मुख्य व्यवस्थापिका मला भेटली व तिने मात्र मला दुसऱ्या दिवशीं येण्यास सांगितलें. लंडनमध्यें मनासारखी जागा मिळणें किती अवघड असतें, ह्याची मला पुढे पुष्कळ दिवसांनी कल्पना आली आणि त्यावेळी मला सहजासहजी मिळून गेलेल्या सुखसोयींची किंमत कळली. पेइंग गेस्ट म्हणून जागा मिळूं शकते. यंग वुइमेन्स ख्रिश्चन ॲसोसिएशनसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था सोय करतात; पण एक तर ह्यांच्याकडे वेटिंग लिस्ट असते व खाजगी कुटुंबें पैसे जास्त मागतात.

आमचें होस्टेल केन्सिग्टन भागांत म्हणजे व्हिक्टोरिया राणीच्या राजवाड्यापासून जवळच व लंडनमधील खानदानी समजल्या जाणाऱ्या भागांत होतें. वस्ती अतिशय सभ्य लोकांची, चांगल्या प्रकारची बाजारपेठ जवळ, आसपास अल्बर्ट म्युझियम, केन्सिग्टन पॅलेस अशांसारखीं रम्य स्थळें, तेव्हा लंडन म्हणजे अगदी स्वर्गासारखें असलें पाहिजे, अशीच माझी समजूत झाली. मला ज्या खोलींत जागा दिलेली होती ती दुसऱ्या मजल्यावर फिकट हिरव्या रंगाची (सी ग्रीन) सजावट असलेली व पूर्वेकडे रस्त्याच्या बाजूला भव्य दोन काचेच्या खिडक्या व त्याला जाळीचे पडदे व शिवाय साधे पडदे असलेली अशी होती. कपडे ठेवावयाला वॉर्ड-रोब, एक छोटें कपाट लहान लहान वस्तूंसाठी व बाकी रोज न लागणारें सामान एका छोट्या खोलींत ठेवण्याची व्यवस्था, पलंग ऐसपैस, त्यावर गादी, दोन-तीन ब्लॅंकेटस, चादरी आणि सगळीकडे स्वच्छ लख्ख. ही स्वच्छता ठेवण्यासाठीं तीन बाया सतत सकाळपासून झटत असत. स्वच्छतेवरून आठवण झाली. अगदी जमिनीपासून तो दाराच्या पितळी कड्यांपर्यंत सगळीकडे ह्या बायांचा हात फिरे. दर दोन महिन्यांनीं उंच उंच खिडक्या पुसण्यासाठीं दोन नोकर येत असत व शेकोट्याहि स्वच्छ करून जात. भिंतींना खिळे मारून हव्या त्याने हव्या त्या तसबिरा लावण्याचा

प्रघात इंग्लिश लोकांच्या घरांत नाही. लाकडी पट्ट्या केवळ एवढ्यासाठी म्हणन मारलेल्या असतील व त्याला पितळी खुंट्या मारून तेथपासून लांब साखळ्या किंवा दोऱ्या सोडून दोन-चार चित्रें टांगावयाचीं, अशी पद्धत आहे. घर छोटें असो वा मोठें असो, दणादण पाहिजे तेथे खिळे मारणें वर्ज्य आहे.

पहिल्या रात्रीं त्या खोलीत अशी झोंप लागली कीं सकाळीं ब्रेकफास्टची घंटा झाली तरी मला जाग आली नाहीं. ९ वाजतां खाली जातें तों सर्वजणी खाणींपिणीं आटोपून बाहेर गेलेल्या. जेवण-घरांत सामसूम. तेथे जिने ब्रेकफास्टची व्यवस्था बघावयाची तीच कप-बश्या वगैरे विसळून सर्व टेबलें स्वच्छ करण्यांत गढून गेली होती. ही बाई अतिशय तुटक बोले. त्यामुळे पहिल्यांदा तिच्याविषयी माझ्या मनांत फार अढी बसली; पण पुढे पुढे मला समजलें कीं, ती मनाची चांगली आहे, परंतु स्वभावच तऱ्हेवाईक आहे येवढेंच. मी नवीन म्हणून तिने रागारागानेच एका टेबलावर खाद्यपदार्थ मांडून दिले (निदान मला तरी ती रागावल्यासारखी वाटली). पॉरिज, ब्रेड-लोणी व बेकन, चहा इतकेच पदार्थ. मला बेकन ह्या वेळेपर्यंत आवडू लागलें होतें. बेकनच्या ऐवजी कधी अंडें, तर कधी सॉसेजीस असत. पुढे पुढे चीज, बिस्किटें इत्यादि आपल्याला पाहिजे त्या गोष्टी जिच्या तिने आणावयाच्या, हें सर्व मला ठाऊक झालें. मी ब्रेकफास्ट घेऊन माझ्या दौऱ्यावर निघालें.

दौऱ्यावर म्हणण्याचें कारण आतां मला लंडनमध्यें कांही उद्योग पाठीशी लावून घेणें प्राप्त होतें. नुसती खाऊन लोळून तर थोडीच राहणार होतें! शिवाय हिंदुस्थानांतून मी कांहीं थोडा पत्रव्यवहार करून थोडीफार माहिती जमविली होती. लंडन युनिव्हर्सिटीचें एक पत्र माझ्याकडे होतें. तें घेऊन तिकडे कसले कोर्सेस आहेत, कशाला जावें, ह्याच्या चौकशीसाठी अस्मादिकांची स्वारी निघाली. लंडन युनिव्हर्सिटींत मला कम्युनिटी डेव्हलपमेंटसाठी एक त्यांतल्या त्यांत छोटा कोर्स बरा वाटला; परंतु तोहि एक वर्षाचा होता व त्यासाठीं ४२ पौंड फी होती. वर्षभर राहण्याच्या तयारीने मी आलेली नव्हतें, तेव्हां इतकी फी भरून अर्धवट सोडून द्याव्या लागणाऱ्या कोर्सने नुकसान तर होणारच. ह्या व्यावहारिक विचाराने त्याच अधिकाऱ्यांच्या

सल्ल्याने तसला दुसरा एखादा लहान कोर्स शोधूं लागलें. ब्रिटिश कौन्सिलच्या लोकांनी मला चांगली माहिती पुरविली व प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स नव्याने यंग वुइमेन्स ख्रिश्चन ॲसोसिएशनने सुरू केला होता, तो उत्तम आहे, असा मला सल्ला दिला. त्यांचें असेंहि मत पडलें कीं, प्रॅक्टिकल ट्रेनिंगच (प्रात्यक्षिक शिक्षण) जास्त महत्त्वाचें आहे. पुस्तकी ज्ञान कोठेहि राहून आत्मसात् करणें अवघड नाही. बेकर स्ट्रीटवरील आणखी एका भल्या मोठ्या इमारतींत यंग वुइमेन्स ख्रिश्चन ॲसोसिएशनचें मुख्य ऑफिस होतें. तेथे जाऊन संबंधित अधिकाऱ्यांना भेटून कम्युनिटी डेव्हलपमेंटच्या वर्गात दाखल झालें.

ह्या ठिकाणीं आम्ही येत आहों तोंपर्यंत आम्ही घरीं आहों, असें समजून निःसंकोचपणें वागावें व आमच्या अडचणी दूर करून घ्याव्या, असें आम्हांला सांगण्यांत आलें होतें; परंतु नव्या घरीसुद्धां नववधूपणा जायला थोडा कालावधि लागतो. आतां माझा आहार बदलला होता आणि हा बदललेला आहार दिवस जात होते तसा ठराविकहि होत चालला होता. पोषाखहि बदलला होता. अर्थात् सोयीसाठी गरम कपडे, छोटा कोट, मोठा कोट, हातमोजे, पायमोजे ह्या असल्या कपड्यांनी रोज सजावयाचें आणि रिमझिम बरसातीला तोंड द्यावयाचें म्हणजे साडीसारख्या कपड्यांची अडचणच वाटते व धुणें, इस्त्री करणें अशी ऊठ-बस आपल्यालाच करावी लागते.

मी कॉलेज सोडल्याला १० वर्षे होऊन गेलीं होतीं. त्यामुळे पुस्तकें घेऊन, वेळापत्रकें पाहून, घरचा अभ्यास करणें जुन्या दिनक्रमांतल्या इत्यादि गोष्टी नव्याने माझ्या वांटणीस आल्या होत्या. बरोबरीच्या मुली, त्यांच्या गप्पा, आमचा अभ्यास – सगळीच मजा होती. आम्हाला जे विषय होते तेहि फार मजेदार व पूर्वीच्या शिक्षणांत न सामावले गेलेले इंग्लंडमधील अशा अभ्यासक्रमांमध्ये न चुकतां व्हिजिट्स् असा एक भाग असतो. त्यायोगें माहिती तर पुष्कळ वाढतेच; पण आठवड्यांतून एकदा ट्रिपला जाऊन आल्यासारखें आम्हांला वाटायचें. माझ्या ह्या कोर्समध्यें व नंतर केलेल्या बिझिनेस ट्रेनिंगच्या कोर्समध्ये मी इतक्या ठिकाणीं हिंडले व इतक्या गोष्टी पाहिल्या कीं, व्यक्तिशः एकटीने जाऊन मी त्या क्वचितच पाहूं शकलें असतें. आम्हांला विषय किती तरी नाविन्यपूर्ण होते.

अभ्यासक्रम वाचून फार दडपल्यासारखें वाटलें आणि पांच दिवसांच्या आठवड्यांतून एक दिवस व्हिजिट्स्मध्ये गेल्यानंतर उरलेल्या चार दिवसांत सकाळीं ९ ते दुपारीं ४ पर्यंत इतका ठासून कार्यक्रम बसविलेला असे कीं, क्वचितच दुसरें कांही करणें शक्य व्हावें. आमच्या वर्गांत जवळजवळ १६–१७ मुली होत्या आणि जगांतल्या कोणत्या कोणत्या देशांतून आलेल्या होत्या. मलाया, घाना, झांजीबार, बोर्निओ, दक्षिण ऱ्होडेशिया, वगैरे ब्रिटिश वसाहतींतून आलेल्या जास्त होत्या. कारण त्यांना इंग्लंडमध्यें येण्यासाठी सवलती आहेत. शिवाय स्पॅनिश, फ्रेंच, एकदोघी इंग्लिश, व मी हिंदी. एक झांजीबारच्या राजाची सून आमच्या वर्गांत होती. एक जॉर्डनची मुलगी होती. ह्या दोघींशी माझी विशेष गट्टी झाली; परंतु पुढे मात्र एक ऑडी म्हणून इंग्लिश मुलगी होती तिची व माझी मैत्री फार वाढली व शेवटपर्यंत टिकली आणि अजूनहि आहे.

चार मुली एकत्र आल्या कीं, मग गप्पांना ऊत यावयाचाच. त्यांतून तेथील वातावरण प्रसन्न, मुली भिन्न देशीय, उत्सुकता कमालीची व प्रत्येकाला त्या मानाने स्वास्थ्य. तेव्हां मजा करण्यांतहि मजा वाटे. सिनेमाला जावयाचं तर मुलांचा विचार, बाहेरगावीं जावयाचं तर रजेचा प्रश्न, थोडा चैनीवर खर्च करावा तर आपण स्वार्थीपणा तर करीत नाही ना, ह्या भावनेचें दडपण आणि कांही इतरांपेक्षां निराळं करायला जावं तर लोक काय म्हणतील, हा बाऊ वाटावा. अशा एक प्रकारें फाजील जबाबदारीच्या जाणिवेने भारावून मी थोडीथोडकीं नाही, तर दहा वर्षे काढलीं होतीं. तेव्हा मला त्या दहा प्रकारच्या दहा जणींबरोबर हुंदडतांना फारच मोकळेपणा वाटे कधी कधी बेचैन होण्याइतका तो वाटे आणि थोड्याच दिवसांत मी दहा वर्षांनी लहान झाल्याइतका खेळकरपणा माझ्यांत आला. मला दोन मुलें असून त्यांना मी हिंदुस्थानांत इतक्या लांब ठेवून आलें आहें ह्या दोन्ही गोष्टींचें माझ्या मैत्रिणींना आश्चर्य वाटे. मला तो दिवस आठवतो. आम्ही आमच्या आलीशान न्याहारीच्या खोलींत दुपारचा नास्ता घेत बसलों होतों. मी माझ्या मुलांचे मला नुकतेच हिंदुस्थानांतून आलेले फोटो माझ्या मैत्रिणींना दाखवीत होतें. माझ्यावर नुसता प्रश्नांचा भडिमार होत होता. “तूं मुलांना ठेवून आलीस कशी ?” ह्यापेक्षांहि इंग्लिश मैत्रिणींना एक विचा-

रल्याखेरीज राहवेना. "तूं इतकी तरुण असतांना तुझ्या नवऱ्यानें तुला एकटीला येऊं कसें दिलें ? तूं नसतांना तो दुसऱ्या एखाद्या मुलीशी मैत्री करील, असें भय तुला वाटत नाही का ? तुझ्या आईनें तुझीं मुलें संभाळण्याचें कसें कबूल केलें ? तिला तसें बांधून घेणें जड नाहीं का वाटलें ?" ह्या इंग्लिश प्रश्नांवरून तेथील वैवाहिक जीवनाची कल्पना करणें सोपें जाईल. एकमेकांबद्दल जितका उदारमतवाद पतिपत्नीमध्यें असतो किंवा भासविला जातो त्याच्या आड किती शंकाकुशंकांचें जाळें पसरलेलें असतें पहा. आपण जर एकमेकांपासून दूर राहिलों तर एका व्यक्तीला दुसरीबद्दल खात्री नाही. ही असली पहाऱ्याची कल्पना मला कशीशीच वाटली. सहजीवन तेंहि प्रेमाच्या पायावर उभें राहिलेलें, सहवासोत्तर प्रेमानें भिजलेलें व आचार-स्वातंत्र्याच्या कल्पनेनें भारलेलें असतांना मनांतून जर दोन व्यक्तींना आपण एकमेकांचे असल्याबद्दल खात्री नसेल तर हा प्रेमाचा देखावा कोणासाठी ? मुलगा-सून किंवा मुलगी-जावई जर सिनेमाला किंवा जेवायला बाहेर जाणार असतील तरीहि कोणातरी बाईला पैसे देऊन मुलें सांभाळण्यासाठी देण्यासारखी आधुनिक सोय पहावी लागते व सासू-सासरे आपली संध्याकाळ फुकट घालवूं इच्छित नाहीत; तेथें माझ्या आईनें आपल्याच नातवंडांचा पत्कर इतक्या दीर्घकालपर्यंत अंगावर घेतला ही आश्चर्य वाटण्यासारखीच गोष्ट होती. सहजीवनाच्या व्यवहारांत मुलें बरोबर नेणें बसूं शकत नाही. म्हाताऱ्यांचा समावेश नसतो, नातेवाइकांचा प्रश्नच येत नाही. तेव्हां इंग्लंड-मधील वैवाहिक जीवन बव्हंशीं तेंच तेंच मजेचें; पण त्या मजेलाहि शेवटीं कंटाळवाणें रूप येत आहे कीं काय, असें वाटावें—इतक्या कृत्रिम तऱ्हेचें होत जातें. मुलांनाहि सामान्यपणें निरनिराळें वागविण्यांत येतें, निदान आपल्यासारख्या त्रयस्थांना तरी तसें वाटतें. आईवडिलांपासून तीं चटकन सुटीं होतात. त्यांचें कार्यक्रम, त्यांची वाटचाल त्यांचें सर्व कांही इतर भोंवतालच्या मुलांशीं समांतरपणें चालू असतें. आईवडिलांच्या इंजिनला त्यांचा डबा जुडलेला आहे व ती आगगाडी रुळावरून धावते आहे, असें संसार-चित्र दिसण्यापेक्षा आईवडिलांप्रमाणेंच परंतु वेगळ्या मार्गावर वेगळ्या दिशेने त्यांचें आयुष्य चाललें आहे असें वाटतें.

बरोबरीच्या नात्याने नवराबायकोमधील मी-तूंपणा करण्याच्या भानगडींत मुलें बेपर्वा किंवा थंड प्रकृतीचीं होतात. स्वतःच्या घरांतलें सुख स्वतः पहाऱ्यावर बसून जपल्यासारखें त्याच्याकडे पाहून वाटतें व त्या अर्थानें इंग्रज मनुष्याचें घर त्याचा बालेकिल्ला वाटत असतो. हें खरें आहे. हें पटतें. मुळांत नवराबायको दोघांनाहि दुसरी व्यक्ति किती दिवस आपल्याशीं नेकीने राहील, ह्याबद्दल धास्ती वाटत राहिली म्हणजे प्रेमाची खोली न वाढविता वरवरचें कृत्रिम उपाय म्हणजे नटणेंमुरडणें इत्यादि करून एकमेकांना आकर्षित करण्याकडेच त्यांची सर्व शक्ति खर्च होत राहते. हें बाहेरचें आवरण मात्र फार चांगलें सजविलें असल्यानें मोहक वाटतें, सुरेख दिसतें व पाहणाऱ्याला सुधारणेचा कळस दिसल्यासारखें वाटतें; पण अंदरकी बात खुदा जाने! एक गोष्ट मात्र खरी कीं, विचार करणाऱ्या माणसांना मात्र जुन्या व नव्या पद्धतींतून मेळ घालून कांहीतरी चांगला मार्ग काढतां येणें शक्य आहे. आधुनिक पाश्चात्य वैवाहिक जीवनाची एक बाजू जरी मीं वर्णन केली असली तरी जुन्या संस्कृतीमध्ये सर्वच चांगलें, असा माझा दावा नाही. जुन्या-नव्याचा समन्वय घालण्याची ताकद मात्र पाहिजे.

आमच्या मुलींच्या साध्या गप्पांना फारच गंभीर कलाटणी मिळाली ही! मुली जरी मला नित्य नव्या भेटत होत्या तरी कांही प्रश्न त्यांचे अगदी एकच असावयाचे. "तूं हा तांबडा ठिपका कधी कधी लावतेस तें काय? हे गळयांत काळे मणी कशाला घालतेस, त्यांत ह्या दोन वाटया कसल्या? तुम्ही नवऱ्याला नांवाने हाक मारीत नाही. मग तो अंतरावर असला आणि तुम्हांला कांही सांगावयाचें असलें तर मग काय करतां? असले व अशाच प्रकारचे हवे ते वेडगळ प्रश्न त्या करीत. मी या सर्व प्रश्नांना अगदी सुरेख उत्तरें देई. दोन अर्ध्या वाटया म्हणजे भिन्न भिन्न कुटुंबें व तीं माझ्यामुळे एकत्र आलीं म्हणून मी ह्या दोन वाटया गळयांत घालावयाच्या असतात व अपुऱ्या अर्ध्या दोन घटकांना एकत्र आणल्याचा मोठेपणा मिरवावयाचा असतो. हा काव्यमय खुलासा ऐकून तर त्यांना हिंदी संस्कृतीच्या उच्च विचारसरणीची व उदात्त आचार-दीक्षेची फार महती वाटे.

आतां थोडंसं माझ्या खोलींतील मैत्रिणींविषयीं. आम्ही खोलींत पहिल्यांदा तिघी होतों. मग थोडे दिवस चौघी. परत तिघीजणीच राहिलों. एक होती हिंदी ख्रिश्चन, तिचं नांव ओल्गा. दुसरी इंग्लिश–म्हणजे वेल्श, पण लग्न केलें होतें इंग्लिश माणसाबरोबर. पुढे तो मेला व दुसरा केला, पण तिने त्याच्याबरोबर घटस्फोट घेतला होता. ह्या मुलीचें नांव नान्सी. ओल्गा आणि मी आमच्या देशी गप्पा बऱ्याच चालत. कारण हिंदुस्थान सोडून तिला ७ वर्षे झालीं असलीं तरी देश तिचा होता. भारतीय संस्कृतीशीं तिची तोंडओळख तरी होती. ही मुलगी इंग्लिश लोकांचा फार तिरस्कार करी; परंतु हिंदुस्थानांत येऊन नोकरी मिळेल कीं नाही, ह्या भीतीने परत यावयाला धजत नसे. शिवाय तिकडच्या निर्बंध आयुष्याची संवय झाल्यामुळे हिंदुस्थानांत जाऊन तें ज्यांनी त्यांनी दुसऱ्याच्या बाबतींत बिनदिक्कत तोंड आणि लक्ष घालण्याचें आयुष्य घालवायला आतां तिची तयारी नव्हती. ती एका रेस्टॉरंटमध्ये नोकरीला होती. कोणा एका भारतीयाने "हिंदुस्थानांतून इकडे आलीस तर आपण लग्न करूं", अशी खोटी आशा तिला लावली. ही विचारी प्रेमासाठी नोकरी करून साठविलेल्या पैशाची होळी करून येथे येऊन पोहोंचली व आपला जिवलग दुसऱ्या एका गोऱ्या मुलीच्या जीवाशीं लग्नगांठ बांधूं इच्छित असल्याचें पाहून ती तर अक्षरशः हतबुद्ध झाली. वेड्यासारखी झाली. तिला कित्येक दिवस काय करावें, हेंच कळेना. शेवटी मनाचा धडा करून इंग्लंडमध्येच नोकरी करून जीवन कंठावयाचें, असें तिने ठरविले. होते नव्हते ते पैसे गेले. आईवडिलांच्या मनाविरुद्ध इंग्लंडला आली म्हणून त्यांचा राग व इकडे प्राणप्रिय व्यक्तीने केलेल्या अवहेलनेमुळे जिवाचा संताप! अशा अवस्थेंत परक्या देशांत तिने कसे दिवस काढले, ह्याची दारुण कहाणी मला समजली, तेव्हां भारतीय नवरेशाहीचे हात किती लांब पोहोचूं शकतात, ह्याची मला कल्पना आली. कितीएक जणींच्या कित्येक दुर्दशा मीं पाहिल्या आहेत, ऐकल्या आहेत. हिंदुस्थानांत अशा गोष्टींना तुटवडा नाही. अशा घटना नित्य व्यवहारांत घडतांना दिसतात. पण ओल्गासारखी गोड मुलगी ह्या असल्या दिव्यांतून बाहेर पडली असेल असें मला तिच्याकडे बघून वाटलें नव्हतें. सदा हंसरी, आनंदी व गोल डोळ्यांची काळीसावळी पण सतेज ओल्गा

आपली हकीगत सांगतांना इतक्या वर्षांनंतरहि अक्षरशः रडे आणि देवानें ..धी संसार करण्याची व चारचौघींप्रमाणें रहाण्याची माझी हौसहि पुरवूं नये, इतकी कां मी वाईट आहें ? असा हृदय पिळवटून टाकणारा प्रश्न विचारी. तेव्हां मला हिंदुस्थानांतल्या असंख्य स्त्रिया तिच्या मुखांतून ओरडत आहेत कीं काय असें वाटून बेचैन वाटत राही. मी संध्याकाळीच जेवण उरकून थंडीमुळें कपडे गुरफटून घेऊन अंथरुणावर पडल्या पडल्या वाचीत असें आणि रात्रीं १० वाजतां ओल्गा कामावरून परत आल्यानंतर दिवसाभराच्या आपल्या कथा सांगून माझी करमणूक करीत असे. ११ वाजतां दिवे गेल्या-वरहि आम्ही किती वेळ बोलत बसत असूं. मी जागी नसले तर ती खट्टू होई आणि सकाळीं मी ती उठायच्या अगोदर निघून गेलें तर दुपारीं केव्हा तरी ती माझ्याकडे येऊन जात असे.

आमची दुसरी सहसोबतीण नान्सी. हिच्याशीं माझें फार सूत जमलें होतें. कारण तिचें वाचन फार व ती स्वतः हरहुन्नरी होती. ती आजारी असे परंतु ओल्गाला वाटे कीं ती ढोंग करते, तिला थोडेसें कमी ऐकूं येई. तर ओल्गाचें म्हणणें कीं ती ढोंग करते. ती मुद्दाम न ऐकल्यासारखें करते. तिच्या फायद्याचें तिला बरोबर ऐकूं येतें. नान्सीला मी साडी नेसलेली फार आवडे. मला ती इंडियन एंजल म्हणत असे. तिच्या मतें माझ्यांत सात्त्विकता फार होती. नान्सी सडपातळ, फारशी उंच नाही, सतेज वर्ण व अतिशय तीक्ष्ण डोळ्यांची होशी होती. तिचें वय चाळिशीच्या जवळपास असावें; पण तिच्या तरुणपणीं ती फार सुरेख असणार. तिच्या आवडी-निवडी विलक्षण होत्या. इंग्लिश बायांमध्यें बहुतेक करून आढळ-णारा करारीपणा तिच्यांत भरपूर होता. ती इंग्लिश कविता करीत असे आणि चांगल्या करीत असे. आपल्या पहिल्या नवऱ्यानें आपले फार लाड केले व आपल्याला अमेरिकेंत, युरोपखंडांत, जिकडे म्हणूं तिकडे कसें फिरवून आणलें, ह्याचें फार सुरेख वर्णन ती करी. एके काळीं श्रीमंती भोगलेली नान्सी कांहीकांही बाबतींत फार चोखंदळ तर कांहींवेळां अगदी साधी वाटे. ती स्वतः उत्तम कपडे शिवीत असे. तिच्याजवळ मीं एकहि असा कपडा पाहिला नाहीं कीं तो वैशिष्टयपूर्ण शिवलेला नव्हता. उत्तम शिलाईचे कपडे, उंची हँडबॅग व महागांतलें महागांत शूज ह्यांचा तिच्याकडे बराच

साठा होता. तिला रंगसंगति उत्कृष्ट साधत असे. तिला येतां जातां खातांना मीं पाहिलें नाही. पण येतां जातां आरशासमोर उभे राहून आपले पिंगट रंगाचें मऊ कुरळे केस विंचरण्याचा व न्याहाळण्याचा चाळा फार गंमतीचा वाटे. ती फार भांडखोर आहे असें ओल्गाला वाटे तर; ओल्गाच्या वागण्यांत अगदीच ओबडधोबडपणा आहे–जराहि मार्दव नाही–असं नान्सीचें म्हणणें होते. दोघी आपापल्या परी चांगल्या होत्या; पण मी येण्यापूर्वी त्या एकमेकीशी फारसें बोलत नसत, असं इतर मुली मला सांगत.


ओल्गा आणि नान्सी ह्यांच्या सहवासांत माझे दिवस चांगलें जात होते यांत संशय नाही. नमुनेदार इंग्लिश बाई म्हणून नान्सीचें अवलोकन करीत बसण्यांत माझें कितीतरी तास जात असत. तिला कुत्र्यांचा फार शोक व पारख होती. फ्रेंच नुडल्स, अल्सेशिअन्स, टेरिअर्स असल्या कितीतरी जातींचीं कुत्रीं तिने तिच्या तरुणपणीं पाळलेली होतीं. त्यांना ती गरम कपडे शिवीत असे. त्यांची जात भेसळ होऊं नये, म्हणून कशी जपत असे, अमेरिकेपर्यंत आपली लाडकी कुत्रीं आपल्याबरोबर आपण कशीं नेत असूं, हें ती खुलवून खुलवून सांगत राही साधारणपणें कुत्र्यांमध्यें ज्यांना गम्य असतें त्यांना घोड्यांचाहि शोक असतो. नान्सी याला अपवाद नव्हती. उत्तम रेसच्या घोड्यांपैकी एका डर्बी विनरवर बसण्याचा मोका आपण कसा साधला व तो घोडा आवरतांना आपली कशी त्रेधा उडाली याचें वर्णन नान्सीच्याच तोंडून ऐकावें. जगांतील सुखाचा भरपूर आस्वाद घेऊन आतां अगदीं अपुऱ्या पैशावर उदरनिर्वाह करतांना नान्सीला फार वाईट वाटत असावे. तिला सरकारकडून पेन्शन मिळे, व त्याच्या भरीला तिला कांहींतरी उद्योग करून पैसे मिळवावें लागत. कोणाचें स्वेटर्स विणून दे, कपडे शिवून दे अशा गोष्टी ती करीत असे.

इंग्लंडमध्ये कोणतीहि गोष्ट असो, पण ती फुकट कोणी देणारहि नाही आणि कोणी फुकट घेणारहि नाही आपल्याला कांही येत असेल तर त्याचा उपयोग दुसऱ्याला पैसे मिळाल्याखेरीज कोणी होऊं देत नाही. ओल्गाचा झंपर शिवून दिला तरी नान्सीला ५ शिलिंग तिने दिलें पाहिजेत हें ठरविण्याची व बोलण्याची गरज नाही. हा संकेत आहे. मी जर कधीं माझ्या मुलीच्या वाढ दिवसाची म्हणून किंवा इतर

— कोंबड्यांची झुंज —



बेलग्रेड — युगोस्लाव्हिया : पिक्चर गॅलरीतील एक सुंदर चित्र



ब्रिटिश कायदेमंडळाचीं सभागृहें — लंडन

कारणाने पार्टी दिली तर पुन्हां मला ती परत देणें हें माझें आमंत्रण स्वीकारतांनाच त्यांनी ठरविलें आहे असें समजावें. मला हें पहिल्याने फार चमत्कारिक वाटे. पण पुढे पुढे इंग्लिश लोकांच्या अगदीं संपूर्ण व्यवहारी वागणुकीची कल्पना मला आली. दुसऱ्याचें वर्तमानपत्र मागून घेऊन गाडींत वाचणें इंग्लंडमध्ये शिष्टसंमत नाही. प्रत्येकजण पैसे टाकून वर्तमानपत्र विकत घेतो आणि ज्या ठिकाणीं फुकट वाचण्याची सोय मुद्दाम केलेली आहे तेथे तीं अगदीं डौलदारपणाने केलेली असेल. कांचेची कपाटें त्यांत व्यवस्थित वर्तमानपत्रें लावलेली. अगदीं नुसत्या जाहिरातीचें म्हणजे दुसरा कांहीहि मजकूर त्यांत असणार नाही असें वर्तमानपत्र लंडनला दर बुधवारीं निघतें व तें खूप खपतें हें पाहून मला नवल वाटलें.

कोणाचें कांही फुकट घ्यावयाचें नाही किंवा कोणत्याहि पुरविलेल्या थोडक्याशा सोयीसाठी थोडे पैसे घ्यावयाचेच, ह्या वृत्तिपायींच मला वाटतं इंग्लिश लोक बोलतांनाहि मोजूनमापून बोलत असावेत. येतांजातां फुकट सल्ले कोणी देत नाही. कारण सल्ला देणें ही महत्त्वाची गोष्ट इतक्या उथळपणें व आगाऊपणें करणें तिकडे वर्ज्य मानली आहे. नाणें टाकून आपण वजन करतों त्या प्रकारची ठराविक नाणीं टाकून बटणें दाबलीं की तुमच्या आवडीचें चॉकोलेट मशिनमधून बाहेर फेकणारीं यंत्रें जिकडे तिकडे उभीं आहेत. ट्यूबस्टेशनामध्ये तर पहिल्या दिवशीं मला फार गंमत वाटली. मोठमोठीं काचेचीं कपाटें उभी करून ठेवलेली. त्यावर सर्व स्टेशन्सचीं नांवें लिहून आंतून दिव्यांचा उजेड पाडलेला. प्रत्येक कपाटावर ठराविक किमतीचें नाणें फटींतून आंत टाकलें कीं तुमचें तिकिट तुमच्या हातांत मिळतें. खिडकींत रांग करून उभें रहावयास वेळ नसला कीं आपलें आपण तिकीट काढून गाडींत चढावयाचें. आपल्याकडे टेलिफोनमध्ये नाणीं टाकावयाचीं तर किती खोटेपणा आढळतो, कीं पब्लिक टेलिफोन्स बंद पाडले जातात. इंग्लंडमध्ये अशी स्लॉट मशिन्स चालू परिस्थितींत राहतात इतकेंच नव्हे–पण त्यांत पैसे टाकतांनाहि लोक फार प्रामाणिकपणें वागतात हें मीं डोळ्याने पाहिलें आहे. संपलेल्या गोळ्यांच्या पुड्या, चॉकोलेटची पाकिटें, तिकिटें, काय असेल तें नियमितपणें एक-दोन दिवसांनीं

एक माणूस येऊन बघून जातो, व संपलेल्या वस्तु त्यांत भरून आंत जमलेला गल्ला गोळा करून निघून जातो. कटकट नाही, कुरकुर नाही, कोणाची तक्रार नाही. ह्या वृत्तीमुळे दैनंदिन जिणें सर्वसाधारणपणें किती सुखाचें होतें.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट जातां जातां नमूद करावीशी वाटते. बसमधून आगगाडींतून फुकट प्रवास करण्याची प्रवृत्ति सर्वसाधारणपणें मला आढळली नाही. जर असे फुकटे दिसलेच तर ते खात्रीने ब्रिटिश नसत. इतर देशीयच असणार, हें खुशाल समजावें. डबल-डेकच्या एका बसमध्ये फक्त एक कंडक्टर दोन्ही मजल्यांवर तिकिटें देणें, घंटी मारणें, ठराविक नंबर आंत घेणें ह्या सर्व गोष्टी करते. ही आणि ह्या कंडक्टर्स बहुसंख्य स्त्रियाच आहेत. आपणांपर्यंत जर तिकिट देण्यासाठी कंडक्टर येऊन पोहोंचूं शकला नाही आणि आपल्याला तर उतरून जावयाचें आहे अशी वेळ आली तर शेजारच्या माणसापाशी बसचें भाडें देऊन ठेवावें व मग उतरावें, असा प्रघात आहे. थोडचा थोडचाशा अवधानाने आपलें जीवन कसें सुखी करावें हें इंग्लिश लोकांकडून शिकावे.

अशा ह्या सगळचा वातावरणांत माझे दिवस किती मजेंत जात होते. हिंदुस्थानांतील माझ्या व्यवसायाच्या आठवणीसुद्धां केवळ दुःखकारक वाटत. इतकी मी इथल्या धकाधकीला कंटाळलेली होतें. माझें घर, माझीं माणसें ह्यांना जर इंग्लंडमध्ये उचलून आणून ठेवितां आलें तर मला त्या नाठाळ भारतीयांच्या संगतींत परत रहावें लागणार नाही असें सुखाचें; परंतु अव्य-वहारी विचार माझ्या मनांत येत असत. जसजसे दिवस जात होते तसतशी तेथे आणखी राहण्याविषयी माझ्या मनांत प्रबळ इच्छा उत्पन्न होऊं लागली. आणखी दोन-तीन महिन्यांनी परत मुंबईच्या बैलघाण्या, दैनंदिनीला जुंपून घेण्याची कल्पनाच मला करवेना. मी आला दिवस आपला, ह्या तत्त्वानुसार प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेत होतें. डोळचांनी बघतां येईल तितकें बघावयाचें, कान सतत उघडे ठेवावयाचे, पायांनी जितकें अंतर व्यापून घेतां येईल तितकें घ्यावयाचें, डोळचाला कायम किल्ली देऊन ठेवावयाची व हातांनी जितकें करतां येईल तितकें करण्याची मी शिकस्त करीत होतें.

होतां होतां आमचा शिक्षणक्रम संपत आला. आमची परीक्षा जवळ आली. इतके दिवस गेलेले श्रम फुकट गेले कीं सार्थकी लागलें हें ठरविण्या-

११४२५

साठी लेडी चर्चिलच्या अध्यक्षतेखाली आमचा छोटासा समारंभ होणार होता. आम्ही केलेल्या अभ्यासाचें प्रात्यक्षिक त्या दिवशी करून दाखवावयाचें होतें. मुली, शिक्षक, मुलींचे नातेवाईक, आप्तेष्ट व निमंत्रित ६०–७० मंडळी इतकाच समाज होता. समारंभ झोकांत आखलेला होता, पण किती झालं तरी आम्ही शिकाऊ मुलीच होतों. एकटीने उभें राहून आपापलीं आपणच बनविलेलीं साधनें वापरून स्वत: केलेल्या एखाद्या योजनेचा आराखडा समजावून सांगावयाचा–तोहि इंग्लिशमधून–आमच्या प्रत्येकीला अवघड होतें. पहिली पाळी माझी होती. लेडी चर्चिल आणि आणखी दोन-तीन लेडीज आल्या. आमची ओळख करून देण्यांत आली. आम्ही सर्वांनी आमचीं समूह-गीतें म्हणून त्यांचें स्वागत केलें. आमच्यावरोबर आमच्या ६० वर्षांच्या शिक्षिका मिस स्टुअर्ट होत्याच. इतक्या वयामध्ये त्यांना लहान मुलींच्या सारखं नाचतांना व गातांना बघून मला वाटतें आमच्या इकडल्या ६० वर्षांच्या बायांना जी मूर्च्छा आली असती त्यांतून त्या परत सावध झाल्याच नसत्या! इंग्लिश लोकांचें म्हणा किंवा पाश्चिमात्यांचें म्हणा, हें वैशिष्टच आहे कीं, वयपरत्वें लहानपणींच्या आपल्या खिलाडू वृत्तीचा ते लोप होऊं देत नाहीत. इतकेंच नव्हे तर अशा वृत्तीची मोठ्या आस्थेने ते जोपासना करतात. दिवसेंदिवस कष्टाच्या व जिगजिगीच्या होत जाणाऱ्या आयुष्यक्रमाला ह्या अशा वृत्तीमुळें किती निराळाच उजाळा मिळूं शकतो, हें मीं स्वत: अनुभवलें आहे. माझ्या वयाला मला वाटत होते कीं, माझे सर्व कांही झालें आहे. आतां काय मला हवें आहे ? कांही नको. आतां ह्यापुढे हातून तरी काय होणार, झालं–संपलं–पुष्कळ झालं. तीच आमची शिक्षिका वयाच्या ६०व्या वर्षीं आपण अजून तरुण असल्यामुळे आयुष्यांत नक्की कशाला वाहून घ्यावयाचं याचा अजून विचार करीत होती. तिने बोलतां बोलतां एक दिवस मला सांगितलें कीं २०–२५ वयांपर्यंत आम्ही मुलांना अगदी लहानच समजतों. नंतर त्यांना जराजरा समजूं लागलें म्हणजे आयुष्याबद्दलची रूपरेषा ठरविण्याकरितां ४० पर्यंतचा तारुण्यकाळ असतो. चाळिशीनंतर प्रौढत्व येण्यास सुरवात झाली व साधारण ६० वर्षांच्यापुढे नव्याने कांही करावयास थोडा उशीर झाला, अशी आमची भावना असते. ह्याच शिक्षिकेचें आतां गेल्या वर्षीं लग्न

झालें. ह्यापुढे तिचा संसार व बाकी सर्व कार्य होणार. मला ती म्हणे कीं, तूं फारच तरुण आहेस. आमच्याकडे चाळीशीनंतर जरा कुठे वयाचा विचार मनांत येतो. आणि खरोखरीच मला इंग्लंडमध्ये राहिल्यापासून वयाचा विसर पडलेला होता. आणि मी परत आले तेव्हाहि सर्वांस जाणवेल इतका ताजेपणा आणि तजेला माझ्या तोंडावर दिसत होता. असो. तर मी काय सांगत होतें? हं कीं लेडी चर्चिलसकट सर्व पाहुण्यांना आणि विशेषत: मिस स्टुअर्टला–चुणचुणीतपणाने हुशारी आली आणि आम्ही प्रात्यक्षिक करून दाखविण्याच्या हॉलमध्ये सर्वजण येऊन बसलों. आतां आम्ही घोळके करून आपापसांत कुजबुज करीत आंतल्याआंत चुळबुळ करीत आपापल्या छातीचे जलद पडणारे ठोके आटोक्यांत आणण्याचा प्रयत्न करीत होतों. इतक्यांत मिस स्टुअर्टचें प्रास्ताविक भाषण संपून तिने माझें नांव पुकारलें सुद्धां! मी माझें साहित्य घेऊन माझ्याकडून जितका शांतपणा दाखवितां येईल तितका शांतपणा दाखवीत टेबलापाशी जाऊन उभी राहिलें. वक्तृत्वकलेसारख्या महत्त्वाच्या कलेकडे इतके दिवस आपण दुर्लक्ष केलें हें बरें केलें नाही, असा विचार करीतच सुरवात तर केली. हिन्दुस्थानांतील खेडीं व इंग्लंडमधील खेडीं ह्यांच्यामध्ये कसें जमीन-अस्मानाचें अंतर आहे व तेथील खेडुतांच्या जीवनाची तुलना करणेंसुद्धा किती निष्ठुरपणाचें होईल, अशासारखी कांहीतरी सुरवात करून हिंदुस्थानांतील कम्युनिटी डेव्हलपमेंट (Community Development) मोहीम कोणत्या तत्त्वानुसार झाली ह्याबद्दलची कल्पना येण्यासाठी संकुचित वैयक्तिक स्वार्थापासून ते जगांतील सर्व मानवजात एकत्र आहे अशा खुल्या तत्त्वज्ञानापर्यंतच्या पायऱ्या सांगतांना फळ्यावर हिंदुस्थानचा नकाशा काढला. मी इतका झटकन् तो नकाशा काढला असावा कीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होईपर्यंत मला त्या माझ्याकडून चटकन् झालेल्या कृतीचें तितकेसें महत्त्व वाटलें नव्हतें. आतां मला जोर आला. उत्तेजनाने आलेल्या जोमाबरोबर वाणी सुलभ व जोरकस झाली. मी स्वत: काढलेल्या पोस्टर्सच्या सहाय्याने स्वत: तयार केलेल्या बाहुल्यांच्या द्वारें पॅनेलच्या फळ्यावर सहज चिकटल्या चित्रांच्या फेकीने एक-एक मुद्दा स्पष्ट करीत जवळ जवळ पंचवीस मिनिटांनी टाळ्या घेत घेत मीं माझें भाषण संपविलें. माझ्यामागून येणाऱ्या मुलींना न गांगरता केलेल्या

प्रात्यक्षिकांनी बराच धीर आला व एकापाठोपाठ एक त्यांनी आपापले धडे सांगून टाकलें. शेवटीं सर्व मुलींच्या कळसूत्री बाहुल्यांचा मनोरंजक खेळ आम्ही करून दाखविला. कळसूत्री बाहुल्या करण्याचें शिक्षण देणाऱ्या एका तज्ज्ञाकडे आम्ही गेलों होतों. त्याने गुलाब व तिची आजी ह्यांची गोष्ट इतक्या प्रभावीपणाने आम्हांला छोटयाशा म्हणजे अगदी २॥–३॥ च्या छोटेखानी रंगमंचकावर करून दाखविली होती कीं, त्या रात्रीं मला झोप आली नाही. अगदी टाकाऊ वस्तूंपासून व साध्यासुध्या हत्यारांच्या मदतीने ससे, उंदीर, लांडगा, कोंबडया, बाहुल्या, विदूषक अशीं नानाप्रकारचीं चित्रें बोलतां बोलतां त्याने तयार केलीं व लहान मुलांच्या मनोव्यापारांकडे पाहण्याची एक नवी दृष्टि त्याने आम्हांस मिळवून दिली. कळसूत्री बाहुल्यांचा खेळ चालू असतांना मुलें त्यांतील पात्रांशी इतकी समरस होतात कीं राग, लोभ, आवेश हे सर्व विकार त्यांच्या मनांत तीव्रतेने उत्पन्न होतात गुलाबला तो आजीच्या अंथरुणांत बसलेला लांडगा दांत नखें दाखवून फसवीत आहे व तिला तो खाणार आहे, ह्याबद्दल मुलांना इतका संताप येत असे कीं, डोळयांत प्राण आणून आपापल्या खुर्च्यांमध्ये आपोआप तीं उभीं राहून पुढे काय होणार तें लक्षपूर्वक पहात. त्या दोन-चार दोऱ्यांच्या जोरावर हालचाल करणारी चेटकीण मरून पडली कीं चिमुकल्या राजकन्येबरोबर हीं खरीखुरीं प्रेक्षक-मुलें नाचू लागत! हें मीं स्वत: पाहिलें होतें. अर्थात् ह्या खेळांच्या दृष्टीने आम्ही केलेली बाहुली कितीतरी ओबडधोबड झाली होती; परंतु त्यांच्या द्वारा जें आम्हीं सांगत होतों त्या गोष्टीला साकार रूप देण्याइतपत यश त्यांनी आम्हांला नक्कीच दिलें. आमचा समारंभ चांगला झाला. आमच्या अभ्यासक्रमाचा समारोप झाला तो समाधानकारकपणें झाला. परकीय देशांत इतक्या लोकांसमोर उभे राहून भाषण करण्याचा पहिलाच प्रसंग म्हणून माझ्या लेखीं त्या दिवसाची नोंद झाली. त्यानंतर मला अशीं भाषणें देण्याची वेळ चार-पांच वेळा तरी आली; परंतु पहिल्या दिवसाइतकी धांदल माझी झाली नाही. त्या दिवसाइतका टाळयांचा कडकडाटहि क्वचितच मिळाला.

आमच्या अभ्यासक्रमाच्या दिवसांत मीं अनेक संस्थांना भेटी दिल्या. कितीतरी क्षेत्रांतील नानातऱ्हेच्या स्त्रिया मला भेटल्या. परंतु आपल्या

देशाबद्दल आपल्या नकळत आपण दूरदेशीयांमध्ये वावरतांना केवळ आदरानेच कसे बोलतों, ह्याचें मला फार आश्चर्य वाटलें. आपल्या लोकांमधील दोषच इंग्लिश लोकांच्या गुणांकडे बघून सारखे काढीत रहाण्याचा माझ्या मनाचा चाळा चाललेला होता आणि असें असूनहि जबाबदार लोकांसमोर बोलतांना आपल्या देशांतील चांगल्याची तरफदारी व वाईट गोष्टीसाठी परकीय अंमलच कसा जबाबदार आहे, ह्यांचें विवेचन करतांना मला किंचितहि अडखळल्यासारखें झालें नाही. जातां जातां, बसतां उठतां मुलाला धपाटे मारणारी आई रस्त्यांतून मोटार जवळ येतांच मुलाचें बकोटें धरून त्याला आपल्या बाजूलाच खेंचते तसें कांहीसें देशी मनाचें विदेशीय वातावरणांत होतें. जितक्या हिरीरीने मीं भाषण केलें तितक्या उत्कटतेने माझ्या मनांत देशप्रेम आहे का, असा मीं माझ्या मनाशीच नंतर विचार केला; तर 'हो', असें उत्तर मला लवकर मिळेना; परंतु मीं खोटं सांगितलें होतें असेंहि मला वाटेना. प्रेमाची तऱ्हा उलटी हेंच खरं !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ विः ..................
क्रमांक ........................ नोंः दिः ..................

# ४

# इंग्लिश पाहुणचार

ऑक्टोबर महिन्यांत मी जरा कोठें सरावतें न सरावतें तोंच मला नाउमेद करणारी हवा पडूं लागली. इंग्लंडमध्ये हवेचें महत्त्व किती आहे आणि इंग्लिश लोक हवेबद्दल इतक्या आपुलकीने कां बोलतात व चौकशी करतात, हें तेथे राहून त्या तऱ्हेवाईक हवेचा अनुभव घेतल्याशिवाय कळणार नाही. मी लंडनमध्ये आले त्या दिवशीं हवा अगदी छान. सकाळीं उठून खिडकीबाहेर दिसेना म्हणून बिछान्यावरून उठून बाहेर डोकावलें तों पाऊस पडत होता आणि सकाळीं न्याहारी करून जामानिमा करून बाहेर पडलें तों दुसऱ्या स्टेशनवर उतरेपर्यंत हवा अगदी मोकळी; ही असली पाठशिवणी माझ्या जरा अंगवळणीं पडते न पडते तेवढ्यांतच इतकी कडाक्याची थंडी पडूं लागली कीं, मला वाटलें आतां कसची मी राहतें आणि कसची शिकतें! जेमतेम जिवंत परत गेलें तरी पुष्कळ झालें. भर ऑक्टोबर महिन्यांत उष्णतामान ३९°, संध्याकाळ म्हणजे घड्याळावरून ५ नंतर संध्याकाळ म्हणायची, बाकी सारा दिवस तसाच अंधारलेला आणि थंडावलेला! संध्याकाळ झाली कीं घरीं येऊन ७–७॥ ला जेवण झालें कीं नंतर करूं म्हणून ठरविलेल्या कामांना बुट्टी देण्याचीच पाळी, इतकी थंडी वाजूं लागे. झटपट कपडे करून बिछान्यांत शिरावयाचें. पायाशी, पाठीशी, छातीशी गरम पाण्याच्या पिशव्या घ्यावयाच्या आणि बस्स, पडून रहा-

वयाचें. फार फार तर बोलण्याची क्रिया व्हावयाची, बाकी कोणत्याहि नैसर्गिक क्रिया करण्यासाठीहि उठूं नयेसें वाटे. ह्यावेळीं मला संध्याकाळीं म्हणजे रात्रीं आंघोळ करण्याची संवय लागली व तीच पुढे कायम झाली. दिवसभराच्या वावरानंतर बिछान्यावर झोपतांना आंघोळ करून स्वच्छ कपडे घालून झोपणें ही किती सुखद कल्पना आहे ! रात्रीं गरम पाण्यांत डुंबणें म्हणजे सबंध दिवसाचा शीण डुबविण्यासारखें वाटे.

जेवण झाल्यावर शेकोटीपुढें बसून गप्पा मारणें हा अशा वसतिगृहांतील एक कार्यक्रमाचा भाग असतो; पण मला मात्र कधी एकदा आंघोळ करून माझ्या प्रिय पिशव्या कवटाळून निजतें असें होऊन जात असे. हिंदुस्थानांत असल्यापासून माझें आणि थंडीचें अजिबात वाकडे ! आतां तर काय येथील थंडीच भयंकर ! माझी कुडी वाकडी करते कीं काय इतकी कडक; पण आश्चर्य म्हणजे ही थंडी आपल्या इकडच्या थंडीसारखी मला मुळींच बाधली नाही. पडसें नाही, अंग फुटणें, ओठांना पायाला भेगा पडणें, कांही नाही. नुसती थंडी वाजत राही इतकेंच; पण ती इतकी वाजत असे कीं, कित्येक सुट्टीचे दिवस मी केवळ थंडीमुळें घरीं विछान्यांत दुपारसंध्याकाळसुद्धा निजून काढले. आतां शनिवार-रविवारीं इकडे तिकडे जाणें व वीकएंडस (Week ends) साजरे करणें ही नित्याची गोष्ट होऊं पहात होती. माझ्या बहिणीच्या परिचयाचे एक गृहस्थ कीं ज्यांनी तिला मुलीप्रमाणें केलें होतें ते एक दिवस मला भेटावयास आले. फोनवरून आमचें भेटावयाचें ठरलें होतें. त्याप्रमाणें ते होस्टेलवर आले. मी बाहेर हॉलमध्ये त्यांचीच वाट पहात बसलें होतें. ते आल्याबरोबर त्यांनीं मला ओळखलें. I know the lady I have come to see असें हंसत म्हणतच त्यांनी हात पुढें केला. आमची ओळख झाली. "येथे येण्यापूर्वी मी बऱ्याच प्रौढ बाईला भेटावयास जात आहें, असें मला वाटत होतें; पण तुमच्याकडे बघून मला फार आश्चर्य वाटलें" असें बोलून अगदी खेळीमेळीने आमची संभाषणास सुरवात झाली व ठरल्याप्रमाणें लंडन दाखविण्याची कामगिरी त्यांनी हौसेने पत्करली. मला टॉवर ऑफ लंडन (Tower of London), वॉटरलू ब्रिज (Waterloo Bridge) सेंट पॉल्स कॅथेड्रल (St. Paul's Cathedral) इतक्या ठिकाणीं त्यांनी फिरवून

आणलें. टॉवर ऑफ लंडन, ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचें म्हणून फार पहाण्यासारखें वाटलें. ज्या दोन मुलांना तेथे रिचर्ड द थर्ड ने मारलें त्यांचा पलंग (बिछाना), तें भुयार व काळोख्या दमट वास येणाऱ्या कुबट खोल्या वगैरे पाहून हे गोरे लोक आंतून किती काळेच आहेत, ह्याची सत्यता पटली. टॉवर आफ लंडनमध्ये पहाण्यासारखा खरा भाग म्हणजे राजरत्नें ठेविलीं आहेत तो ! इतके दिवस कौतुकाने ज्या संबंधीं वाचलें होतें तो कोहिनूर हिरा तेथे पाहिला. शिवाय स्टार ऑफ आफ्रिका (Star of Africa), केसर-इ-हिंद इत्यादि अनेक रत्नें व व्हिक्टोरिया राणीपासून आजपर्यंतच्या राजेराण्यांनीं निरनिराळचा प्रसंगीं वापरलेलीं रत्नें, मुकुट, राज्याभरणें वगैरे सर्व व्यवस्थितपणें मांडून ठेवलेलें आहे व्यापारी लोकांनी मांडलेलें तें प्रदर्शन. पैसे मिळविण्याची शक्कल त्यांत आहेच, पण व्यवस्थाहि चांगली ठेवली आहे. नवरात्रांत महालक्ष्मीच्या दर्शनाची व्यवस्था जितकी चांगली होत नाही तितकी एक शिलिंग दिल्यानंतर हे रत्नालंकार बघण्यासाठी तेथे केली होती. रत्नें ठेवलेल्या काचेच्या खिडक्यांच्या चौकटचांतून विजेचा प्रवाह खेळता ठेवण्याची म्हणे त्यांत व्यवस्था आहे. म्हणजे कोणी डल्ला मारण्याचा बेत केलाच तर तो फसावा. टॉवर ऑफ लंडनमध्ये क्रॉमवेलसंबंधीचें प्रदर्शन आहे, त्यांत बारकाईने पाहण्यासारखें पुष्कळच सामान आहे.

वॉटर्लू ब्रिज हा त्या नांवाच्या सिनेमापेक्षां सुद्धां वॉटर्लू आणि नेपोलियन ह्यांच्या परस्परसंबंधामुळे मला पाहण्याची घाई झालेली होती. वॉटर्लू हा भाग आतां इतका माणसाळलेला आणि गजबजलेला निव्वळ शहरी झाला आहे कीं, नेपोलियनबद्दल वाचतांना जी कल्पना खेडयाबद्दल असते किंवा होते ती या भागांत आल्यावर साफ नाहीशी होते. ह्याच नेपोलियनच्या आठवणी नव्याने ताज्या करून देण्याचें सामर्थ्य, जें पॅरिस शहरांत मला पुढे आढळणार होतें त्याची ओझरती कल्पनासुद्धा मला वॉटर्लू भागांत ह्यावेळी आली नाही. जसें कांही ह्या ठिकाणीं कधी कांही घडलेंच नव्हतें. ट्रॅफलगार स्वेअरमधील स्मारक ह्यासंबंधी जितकें कौतुक त्याच्या एक शतांशानेहि नेपोलियनबद्दल आतां इतक्या वर्षांनंतरहि व्यक्त करण्याची आवश्यकता त्यांना वाटत नाही. अर्थात् हें साहजिकच आहे; परंतु वॉटर्लू पाहिलें तेव्हा माझी निराशा झाली हें मात्र खरें.

सेंट पॉलसबद्दल इंग्लिश लोकांना-डॅडीना ( जे गृहस्थ माझ्याबरोबर होते त्यांना )जे काय कुतूहल आणि आश्चर्य वाटतें तेवढें मात्र मला वाटलें नाही. कारण मी सेंट पीटर्स बघितलें होतें आणि त्या मानाने सेंट पॉल्स जें एरवीं फार मोठें वाटेल तें मात्र मला फारच लहान वाटलें. मिलानचें कॅथेड्रलसुद्धा त्या मानाने मोठें आहे; परंतु सेंट पीटर्सची प्रतिकृति म्हणून सेंट पॉल्सचें इंग्लिश लोकांना फारच आकर्षण आहे. त्याच्या घुमटामध्ये आपल्या गोलघुमटाप्रमाणें सातवेळां प्रतिध्वनि निघतात. स्थापत्यरचनेच्या दृष्टीने फार कौशल्यपूर्ण घडण आहे, हें सर्व मात्र मला डॅडींनी ऐकविलें. आम्ही गेलों तेव्हां तेथे प्रार्थना चालली होती. नंतर आम्ही सर्व पाहून अगदी वरपासून ते थेट भुयारापर्यंत सारें कांही पाहून आलों. वॉटर्लूच्या लढाईंत जितक्या बंदुका, तोफा वगैरे लूट वेलिंग्टनच्या सैन्याने केली त्या सगळ्या आटवून त्यांचा एक मोठा रथ तयार करून त्यावर ड्यूक ऑफ वेलिंग्टनचें शव वाहून नेण्याचा समारंभ केला. तो रथ अजून तेथे आहे. त्याचप्रमाणे नेल्सनचेंहि स्मारक मोठ्या प्रमाणावर केलेलें आहे. शिवाय मोठमोठे राष्ट्रपुरुष म्हणून मानले गेलेले पण राजघराण्यांतले नव्हेत अशा सर्वांच्या शव-पेट्या व स्मारकें तेथे आढळलीं. सांगावयाचें तात्पर्य काय कीं मी आतां लंडन पहाण्याला सुरवात केली असें म्हणावयास हरकत नाही. पुढच्या एखाद्या वीक-एंडला तुला आमच्या घरीं घेऊन जाईन, असें सांगून डॅडी निघून गेले. माझ्या बहिणीप्रमाणें मला त्यांनी मीं लंडनमध्यें असेतों मुलगी मानिलें व शेवटपर्यंत तसेंच वागविलेंहि. कपाळावर ओठ टेकून स्वत:च्या मुलीप्रमाणेंच माझा निरोप घेतला आणि मला गहिंवरून आलें. इंग्लिश लोकांची आणि तुमची ओळख नाही तोपर्यंत ते तुमच्याशी अतिशय तुटक वागल्यासारखें तुम्हांला वाटेल; पण जर एकदा तुम्ही घरांतले मानण्यालायक आहांत, अशी त्यांची भावना झाली तर मध्यरात्रींहि तुमच्या मदतीला धावून येण्यास ते कमी करणार नाहीत. मग तुम्हांला त्यांच्या घरांत अगदी नि:संकोचपणाने वावरणें फार सुलभ करतील. त्यांच्या घरीं मी पुढे गेलें तेव्हा मला कसें वाटलें तें मी पुढें ओघाने सांगेनच; परंतु त्याच्या अगोदर मला दुसऱ्या एका इंग्लिश कुटुंबाकडे पाहुणचार घेण्याचा

प्रसंग आला. त्या वेळीं एका मध्यमवर्गीय इंग्लिश कुटुंबाचें जवळून निरीक्षण करण्याची संधि मिळाली.

इतके दिवस इंग्लिश लोकांशी माझा नित्य संबंध येत होता तरी राहणें होस्टेलमध्ये, वावरणें समाजामध्ये व ओळखी शाळा-कॉलेज किंवा अभ्यासामुळे होतील त्या. तेव्हा खाजगी आयुष्य कसें असतें, त्याची कल्पना आलेली असली तरी प्रत्यक्ष पाहण्याची संधि मिळाली नव्हती. आतां ऑड्री आणि जॉन ह्यांनी मला शनिवारीं जेवावयास बोलाविलें व त्याप्रमाणे मला घेऊन जाण्यासाठी ऑड्री आली. आम्ही आमच्या पद्धतीने जेवण केलेंच आहे, परंतु तुमच्या पद्धतीचा जर एखादा पदार्थ केला तर आम्हांला आवडेल हें तिने खुबीने मला सुचविलें." तिचा हेतु इतकाच कीं, जर त्यांचें जेवण मला न आवडलें तर मला उपास न घडावा. मीहि आमचा पुलाव, ज्याबद्दल तिने ऐकलें होतें व हॉटेलमध्ये एकदोनदा खाल्लाहि होता तो करण्याचें ठरविलें. आम्ही जातां जातां जरूर ती खरेदी केली व तिच्या घरीं गेलों. त्यांना नव्यानेच घर मिळालें होतें. फारसा मोठा प्लॉट नव्हता; परंतु ती जितका लहान लहान म्हणून सांगत होती तेवढा लहान तर तो खासच नव्हता. दोन माणसांना एवढी जागा म्हणजे लंडनमध्ये ती भाग्यवानच होती. मी पहिल्यांदाच ह्या खाजगी घरांत शिरलें आणि तीहि थेट दिवाणखान्यापासून तों सैपाकघरापर्यंत.

आम्ही हातपाय धुऊन लव्हेंडरचा फरारा अंगावर उडवून ताज्यातवान्या झालों. तेवढ्यांत केव्हातरी आंत जाऊन ती बटन दावून आली असावी. कारण सैपाकघरांत जातों तों पाणी उकळत होतें. आम्ही चहा प्यालों. हिंदुस्थानचा चहा इंग्लंडमधील लोकांना फार आवडतो. मी तिला भेट म्हणून थोडा चहा व इतर कांही खास भारतीय वस्तु नेल्या होत्या. इकडन जातांना बरोबर मोठमोठ्या वीडाच्या बांगड्यांचे जोड, बटवे, निरांजनें अशा कांही वस्तु मीं नेल्या होत्या. रोमला आम्ही ज्यांच्याकडे राहिलों होतों त्यांचा निरोप घेतांना दोन निरांजनें येशूपुढे लावण्यासाठीं दिलीं व तीं लावून दाखविलीं. तेव्हा त्यांना किती आनंद झाला होता. दोन बोटांत धरून निरांजन उचलण्याची तर त्या म्हातारीला फार गंमत वाटली होती. मी आणि किरण तिचे आभार मानीत होतों तेव्हां "तुमच्या

जातींत माझ्यासारख्या वृद्धेला चुंबन घेऊन निरोप देण्याचा प्रघात नाही का ?" असं तिनं इतक्या जिव्हाळ्याने विचारले कीं नकळत किरणने आणि मीं तिच्या कपाळावर ओठ टेकून तिचा निरोप घेतला. माणसाबद्दल फार अगत्य किंवा आपुलकी वाटत असली म्हणजे ती व्यक्त करण्याची ही पद्धत आहे, हें पुढे पुढे मला समजलें, परंतु तिने माझ्या डाव्या गालावर तोच प्रयोग केला त्यावेळी मला चमत्कारिक झालें हें मात्र खरें.

मीं ऑड्रीला दोन-चार वस्तु दिल्या त्याबद्दल व अशाच अनेक कितीतरी रोजच्या व्यवहारांतील गोष्टींबद्दल आम्ही बोलत होतों. चहा झाला व तिने भांडीं तशीच सारून लहानशा बेसिनमध्ये ठेवलीं. एकीकडे तिचा हाताने कांहीतरी उद्योग चालूच होता. तिने अॅप्रन (Apron) बांधला व आमचा बेत (मेनू) ठरविला होता तो मला सांगितला. कोंबडीचा बेत होता आणि कोंबडी तिच्या स्वयंचलित मंद अशा भट्टी (Automatic fire oven) मध्ये केव्हांची तयार होत होती माझ्या पद्धतीचा पुलाव करावयाचा, नंतर चिकन, त्यानंतर पुडिंग आणि सुरवातीला सुरेख सूप घ्यावयाचें असा बेत ठरला. अगदी १०×८ चेंच स्वयंपाकघर असेल पण सर्व सोयींनी परिपूर्ण होतें. एका बाजूला उभ्याने स्वयंपाक करावयाच्या विजेच्या शेगड्या, त्यांना उष्णता कमीजास्त करण्याचीं बटणें, त्या शेगड्यांच्या पट्टीला लागूनच एक खोलगट बेसिन, त्यांत नळ, पाणी, त्या शेजारींच लाकडाच्या पट्ट्या असलेली भांडीं पालथी घालण्याची फळी, ह्या फळीवरच भिंतीला एक छोटीशी शेल्फ व तींत व्हिमचा डबा, निरनिराळ्या तऱ्हेचे ब्रशेस, स्पंज, साबण अशा वस्तु. भिंतींत एक कपाट, त्यांत साठवणीचें डबे; परंतु इंग्लिश कुटुंबांतून घर भरभरून वस्तु ठेवण्याचा प्रघात नाही. सर्व व्यवहार आठवड्याच्या हिशेबाने असल्यामुळे आपल्याकडे आढळून येतें तशी साठवासाठव मात्र तिकडे कोणाकडेच आढळली नाही पगार आठवड्याला मिळणार, त्यामुळे भाडें देणें, वस्तु आणणें, बाजारहाट करणें हें आठवड्याच्या आठवड्यालाच होतें तेवढ्या आठवड्यांत जर कोणी जास्तकमी येणार असेल तर तें अगोदर माहिती असतें आणि आला गेला, बसायला आला तर येऊन जा अशी पद्धत नाही. साधारणपणें परिचय किती दाट आहे, यावर ब्रेकफास्टला, चहाला किंवा जेवावयाला बोलाविणें

ठरवितात. एकदां तसें ठरलें म्हणजे जेणेंकरून त्या पाहुण्याचा वेळ चांगल्या रीतीनें कसा जाईल हें पहाण्याची दक्षता घेतात. त्या दिवशीं मी ऑड्रीकडे पाहुणी म्हणजे ऑड्री व जॉन दोघांनी माझ्यासाठी ती संध्याकाळ ठेवलेली. कोणीहि येणार नाही त्यांच्याकडे मग. मात्र मला सोबत म्हणून जॉननें त्याचा एक अमेरिकन मित्र डेव्हिस ह्याला बोलाविलें होतें. सर्व-साधारण अशी पद्धत आहे कीं, दोघांना जोडीनें बोलावितात; पण एकटा पाहुणा किंवा एकटीच पाहुणी असेल तर तिच्यासाठी अथवा त्याच्यासाठी जोडीदार शोधून काढणें हें यजमानाचें काम आहे. माझ्या आवडीनिवडी, मला काय तऱ्हेच्या विषयावर बोललेलें आवडेल किंवा बोलतां येईल, असा विचार करून नंतरच त्यांनी डेव्हिसला बोलाविलें असणार. आमची पुलावाची तयारी होईपर्यंत जॉन व डेव्हिस आले. आम्हा दोघांची ओळख करून देण्यांत आली. बोलण्याचालण्यांत एकदम सफाई व उत्तम शिष्टाचार हा इंग्लिश लोकांचा विशेष गुण आहे. आम्ही चौघे आतां बाहेर आलों व दिवाणखान्यांत बसलों. ऑड्रीचें पाणी उकळलेलेंच होतें. तिने झटकन चहा तयार केला व बाहेर आणला. आम्हाला दोघांना संभाषणाच्या ओघांत ठेवून ऑड्री व जॉन आंत गेलीं. पंधरा-वीस मिनिटांत ऑड्री बाहेर आली ती छान कपडे घालून जेवणाच्या पोषाखांतच (Evening dress) आली. ती चांदणें शिंपीत आल्यासारखी आणि हंसली तें मोत्यें उधळल्यासारखी. झटपट बटनें दाबून दिवाणखान्यांत छान प्रशांत प्रकाश लावला गेला व जेवणाची तयारी झाली असल्याचें तिने आम्हांला सांगितलें वाजले होते सायंकाळचे सात. आतां जॉनहि छान शिवलेला काळा सूट घालून बाहेर आला. आम्ही सर्वजण आंत गेलों. अर्थात् बायका नेहमीच आधी. पुरुषांनी नेहमी त्यांच्यामागून आंत जावयाचें मग तें कुठेहि असो. मोटारींत चढा-वयाचें असो, आगगाडींत, बसमध्ये चढावयाचें असो, दुकानांतून हिंडावयाचें असो. जिकडे तिकडे हें वैशिष्टच कीं स्त्रियांना पुढे घालून पुरुष वावरतात. त्यामुळे दारें लावणें, ओढून घेणें, दिवे घालविणें, हें सर्व तेवढ्यांतल्या तेवढ्यांत अवधान सांभाळून पुरुषाला करावें लागतें. आंतमध्ये सैपाकघरांत आम्ही आलों तों मद्याचीं भांडीं उपडीं घालून ठेवलेलीं सर्व बशा चमचे वगैरे मांडून ठेवलेले. नंतर मला समजलें कीं, ऑड्री कपडे करीपर्यंत जॉननें

हें सर्व करून ठेवलें होतें ! त्यांच्याकडे भांडीं व बशा विसळण्याचें काम नेहमी पुरुष करतात किंवा पाहुण्या माणसाला जर मदत करावयाची असेल तर त्याला बशा पुसण्याचें काम देतात. मला माझ्या जागेवर बसवून नंतर माझ्यासमोर ऑड्री, तिच्या शेजारीं जॉन व माझ्या उजव्या हाताला डेव्हिस असे आम्ही बसलों. उजव्या हाताला ठेवलेलें भांडें, उपकरणी वगैरे सामान माझें व डेव्हिसने मला काय हवें काय नको तें पहावयाचें हा संकेत. पहिल्याने ग्लासेसमधून जॉनने दारू भरली. माझ्या सन्मानार्थ कांहीतरी वाक्य उच्चारून आम्ही जेवावयाला सुरवात केली. शॅम्पेन, पोर्टवाइन, शेरी, असल्या मामुली मद्याच्या प्रकारापासून तों व्हिस्की, ब्रँडी येथपर्यंत सगळे— मला वाटतें कमींतकमी दहाबारा—प्रकार त्या कपाटांत होते. पाणी न पितां मधून मधून दारूचे घोट घ्यावयाचे; पण एवढे मात्र खरें कीं, इंग्लंडच्या हवेंत आपण इकडे पितों तसें घटाघटा पाणी प्यावेंसेंच वाटत नाही. कढत कढत सूप आम्ही वाढून घेतलें. नंतर पुलावा. तो मात्र दुर्दैवाने इतका तिखट झाला होता कीं, माझ्याच डोळ्यांना पाणी येऊं लागलें. मग त्या तिघांना काय झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी ! तिकडल्या मिरच्या अगदी लहान लहान दिसत होत्या म्हणून मीं जरा जास्त घातल्या; पण त्या इतक्या तिखट असतील अशी मला कल्पना नव्हती; तरी मला वाईट वाटूं नये, म्हणून जॉन व डेव्हिस तसेंच दाबून पुलाव खाण्याचा प्रयत्न करीत होते; पण संपवीत मात्र होते पापड आणि मद्य ! तेव्हां चटकन तो पदार्थ बाजूला सारून त्या दिवसाची खास मेजवानी ऑड्रीने पुढे आणली. एका मोठ्या बशांत दोन पाय वर करून ठेवलेली ती कोंबडी बघतांच आतां पोटांत ढकललेला पुलावा तरी आंत राहतो की नाही, असें मला होऊन गेलें. कोंबडी समोर येतांच जॉन व डेव्हिस यांची कळी खुलली. बिचाऱ्यांना ह्यावेळेपर्यंत भलत्याच कसोटीला तोंड द्यावें लागलें होतें. इंग्लिश लोकांना तिखट अगदी चालत नाही. कोंबडीचे तुकडे करून आमच्या बशांतून ऑड्रीने घातले व बरोबर भाज्या, सॅलड वगैरे होतेंच. चिकन मला इतकें आवडलें कीं, बोटीवर किंवा आतांपर्यंतच्या प्रवासांत मी तें खाऊनच कधी बघितलें नाही, याबद्दल माझा मलाच फार राग आला. मांसाहारी पदार्थ अगदी साधे शिजवून खाल्लेलेच चांगले लागतात. आपल्या-

कडे मसाले घालून करतात ते अगदी चांगले नाही, असं माझं जें मत होतें तें आतां कधी बदलेल असं वाटत नाही. पुष्कळ लोक इंग्लिश लोकांच्या मिळमिळीत व बेचव जेवणाबद्दल तक्रार करतात; परंतु चमचमीत आहार निदान मांसाहार मला वाटतें वरा लागत नाही. बेकन, हॉट-डॉग्स, साधे शिजविलेलें मटन, भाजलेलें चिकन ह्या मसाल्याविना केलेल्या जिनसा भाज्यांबरोबर फार चांगल्या लागतात. कोंबडीच्या तंगड्या उतरवून टाकल्यानंतर पुढचा मात्र मला आवडणारा पदार्थ होता. पुडिंगमध्येहि बरेच प्रकार असतात. दूध पुडिंग, प्लम्पुडिंग आणखी कस्टर्ड पुडिंग कितीतरी. दूध-पुडिंग तर छान झालें होतें व तें फिजिडिअरमध्ये घालून ठेवल्याने तर सुरेखच लागलें. अमेरिकेमध्ये खाण्यापिण्याची किती रेलचेल आहे, बहुतेक प्रत्येक खाण्याचा कसा पदार्थ आयता मिळतो, ही संवय किती वाईट आहे इत्यादि काय काय तरी डेव्हिस सांगत होता. माझ्या मनांत मी, माझी आई, आजी, काकू, मामी सगळ्यांची आठवण करून म्हणत होतें कीं ह्या डेव्हिसला काय सांगावं ? आमच्यापैकीं अर्धी लोकसंख्या सबंध आयुष्यभर नुसते खाण्याचे पदार्थ सकाळ, दुपार, संध्याकाळ तिन्ही त्रिकाळ करण्यामध्ये गर्क असते आणि तुमच्याकडे सगळ्या गोष्टी आणि त्याहि इतक्या स्वच्छ व रहाणीच्या मानाने स्वस्त आयत्या मिळतात तरी तुम्हाला त्याची किंमत नाही ! माणसाचें सुख दुखतें हें कांही खोटे नाही.

हिंदी स्त्रियांच्या संसारांतील स्थानाबद्दल किंवा कष्टाळूपणाबद्दल इंग्लिश आणि अमेरिकन लोकाना सारखेंच कुतूहल आहे. नवऱ्याला देव मानून राहणाऱ्या ह्या अतीव मानवजातीबद्दल त्यांना विलक्षण आश्चर्य वाटते व हिंदी संस्कृति ही मुख्यत: हिंदी स्त्रियांनीच टिकवून धरली आहे ह्याबद्दल कोणाचेंच दुमत झालें नाही. सदैव एकमेकांची सोबत तुमच्यामध्ये सहजीवना-पेक्षांसुद्धा एकमेकांवर नजर ठेवण्याच्या दृष्टीने करण्याची जरुरी वाटते काय? ह्या माझ्या प्रश्नावर आम्ही खूप हसलों. परंतु तरीहि सहजीवन ज्या प्रकारचें इंग्लंडमध्ये आहे तसें हिंदुस्थानांत असावें, असें मला मनोमन वाटत होतें, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाही. एकपत्नीव्रत किंवा अनेक बायका करणें ह्यांपैकी दुसरी पद्धति पुष्कळ दृष्टींनी चांगली आहे असा डेव्हिसने निर्वाळा दिला. पटत नाही हें मान्य केल्यानंतर फटाफट घटस्फोट

घेऊन दुसऱ्या व्यक्तीबरोबर पुन्हा तोच खेळ खेळत रहाण्यापेक्षां दोनचार बायका ज्या वेगवेगळ्या कारणांकरितां आवडूं शकतील त्या सर्वांना घेऊन जबाबदारीने रहाणें ह्यांत वाईट काय आहे, हेंच त्याला समजत नव्हतें. शिवाय एक पुरुष व एक बाई असा दंडक जर आमच्यासारख्यांच्या देशांतून--जेथे बायकांचें प्रमाण पुरुषांच्या मानाने जास्त आहे तेथे घातला तर स्त्रीच्या लग्न करण्याच्या नैसर्गिक हक्कावर गदा आणल्यासारखें होणार नाही काय? हा माझा मुद्दा त्याला फारच नवलाचा वाटला. आम्ही असंच कितीतरी बोलत होतों, बोलतहि राहिलों असतों. हिंदी स्त्रियांना काही तरी त्यांचें असें वैशिष्टय आहे, हें त्यानी सादरपूर्वक प्रांजलपणाने माझ्या जवळ कबूल केलें आणि तुमच्यासारखी बायको असायला तुमच्या नवऱ्याचें फारच भाग्य असलें पाहिजे, हा इंग्लिश लोकांना नेहमीचा Compliment मला बहाल केला. एक गोष्ट मला येथे सांगावीशी वाटते कीं, किती छान, फारच सुंदर अशासारखें गुणवर्णनपर धन्यवाद देणें हें परकीय देशांमध्ये फार सर्रास चालतें. आपल्याकडे दुसऱ्याबद्दल बरें बोलतांना आपण तोलून मापून बोलतों. चटकन् कोणाला चांगलें सहसा म्हणणार नाही. इंग्लंडमध्ये अगदी लहानशी गोष्ट तुमच्यांत आढळली किंवा तुमच्या अंगावर दिसली तर त्याबद्दल गौरवाने उल्लेख करणें चांगल्या शिष्टाचाराचें लक्षण मानलें जातें. पण त्याचें महत्त्व तितकेंच. संवय जशी लावून घ्यावी लागते त्याचप्रमाणें कोणी चांगलें म्हटलें तर "आभारी आहें," (Thanks) म्हणून चटकन् विषय बदलण्याची कलाहि साधून घ्यावी लागते.

आम्ही एकीकडे बोलत बसलों होतों तेव्हा तिकडे लॉन्ग रेंज रेकॉर्डस (Long range records) चालूच होत्या. निळ्या रंगाच्या प्रकाशांत आमच्या पुढ्यांत सुकामेवा (Nuts) येऊन पडला होता व मध्ये उठून जॉनने कॉफीहि करून आणली होती. आम्ही बोलत होतों. कॉफी पीत होतों. गाणें ऐकत होतों; पण ह्याच्या अगोदर एक गोष्ट सांगावयाची राहिली. आमची जेवणें होऊन आम्ही बाहेर आलों तेव्हा जॉन आमच्याबरोबर होता; पण तो लगेच आंत गेला. मला समजलें कीं, आंत आवराअवरी करीत असणार. मी ऑड्रीला म्हणालें, आपण सर्वजण आंत जाऊं. आम्ही आंत आलों तो मोठा ॲप्रन (Apron) घालून सगळ्या भांड्यांचा ढीग बेसीन-

मध्ये जमवून रबराचे हातमोजे चढवून स्वारी नळ सोडून तयार. माझ्याखेरीज हें कोणालाहि चमत्कारिक वाटत नव्हतें. डेव्हिस तेथे थंडपणें सिगरेट ओढीत बसला. ऑड्री एक टॉवेल व मी दुसरा हातांत घेऊन उभ्या राहिलों व अर्ध्या तासांत सगळीं भांडीं चकाचक करून आम्ही सर्वजण गप्पा मारीत बसलों. जॉनने इतकें घरकाम केलेलें पाहून मला जो अचंबा वाटत होता तो कित्येक दिवस तरी ! ! आमच्या घरीं पुरुषवर्गाची घरकामांत मदत करण्याबद्दलची खळखळ पाहिली कीं, आम्ही बायकांनी त्यांना किती लाडावून ठेविलें आहे, ह्याची मला शरम वाटते. ऑड्रीने जेवण करण्याचा पसारा घालणें व जॉनने तो किती सहजपणें आवरणें ह्यांत मला फारच सुखाचें सहजीवन (Co-operation) दिसलें.

रात्रीचे दहा वाजले व मी घरीं जाण्यासाठी उठलें. आम्ही चौघेहि उठलों. माझा कोट धरून जॉन दारांत उभाच होता. माझ्या अंगावर त्यानें कोट चढविला व दार लोटून आम्हांला स्टेशनपर्यंत पोहोचविण्यासाठी तीं दोघे आलीं. मला घरापर्यंत सोडणें हें डेव्हिसचें काम होतें, तें त्याला समजत होतें. जॉनला माहिती होतें, कोणीहि कोणाला सांगितलेलें नव्हतें. हें सर्व सहज होत होतें आणि तसेंच तें होतें. आणि इतकें असूनहि मला डेव्हिसबद्दल याच्याबरोबर कशी जाऊं ? कशी बोलूं ? असें कांहीहि वाटलें नाही. एक रात्र अतिशय चांगली गेली खरी; पण डोक्याला जी किल्ली दिली गेली होती ती मात्र पुढे कितीतरी दिवस संपत नव्हती. त्यानंतर ऑड्रीने मला पुन्हा एकदां जेवणाचें आमंत्रण होते; परंतु तें स्वीकारतां आलें नाही. त्यानंतर आम्ही एकदा तिकडील खेड्यांतील जीवन (Country life) कसें असतें, हें प्रत्यक्ष पाहण्यासाठी एक कार्यक्रम आखला. तोहि दिवस असाच छान घालवला. इंग्लंडमधील खेडीं किंवा Villages म्हणतात तीं किती चांगलीं आहेत ह्या गोष्टीची कल्पना मला वाटतें ऑड्रीबरोबर मी हिंडलें नसतें तर पूर्णांशाने मला आली नसती. ऑड्री व जॉन दोघे मोटर आळीपाळीने चालवीत असत. हातांत एक पुस्तक होतें. त्यांत कोठे कोठे कोणकोणत्या रस्त्यावर हॉटेल्स, जेवणाची सोय आहे ह्याची माहिती, नकाशे सर्व कांही होतें. आम्ही खूप हिंडलों. कुठे कुठे गेलों, एरवी ज्या जंगलांत जाणें मला कधीहि सुचलें नसतें त्या जंगलांतून

फिरून आलों आणि अगदी निर्भयपणें इंग्लंडमध्ये मध्यरात्रीहि फिरतांना कधी भय वाटलें नाही. माझ्या कोणी वाटेस गेलेलें मला आठवत नाही. पांच दिवस अतोनात काम करून दोन दिवस भरपूर आनंद करणें म्हणजे काय, हें अशा तरुण मंडळींमध्येच राहून समजणें शक्य होतें. नाहीतर आता आमच्या डॅडी-ममीकडे जाऊं. त्यांच्याकडे म्हाताऱ्या लोकांचा वीक-एंड कसा असतो तो बघावयास मिळेल. चला तर माझ्याबरोबर.

डॅडीनी मला फोन केला. "तूं आज येणार ना ? हॅरो ऑन द हिल (Harrow on the Hill) ह्या स्टेशनवर उतर, मग अमुक अमुक नंबरची बस घे. "मीं बरं म्हटलं" आणि लंडनपासून जवळ जवळ २५–३० मैलांवर असलेल्या त्या गावीं दुपारीं चार वाजतां जाण्याकरितां निघालें. खरं म्हणजे मी व माझी एक भाची तिकडे होती ती व दुसरी एक बहीण होती ती अशा आम्ही तिघीजणी एकदा जेवायला डॅडींच्याकडे ह्यापूर्वीं गेलों होतों. त्यावेळेस बरोबर ममीसाठी फुलांचा गुच्छ नेला होता. गेल्याबरोबर दार उघडून ममीने आम्हाला आंत घेतलें. आम्ही अंधारलेल्या संध्याकाळीं थंडीने गारठूनच गेलेल्या होतों. तेव्हां शेकोटी-पाशी बसून गप्पा मारीत होतों. इतक्यांत १५–२० मिनिटांत ममीने जेवण्याची तयारी झाल्याचें सांगितलें होतें. मला आश्चर्य वाटे कीं, ह्यांचें जेवण इतक्या चटकन कसें तयार होतें ? जेवायला बसलों तों पहिल्याने ब्रेड, बटर व भाजी–पण पुष्कळ. नंतर शिजवलेलें मांस हाताच्या–पंज्या-पेक्षा जरा लहानच तुकडा–व त्याच्याबरोबर कच्च्या भाज्या म्हणजे टोमॅटो, मुळा, कांदा, सेलरी इत्यादि. त्यानंतर अननसाच्या चकत्या व त्यावर क्रीम सोडलेली. हा तर पदार्थ मला इतका आवडला कीं, बोला-वयाची सोय नाही. झालं. पोट भरलं. कॉफी प्यालों कीं खेळ खलास. त्यांच्याकडे जेवणाचा थाट असा चटपट बिनत्रासाचा असतो. आता ह्यावेळेस मी डॅडीकडे निघालें होतें ती एकटीच. शिवाय राहाणार होतें. सकाळीं आम्ही हिंडणार होतों. नंतर मी दुपारीं कधीतरी घरीं येईन असा बेत ठरला होता.

मी हॅरो द ऑन द हिल स्टेशनवर उतरलें व डॅडींनी सांगितलेला नंबर पाहून बसमध्ये बसलें. मी जाण्याचें ठिकाण सांगितलें मात्र, कंडक्टरने

दुसरी बस घेण्यास सांगून खाली उतरविलें. मी पाठीमागून दुसरी बस आली तींत बसलें व मला उतरावयाचें ठिकाण सांगितलें. कंडक्टर विचारांत पडला; पण त्याने त्या ठिकाणच्या जवळपासचें म्हणून एक तिकिट मला दिलें. बऱ्याच वेळानंतर आठवणीने त्याने मला उतरवून दिलें. मला ओळखीचें ठिकाण दिसेना. घरें सगळीं एकसारखीं, रस्ते आपले लांबच लांब धावणारे. बसेस एका पाठोपाठ येत; पण मला समजेना कीं मी कुठे आहें. मी जवळ जवळ दोन-तीन मैल लांब आलें होतें. आतां परत तरी जाऊं कशी ? शिवाय तिकडे जेवणासाठी सगळीजणं वाट पहातील. मी पत्ता सांगावा आणि तेथे कोणाला माहिती नसावा असेंच चाललें होतें. हातांत एक पिशवी, अंगावर कोटाचें वजन आणि मी आपली चालतें आहें! काय करावें समजेना. आणखी उलटया दिशेची बस घेऊन जावें म्हटलें. इतक्यांत एक पब्लिक टेलिफोन दिसला. धांवत जाऊन नंबर फिरविला व डॅडींना फोन केला. ते मला विचारीत–' तूं कुठून बोलत आहेस ? " आणि मीं म्हटलें–" तें मला सांगता येणार नाही; परंतु मी तुमच्या स्टेशनपासून फार लांब आहें. शेजारीं सगळ्या रहात्या इमारती एकासारख्या एक दिसत आहेत व जवळ चर्च आहे. ही काय खूण झाली ? मग मला सुचलें कीं, ह्या रस्त्यावरून इतक्या इतक्या नंबरच्या बसेस धांवत आहेत; तर मी कोणत्या बसमधून येऊं तें सांगा. त्यांनीं मला बस नंबर सांगून तो बदलावयाचा कसा तें सांगितलें व माझी स्वारी चारला घरून निघालेली ७ ला त्यांच्या घरीं पोहोंचली. झालं होतं काय कीं बस नंबर बरोबर घेतला तरी तो विरुद्ध दिशेला जाणारा घेतल्यामुळे व पुढे दुसऱ्या बसमध्ये बसून गेल्यामुळें मी डॅडींच्या घरापासून फार लांब गेलें होतें. पुन्हां हॅरो ऑन द हिलला येऊन तोच नंबर उलट बाजूला घेतल्यानंतर मी बरोबर घरीं गेलें; पण मी हिंदुस्थानांत येईपर्यंत हा बावळटपणा डॅडींना पुरला. तुझ्या नवऱ्याला तुझ्याबरोबर एक आया पाठविण्याचें कसें सुचलें नाही ? " अशी थट्टा ते माझी नेहमी करीत असत. घरीं जातांच ममीने मला पुढे होऊन जवळ घेतलें. मला भेटण्यासाठी त्यांचा मुलगा व सून आली होती त्यांच्याशीं मी गप्पा मारल्या. टेरी आणि शिला दोघेहि एकमेकांस अनुरूप होतीं व टेरी जरी डॅडींचा एकुलता एक मुलगा होता तरी लग्न होतांच

तीं दोघें वेगळीं राहूं लागलीं होतीं. डॅडी-ममी जवळ नाही. कधी तरी येत; पण बिऱ्हाड मात्र वेगळें होतें. एकत्र राहणें इंग्लिश लोकांना मानवत नाही. दोघंजणं राहिलीं तरी पुष्कळ. मग अनेक जणांची गोष्ट कशाला? व्यक्तिस्वातंत्र्याच्या महत्त्वापुढे बाकीचे मुद्दे फोल आहेत. टेरी, शीला जेवायला थांबलीं नाहीत. आम्ही तिघें होतों. ममी नोकरी करणारी बाई होती. पुढच्या वर्षी तिला पेन्शन मिळणार होतें. डॅडींना अजून दोन-तीन वर्षें होती; पण ममी आधी सेवामुक्त होणार होती. पंचवीस वर्षांच्या नोकरींत ती आतां पोस्ट-मास्तरीण होती. सेवानिवृत्त झाल्यानंतर काय काय करावयाचें, ह्याबद्दल ती बेत आखीत होती. मुलगाहि हातावेगळा झाला होता. तरी ममी लहानच होती. तिचें बोलणें अगदी थेट माझ्या वयाच्या बाईसारखें होतें. फक्त तिचें वय झाल्याचें दिसत होतें इतकेंच.

इंग्लंडमध्ये ममीच्या वयाच्या बायका रंगरंगोटी करून हिंडतांना किंवा कानांत डूल घालून फिरतांना पाहिल्या कीं पहिल्याने मला कसेंसेंच वाटे. खरं म्हटलं तर एका दृष्टीने त्यांत फारसें न रुचण्यासारखें कांहीच नव्हतें; परंतु वयातीत बायकांच्या तोंडावर जो करून दमून भागल्याचा भाव दिसतो तो त्या बायकांच्या चेहऱ्यावर जास्त करुणपणा आणीत असेल आपलं मला वाटलं; पण मूर्तिमंत उपेक्षेचा अवतार दिसण्यापेक्षां नीटनेटकेपणा, क्वचित् छाकटेपणासुद्धां पुरवला. आपल्याकडील चाळिशीच्या पुढील बायकांचा समाज जसा दिसतो त्यापेक्षांहि त्यांच्याकडील ह्या वयाच्या बायकांचा समूह खात्रीने वेगळा दिसतो. ह्याची प्रचीति मला यंग वुइमेन्स ख्रिश्चन ॲसोसिएशनच्या वार्षिक समारंभाला हजर राहाण्याची संधि मिळाली तेव्हां आली. मुंबईंत ऑल इंडिया वुइमेन्स ॲसोसिएशनची सभा मीं पाहिलेली होती. त्यामुळे मला दोन्ही सभा ज्या पद्धतीने चालविल्या गेल्या त्यांत फार तफावत वाटली.

डॅडी आणि ममी ह्यांच्या घरीं फार स्वास्थ्य मिळालें. रविवारीं सकाळीं त्यांच्या अगदीच छोट्याशा बागेंत मीं हिंडून पाहिलें,-हिंडून म्हणण्यापेक्षा चालून पाहिलें म्हटलें तर योग्य होईल. गंमत मात्र ही कीं, इतक्या लहानशा आवारांतहि ममीने आपल्या व डॅडींनी खास स्वतःच्या अशा कितीतरी चीजा दाखविल्या. ममीने फुलझाडें व नव्यानेच लावलेल्या भाज्या कीं

ज्या कधीकाळीं येतील अशी तिला फारशी खात्री नसावी त्यांचें कौतुक केलें. डॅडी तर सकाळचा चहा घेऊन आपल्या छोटयाशा वर्कशॉपमध्ये स्वतःच्या पक्ष्यांसाठीं पिंजरे करण्यांत गढून गेले होते. डॅडींनी जवळजवळ ५०–६० छोटे छोटे रंगीबेरंगी पक्षी पाळलेले होते. त्या पक्ष्यांचीसुद्धां वंशावळ, त्यांच्या शुद्ध रक्ताबद्दल काळजी हें सर्व ते स्वतः आस्थेवाईकपणें बघत असत. असे पक्षी विकणें व पक्ष्यांबरहुकूम लाकडाचीं मॉडेल्स बनविणें, हा त्यांचा आवडता छंद होता. निरनिराळ्या पोझेस (Poses) सतत पाहून त्याबरहुकूम एकसंध लाकडांतून पक्षी तयार करणें ही आपल्याला वाटतें तितकी सोपी गोष्ट नाही. नंतर ते गुळगुळीत करणें, रंगविणें, प्रदर्शनांत प्रतिकृतीसह ठेवणें ह्या गोष्टी अनुषंगाने आल्याच. एक आंधळा म्हातारा पक्षी कीं ज्याने त्याच्या तरुणपणीं डॅडींना अनेक प्रदर्शनांतून प्रशस्तिपत्रकें व बक्षिसें मिळवून दिलीं होतीं, त्याबद्दल डॅडी फार गहिवरून माहिती देत असत. तो पक्षी केवळ चाहूल किंवा आवाज यावरून डॅडींना ओळखून साद घालीत असे. ह्या पक्ष्यांचे रंग अतिशय मोहक व त्यांचीं छोटीं पिल्लें तर भारीच गोजिरवाणीं दिसत. इंग्लंडमधील फुलांचा रंगहि असाच भारी मोहक असतो. टयुलिप, पॉपीज, व्हायोलेटस्, कितीतरी तऱ्हेचीं फुलें ज्यांचा वास मुळींच नाही; पण रंग मात्र अतीव मनोहर, व रंगपेटीं-तील रंगाइतके बिनभेसळीचे शुद्ध रंग असत. त्या हवेला फुलें टिकतातहि बरेच दिवस. फुलांचे रंग, पक्ष्यांचे रंग आणि मुलांचे रंगीबेरंगी कपडे ह्यामुळे निसर्गाच्या पार्श्वभूमीवर रंगसंगतीची फार मजा दिसते. मला पूर्वी वाटे कीं, त्यांच्या लॅण्डस्केप्स (Landscapes) मधून रंगाचा जरा जास्त भडक किंवा उठावदार वापर करून तीं आकर्षक करतात, पण तसं नाही; अगदी अक्षरशः जशीं तीं चित्रें असतात किंवा आपण पाहतों तशीच चमक तेथील खऱ्याखुऱ्या वस्तुस्थितींत वस्तूंच्या रंगांना असते. डॅडीचे पक्षी बघून मला फार प्रसन्न वाटलें. डॅडी पक्ष्यांवर फार पैसे खर्च करतात व ममी स्वतःच्या हॅटस्वर फार खर्च करते, अशी त्या दोघांची एकमेकांबद्दल तक्रार होती. हॅटस्चें दुकान किंवा शो-रूम्स (Show-rooms) दिसल्या कीं, डॅडी जणूं कांही आपलें लक्षच लागत नाही असें दाखवीत. कांही तरी संभाषण जोरांत सुरू करून ममीला पुढे खेचीत असत, हें मीं स्वतः पाहिलें होतें.

कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा षोक मनापासून असणें हा पाश्चात्यांचा स्वभावधर्म आहे. लहानपणापासून सहजासहजीं मिळणाऱ्या शिक्षणाचा तो एक भाग आहे. मला भेटलेल्या महिलांच्या विविध प्रकारच्या छंदासंबंधीं मी किती लिहीन म्हटलें तरी थोडेंच होईल.

पक्ष्यांबद्दल डॅडीचें प्रेम इतकें होतें कीं, दिवसांच्या दिवस, महिनेच्या महिने ते कोणाकडेहि गेल्याशिवाय सहज घरीं काढीत. पक्ष्यांबद्दल वाचन, त्यांच्या आवडीनिवडी, आजार, मानसिक व्यापार यांबद्दल फार मनोरंजक माहिती त्यांनी मिळविली होती. त्यांना अशा पक्ष्यांच्या प्रदर्शनामध्ये परीक्षक म्हणूनहि बोलावीत असत ससे, घोडे, कुत्रे, अशांचा षोक मीं पाहिला होता; पण ससे, पांढरे उंदीर, पक्षी असल्या ह्या घरगुती लोकांची इतकी मजा असते, हें मला माहीत नव्हतें.

खास इंग्लिश लोकांचा पाहुणचार घेण्याचा योग मला बऱ्याच वेळां आला असला तरी आणखी एका ठिकाणचा अनुभव विस्तारानें सांगितल्या-खेरीज मला चैन पडणार नाही. हा पाहुणचार म्हणजे एका शैक्षणिक संस्थेच्या सेल्फ हेल्प (Self-help) च्या तत्त्वावर चालविलेल्या वसतिगृहामध्यें घडला. तेथे रहाणारे पन्नास-साठ स्त्री-पुरुष होते. शिकणारे जवळजवळ २००-२५० असतील. ह्यांपैकी बहुतेक सर्वच माझ्या बहिणीचे एकेकाळीं सहाध्यायी असल्यानें मला त्यांच्याकडे गेल्यावर बिलकुल परक्याप्रमाणें वाटलें नाही. ज्या रात्रीं मी जेवणाचें आमंत्रण स्वीकारून गेलें तेव्हा खूप पाऊस पडत होता. काळोख दुपारीं ४-४। लाच पडत असे. मी गेल्यावर अगदीं आपल्याकडे एकत्र-कुटुंबांत असावें तशा वातावरणांत येऊन पडल्यासारखें मला वाटलें. कोणाकडे चहाचें काम, कोणाकडे बागेची व्यवस्था, कोणाकडे बाजारहाट, कोणी संस्थेची नवी इमारत होत होती त्यावर खपत होते. कोणी संस्थेच्याच मालकीच्या लहानशा छपाईखान्यांत काम करीत होते. कांहींच्याकडे संस्थेच्या चॅपेल (Chappel) ची व्यवस्था होती. हें सर्व बघून मला फार आश्चर्य वाटलें. ज्या संस्थेंत आपण शिकतों तिच्याशी इतकें एकरूप होऊन रहाण्याची सोय इंग्लंडमध्यें उपलब्ध असेल व तिला इतकें पाठबळ मिळत असेल अशी मला कल्पना नव्हती. अर्थात् अशा तऱ्हेनें तेथे रहाण्याबद्दल वसतिगृहांत सवलतीनें रहावयास मिळे हें सांगावयास नकोच.

भेटलेल्या मित्रमंडळींत कोणी ऑस्ट्रेलियांतून, कोणी फ्रान्समधून, कोणी आफ्रिकेमधून असे नाना देशांतून आलेले लोक होते. एका रक्ताचे, वंशाचे वा नात्याचें लोक एकत्र कुटुंबपद्धतींत कसें काय राहू शकतात या बद्दल कुतूहल व्यक्त करणाऱ्या लोकांना अनेक जातीचें, भिन्न संस्कारांचे, भिन्न प्रकृतिधर्माचें व अजिबात तिऱ्हाईत लोक एकत्र राहतात ह्याचें आश्चर्य कां वाटूं नये असा मी विचार करीत होतें. इतक्यांत 'ह्यू' नें त्याचें उत्तर मला दिलें. वैयक्तिक खाजगी हितसंबंध एकमेकांत गुंतले नसतील तर अशा प्रकारें रहाणें सर्वच दृष्टींनी फायदेशीर पडते, असा त्यांचा अनुभव होता. जेवणाचा बेत साधाच आणि माझ्यासाठी बहुतेक करून शाकाहारी होता. मी त्यानंतरहि लंडनमध्यें असेतों दोनचार वेळां तेथे गेलें; पण पहिल्या दिवशीं मला त्या अभिनव प्रयोगानें जें आश्चर्य वाटलें होतें ते शेवटपर्यंत तसेंच राहिलें. त्या संस्थेत एक आणखी नमूद करण्यासारखी गोष्ट मी पाहिली. ती म्हणजे फिनिश बाथ (Finish Bath). अशा प्रकारची स्नानगृहें सबंध लंडनमध्यें एक किंवा दोनच ठिकाणीं आहेत. फिनिश बाथ म्हणजे पहिल्याने साधी आंघोळ करण्याची एक खोली. नंतर जिचें उष्णतामान आपल्याला सोसवेल इतके वाढवीत वाढवीत नेण्याची सोय आहे अशी एक लाकडाची रुंद खोली. ह्या खोलींत जाऊन अतिशय उष्ण अशा हवेंत डबडबून घाम येईल इतक्या उष्णतामानांत तीन मिनिटां-पासून दहा मिनिटांपर्यंत वाफेचे भपकारे घ्यावयाचे आणि ताबडतोब शेजारच्याच लागून असलेल्या तिसऱ्या खोलींत जाऊन बर्फापेक्षांहि थंडगार अशा पाण्यानें सचैल स्नान करावयाचें याला म्हणावयाचें फिनिश बाथ. अशी आंघोळ आठवड्यांतून एक-दोनदा करणेंच जमतें. शनिवारीं आणि रविवारीं तर येथे येवढ्यासाठी कितीतरी लोक येत असत. फिनिश बाथ आरोग्यदृष्टचा अतिशय चांगला व दुर्मिळपणामुळे अतिशय हवाहवासा वाट-णारा. ह्या सात एकरांच्या परिसरांत उभ्या असलेल्या संस्थेमध्ये चमत्का-रिकपणा पुष्कळ होता. कांहीतरी अतिमानवी वास्तव्य तेथे आहे अशी समजूत, गुप्त झरा प्रकट झालेला व आठव्या हेन्रीच्या वेळेपासून तेथे कोणी ना कोणी रहात असे. त्या झऱ्याचें अति-सुमधुर पाणी पिण्यासाठीं अजूनहि वाघ येतो. असल्या चमत्कृतिपूर्व कथा ऐकत मी तें सबंध आवार हिंडत

असें. तेथे पूर्वी कधीं गूढतेचें वातावरण असावें असें मला पक्कें वाटूं लागलें होतें. कदाचित् त्या कथा ऐकून माझा तसा ग्रह झाला असावा. परंतु पुन्हा कधींतरी लंडनला गेलें तर तेथील पाहुणचार घेण्यास मी विसरणार नाही आणि तेथे राहूनहि पाहीन हें नक्की.

अशींच जोडपीं, अशीच घरें आणि असेच इंग्लिश लोक ह्यांच्याबद्दल मी असेंच आणखी कितीतरी लिहीत राहिलें तरी मला पुरेसें वाटणार नाही व वाचकांना हवेंसें वाटेल अशी माझी खात्री आहे. मी न विसरणाऱ्या प्रसंगांबद्दल जेव्हा जेव्हा लिहीन तेव्हा तेव्हा सहजच न विरणाऱ्या इंग्लिश लोकांच्या आस्थेवाईकपणाचा उल्लेख येईल व इंग्रज लोक फार तुटक, न बोलके, बेपर्वा असे किंवा अशाच प्रकारचे गैरसमज जर कांहीं वाचकांच्या मनांत असतील तर ते दूर होण्यास मदत होईल.

● ● ●

५

# सणांचा राजा नाताळ

नोव्हेंबरमध्ये थंडी फारच वाढली आणि तशा त्या बोचऱ्या थंडींत माझा कामाचा व्याप वाढत होता. चोवीस तास गरम कपडे आणि गरम पाणी वापरूनसुद्धा थंडी बेजार करीत होती; पण ह्याच थंडीच्या बुरख्या-आडून धुक्याच्या मऊमऊ शालींत गुरफटून आणि बर्फाच्या वृष्टीला हलक्या हलक्या पावलानें माझा इंग्लंडमधला पहिला नाताळ सण येत होता. त्याची चाहूल लागतांच सगळीकडे जाग आली होती. सर्वांच्या नकळत कोणास त्रास होऊं नये म्हणून तो जितक्या थंडपणें येत होता तितकी तो आल्याची जाणीव तीव्रतेने होत होती. खरं म्हणजे नाताळचे वेध मागच्या महिन्या-पासूनच लागलेले होते. आता नोव्हेंबरमध्ये तर काय त्याच्या स्वागताची धामधूम विचारायला नको.

नाताळ म्हणजे येशूख्रिस्ताचा जन्मदिवस. दहा दिवस सुट्टी घेऊन लोक मजा करतात, इतकीच मला हिंदुस्थानांत त्या सणाबद्दल कल्पना होती; पण तो साजरा करतात म्हणजे काय, हें मीं आता पहात होतें. खरं म्हणजे ११ नोव्हेंबरपर्यंत मला ह्या भोवतालच्या धामधुमीचा तितकासा पत्ताच नव्हता. ११ नोव्हेंबर पॉपी डे (Poppy day). तो दिवस म्हणज महायुद्धांत कामीं आलेल्या योद्धयांच्या स्मरणाचा दिवस. राणीच्या हस्तें

पहिला पुष्पगोल त्या सैनिकांच्या स्मारकावर वाहिला जावयाचा. ट्रॅफलगार स्क्वेअरमधून पार्लमेंट हाऊसवर जाणाऱ्या रस्त्यावर एक स्मारक उभें केलेलें आहे व तेथे राजशाही इतमामाने सारे लोक जमा झाले होते. जवळ जवळ २०० लोकांचा खास बॅण्ड, त्यामागे युद्धांत मर्दुमकी गाजविली असून अद्यापि सैन्यांत असलेल्या सैनिकांचा तांडा, त्याच्या दोन्ही बाजूंनी ऐटदार घोडेस्वार डौलांत जात आहेत. पुन्हा एक खास हायलँडर्सचा बँड, त्याच्या मागून खास दरबारी मानकरी, प्रतिष्ठित लोक, नाविकदल, आरमारी अधिकारी, सैन्यांतील अधिकारी, नंतर साधे नागरिक व शेवटीं विद्यार्थीवर्ग, अशी तीन-चार मैल लांबीची प्रचंड मिरवणूक ह्या सिनेटॉफ सर्व्हिस (Cenetoph service) ला आली होती. बॅण्डवाल्यांचे पोषाख, घोडे-स्वारांचें उत्कृष्ट सजलेलें पथक, नाविकदलाचा रुबाब ह्या सर्वांमुळें मिर-वणुकीला एक प्रकारची विशेष शोभा आली होती. जवळ जवळ पांच-सात लाख लोक तरी तो सोहळा पहाण्यासाठी दुतर्फा जमले होते व दोन्ही बाजूंच्या इमारतींतून उभे होते; परंतु गडबड मात्र अजिबात नव्हती. त्या सर्वांनी "पॉपींची" तांबडीं फुलें छातीवर लाविलीं होतीं. समारंभाचें गांभीर्य जाणून प्रत्येकजण इतक्या व्यवस्थितपणें वागतांना आढळला कीं, मला चौपाटीवरच्या नेहरूंच्या सभेची आठवण होऊन विरोधाभास चांगलाच जाणवला. मी एका कम्पाउंडच्या भिंतीवर उभी होतें व शेजारीं असंख्य लोक होते; पण धक्काबुक्की, अचकट-विचकट बोलणें, टिंगल करणें असला कोणताहि प्रकार नाही. पोलिस नुसत्या दोन हातांच्या जोरावर सबंध गर्दी व्यवस्थितपणें हाताळूं शकत होते. अगोदरच लंडनचे पोलिस आदर्श आहेतच; पण खरोखरीच कमींत कमी पोलिसांच्या संख्या-बळावर जास्तींत जास्त लोकांवर ताबा ठेवण्याची त्यांची कर्तबगारी पाहिली कीं कौतुक वाटतें. पोलिसांबद्दल कोणत्याहि इंग्लिश व्यक्तीच्या मनांत आदर आहे. "पोटभरू" म्हणून पाहाण्याची दृष्टि नाही. जिकडे तिकडे रस्त्यांत वावर-तांनाहि पोलिस आपण कोणी जबाबदार समाजघटक आहोंत ह्या जाणिवेने वागतांना आढळतात. पोलिसांची सर्वांत मजा म्हणजे वाहतुकीकडे लक्ष देत असतांनाहि जर चौकांत त्याच्याजवळ जाऊन तुम्ही त्याला कांही विचारलें तर जराहि चलबिचल न करतां किंवा तुमच्याकडे न पाहतां

तुमच्या प्रश्नाला तो तोंडाने बरोबर उत्तर देईल. "उजवीकडे प्रथम वळा, नंतर समोर जा व डावीकडून चौथी इमारत," किंवा "तुमच्यासमोर दिसतें तीच ती पांढरी इमारत, सरळ चला." अशासारखें उत्तर देऊन तुम्हांला मार्गदर्शन करील. सर्वसाधारण इंग्लिश लोकांप्रमाणें पोलिसहि मितभाषी आहेत. असो. मिरवणूक स्मारकापाशीं येऊन पोहोंचली व त्या सर्व दलांतील लोकांनी आपापल्या जागा घेऊन झाल्या. दुरून बकिंगहॅम राजवाड्याच्या बाजूने सर्व मिनिस्टर्स व राणी ह्या खाशा स्वाऱ्या आल्या. सेंट पॉलमधील पाद्री लोक आपापले रुबाबदार झगे घालून उभे होतेच. त्यांनी बायबलमधील प्रार्थना म्हटल्या व राणीने एक मोठा पुष्पगोलक स्मारकावर वाहिल्यानंतर बाकीच्या सर्वांनी आपले पुष्पगोलक अर्पण केले. यांत अनेक संस्था, अनेक व्यक्ति होत्या. तोफांची सलामी होऊन सर्व खाशी मंडळी निघून गेल्यानंतर जितक्या व्यवस्थितपणें व निरावाज सर्वजण तेथे जमले होते तितक्याच व्यवस्थितपणें प्रत्येकजण परतीच्या मार्गावर चालला. अशा दुःखाच्या प्रसंगीं म्हणा किंवा गंभीर प्रसंगीं इतक्या थाटामाटाने सरकारी स्वारी होते. मग राज्याभिषेक किंवा राजघराण्यांतील लग्नप्रसंगीं तर काय थाटमाट असेल याची कल्पनाच करणें बरें. राणी पार्लमेंट उघडण्यास जाते त्यावेळचा सोहळा असाच अवर्णनीय. जरी तोच तोच दरवर्षीं असें वाटत असलें तरी तो अवलोकनीय असतो ह्यांत संशय नाही. इंग्लंडमधील लोकांची राज्यनिष्ठा आणि राजनिष्ठा पाहिली म्हणजे किती परस्पर विरोधी भासणाऱ्या गुणांचीं किंवा स्वभाव वैशिष्ट्यांचीं इंग्रजी मनें बनलेलीं आहेत असें मनांत आल्याखेरीज रहात नाही.

नोव्हेंबर महिन्याच्या ह्या धामधुमींत पिकॅडली सर्कस, बॉण्ड स्ट्रीट, रीजंट स्ट्रीट, ऑक्सफर्ड सर्कस ह्या बाजारपेठांतून नाताळच्या स्वागताची प्रचंड तयारी चाललेली होती. ह्या भागांतून जातांना आपल्याबरोबर आपण सगळ्या लंडनची लोकसंख्या तर घेऊन हिंडत नाही ना, असा भास होई. खरं म्हणजे बारा महिनेच लंडनचे हे विभाग फुललेले असतात; पण आता तर आगामी नाताळच्या वसंतऋतूने ह्या मनुष्यनिर्मित वस्तूंच्या बागा जास्तच दिमाखाने फुलूं लागल्या होत्या. मागणाऱ्यांनी वस्तु मागाव्या व कारखानदारांनी त्या हौसेने पुरवाव्या, अशा अहमहमिकेने सगळीकडे सौदे

चाललेले दिसून येत. लंडनमधील बाजारपेठ म्हणजे काय, ह्याची कल्पना मोठमोठे डिपार्टमेंटल स्टोअर्स, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी खच्चून भरलेलीं विविध वस्तूंचीं दुकानें, रंगीबेरंगी विजेच्या रोषणाईने नटविलेल्या देखाव्यांच्या खिडक्या ह्यांच्या यथार्थ वर्णनानेसुद्धा येणें कठिण आहे. वस्तु दुकानांत आणणें व त्या गिऱ्हाइकाने विकत घेणे ही क्रिया कोणत्याहि बाजारांत सारखीच; परंतु ती ज्या तऱ्हेने होते त्यांत गंमत आहे. त्या गमतीकडे तिऱ्हाइताच्या नजरेने पहाण्यांतहि फार करमणूक आहे. आता पहा, इंग्लंडमध्ये सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या विक्रीसंस्थांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ह्या चळवळीच्या वेळीं केलेल्या अहवालाप्रमाणे इंग्लंडमध्ये शेंकडा ७० टक्के उलाढाल म्हणजे दुकानांतील वस्तूंची देवघेव स्त्रियांमुळे, स्त्रियांच्या हाताने किंवा स्त्रियांसाठी होते असें आढळून आलें. म्हणजे स्त्रियांच्या हातांत मालाचा उठाव करणें वा न करणें किती मोठ्या प्रमाणावर आहे, ह्याची कल्पना येईल. साहजिकच स्त्रियांना खूष करण्यासाठी कारखानदार जिवाचा आटापिटा करीत असतात. त्यांची सोय, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या लहरी संभाळण्यासाठी काय काय युक्त्या योजीत असतात, हें आपण नुसतें पहात रहावें. दोन्ही हातांत दोन-तीन पिशव्या लटकावून खिडक्या पहात, हिंडत व दुकानें धुंडत जाणाऱ्या हजारों महिला नाताळमध्ये सगळ्या बाजारपेठा दुमदुमून सोडतात. आठवड्याअखेरचा बहुतेक जणींचा कार्यक्रम बाजारहाट व सणाची खरेदी. नाताळसाठी आठवड्याच्या आठवड्याला कांहीं पैसे बाजूला ठेवून खरेदी करणें, ही योजना सर्व बायकांना करावीच लागते. कारण आठवड्याला पगार मिळत असल्याने आठवड्याच्या मापानेच बेत ठरवावे लागतात. मुलांसाठी बेत ठरवावे लागतात. मुलांसाठी खेळणीं, नवऱ्यासाठी कपडे, सिगरेट केसेस, लाइटर्स, टाइज, मित्रांसाठी छोट्या भेटी, घरगुती सामान, घर सजविण्यासाठी कांही, मैत्रिणीसाठी मोजे, पर्सेस, स्वतःला नव्या फॅशनच्या टोप्या नाहीतर बूट, टॉयलेटचें सामान, अशा प्रकारच्या नानातऱ्हेच्या वस्तु घेत बायका फिरत असतात. आपण नेलेल्या वस्तु नाविन्यपूर्ण असाव्या म्हणून कोणी वणवण हिंडत आहेत; तर कोणी उपयोगी वस्तु स्वस्तांत कशा मिळतील ह्यासाठी धडपडत आहेत. ह्या सर्व उलाढालींचें मूळ बायकाच आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम वि:
क्रमांक नों. दि.

बायकांची खरेदी पुरुषवर्गासाठी, घरासाठी, मुलांसाठी आणि कोणासाठी असली तरी खरेदी करणाऱ्या बायकाच! "डार्लिंग", "डिअर" करीत शोरूम्स निरखीत जाणाऱ्या जोडप्यांची गर्दी ऑक्सफर्ड स्ट्रीटवरून रीजंट स्ट्रीटला वळतांना बहुशा आढळते! लग्नांत कोणाला अहेर द्यावयाचा झाला तर मला मुंबईंत कोण प्रश्न पडतो कीं देऊं काय? आणि इकडे रोज शंभर लग्नांना अहेर द्यावयाचे आहेत म्हटलं तरी तुमच्या किंमतीच्या आडाख्यांत बसणारं कांहीतरी आढळेलच. खरें म्हणजे "बोर्न ॲण्ड हॉलिंगवर्थ", "सी. ॲण्ड ए." "मार्क्स ॲण्ड स्पेन्सर" ह्यांच्या शोरूम्समध्ये इतक्या सुरेख पद्धतीनें सामान लावून ठेवलेलें असतें कीं कांही न घेतां नुसतं तासन्तास बघण्यासच वेळ निघून जातो. पुराणांत वत्सला-हरणाच्या वेळीं "घटोत्कचानं" मायाबाजार मांडला होता असं वर्णन आहे तो हाच असावा!

खरं घेण्याचें सामान वूलवर्थ (Woolworth) आणि लिट्लवुड्स् (Little wood's) यांच्या दुकानांतच मध्यमवर्गीयांना आढळतें. बरें, तेथेहि काय मिळत नाही तें विचारा. केक्स सजवावयाचें तर त्यांस लागणारीं चित्रें, घरांत आरास करावयाची असेल तर गोळे पताका, मुलांसाठी खेळणीं, भरलेले मोजे, नाना वस्तु, नाना प्रकार! एकदां वूल-वर्थच्या दुकानांत शिरलं कीं सगळं मिळणारच. हत्तीच्या गतीनें आंत शिरावं तर हत्तीच्या गतीनें पाऊल बाहेर पडणार. पैसा मात्र वाऱ्याच्या गतीनें वाहतोय–आपल्या खिशांतून दुकानदारांच्या तिजोऱ्यांत. हं पण, दुकान सहकारी मंडळींचें (Co-operative Society), तेव्हां नफा झाला तरी परत लोकांच्याकडेच परत जावयाचा. लोकांचा उत्साह म्हणजे ओसंडत होता. कशीतरी मारून मुटकून, चार दिवे लावून आणि एक दोन पक्वान्नें करून उभ्या वर्षांतून एकदा येणारी दिवाळी साजरी करणारे आपण लोक कुठें आणि जणूं लंडन नगरीचें लग्न लावावयाचें आहे अशा थाटांत तिला सजवून महिनेंच्या महिने नाताळ गाजविणारे हे लोक कुठें. पैसा हें एक कारण असेल; पण हौस आहेच कीं नाहीं? पैसे नाहीत ते लोकहि कार्डें घेण्यांत गुंतले आहेत. मोठ्या नाहीत तर लहानछोट्या वस्तु घेत आहेत. सुंदर वचनें लिहिलेलीं रंगी बेरंगी कार्डें पाठविण्याची व

आठवण देण्याची कल्पनाच किती चांगली आहे. आपल्याकडेहि आपण ही पद्धत संक्रान्त व दिवाळी या सणांत अवलंबित आहोंत पण त्यांतहि फरक आहेच. इतकीं सुबक कार्डें आपल्याकडे कोणी अजून छापीतहि नाहीत आणि गरिबांसाठी ती आहेत असेंहि म्हणतां येणार नाही. तिळगूळ पाठविण्याची आपली कल्पना चांगली आहे त्यांत काव्य आहे. सौंदर्यदृष्टि आहे; परंतु जरा चांगल्या नीटनेटक्या स्वरूपांत प्रगट करण्याची कोशिस केली तर किती चांगलं होईल असें मला वाटते !

हिंडून हिंडून दमलों कीं कोणत्यातरी रेस्टॉरंटमध्यें जाऊन चहा घ्यावयाचा. येथे सुद्धा सेल्फ सर्व्हिस (Self service) असावयाची. केक्स तरी किती प्रकारांनी सजविलेले. ख्रिसमसचे वृक्ष पाहून डोळ्यांना गारवा वाटे. ही अशी आकर्षक सजावट करणें " येऱ्या गबाळ्याचें " काम नाही. मुख्यत: " डिकन्स अॅण्ड जोन्स ' च्या दुकानांत सुदर ड्रेसिसना (Dresses) मोरांचे आकार देऊन काय छान सजावट केली होती. हाय स्ट्रीट केन्सिंग्टनवरील (High street Kensington) दुकानांतहि किती सुरेख सजावट ! आपल्याकडे गणपति बघायला रात्रीं टोळकींच्या टोळकीं फिरत असतात तसेंच कांहीसें हें. नाताळच्या " सेलच्या " इतक्या पाट्या जागोजाग दिसत कीं पाय थकले तरी मन तिकडे खेचलें जाई. पण एक गोष्ट मात्र प्रामुख्याने जाणवली कीं त्या दुकानामधल्या निम्म्यांहून जास्त वस्तु आपल्या देशांतील लोकांना माहीतहि नाहीत आणि लागतहि नाहींत. पुष्कळशा आपल्या आवाक्याबाहेरच्या आहेत तेव्हां उरलेल्या थोड्याफार वस्तूमध्येच काय ती आवडनिवड करावयाची. ही पैशाची प्रचंड उलाढाल पन्नास टक्के मनुष्याच्या " आरामी " वृत्तीमुळें होते म्हणा ना. आराम वाटेल अशा तऱ्हेचे कपडे घालण्यास मिळावें म्हणून गिऱ्हाइकांचीं धडपड आणि अगदी मनपसंत माल पुरवून हलक्या हाताने गिऱ्हाइकाचा खिसा कसा फाडतां येईल ह्यासाठी कारखानदारांचा आटापिटा ! दिसायला छान दिसावें म्हणून सौंदर्यसाधनें, पेहेरायला छानछोकीचें असावें म्हणून नित्य नव्या तऱ्हा, झोपायला आराम वाटावा म्हणून गाद्यागिरद्यांचा थाट, सगळ्यांत कारखानदारांचा लाभ आहे. थंडींत रजईची ऊब रहावी म्हणून त्यांतून विजेचा प्रवाह सोडावयाची शक्कल या वर्षीं नवीच होती. फार काय

पायाला आराम मिळावा म्हणून पादत्राणांची किती चिकित्सा—पाहून सुद्धां आपल्यासारख्यांना उबग यावा. पायांत बूट नीट बसत आहेत कीं नाहीत हें कळावें म्हणून " एक्स–रे " मशिन वापरून त्यांतून पाय आंत-मध्यें चिमटून जात आहेत कीं काय तें बघतात. ह्याच यंत्राचा एका बाईने किती छान उपयोग करून घेतला ! तिची अंगठी कुठें तरी पडली, सगळीकडे शोधलें तरी सांपडेना. मग ख्रिसमससाठीं बनविलेलें पुडिंग तिनें बुटाच्या दुकानांत आणिलें आणि या यंत्राखालीं ठेविलें. तिची अंगठी त्या पुडिंगमध्यें सांपडली !

सेल्फरिजेस (Selfridges) म्हणून एक दुकान आहे बॉण्ड स्ट्रीट-वर तेथे दर आठवड्याला शो-रूम्स गेले दोन महिने बदलत होत्या. आम्हीं आमच्या बेकर स्ट्रीटवरील शाळेंतून सुटलों कीं संध्याकाळीं तेथे जात असूं. एका खिडकींत एक भारतीय नृत्याची नाचती आकृति करून तिच्या अंगावर दागिने घालून त्याची जाहिरात केली होती. आणि मोठाले चकचकीत कोळी जाळ्यांच्या धाग्यांवरून वरखालीं जाताहेत असें दर्शविले होतें. एका खिडकींत आगगाड्या बोगद्यांत फिरतांना पाहून मुलें खूष होत होतीं. एका आठवड्याला सुवासिक अत्तरांच्या सेंटच्या बाटल्या मांडून त्यांवर फुलपांखरें उडवीत ठेविली होती. ख्रिस्तजन्माचें दृश्य हुबेहूब देखाव्यांनिशी मांडलेलें कितीतरी ठिकाणीं आढळून येतें. दुसऱ्या एका खिडकींत पादत्राणांना छोट्या हालत्या फिरत्या जिन्यावरून मांडून सर्व तऱ्हा गिऱ्हाइकांना पाहता येण्याची सोय केलेली होती. कठ-पुतळ्यांचीं गंमत पहाण्यासाठीं सेल्फरिजेस्‌मध्यें अक्षरशः मुलांचीं तोबा-गर्दी जमत असे. " गलिव्हरची लिलिपुटची सफर " छोट्या बाहुल्यांच्या द्वारा सजवून ठेविली होती ती तर फारच प्रेक्षणीय होती. नव्या नव्या कल्पनांना नाताळांत तर ऊत येतो. सेल्फरिजेस्‌मध्ये वरच्या मजल्यावर एक " फादर ख्रिसमस " बसविला होता. त्याला भेटण्यासाठी मुलें किती अधीर होत. तीं विश्वासाने आपल्याला काय हवें तें त्याच्याजवळ सांगून ठेवीत व पालकांना आपल्या मुलांना नाताळच्या दिवशीं चकित करणें सोपें जाई. नाताळच्या भेटी देण्यांत वैशिष्ट्य तें हेंच कीं त्या सांगून किंवा मागून द्यावयाच्या नसतात. जाणून आठवून निवडावयाच्या असतात

व अशी वस्तु त्या व्यक्तीला मिळाली कीं कांही वेगळाच आनंद होणें साहजिक असतें. ज्या सजावटीचा दुकानांतील वस्तूंच्या खपाशीं संबंध नाही अशी "निद्रिस्त राजकन्या" (Sleeping Princess) अशा गोष्टींसारखीं कितीतरी दृश्यें पहिल्यापासून शेवटपर्यंत गोष्ट समजावी, अशा तऱ्हेने कळसूत्री पुतळ्यांसह व देखाव्यासह तेथे सजवून ठेविलेलीं आढळलीं. हेतु एकच, जास्तींत जास्त लोकांना आकर्षित करावयाचें. एकदा दुकानांत माणसें आलीं कीं कांही ना कांही घेतातच. ठरविलें नसतांहि कांही वस्तु खरेदी करतात. आपल्या मालाचा उठाव कसा करावयाचा हें तंत्र येथे फार पुढे गेलें आहे आणि त्याची पुरेपूर कल्पना पुढें जेव्हां मी लंडन प्रेस एक्सचेंज (London Press Exchange) वर एक दिवस काढला तेव्हा मला आली.

माझ्यासारखी चिक्कू बाई कांही घ्यावयाचें नाही असें ठरवून बाहेर पडली तरी ऑक्सफर्ड–पिकॅडेली मार्गावर सहज सात-आठ पौंडस घालवून बसली. रीजंट स्ट्रीट या लंडन मधील बादशाह रस्त्यावर ब्रह्मदेशांतून आणले असावेत असे पौर्वात्य पद्धतीचे आकाशदिवे व त्यांच्या सभोवतीं लोंबकळणारे कांचेचे गोळे ह्यांची इतकी सुंदर रोषणाई केली होती कीं बिजलीचे सुंदर अलंकर घालून ह्या चमचमणाऱ्या गोळ्यांच्या आरशांत आपलें सौंदर्य पाहून खुदकन् हंसणारी पिकॅडेली आतां नव-वधूच्या तोऱ्यांत उभी आहे असं वाटावं !

लंडनच्या गजबजलेल्या बाजारपेठांतून हिंडतांना प्रत्येक गोष्ट घ्यावीशी वाटे. पण प्रत्यक्ष घेण्याचें मनांत आलें कीं मला वाटे, 'काय करायचय् आपल्याला हें ? आहे, ठीक आहे पण घेतलंच पाहिजे असं नाही.' मला हव्यास वाटे तो क्षणिक ठरे. इतक्या वैपुल्याच्या सान्निध्यांत

परि मी असा गरीब कारकून
वस्तु दर्शने भांबावून,
हें घेऊं कां तें मी म्हणून
वेडावुनि जाई

ह्या कोणाच्याशा ओळी गणगुणतच मी फिरत होते. एका दृष्टीने माणसाला सोस असावा, हव्यास असावा, त्यामुळेंच जाणाऱ्या आयुष्यावर

त्याचें किती प्रेम आहे हें सिद्ध होतें ही मनोभूमिका मला पटे, पण मी घेतांना मात्र फार थोडया वस्तु माझ्यासाठीं घेतल्या. अगदी हें मला बिलकूल नापसंत आहे. स्वत:ला पाहिजे असतील व शक्य असतील त्या प्रत्येक चांगल्या वस्तूची माणसाने अभिलाषा धरावी–पुरवावी या मताची मी आहे. आत्मसंयमन (Self denial) करणारी व त्यांतच स्वत:ला धन्य मानणारी माणसें मला आवडत नाहीत. हे असं करणें म्हणजे एक प्रकारचा कोतेपणा आहे असं माझं ठाम मत आहे. त्याग करण्यासारखें जवळ कांही आहे. तोंपर्यंत त्यागाला किंमत आहे त्याचप्रमाणें घेण्याची धमक आहे अशा वेळींच आत्मसंयमन किंवा त्याग ह्यांत कांही अर्थ आहे. एरवी तो नुसता दांभिकपणा आहे. पण असं सगळं असूनहि माझं भारतीय मन कल्पनेपेक्षा थंड होतें. इतकंच नव्हे तर मी इंग्लंडला जाऊन परत आल्यापासून मुंबईला खरेदी करण्याची माझी पूर्वीची हौसदेखील पार नाहीशी झाली. मी वर्षावर्षात कांही आणण्यासाठीं म्हणून मोहिमेवर गेलेली मला आठवत नाही. हा सर्व संस्काराचा परिणाम असावा. कदाचित् आपल्या पौर्वात्य रक्तांतच हा अळूच्या पानाचा पाणी ओघळून टाकण्याचा गुण (?) असावा.

बाहेर अशी जंगी तयारी चालली होती तशी आमच्या होस्टेलमध्येंहि सर्व मंडळी कामांत गुंतलेली होती. हल्ली कोणाला वेळ नव्हता. प्रत्येकजण कशांत तरी गढलेली होती. नान्सी स्वत: कार्डें रंगवावयाला बसली होती आणि तिच्या नादाने मीहि. कितीतरी दिवसांनी मला चित्रकलेकडे लक्ष द्यावयाला वेळ मिळाला होता. नान्सीचें विणकामहि जोरांत चालू होतें. स्वत: तयार करून बक्षिसें देण्यांत अधिक मोठेपणा आहे. नान्सी आणि मी, आमच्या डोक्यांत एक कल्पना आलीं कीं बाजारांत जाऊन निर-निराळ्या फॅशन्सचें डूलाचे साचे आणावे व आपल्या कल्पनेप्रमाणें खडे निवडून रंगसंगति जमवून त्यांत घरींच असे कृत्रिम खडे बसवून नाताळच्या भेटी तयार कराव्या. त्याप्रमाणें आम्ही मजेदार वस्तु तयार केल्या.

आमचा वेळ फार चांगला जात होता. लिलियनने दोन गुबगुबीत पांढरे ससे आपल्या भाच्यांना देण्यासाठी आणले होते. त्यांना नाचवतांना मलाच फार गंमत वाटे; मग त्या मुलांना तर किती आनंद झाला असेल!

आधीच चॉकलेट खाण्याची फार पद्धत आहे; त्यांत अशा सणामध्ये-नाताळ इस्टरमध्ये-तर दुकाना-दुकानांतून चॉकलेटचा खच पडलेला असतो. एका चॉकोलेटच्या बाबागाडींत साखरेची सुंदर बाहुली करून निजवलेली असे. एक चित्र मला फार फारच आवडलें. त्याचप्रमाणें चॉकलेटचें पिस्तुल त्यांत गोड गोळ्या. चॉकोलेटचीं नाणीं. आणखी कितीतरी प्रकार जे इकडे कधीच पहावयास मिळणार नाहीत असे मला आढळले व मीं एक दीड पौंड वजनाचा माल घेऊन एका मजबूत खोक्यांत घालून पार्सलने माझ्या मुलांसाठी म्हणून पाठविला. मुलांना फारच मजा वाटेल, ह्या कल्पनेनेच मला किती बरें वाटत होतें! कितीतरी दिवस मी पार्सल पोहोचल्याचें पत्र मिळेल म्हणून वाट पहात होतें. शेवटीं जवळ जवळ दीड-दोन महिन्यांनी मला तसें पत्र आलें आणि मला अतोनात वाईट वाटलें. कारण अशा क्षुल्लक आनंदावर हिंदुस्थानांतल्या कस्टम खात्याने बेलाशक पाणी ओतलें होतें! त्या पार्सलपायीं माझ्या मुलांच्या वडिलांना रु. ४२–१३–० भरावे लागले होते ! ! पुन्हां कोणतीहि गोष्ट पाठविण्याच्या भानगडींत पडावयाचें नाही, असा कानाला खडा लावून घेतला, दुसरें काय ? हौसेला मोल द्यावेंच लागतें. त्याशिवाय ती हौस कसली ?

२५ डिसेंबरला रात्रीं आमच्या होस्टेलवर सकाळपासून प्रार्थना वगैरेची गडबड चालूच होती. आपल्याकडे जसे यज्ञाला भटजी बसतात किंवा मंत्रजागर असतो त्याचप्रमाणें आमच्या छोट्या चॅपेलमध्येहि सतत अखंड प्रार्थना दहा दहा दिवस चालू ठेवण्याचा संकल्प होता. चर्चमध्ये आपल्याला सर्व धार्मिक विधि लांबून पहावे लागतात; पण येथे तसें नव्हतें. धूप लावतात, घंटा वाजवितात, ख्रिस्ताचें पवित्र सोनेरी चक्रासारखें आशीर्वाद देणारें Monstrance (ह्यांत येशु ख्रिस्ताचें वास्तव्य असतें, असा विश्वास आहे) हें सगळं मला पहावयास मिळालें. प्रार्थना गातांना तर इतकें गांभीर्य पसरलेलें असतें कीं, नास्तिकाच्या मनावरहि परिणाम व्हावा. दुपारीं जेवायला नवे नवे पदार्थ, ख्रिसमस पुडिंग (हें वर्षभर मुरविलेलें असतें) प्रामुख्याने होतें. आपल्या दिवाळीसारखीच तऱ्हा. रात्रीं अशाच चवदार जेवणानंतर एका मोठ्या हॉलमध्ये ख्रिस्तजन्माचा मोठा देखावा करून आरास केलेली असते, शेजारीं मोठें सुशोभित नाताळचें झाड, त्याला लाव-

लेल्या सुरेख वस्तु, वयस्क माणसांनाहि अशा झाडावरून मिळालेली भेट घेतांना लहान मुलांसारखा आनंद होतो हें मीं पाहिलें आहे—अनुभविलें आहे. अशा गोष्टींना मी पोरकटपणा म्हणणार नाही. खेळकरपणा कायम ठेवण्यासाठी हे असे खेळ जरूर खेळावे—खेळायला शिकावें, असंच मी म्हणेन. त्यानंतर नाचाचा कार्यक्रम होता. अर्थात् सर्व स्त्रियाच असल्यामुळे सामुदायिक लोक-नृत्येंच जास्ती होतीं. नंतर निरनिराळ्या साथींवर निरनिराळ्या लयींत मुली मनसोक्त नाचल्या.

२६ तारखेला आम्ही सकाळीं उठलोंच मुळीं १० च्या पुढे. थंडी तर इतकी पडली होती कीं, हातापायाचे द्रोण होत होते ! अगदी ढगाळलेली हवा, मधून मधून पाऊस. आता आठवड्यांतून दोनदा आंघोळ करण्याऐवजी एकदाच पुरे, अशावर मी आलें होतें. किती थंडी ! दुपारीं जेवण झाल्यावर जास्तच थंडी वाजत होती; पण मला एका इंग्लिश कुटुंबांत संध्याकाळच्या ख्रिसमस मेजवानीचें आमंत्रण होतें; म्हणून थंडीबिंडी झुगारून मी चार वाजतांच जामानिमा करून तयार झालें. इतक्या छान नटण्यानंतर वरून पुन्हा ते रोजचेच डगले चढविण्याचा फार कंटाळा आला होता, पण नाइलाज होता. एक कार्डिगन, दोन कोट, हातमोजे, पायमोजे, स्कार्फ हा साजशृंगार वरून घालून बाहेर तर पडलें. नाताळची पार्टी हा सर्वसाधारणपणें घरगुती कार्यक्रम असतो. अगदी मोजक्या ओळखीच्या किंवा जवळच्या मंडळींना बोलावून अशी पार्टी साजरी करण्याची प्रथा आहे. ह्या दिवशीं बर्फ पडतेंच पडतें, अशी एक समजूत आहे आणि त्याप्रमाणे निदान इतके दिवस क्वचितच दिसलेली बर्फाची भुरभुर आज विशेष प्रमाणावर दिसली खरी. मला जायचं होतं तें भूमिगत आगगाडींतून. जवळ जवळ २० मैल लांब. आंत शिरल्यावर तितकीशी थंडी वाजत नाही. त्यामुळें जमिनीखालीच वावर असावा, वर येऊंच नये असें वाटतें. भुयारी स्टेशनांत बर्फाचे थर नाहीतच. घरोघरीं असा कार्यक्रम असल्याने बाहेर रोजच्या मानाने कमी लोक हिंडतांना दिसत होते. मी मार्टिन बाईच्या घरीं पोहोचलें तेव्हा साडेपांच वाजून गेले होते. गेल्याबरोबर तिने आपली बहीण व म्हातारी आई ह्यांच्याशी ओळख करून दिली व आम्ही गप्पा मारीत शेकोटीपाशी बसलों. मी मागच्या वेळेस तिच्याकडे आलें होतें

तेव्हा हीच खोली किती निराळी दिसत होती ! आज तर जिकडे तिकडे सजावट ! मी अशी पार्टी पहिल्यानेच पहात असल्याने मला सगळ्याच गोष्टींचें नाविन्य वाटत होतें. भिंतीवर अगदी जवळ जवळ अशा तऱ्हेनं सुमारें तीन-चारशें नाताळ कार्डे त्या तिघीना मिळून आलेलीं छानदारपणे लावून ठेविलीं होतीं. तीं कांही हेतूने असें मला वाटलें नाही. केवळ शोभा आहे असेंच वाटलें. फुगे, रंगीबेरंगी कागदाच्या माळा, रंगीत फुलांच्या फुलदाण्या व सर्व सामानांवरून सुबक कलाकुसर केलेली आच्छादनें ह्यामुळे खोलींत फार प्रसन्न वाटत होतें. ६–६।। पर्यंत आमंत्रित मंडळी जमली. त्यांत दोन-तीन पुरुष व दोन-तीन बायका—अर्थात् ती सर्व मार्टिनबाईच्या जवळची नातलग मंडळी होती. आम्ही सर्व मिळून ७ बायका व ३ पुरुष अशीं १० जण होतों. मार्टिनबाई अनेक तऱ्हेच्या हस्तकौशल्यामध्ये वाकबगार होती. तिने स्वतः भेटी देण्यासाठी कॅलेंडर्स बनविलीं होतीं तीं तर फारच सुरेख केलेलीं होतीं आणि वाटणाराला वाटावें—काय सोपं काम आहे ? स्वतः ती कुठे मास्तरीण होती ! पण सबंध दिवस स्वतःला बांधून घेणें व पैशाच्या मागे लागणें तिला आवडलें नाही. म्हणून थोडे पैसे शाळेंत पार्ट-टाईम नोकरी करून, थोडें टायपिंगचें काम घरीं करून व कांही बचत, घरीं पेइंग गेस्ट ठेवून, तिने आपल्या संसाराची आर्थिक व्यवस्था केली होती. ह्यामुळे ती स्वतः आपापल्या आवडीचे उद्योग करायाला मोकळी राही. तिच्याकडे राहणाऱ्या एका मुलीने इंग्लंडमधील जितकी म्हणून शक्य होती तितकीं फुलें मिळवून तीं दाबून वाळवून त्यांची वर्गवारी ठरवून, एका पुस्तकांत टाक्याने शिवून ठेविलीं होतीं. जवळ जवळ शंभरच्या वर फुलांचे प्रकार त्यांत होते आणि त्यांचीं नांवें तिला पाठ होतीं. कोठेहि ती गेली तरी नव्या तऱ्हेच्या फुलावर तिची नजर जाई व एखादा गुच्छ ती घरीं आणून आपल्या संग्रहीं ठेवी. गोष्ट क्षुल्लक; परंतु त्याचा ठळक परिणाम म्हणून तो अल्बम (Album) पाहिला कीं फार कौतुक वाटे. माणसाचा जिवंतपणा टिकून राहण्यास पैसा हेंच कारण आहे, हा आपली असमर्थता छपविण्याचा जो मुद्दा आहे, त्याला ह्या अशा कृतींतून उत्तर मिळतें केवळ पैसा असेल तर आपण इंग्लिश लोकांसारखें सहज होऊं हा केवळ भ्रम आहे. आपण कसें होणें हें आपल्या वृत्तीवर अवलंबून

आहे. आपला आनंद आपण निर्माण करण्याची किमया पैशाशिवायहि माणसाला करणें शक्य आहे भांडवल पाहिजे तें कल्पनाशक्तीचें, हौसेचें, परिश्रमाचें, इच्छेचें आणि ह्या भांडवलाचा अभाव असेल तर पैसाहि कांही करूं शकणार नाही आपल्याकडील औदासिन्याचें फक्त दारिद्र्य हेंच कारण नाही हा मुद्दा पुन्हा एकदां माझ्या मनावर ठसला.

मार्टिनबाईने आमची एकमेकांशीं ओळख करून दिली. आम्हीं आमच्याबरोबर नेलेल्या छोटयाछोटया भेटी तिला दिल्या. नंतर आम्हांला कांहीं खेळ खेळावयाचे आहेत असें तिने जाहीर केलें. पहिलाच खेळ भिंतीवर जी पुष्कळ कार्डें लावलेली होती त्यांतच चार उलटी टांगलेली होती ती पाहिल्याने जो शोधून काढील त्याला बक्षीस मिळणार होतें. ह्याच खेळांत काय तें मला पहिलें बक्षिस मिळालें. नंतर दुसरा एक खेळ आम्ही खेळलों. दुधाची बाटली मध्ये ठेवून प्रत्येकाने एकेक आगकाडयाच्या पेटींतील काडी तिच्या तोंडावर आडवी ठेवावयाची धक्का देऊन काडया पाडल्या किंवा आपली काडी बरोबर न बसतां खाली पडली कीं बाद. शेवटपर्यंत जो काडया टाकीत राहील त्याला बक्षिस मिळे. माझ्या हाताला कंप आहे ह्याची किती तीव्र जाणीव तेव्हां मला झाली. ह्या खेळालाहि फार मजा आली. नंतर स्मरणशक्तीचा खेळ, गाढवाला शेपूट लावणें, कागदावर पांच वाक्यें लिहून त्यांचा एकमेकांच्या कागदावरील वाक्यांशी संबंध लागेल असें संभाषण करावयाचें व दुसऱ्याची वाक्यें ओळखून काढावयाची, अशासारखे कितीतरी मजेदार खेळ आम्ही खेळलों. त्यांत दोन तास कसे गेले हें कळलेंहि नाही. नंतर आंतल्या खोलींत जेवणाचा थाट मांडून ठेवला होता. पदार्थ रुचकर, सौंदर्यसृष्टीने आरास करून मांडले होते. जेवणाच्या टेबलाभोवतीं सर्वांनी जागा घेतल्यावर आम्ही विनम्रभावाने नत मस्तक करून शांतपणें प्रार्थना केली व तदनंतर जेवणास सुरवात झाली. जेवतांनाहि उखाणे, कोडीं घालून आम्ही नुसती गंमत करीत होतों. मेणबत्त्यांचा मंद प्रकाश निराळीच थंडाई घेऊन आला होता. नंतर प्रत्येकाला एक एक फटाका देण्यांत आला. हाताची आढी घालून आपल्या दोन्ही बाजूंच्या व्यक्तींच्या हातांतील फटाक्यांचीं टोकें धरावयाची अशा प्रकारें सर्व मंडळीची साखळी झाली. एक, दोन, तीन म्हटल्यानंतर प्रत्येकाने आपल्या

हातांतील टोकें खेचलीं व सर्व फटाके एकदम फुटले, आपापला फटाका उलगडून आम्हीं आमचें नशीब काय तें पाहिलें, तों प्रत्येकाच्या फटाक्यांत एक छोटेसें प्लॅस्टिकचें चित्र व नशिबाची चिठ्ठी आली. ती एकमेकांना वाचून दाखवून आम्ही खूप हंसलों टेबलावर कोणत्या केकमध्ये काय लपविलें आहे ह्याचा अंदाज बांधण्यांत आमचा खूप गोंधळ उडाला. नंतर फळें, थंडगार जेली, क्रीम अशा खाण्याने शांत होऊन आम्हीं बाहेरच्या हॉलमध्ये आलों. पुनश्च कोणीकोणी सुचविलेल्या खेळाच्या तऱ्हा सुरू झाल्या. नंतर समोर छोटेसे परंतु सुंदर नटविलेलें नाताळचें झाड होतें. त्यावर रंगीत भेटी लावून ठेविल्या होत्या व त्याच्यावर नंबर दिले होते. मार्टिनबाईने चिठ्ठ्यांचें टोपलें आमच्यांत फिरवून दोनदोन चिठ्ठ्या उचलण्यास सांगितल्या व नशिबाची परीक्षा सुरू झाली. लहान लहान सुरेख वस्तु आपल्या नंबरावर आल्या कीं, आमच्यांतील मोठ्या माणसाचीहि कळी खुले. “देवा, माझ्या चिठ्ठीवर अमुक येऊं दे रे,” असें विनोदाने म्हणून कोणी प्रार्थना करी व दुसऱ्या कोणाला ती वस्तु मिळाली कीं, नुसता हंशा पिके. फळांच्या आकाराचें साबण भरलेली छोटी करंडी मला मिळाली तर खरोखरी मला लहान मुलाइतका आनंद झाला. मी ती करंडी माझ्याबरोबर जपून हिंदुस्थानांत आणली तर खरीच पण नंतरहि कित्येक दिवस ते साबण मला वापरण्याचें जिवावर आलें होतें. अखेर दिवाळीच्या दिवशीं मी माझ्या मुलांना त्यांतील दोन फळें आंघोळीसाठीं दिली व आणखी दोन माझ्याजवळ कितीतरी दिवस होती. साध्या साध्या नाविन्यपूर्ण गोष्टींनी मी भारून जाई व त्याचा ठसा माझ्या मनावर कसा असे ह्याचें हें एक उदाहरण सांगितलें इतकेंच. शेवटीं गाणें व नाच ह्या कार्यक्रमानंतर केवळ रात्र फार झाली मला लांब जावयाचें म्हणूनच नाखुशीने सर्वजण उठलों. फुगे उडवून फोडावयाचें हा शेवटचा खेळ खेळून आम्हीं एकमेकांचा निरोप घेतला खरा पण खरं म्हणजे त्यांची कायमची आठवण ठेवूनच. ती नाताळची पार्टी मी कधीं विसरणार नाही. अशी एकेक रात्र मनुष्याला दहा वर्षांनीं लहान करील व त्याचें आयुष्य वाढवील अशी खेळीमेळीने जेवणें जेऊन मनुष्य वर्षभर तृप्त राहील. अशा खेळामुळे माणूस खेळकर न राहील तरच नवल. लहान मुलांनाच काय पण मोठ्याच

माणसांना ह्या अशा कार्यक्रमाची जरूर आहे हें आपल्याला कधीं बरे पटेल ? एकदा तरी अशी पार्टी करून पाहिल्याशिवाय पटणार नाही.

नाताळची सुट्टी अशी मजेंत जात होती. ता. २६ ला फक्त सर्व कचेऱ्या, दुकानें, बँका व व्यवहार बंद होते. बाकी सगळे दिवस लोक काम करीत होते, मजाहि मारीत होते. मी ह्या वेळेपर्यंत बी. बी. सी. लंडन वरून भारतीय लोकांचे कार्यक्रम होतात त्यामध्यें भाग घेऊन आलें होतें. " माझा नाताळ ", ह्याबद्दल थोडेसें बोललेंहि. पण ज्या दिवशीं आमचा कार्यक्रम होता तो दिवस फार गमतीचा. धुकें इतकें दाट पडलें होतें कीं, दुपारीं १२॥ – १वाजताहि संध्याकाळचें सहा वाजल्याइतका काळोख पडला होता. नोव्हेंबरपासून इंग्लंडमध्ये दिवस फार लहान आहे हें भासू लागतेच, पण त्यांतल्यात्यांत डिसेंबरमध्यें तर फारच लहान दिवस होतो. २९ तारखेला दुपारीं ३।। वाजतां आमचा कार्यक्रम होता आणि मी २।। वाजतां घराबाहेर पडलें. बॉल्डविच्ला मी कमीतकमी पंधरा-वीस वेळातरी सहज गेलें असेन. रोजचा रस्ता; पण त्या दिवशीं धुकें इतकें विलक्षण दाट होतें कीं, मी रस्ता चुकलें, इतकेंच नव्हे तर पोलिसच्या मदतीने बरोबर रस्त्यावर आल्यानंतरहि मला बी. बी. सी. ची इमारतहि दिसेना. इतकें विलक्षण दाट धुकें होतें कीं, खरोखरीच आपण आभाळाच्या नौकेंत बसून चाललों आहोंत कीं काय असें वाटे. फक्त विजेचे दिवे तेवढे धुरकट उजेडाचे दिसत होते. बाकी अगदी हाताच्या अंतरापलीकडे असलेला पदार्थहि दिसेना. त्या दिवसानंतर इतकें दाट धुकें मी परत पाहिलें नाहीं. २६ तारखेला बर्फाच्या भुश्यावरून चालतांना आपण एक नवाच अनुभव घेत आहोंत, कांहीतरी गंमत–जी हिंदुस्थानांत कधींच दिसणार नाही ती–पहात आहोंत असें मनांत येऊन फार मजा वाटत होती. बर्फ हाताने उचलून घेऊन त्याचे गोळे करूनहि मीं बघितलें. ठिकठिकाणीं बगीचांतून किंवा रस्त्यांतूनहि लहान मुलें छोटींशीं फावडीं घेऊन बर्फांत खेळत होतीं तें पाहून मला त्यांचा फार हेवा वाटला. छपरा-छपरा-वरून, झाडांझुडुपांवरून, पांढऱ्या लोकरीच्या झुली घालून बसल्याप्रमाणें झाडें, घरें, दिसत होतीं. अवचित उन्हाचा कवडसा पडला तर बर्फाच्या झुली जरीच्या बनल्या कीं काय असा भास होई. खांद्यावर, डोक्यावर

बर्फाचा थर साचला तरी तो झटकून टाकावा, असें कां कोण जाणें मला वाटेच ना. भुरूभुरू बर्फाची जशी मजा वाटते तशी धुक्याची वाटली नाहीं. एक प्रकारची सूक्ष्म भीति वाटे. आपण अधांतरी तरंगत आहों असें वाटे.

३१ तारखेची रात्र म्हणजे आमच्या होस्टेलमधील मुलींचा उरुसाचा दिवस. त्या दिवशीं खोल्यांवर मद्य आणण्याची खास सवलत दिलेली होती. हा सत्रंध दिवस मनसोक्त मद्य पिण्याची गंमत उजळ माथ्याने समारंभाने सर्वजण करतात. आमच्या खोलीवर अगदी मिळमिळीत साध्या मद्याच्या बाटल्या माझ्याकरिता खास आणल्या होत्या. मी आयुष्यांत पहिल्यानेच दारू घेत होतें; पण मला कांही झालें नाही. जशी माझी कल्पना होती तशी तिची चव लागत नव्हती. मीं अनेक तऱ्हेची दारू अनेक प्रसंगीं औपचारिकपणा म्हणून घेतली, पण केव्हाहि मला दारू घेऊन झिंगल्यासारखें वाटलें नाही. दारू घेऊन भूक लागते, एवढेंच मला सांगतां येईल. पण ती घेण्यापासून फारसे फायदे आहेत असंहि वाटलं नाही आणि आपण बाऊ करतों तितकें त्यांत कांही वाईट आहे असंहि आढळलं नाही. चवीला दारू कडसर लागते, न प्यालों तर कांही विशेष आनंदाला मुकतों आहोंत असं वाटण्यासारखं त्यांत कांही नाही. चार-चौघेजण घेत असतील तर नको नको करण्यासारखेंहि त्यांत कांही नाही. इंग्लंडमध्यें दारू पिणें सर्रासपणें चालतें. तरीहि दारू पिऊन तोल सुटला आहे, असे लोक अगदी फार क्वचित माझ्या पहाण्यांत आले. पण मनुष्याच्या सुसंस्कृतपणाच्या पातळीवर दारू पिणें वा न पिणें अवलंबून रहातें असें म्हणावेंसें वाटतें. आपल्याइकडील लोकांपेक्षां तिकडील लोकांना लौकिक दृष्टया, सामाजिक दृष्टया सभ्यतेने वागण्याचें महत्त्व समजलें आहे व सर्वसाधारण मनुष्य आपापलीं मतें बनविण्याइतका सुशिक्षित खासच आहे. म्हणून दारू पिणें कायद्याने बंद करण्याची तितकीशी जरूरी वाटत नसावी. आपल्याकडे सारासार विचार करण्याची सर्वसाधारण मनुष्याची कुवत कमी म्हणून कायद्याची मदत घेण्याची जरुर भासत असावी. तें कसेंहि असो, माझा स्वतःचा परदेशांत आला तेवढाच दारूशीं संबंध. त्यानंतर मला कधी ती प्यावीशी वाटलीहि नाही व मला तशी वेळहि आली नाही.

३१ व्या रात्रीं झोपायचें नव्हतें. बारा वाजेपर्यंत आम्ही गाणीं म्हणून नाचून, दारू पिऊन धिंगाणा करीत होतों. आमच्यांतील कांही मुलींची दारू पिण्याची कुवत बघून मला फार आश्चर्य वाटलें. रात्रीं बारा वाजतां सगळ्यांत म्हातारी बाई होती तिला आम्ही खोलीबाहेर हुसकून लावलें व सर्वांत लहान होती तिला कौतुकाने आंत घेतलें. कांहींनी सकाळपासून खाल्लें नव्हतें पण आतां खाण्याच्या बशा पुढें ओढल्या. बरोबर बारा वाजतां सगळीकडचे दिवे एक मिनिट (त्यापेक्षाहि कमीच वेळ असेल) बंद झाले आणि ह्यावेळीं जवळ असलेल्या मुलीच्या गालाचें चुंबन घ्याव-याचें अशी पद्धत आहे. ह्यांत चमत्कारिक वाटणारी फक्त मी एकटीच होतें. बाकीच्यांना कांहीच वाटलें नाहीं. मुली नंतर "मिड नाइट मास" (Mid-night mass) ला म्हणजे मध्यरात्रींच्या प्रार्थनेला गेल्या. नवें साल उजाडलें. १९५७ सालाच्या पोटांत काय आहे कोणालाहि माहिती नव्हतें. प्रत्येकजण आशेच्या जिवावर उजळल्या चेहऱ्याने नव्या वर्षाचें स्वागत करीत होती. मला हा नव वर्षोदय नवाच होता. कोणास ठाऊक अशा तऱ्हेचा हा एकटाच माझ्या आयुष्यांत तरी ठरणार होता. हिंदुस्थानांत आतां परत जावयाला पाहिजे, हें वर्ष आपल्याला परत नेण्यासाठी आलें आहे, हा विचार कांही केल्या जाईना. परतणाऱ्या जुन्या वर्षानें मला कांही वाईट, कांही चांगल्या, आठवणी ठेवून दिलेल्या होत्या. मी बऱ्याचशा शून्य मनःस्थितींतच गादीवर अंग टाकलें आणि त्याज्य जुन्या आठवणी बुजवून नव्या आशेने नव्या वर्षाचें स्वागत करण्यासाठीं तंद्री लावली.

* * *

## ६

# महिला व महिलामंडळें

कोणी असें म्हणतात कीं, मनुष्य जें पूर्वजन्मीं करतो त्याचीं फळें या जन्मीं त्याला भोगावीं लागतात. त्याचप्रमाणें पूर्वजन्मीं ज्या प्राणिवर्गांत तो जन्माला आला असेल त्या प्राण्याचें गुणधर्म बाह्य-स्वरुपांत म्हणा किंवा त्यांच्या वृत्तींत म्हणा पण आढळून येतात. खरें खोटें कांहीहि असो; पण येवढी मात्र गोष्ट निश्चित की, प्रत्येक भेटणाऱ्या माणसाचें जर आपण वरील सिद्धान्त लक्षांत आणून निरीक्षण करूं लागलों तर आपला वेळ फारच मजेंत जातो. कोणी गिधाडासारखे दिसूं लागतात. कोणी शुद्ध बैलासारखे दिसत आहे असें वाटतें. कोणी पूर्वजन्मीं घोडा असावा असा संशय येऊं लागतो. कोणी उगाचच ज्याच्या त्याच्या अंगावर भुंकणाऱ्या कुत्र्यासारखा भासूं लागतो. कोणी बाई शेळीसारखी, कोणी मुलगा बदकासारखा आहे असें वाटूं लागतें आणि वेळ नकळत निघून जातो. हा चाळा लागल्यापासून मला आगगाडींत, बसमध्यें, उद्यानांत, कोठेहि एकटी बसलें तरी कंटाळवाणें वाटेनासे झालें. माझ्या परिचयांत, पहाण्यांत, भेटण्यांत ज्या मुली किंवा स्त्रिया आल्या त्यांच्यांतील विविधतेच्या छटा अवलोकन करण्यांत मला तरी फार आनंद होत असे. या छटा कांही वेळा इतक्या सूक्ष्म तर कांही

वेळां इतक्या भडक असत कीं साधर्म्य आणि वैचित्र्य यांचा असला संगम कसा होत असावा याचा अचंबा वाटे.

माझ्याबरोबर राहणाऱ्या खोलींतील दोन मैत्रिणींचें वर्णन मी यापूर्वीच केलेलें आहे. कुत्र्यांचा षोक असलेली नान्सी, तिचीं कुत्रीं मरून गेलीं तरी त्यांचे पट्टे संभाळून होती. तिच्या कितीतरी आठवणी त्या पट्ट्याभोंवतीं गुंफलेल्या होत्या. नान्सीची एक आठवण मी कधीं विसरणार नाहीं. माझ्या साड्या तिला फार आवडत असत म्हणून एक साधी व एक जरा चांगली अशा दोन साड्या मीं तिला नाताळ भेट म्हणून दिल्या होत्या. " माझ्या आयुष्यांत कधी कोणी मला मनापासून आवडलेली वस्तु इतक्या निर्लोभीपणानें दिली नाही. आजपर्यंत मिळालेल्या सर्व भेटींमध्यें मी या साड्या सर्वांत महत्त्वाच्या मानतें. मी मरेपर्यंत त्या जपून ठेवीन, असें ती मला सद्‌गदित आवाजानें म्हणाली. ती संध्याकाळ मला अजून चांगली आठवते. माझ्या साड्या गेल्याचें मला मुळीच वाईट वाटलें नाही. मला खात्री आहे कीं नान्सी त्या खरेंच जपून ठेवील. हौसेने पार्टीच्यावेळीं नेशील. आणि कुठेंहि असली तरी आपल्या स्वप्नाळू डोळ्यापुढें आमच्या सहवासाच्या ठळक पुसट आठवणी आणून तासन्‌तास आपला जीव रमवील, नान्सीनें माझ्यावर एक कविता केली होती. मी २५ डिसेंबरला झोपून उठलें तेव्हा माझ्या टेबलावर अत्तराची (सेंटची) बाटली आंत गुंडाळून कागदाची केलेली सुरेख मेणबत्ती तिनें नाताळ भेट म्हणून चकित करण्यासाठी ठेविली होती माझ्याकडे ती बाटली अजून आहे. नान्सी भारीच रसिक होती आणि म्हणूनच तऱ्हेवाईक होती.

रोझीची तऱ्हा वेगळी. ती अतिशय धार्मिक. ती नोकरी करीत असे, पण त्यांतहि वेळांत वेळ काढून रोज चर्चमध्ये जाऊन येई. गाडीमध्ये बसल्या बसल्या जपमाळेचे मणी खिशांतल्या खिशांत फिरवीत बसे. कधीहि गप्पा मारतांना तिने छातीवर क्रॉस करून भाविकपणें आकाशाकडे नजर देऊन देवाच्या भरवशावर कोणती गोष्ट सांगितली नाही, असा मला दिवसच आठवत नाही. आपल्याला चांगला नवरा मिळावा व ह्या नोकरीच्या कटकटींतून त्याने आपणांस सोडवावें, ही एक आत्यंतिक इच्छा मनाशीं बाळगून आयर्लंडपासून रोझी इतक्या लांब इंग्लंडमध्ये दिवस कंठीत

होती. ती नाच करायला जाई, नोकरीला जातांना आपले पिकलेले केस लक्षपूर्वक रंगवून जास्त काळजीपूर्वक नट्टापट्टा करी. तरीहि खरोखरीच पुरुषमित्रांबरोबर धिटाईने वागणें तिला जमलें नाही. कोणी कोठे बोलाविलें तर "हो" म्हणणें तिला अवघड जाई. इकडे तिकडे फिरलों, एकत्र वावरलों आणि विचारावयाचा तो प्रश्न जर त्या मित्राने विचारला नाही तर उगाच कशाला आपण त्याच्याबरोबर हिंडलों असें व्हावयाला पाहिजे ? अशी तिची भूमिका होती. अशा अवघडलेल्या मनानें वागणाऱ्या रोझीसारख्या अगदी बाळबोध वळणाच्या मुलीचें इंग्लिश समाजांत कसें होणार ? अशा बाळबोध मुलींचा आपल्या इकडील समाजांत होणारा कोंडमारा मी पाहिला होता; परंतु इंग्लंडमध्येहि अशीं उदाहरणें दृष्टीस पडलीं तेव्हा मला फार चमत्कारिक झालें. आणखी भोवतालच्या समाजरचनेच्या चौकटींत आपण न बसणें म्हणजे एक कूटप्रश्नच. आपल्या इकडे स्वतंत्रपणें वावरणाऱ्या अविवाहित मुलींना नवरा शोधणें किंवा सापडणें जसें मोकळेपणाच्या वातावरणाच्या अभावी अशक्य होऊन बसतें व "पाहून सवरून" करणें मागासलेपणाचें व किंचित् अपमानास्पद वाटतें तसा प्रश्न इंग्लिश समाजांत नाही; परंतु जर पाहिजे तितका ऋणखरपणा व खेळकरपणा मुलीमध्ये जात्याच नसेल तर रोझीसारख्या मुलींना पाहून सवरून नवरा करण्याची सोय उपलब्ध होऊं शकत नाही. त्या अशीच वाट पाहून पाहून थकतात रोझीचें लग्न व्हावें, असें मला सहानुभूतीपोटीं वाटून उपयोग काय ?

ओल्गाचें तसें नव्हतें. ती सगळ्या परिस्थितींतून गेली होती. त्यामुळे हौसेपेक्षासुद्धा व्यावहारिक उत्तर म्हणून तिला घरचें ठीकठाक असणारा, व्यवस्थित पैसा बाळगून असणारा नवरा मिळाला तरच ती लग्न करणार होती. ही अशीच नोकरी करीत जन्मभर रहावयाचें असेल तर लग्न करण्याची भानगड हवी कशाला ? आपल्याला थोडा आवडेल त्या मुलाबरोबर तेवढीच मैत्री ठेवून मजा करावी व सोडून द्यावें, असा तिचा खाक्या होता. तिच्यामागे बरींच मुलें लागत. त्यांना ती अशीच गुंगवीत ठेवी. "मला पुरुषजातीने इतकें फसविलें आहे कीं, मी इतपत त्यांना भुलविलें तर तें अगदी क्षम्य आहे," ह्या तिच्या बोलण्यावर मीहि निरुत्तर होत असें. ती मुलांबरोबर जेवावयाला जाई, सिनेमाला जाई, भेटी घई, क्वचित्

देईहि, परंतु कोणालाहि तिने लग्नाचें वचन दिलें नाही. मैत्रीसाठी मैत्री हवी असेल तर येईन, असें तिचें उत्तर होतें. तिला पसंत असा मुलगा आढळेल व तिच्या मागे लागेल तरच ती लग्नाचा विचार करणार होती. नाहीतर लग्नाशिवाय. अशी होती ओलगा. रोझीप्रमाणें तिची कींव कोणाला येत नसे. फक्त कधी कधी वाटे कीं, इतकी चांगली मुलगी परिस्थितीच्या झंझावाताने व अनुभवांच्या टक्क्याटोणप्यांमुळे किती बेदरकार बनली आहे !

मारिएल्डा म्हणजे नुसती पठाण. दिसायला सुरेख. तिचा रंग, डोळे, केस, रसरशीत बांधा, सगळेंच कांही आकर्षक. एक एक पाऊल टाकीत मारिएल्डा आमचा मोठा कॉरिडॉर टकटक करीत ओलांडीत असे तर नुसता मूर्तिमंत जिवंतपणा भोंवतालच्या गजा-खिडक्यांच्यामध्ये ओतीत जाई, पण नाजुकपणा तिला कसा तो माहीतच नव्हता. इतकें असूनहि ती पुरुषी नव्हती. हसली, बोलली तरी ठासून. होती १६ वर्षांचीच; पण दिसे चांगली २२–२४ वर्षांच्या मुलीसारखी. तिच्या आईला तिची काळजी वाटे, ती स्वतःच्या मुलीचें कसें होईल म्हणून नव्हे; तर हिला जो नवरा मिळेल त्याचें कसें होईल हीच ! मारिएल्डा जेवणाच्या वेळेस माझ्या टेबलावर नसली तर मला चुकल्यासारखें होई. कायम आशावादी, सदा आनंदी, सदैव उत्साही, सतत गडबडींत ! अशा मुलीचा आमच्या समाजांत किती प्रकारें कोंडमारा झाला असता, असं मला राहून राहून वाटे. स्वच्छंदी पाखरांप्रमाणें ती जशी भुरंकन् कोठे जाई तसें एकदा तरी आपण जाऊन पहावें, असें मला आपलें बसल्या जागीं उगीचच वाटे. तेथे जातीचें पाहिजे......... !

मेरी माझी दुसरी स्पॅनिश मैत्रिण. ती स्टेनो-टायपिस्ट होती. दिसायला चांगली. बहुतेकजणी केवळ रंगामुळें चांगल्या दिसतात. 'एक गोरी हजार गुण चोरी' म्हणतात तेंच बरोबर. मेरीला स्पॅनिश मुली फार मानीत. कारण ती कोणाच्याहि कधीहि उपयोगी पडत असे. तिची माझी मैत्री फार चमत्कारिक कारणावरून वाढत गेली. तिला अनेक मित्र-मैत्रिणी होत्या. त्यांपैकी एकावर तिचें तें तसलें प्रेम होतें. तो होता पाकिस्तानी. तिला हिंदुस्थानी आणि पाकिस्तानीसुद्धां लोक फार आवडत. इतकीं गोरीं-गोमटीं मुलें सोडून ह्या मुलीला भारतीय मुलांमध्ये काय आढळलें ह्याचें

मला नवल वाटे. त्या पाकिस्तानी मित्राची ती अशी वारेमाप स्तुति करीत असे की, मला तिच्या आचरटपणाची कीव करावीशी वाटे. पुढे बऱ्याच दिवसानंतर त्या दोघांचें बिनसलें. तेव्हा, "आपल्याला कांही हिंदी मित्र करून देशील काय ?" असा तिचा मला प्रश्न होता. मी तिच्याशीं ओळख करून द्यावे असे मला तरी कितीसे भारतीय लोक माहिती होते ! वरं जे होते त्यांची कोणाशीं ओळख करून द्यावी ह्याला माझें मन घेईना. शिवाय मीं पाहिलेल्यांपैकी बरींचशीं हिंदी मुलें फार बेजबाबदारपणें इंग्लंडमध्ये वागत होतीं वा असावींत, असा माझा ग्रह झाला होता. कां कोण जाणे पण कोणाहि भारतीय किंवा पाकिस्तानी मुलाशीं तिची ओळख करून देण्याचें मला शेवटपर्यंत जमलें नाही. तरी पण आपल्या हिंदी लोकांवर फिदा झालेल्या मुलीचा नमुना म्हणून मेरीची मला चांगली आठवण आहे.

मिरांडा म्हणून एक दिसायला फार चांगली, स्वभावानें सालस, पण आर्थिक दृष्टया गरीब मुलगी होती. ही बोलत असे घडाभर; पण त्यांत अर्थ नसे चुळकाभरसुद्धा. तरीहि तिचें असें खास व्यक्तिमत्त्व तिला होतें. अगदी सामान्य असूनहि व्यक्तिमत्त्व असू शकते हें पाहून मला धक्काच बसला होता. परिस्थितीला टक्कर देण्याची तिची सर्व तयारी पाहिली म्हणजे मला तिचें कौतुक वाटे. मिरांडाला आमच्या होस्टेलमध्ये अगदी माफक दरांत राहूं देण्यांत आलें होतें. तिचें शिक्षण अर्धवट म्हणून तिला नोकरी मिळाली तरी तितकेसे पैसे मिळत नसत. ती कोणाला मदतनीस तर कांही वेळ लहान मुलांचा सांभाळ करणारी म्हणून राही. थोडेफार परिचारिकेचें कामहि तिला अवगत होतें. मुलांशीं मात्र ती फार गोड बोले. परंतु तिच्यावर मुलें सोपविली तर ही खुशाल त्यांच्यावर डाफरत असली पाहिजे असें मला नक्की वाटे. इंग्लंडमध्यें नोकरी गेली तरी सरकारकडून तनखा मिळतो याचा फायदा मिरांडा भरपूर घेत असे. कितीतरी दिवस तिला नोकरीशिवाय रहावें लागे तेव्हा त्या अपुऱ्या पोटगी-तनख्यांत गुजराण करावयाची तिला पंचाईत पडे. नित्य नव्या मुली गाठून थोडीशी उधार-उसनवारी ती करी; पण असे किती दिवस चालणार ! प्रत्येक मुलगी एकदोनदा तरी फसत असे. पण मिरांडा आपल्या जवळच्या वस्तु विकीत असे. चांगले बूट,

कार्टिगन्स, टोप्या, पर्सेस, नोकरी असतांना ती विकत घेई. कोणाकडूनहि भेट म्हणूनहि कांही गोष्टी मिळत. अशा वस्तु आपत्-धर्म म्हणून ती सरळ विकीत असे. चांगल्या भरपूर किंमतीच्या छत्र्या, पावसाळी बूट, फॅन्सी टॉयलेट बॉक्सेस, नक्षीच्या ताटल्या, मखमली जाकिटें, खेळावयाचे पत्ते, अशा एक ना शंभर वस्तु ती खुशाल विकून टाकी. अशा रीतीने चार-सहा महिने घालविल्यानंतर कधी नोकरी लागली की एक एक वस्तु पुन्हा खरेदी करी. पुन्हा वेळ आली तर पिशव्या भरून त्या विकून टाकावयालाहि तिची तयारी असे. " निर्जीव वस्तु त्या, त्यांच्यावर कसला जीव करावयाचा ! पाहिजे तेव्हां घ्याव्या नाही तर विकून टाकाव्या" अशी तिची वृत्ति बनली होती. ही गोष्ट लिहिणें मला अवघड जात नाही. सांगणें सोपें वाटते; पण प्रत्यक्षांत तें किती कठिण आहे, हें ज्यांच्यावर आपल्या वस्तु दुसऱ्याला देऊन टाकण्याची वेळ आली असेल त्यांनाच समजेल.

मारिएल्डा व ग्रेस ह्या दोघींना साड्या नेसून मिरविण्यांत फार गंमत वाटे. त्यांनी साड्या नेसून फोटोहि काढून घेतले. माझ्या भोवतालच्या सगळ्याच मुली फार चलाख, चटपटीत होत्या, असा समज होण्याचा संभव आहे; पण वस्तुस्थिति तशी नव्हती. रोझीसारख्या भकासपणें जगणाऱ्या आणि मारिएल्डासारख्या बेदरकारपणें वावरणाऱ्या हे जसें दोन नमुने होते तसेंच सर्व बाजूंनी सामान्य अशाहि बऱ्याच मुली होत्या. परंतु माझ्या मनावर कायम आठवण ठेवून नाहीशी झालेली कॅथरीन मला भेटली ती रात्र फार भयंकर ! होती. माझ्या आयुष्यांतील मला आलेले भयप्रद अनुभव बहुशः रात्रींच आले. दिवसभराच्या डोळे उघडे ठेवून केलेल्या व्यवहारांतून मीं शिकलें नाही; परंतु रात्रीच्या काळोखांत माझ्या डोक्यांत सूर्यप्रकाशाइतका लख्ख प्रकाश पडलेला आहे. दिवसापेक्षा रात्रींच मेंदू जास्त प्रखरपणें चालतो, हें बऱ्याच जणांच्या अनुभवास आलें असेल; परंतु जागवलेल्या रात्रीं उद्योगी दिनक्रमालाहि निष्प्रभ ठरविण्याइतक्या कांही कांही वेळां प्रभावी ठरतात. तशीच ती एक रात्र होती. मी केन्सिंग्टनचें होस्टेल सोडून दुसऱ्या होस्टेलमध्यें तात्पुरती रहावयास जाऊन पंधरा दिवसहि लोटले नव्हते. ह्या नव्या होस्टेलमधील मुली थोड्याबहुत

ओळखीच्या झाल्या होत्या. इतक्यांत एका संध्याकाळीं आमच्या खोलींतील कॉटखाली एक नवीन बॅग आणून ठेवली गेली. माझ्या दुसऱ्या दोघी सहनिवासी मैत्रिणी कोठे week end साठी गेल्या होत्या. मला वाटतं तो शुक्रवार असावा. त्या दिवशीं रात्रीं मीच एकटी खोलींत झोपणार होतें. त्यामुळे ही नवी सोबत आली तर मला वाईट वाटलें नाही; पण त्या मुलीबद्दल उत्सुकताहि वाटत नव्हती. कारण माझा मला पुष्कळ अभ्यास करावयाचा होता. मी जेवण झाल्यानंतर वरती आलें ती झोपण्याची तयारी करूनच. बिछान्यापाशीं दिवा ओढून घेऊन वाचीत पडलें. इतक्यांत आमच्या होस्टेलची मुख्य-व्यवस्थापिका व तिच्याबरोबर आणखी दोघी-जणी आल्या. त्यापैकी एकीला त्यांनी त्या रिकाम्या पलंगावर वळेंच झोपविलें व तिच्या भोवतालचे पडदे ओढून उजेडापासून तिला आडोसा केला व कांहीतरी स्पॅनिश भाषेंत सांगून त्या निघून गेल्या. जातांना आमच्या मुख्य-व्यवस्थापिकेने मला त्या मुलीकडे जरा लक्ष ठेवण्याबद्दल विनंती केली. मीहि मान डोलाविली. ती मुलगी दुसऱ्या दिवशीं आइल ऑफ वॅट् ह्या बेटावर त्या दोघींबरोबर जाणार होती. अर्थातच एक रात्र ती झोपणार, त्यांत लक्ष तें काय ठेवावयाचें, असा विचार माझ्या मनांत डोकावल्याखेरीज राहिला नाही. त्या दोघी निघून गेल्यावर आमच्या खोलींत आम्ही दोघीच. ती निजलेली, मी वाचीत पडलेली. मला वाटलें होतें की,ती कांहीतरी माझ्याशीं बोलेल तर मी संभाषण करीन; नाही तर उगीच कशाला वेळ घालवूं ? तिने पडदा सारून माझ्याकडे हसून पाहिलें. तेवढ्यांतहि तिचे डोळे फार तेजस्वी असावेत इतकें माझ्या मनावर ठसून गेलें. मला "हॅलो, कसं काय ?" असं औपचारिक म्हणून लगेचच ती, "Good night" म्हणाली. अर्थात् मी कांहीं विचारण्याची वेळच आली नाही. मी आपोआपच "Good night" म्हटलें व संभाषण संपलें. रात्रीं १२ वाजतां मला वाटतं मी दिवा मालवून झोपून गेलें.

त्यानंतर किती वेळाने सांगवत नाही; पण मी जागीं झालें, ती कॅथ-लीनच्या गदागदा पलंग हालविण्यामुळें. "विज्या, मला घट्ट धर, मला कोणी-तरी पकडतें आहे. इंडिआऽ नाऽ," अशी किंकाळी फोडून धापा टाकीत तिने मला पकडलें आणि काय होय होत आहे, हें माझ्या डोक्यांत येण्याअगोदरच

धाडकन् माझ्या गुडघ्यावर पडून ती पलंगांत घुसलीसुद्धां ! मी तिला काय काय करून विचारीपर्यंत तिने मला घट्ट धरून रडायला, स्फुंदायला सुरवात केली. या आकस्मिक प्रकाराने मला दरदरून घाम सुटला होता. थंडी-विडी तर बाजूलाच राहिली पण घशाला कोरड पडल्यासारखे वाटत होतें. मी तिला एका हाताने थोपटत, धडपडत उठून दिवा लावला. आता मला ती स्पष्टपणें दिसत होती. ती मला म्हणें "तू दिवा मालव." पण माझी तसें करण्याची छाती नव्हती. मी तशीच दामटून तिला शांत करीत होतें. ती कांही तरी असंबद्ध बोलत होती. माझ्या डोक्यांत आलें कीं हिस्टेरिया (Histeria) म्हणतात तसला तिला झाला असावा. पण तो हिस्टेरिआ आहे कीं ल्यूनसी (Lunacy) 'वेड' आहे हें कसें सांगणार ? नंतर मी हळूहळू तिला प्रश्न विचारावयाला सुरवात केली. ती टक लावून माझ्या डोळ्याला डोळा देऊन मला निरखून पहात राहिली. माझी बोबडीच वळते कीं काय असें मला क्षणभर वाटलें. ती पुन्हा रडायला लागली तेव्हा मी तिच्या अंगावर दरडावून ओरडलें, तिला माझ्या पलंगा-वरून उठविलें व तिच्या पलंगावर नेऊन झोपविले. तिला मी रागावल्याचें समजलें कीं काय कोण जाणें; पण ती चूपचाप पडून राहिली. मी दिवा तसाच तेवत ठेवून माझ्या गादीवर पडून राहिलें. घड्याळ्यांत पाहिलें तों फक्त दीड वाजला होता. म्हणजे अजून पांच-सहा तास अशा परिस्थितींत घालवावयाचे होते. मला झोंप येणें शक्यच नव्हतें, आता पण सकाळपासूनच्या श्रमामुळे मी फार वेळ जागी रहाणेंहि मुष्कील होतें. पुन्हा माझा डोळा लागला असावा. इतक्यांत ठक, ठक, ठक, ठक, असा आवाज आमच्या व्हरांड्याच्या दिशेकडून येऊं लागला. आता मला वाटलें कीं कॅथॅलीन म्हणत होती ते खरंच कीं काय खरोखरच कोणी चोर आला होता कीं काय ? मी निपचित पडून राहिलें. पावलांचा आवाज दूरदूर जात होता. रात्रीं बुटांचा आवाज तर लाकडाच्या जमिनीवर घुमूघुमून वाजतो. सबंध होस्टेलमध्यें सगळ्याजणीं गारठून लाकडे झाल्याप्रमाणें आपापल्या खोल्यांना आंतून कड्या लावून झोपल्या होत्या. माझ्या पूर्वीच्या होस्टेलमध्यें अशा कड्या घालून झोपण्याची पद्धत नव्हती पुन्हा 'टक टक' आवाज जवळ जवळ येत चालला. तिच्या पलंगाकडे मी

नजर टाकली. पडद्यामुळे ती तेथे आहे कीं नाही तें कळत नव्हतें आणि उठून पहाण्याचें धैर्य माझ्यांत राहिलें नव्हतें. मी श्वास रोधून पडून राहिलें. दोनच मिनिटांत भली मोठी सांवली दाराजवळ सरकतांना दिसली व टक टक् पावलाची मालकीण म्हणजे कॅथलीन आंत आली. येतांच तिनें माझ्याकडे पाहिलें, आणि तिच्याकडे बघून भीति वाटण्याऐवजीं मला धीर आला तीच असेल तर हरकत नाही. चोर असता तर काय पंचाईत आली होती ! मीं आता चटकन उठून बसलें व तिला हाक मारली. ती यंत्रासारखी चालत येऊन माझ्या पलंगावर येऊन बसली. "मला बाईकडे जावयाचें आहे," असें म्हणून ती मला उठवूं लागली. ती निदान काही अर्थ असलेलें बोलते आहे म्हणून मी तिच्याबरोबर जाण्यास निघालें. शिवाय मला वाटलें कीं, इतका गोंधळ त्या बाईच्या कानावर घातलेला बरा. आता दोन पावलांऐवजीं चार पावलांचा आवाज आमच्या व्हरांड्यांत घुमूं लागला. आम्ही त्या एवढ्या मोठ्या बिल्डिंगमध्ये सपाट्याच्या थंडींत एकमेकांचे हात धरून धीमेपणानें (अर्थात् मी उसन्या) व्हरांडा ओलांडून दोन जिने उतरून बाईच्या खोलीपाशीं आलों. बाईच्या खोलीला दोन दरवाजे एक गजांचा आंतून एक साधा व त्याच्या आंत एक खोली व तिच्यांतून पलीकडे गेल्यानंतर बाईची झोपण्याची खोली. आम्हाला गजांचाच दरवाजा कोणीं उघडला नाही तर आम्हीं आंतपर्यंत पोचतोंच कशाला ? शेवटीं तिच्याबरोबर दुसरी बाई आली होती तिला तरी गाठावें म्हणून आम्ही परत तेवढे जिने चढून टकटक आवाज करीत भुताटकीप्रमाणें आमच्या खोलीच्या पलीकडच्या खोलींत ती झोपली होती तेथे गेलों. कॅथलीननें धक्के मारले, मी हाका मारल्या; पण सांगण्याची गंमत म्हणजे आंतून "कोणीहि दार उघडणार नाही," असा जबाब आला. पाश्चिमात्य लोकांच्या तऱ्हेवाइकपणाचा म्हणा किंवा अत्यंत स्वार्थीपणाचा हा मात्र मला तरी कळस वाटला. आपली साखरझोप मोडून त्या थंडींत आपला बिछाना सोडायला कोणीहि तयार नव्हतें. ह्या अशा वेळीहि नव्हते. तिची नातेवाईक बाईहि या क्षणाला तिची कोणी नव्हती ! मी काय करणार ? पुन्हां तिला हात धरून आमच्या खोलींत आणलें व बळेंच तिच्या पलंगावर झोपविलें. एक झोपेची गोळी माझ्या मैत्रिणीच्या बाटलींतून

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
नों. दि: ............

काढून घेतली, तिला पण्यांबरोबर घ्यावयाला लावली व ती झोपण्याची वाट पहात बसलें हा सगळा प्रकार होईतों पहांटेचे साडेचार वाजले. अजून तीन तास पर्यंत कोणी उठणार तर नव्हतेंच; परंतु साधा उजेडहि दिसणार नव्हता. अशा वेळीं उजेडाची किती सोबत असते हें मी सांगून कळणार नाही ! माझें नशीब कीं अर्ध्या पाऊणतासाच्या आंतच कॅथलीन गुंगींतच झोपली. मी ह्या असल्या नमुन्याचा विचार करीत पडलें. जगांत किती प्रकारच्या समस्या, किती प्रकारचीं संकटें आहेत! कोणाच्या वाटयाला काय काय विचित्र विवंचना येत आहेत, याचा विचार आपण एरवी कधी तरी करतों का? अशाच वेळीं ह्या अशा आपद्ग्रस्तांची सामुदायिकपणें आपल्याला आठवण होते. ही मुलगी अशी कशाने झाली, हिचें पुढे कसें होणार ? मी काय करणार, कोणीतरी कांही करूं शकेल का? शेवटीं तिचें नशीबच तिच्याबरोबर, इतरांची सहानुभूति केवळ निरुपयोगी, अशा तऱ्हेचे विचार मला अस्वस्थ करून सोडीत होते. ती झोपली होती; पण आता माझी झोप गेली होती. ती शांत झाली होती; पण माझी शांति घालवून. सकाळीं आठ वाजेपर्यंत सगळ्याजणी आमच्या खोलींत आल्या. नखऱ्या आवाजाने सहानुभूति व्यक्त करूं लागल्या. कोणी तिची कीव करू लागल्या ! रात्रीच्या त्या दोघी बाया आल्या. मुख्य व्यवस्थापिका आली आणि माझ्यावर धन्यवादाचा शाब्दिक पाऊस पाडून तिनें आपल्याला मोकळें करून घेतलें. तिची नातेवाईक बाई मला तिची पूर्व-कहाणी ऐकवीत होती, पण माझें लक्ष तिकडे नव्हतें. मला ह्या दांभिकपणाचा संताप आला होता. एका पाहुण्या बाईच्या खोलींत अशा असहाय मुलीला सोडून देऊन आपण नामानिराळ्या राहणाऱ्या ह्या बायकांचा नमुना कांही और होता ! मला रात्रीची झोप मिळाली नाही; परंतु मी त्या रात्रींत किती शहाणी झालें ! "स्टायलिश" असणाऱ्या गोऱ्यागोमटया बायकांचें खरेंखुरें काळें स्वरूप मला काळोखांत स्पष्ट दिसलें नव्हतें का?

कॅथलीन सकाळीं नाश्ता करण्यासाठी आमच्याबरोबर बसली होती. मी नाश्ता घेऊन कॉलेजला जाण्याच्या घाईत होतें, कॅथलीनला घेऊन त्या दोन बायका "आइल ऑफ वॅट"ला जाण्यासाठी निघणार होत्या. मला जिन्यावरून खाली उतरून येत असल्याचें पाहून कॅथलीन कुठूनतरी

धावत धावत आली व मला तिने मिठी मारली. माझे दोन्ही हात आपल्या हातांत घेऊन माझ्याकडे निरखून पहात उभी राहिली. पहातां पहातां तिच्या डोळ्यांत अश्रू आले. मला तिने पुन्हा मिठी मारली. "You are nice, very nice! Good-bye Indiana" असें मोडक्या-तोडक्या इंग्रजींत ती मला म्हणत होती. मला फार वाईट वाटलें. माझा सर्व शीण क्षणांत नाहीसा झाल्यासारखें वाटलें. मी फुलासारखी हलकी झालें व तिच्या पाठीवर थोपटल्यासारखें करून कॉलेजांत गेलें. त्यानंतर कॅथलीन मला पुन्हा भेटली नाही, भेटणार नाही; पण भेटली ती मला एकदांच आणि गेली तीहि कायमची आठवण देऊन.

डॅगनहॅमच्या महिला मंडळाच्या वार्षिक सभेला पाहुणे म्हणून आम्हाला बोलावणें होतें. आम्ही गेलों. लंडनपासून जवळ जवळ वीस ते पंचवीस मैल लांब आम्हांला जावयाचें होतें. आगगाडींत आमच्याबरोबर दोनतीन कुटुंबें चढलीं होतीं. त्यांत लहान लहान मुलें म्हणजे वय ७ ते १५ वर्षांपर्यंतचीं होतीं. इंग्लंडमध्ये पद्धतच अशी आहे कीं, बसायला जागा थोड्या असतील तर मुलांनी उभे रहावयाचें व मोठ्यांनी बसावयाचें, मी माझ्या मुलांना घेऊन मुंबईंत कधी जात असेन तर खिडकीसाठी मुलें धडपडावयाचीं व माझीहि वृत्ति त्यांना अगोदर बसवून नंतर आपण जागा असली तर बसावयाचें किंवा मग उभेच राहून जावयाचें अशी होती. तेव्हा मला ह्या आईवडिलांचें मोठें आश्चर्य वाटलें. आईबाप एकमेकांशेजारी बसतात व मुलें खुशाल उभीं राहतात. इतकेंच नाही तर आगगाडींत इतर पक्क्या मोठ्या माणसांसाठीहि त्यांनी जागा खालीं करून द्यावी व उभे रहावें अशी शिकवण त्यांना असते. मुलांच्या समजूतदारपणाची कीव करावी कीं आईवडिलांच्या शिस्तीचें कौतुक करावें हेंच मला कळेना! इंग्लंडमध्ये सरसकट सर्व वाहनांतून गर्दीच्या वेळी मुलेंच उभ्याने प्रवास करतात असें आढळून येतें. मोठ्या माणसांना शेजारी उभें राहूं देऊन मुलांनी बसणें हें शिष्टाचार-संमत मानलें जात नाही.

आम्ही ज्या महिला मंडळांत गेलों होतों तेथे त्या दिवशीं जवळ जवळ दोनशें लोक जमले होते व आमच्या स्वागताप्रीत्यर्थ चहापार्टीचा बेत केलेला होता. आपल्याला इंग्लंडमधील लोकांबद्दल काय वाटतें, हें आम्ही

परकीय देशांतील स्त्रियांनी त्यांना सांगावें, अशी एका बाईने विनंती केल्या-मुळे मी व माझी दुसरी एक मैत्रीण ह्यांना थोडेंसें भाषणवजा बोलावें लागलें; पण कसेंहि असो, मला त्या समाजांत कधी गोंधळल्यासारखें वाटलें नाही. कदाचित् ते फार खेळकर वातावरण उत्पन्न करतात त्याचा तो परिणाम असेल. पुढे एकदा रोटरी क्लबच्या लोकांनी आम्हाला पाहुणे म्हणून जेवावयाला बोलाविलें होतें तेव्हांहि तोच अनुभव आम्हांस आला. खरं म्हणजे सगळे उत्तम व्यवसायांतील, चांगल्या दर्जाचे लोक तिथे जमले होते. स्त्री-रात्र (Ladies night) असल्याने त्यांच्या बायकाहि त्यांच्या बरोबर होत्या; परंतु त्यांपैकीं कोणीहि आपल्या ऑफिसांतील जागांचा विचार करून आमच्याशी बोलत असावा किंवा इतरांशी वागत असावा असें दिसलें नाही. कित्येकदा तर इतक्या मोठ्या हुद्द्यावरचे लोक कसे साधे, असं तर वाटेच; पण कांही लोकांबद्दल कितीतरी दिवसांनंतर कळे कीं ते अमुक अमुक म्हणून. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होण्याचा गुण ही मनाचीच विकृति आहे. चोवीस तास आपला ऑफिसमधील दर्जा न विसरणारे काय कमी लोक मी पाहिले होते ? आणि म्हणूनच मला इंग्लिश लोकांच्या मनोवृत्तीचें कौतुक वाटतें. दुसऱ्याच्या मानाला (Self respect) — मग तो कोणीहि असो—धक्का न लावण्याचें महत्त्व त्यांना इतकें पटलेलें आहे कीं, त्याचा सुपरिणाम म्हणून प्रत्येकाचें आयुष्य अगदी सुसह्य मोकळेपणानें जाण्यास मदत होते. कोणी अमका-तमका बडा आहे म्हणून लहान माणसाने त्याला भिण्याचें कारण नाही. हें तत्त्व सर्वांच्या ठायीं बाणलेलें आहे. त्यामुळे लाचारीची कळा कोणावरहि नाही. म्हणूनच त्यांच्या आविर्भावा-वरून त्यांच्या व्यावसायिक हुद्द्याची कल्पना येणार नाही.

जेनेट सालोमन ही केवळ दहा वर्षांचीच मुलगी; पण मला तिने तेवढ्या दोन तासांतहि लळा लावला. "Be a good girl today and you will be a good woman tomorrow" अशी मी तिला स्वाक्षरी दिली होती. त्यानंतर तिची व माझी पत्रोपत्रीं अनेकदा भेट होई. परवा नाताळप्रीत्यर्थ तिने मला सुरेख रुमाल भेट म्हणून पाठविले. मीहि कोणी जाईल येईल तेव्हा मला जमेल तें पाठविलें. जेनेट आतां मोठी झाली आहे. तिच्या पत्रावरून मला तिच्याबद्दल सर्व कळतें. आता

तिची पत्रें मोठ्या मुलीसारखीं लिहिलेलीं असतात. वयाच्या १५–१६ व्या वर्षी तेथील मुलांना कोणी लहान म्हणणार नाही. म्हणजे त्यांना ठराविक जबाबदारीच्या गोष्टी कळल्याच पाहिजेत, ही अपेक्षा करणार. स्वतःचे स्वतः त्यांनी पहावें, या दृष्टीने त्यांच्याशीं मोठीं माणसें वागणार.

हार्सेलच्या महिला मंडळाच्या वार्षिक सभेला आम्ही गेलों तेव्हा खास खेडूत इंग्लिश महिला काय करतात, हें पहाण्याच्या उत्सुकतेमुळेच नव्या कमिटीची निवडणूक करतांना निवडून येऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांची ओळख करून देण्याचा समारंभ फार मजेदार वाटला. नंतर सबंध वर्षाचा आखलेला कार्यक्रम सभासदांपुढे सादर करण्यांत आला. पुढच्या वर्षांत आपण काय करूं इच्छितों, ह्याची पूर्ण कल्पना वर्षाच्या सुरवातीला सर्व संबंधित सभासदांना देणें हें फार महत्त्वाचें आहे. असें केल्याने आपण ह्या कार्यक्रमांत कशासाठी तयार राहिलें पाहिजे याची कल्पना सर्वांना येऊं शकते. उदाहरणार्थ, निरनिराळ्या चढाओढी जाहीर केल्या गेल्या. त्यांपैकीं कशामध्ये कोणी भाग घ्यावयाचा, ह्याचा अंदाज प्रत्येकाने स्वतःशीं बांधावयास सुरवात केली. त्यानंतर ज्या सभासद स्त्रियांचा जन्मदिवस त्या महिन्यांत येत होता अशा चार-पांच जणींचें सामुदायिक अभिनंदन करण्यांत आलें व त्या चार-पांच स्त्रियांनी मिळून चहापार्टीचा बेत ठरविलेला होता त्याला निराळीच मजा आली. असा उपक्रम दर महिन्याच्या सभेमध्ये होतो, असें त्यांनी आम्हांला सांगितलें. नुकत्याच होऊन गेलेल्या नाताळमध्ये मंडळाने ज्या अनेकविध हस्तव्यवसायाच्या वस्तु विकल्या होत्या त्यांपैकी उरलेल्या पुन्हा विक्रीला ठेविल्या होत्या व त्या लुटुपुटीच्या लिलावाने उपस्थित सभासदांना विकण्यांत आल्या. कार्यक्रमाचें नाविन्य कदाचित् परकीय असल्याने मलाच जाणविलें असेल; परंतु पद्धतशीरपणें एखादें अंगीकृत कार्य करण्यामुळ तेथील खेडूत समजल्या जाणाऱ्या महिलाहि मला विशेष उल्लेखनीय वाटल्या.

यंग वुइमेन्स ख्रिश्चन ॲसोसिएशनच्या बायकांनी एक अभिनव प्रयोग केलेला मीं पाहिला तो फार यशस्वी झाल्याचें माझ्या पहाण्यांत आलें म्हणून त्याबद्दल थोडेसें लिहितें. ह्या संस्थेच्या सभासदांनी निरनिराळ्या कारखानदार किंवा दुकानदार ह्यांच्याकडे हिंडून संस्थेसाठी

पैशाची किंवा दुसऱ्या कोणत्याहि स्वरूपांतील भेटी गोळा केल्या. कोणी काचसामान, कोणी कापड-चोपड, कोणी तयार कपडे, कोणी खेळणीं, कोणी कांही अशा तऱ्हेच्या वस्तु जमा झाल्या. पैसे उचलून देण्यास नाखूष असणाऱ्या उद्योगपतींनी जाहिरातीच्या निमित्ताने आपापल्या मालाच्या वस्तूंची ह्या बायकांवर खैरात केली. सगळ्या बायका कामाला लागल्या. एक मोठा हॉल भाड्याने घेऊन वेगवेगळे स्टॉल्स लावण्यांत आले. या स्टॉल्सवर वाय. डब्ल्यू. सी. ए. च्याच बायका विक्री करण्यासाठी बसल्या व त्या गोळा केलेल्या वस्तूंना माफक किंमत लावून त्यांची धडाक्याने विक्री चालू झाली. किंमती बाहेरच्या मानाने फारच कमी होत्या. ह्या विक्री-मध्ये मला कितीतरी चांगल्या वस्तु अतिशय अल्प किंमतींत मिळून गेल्या. वाय. डब्ल्यू. सी. ए.च्या स्त्रियांनी कांही लोकरीच्या वस्तु, तयार कपडे, खाद्यपदार्थ वगैरे गोष्टी स्वतः बनविल्या होत्या. त्याहि त्या त्या स्टॉल्सवरून विक्रीकरितां ठेवण्यांत आल्या. या उपक्रमामुळे ॲसोसिएशनला बरीच आर्थिक प्राप्ति झाली. कारखानदारांच्या मालाची जाहिरात, ॲसोसिएशनच्या महिलांची मेहनत व गिऱ्हाइकांचा फायदा या सर्व गोष्टी साधूनहि या संस्थेला पैसा करतां आला.

येथील महिला मंडळाचें एक वैशिष्ट्य असें सांगतां येईल कीं, जो विधायक कार्यक्रम त्यांच्या सभासदांनी आखलेला असतो तो पार पाडल्या-नंतर त्यांना त्याचे परिणाम किंवा प्रतिक्रिया ठळकपणें दाखवितां येते, इतकें तें कार्य भरीव असतें. उगीच स्वतःची व दुसऱ्याची फसवणूक करून वेळ फुकट घालविण्यासाठी ह्या मंडळाचा सधन बायकांना उपयोग होतो आहे, असेंच केवळ चित्र दिसलें नाही. मंडळाच्या नांवाचा फायदा घेऊन सभासदांनी स्वतःच्या कष्टाने पैसा मिळविला तरी त्यांच्या आड मंडळ येत नाही. त्याच बाईने जाणून कांही भाग मंडळास खुषीने द्यावा. नाहीतर तिला मदत होणें हेंहि एक सामाजिक कार्यच आहे, ह्या दृष्टीने त्याकडे पाहिलें जातें. केलेल्या श्रमाबद्दल पैसा घेणें हें कमीपणाने मानीत नाहीत. उलट फुकट श्रम करणें हें फारसें प्रचलित नाही. त्यामुळे मध्यमवर्गीय महिलांना अशा मंडळाच्या आधाराने थोडेंफार द्रव्यार्जन करणें सहज शक्य आहे. इंग्लंडमध्ये राहणीचें मान उंचावलेलें असलें तरी त्या राहणीच्या

मानाने नोकरीधंद्यांत मजुरीहि मिळते. त्या राहणी-मानाप्रमाणें राहणें जरूर असल्याने प्रत्येकाच्या श्रमाचें मूल्य पैशांत थोडेंफार झालेंच पाहिजे, हें कटाक्षाने पाळलें जातें. घरून गाठोडें बांधून घेऊन जाऊन त्यावर उपजीविका करणाऱ्या परदेशीयांना मात्र ही राहणी महागाईची जरूर भासते व उद्योग न करितां वर्षानुवर्षें राहणें किंवा केवळ शिक्षण करीत पैसे उधळणें न परवडण्यासारखें असतें. ज्याप्रमाणें वेतनाचें राहणी-मानाशी प्रमाण साधलेलें आहे त्याचप्रमाणें बाजारांत मिळणाऱ्या वस्तूहि राहणीमानास साजेशाच असतात. अतिशय स्वस्त परंतु भिकार दर्जाच्या वस्तु मिळणारच नाहीत. अमुक एक गोष्ट हवी असेल तर ती अमुक इतकी चांगली असलीच पाहिजे, हा दंडक आपोआपच येतो व राहणीचें मान उच्च राखण्यास मदत होते. "कमीच कपडे पण चांगल्या दर्जाचे" असा जर गरिबांच्यावर दंडक असेल तर विपुल कपडे व उच्च दर्जा एवढीच श्रीमंतांना सवलत, परंतु पुष्कळ कपडे; पण कमी प्रतीचे किंवा कमी कपडे आणि तरीसुद्धां भिकार कापड, असला प्रकार नाही. सहा आण्याचें नाणें अगदी आपल्याकडील नाण्यांच्या हिशेबाने वापरण्याची मलाहि इतकी संवय लागली की, हिंदुस्थानांत आल्यावर मला ती सवय मोडावयाला फार त्रास पडला. क्षुल्लक गोष्ट पण ह्या दृष्टीने महत्त्वाची आहे. ठिकठिकाणीं स्त्रियांसाठी किंवा पुरुषांसाठी संडासाची व्यवस्था आहे आणि प्रत्येक वेळी ह्या संडासाचें दार उघडण्यासाठी एक पेनी म्हणजे एक आणा टाकावा लागतो. सोय आहे. अगदी प्रत्येकाला जरूर पडते अशी सोय आहे; परंतु फुकट नाही. पैसे दिलेच पाहिजेत. ह्यामुळें अर्थात् जरूर ती स्वच्छता ठेवण्याचें इकडे जें अतिशय अवघड काम तें तेथें सहज जमून जातें. अशा जागांची स्वच्छता वेगळा नोकरवर्ग नेमून करणें सहज परवडतें.

माझ्या ह्या परदेशी मैत्रिणींच्या घोळक्यामुळेच कधीकधी मला आपल्या महाराष्ट्रीय मुलीहि भेटत. कोणी मैत्रिणी निघत, कोणी ओळखीच्या, माहितीच्या, ऐकून ठाऊक असलेल्या, सर्व तऱ्हा असत. महाराष्ट्रीय लोकांच्या एका मंडळाने म. म. दत्तो वामन पोतदार तेथे आले होते तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ एक जेवणाचा कार्यक्रम ठरविला होता व त्यावेळीं इकडे अतिशय दुर्मिळ असें खास शिरा-पुरीचें जेवण मला जेवावयास मिळालें

अनेक महाराष्ट्रीय लोक भेटले, पैकी तेथेंच स्थायिक झालेल्या एका मैत्रिणीच्या घरींहि मी गेलें होतें. इतकीं वर्षे तिकडे राहून त्या माझ्या मैत्रिणीला हिंदुस्थानांत जावें-जावेंसें फार वाटे; परंतु एकदम तसें केल्यास ह्या राहणीमानाने हिंदुस्थानांत रहावयाचें झालें तर जितके पैसे हवेत तितके तेथें मिळतील की नाही आणि सुरवातीला तर नाहीच नाही, हा विचार प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांच्या आड येई. तेथे त्यांनी म्हणजे तिच्या यजमानांनी बरींच वर्षे शिक्षण केलें, कष्ट घेतले व चांगल्या रीतीने ते स्थायिक झाले होते. इकडे चैनीच्या समजल्या जातील; परंतु तिकडे जरुरी असणाऱ्या टेलीव्हिजन, रेफ्रिजरेटर, रेडिओ-ग्रॅम, मोटार असल्या कितीतरी वस्तूंची इतकी संवय झालेली की, मुलांनाहि हिंदुस्थानांत त्या मिळाल्या नाहीत तर चुकल्यासारखें होईल. त्या मुलीकडे मी पहिल्याने गेलें तेव्हा तिने आपलें घर मला दाखविलें व त्यांत नवीन वाढविलेली खोलीहि दाखविली. पुढच्या वेळेस मी गेलें तों ती खोली अगदी अद्ययावत् सजविलेली ! मला आश्चर्य वाटलें. मीं तिला विचारलें की, इतकी बारीकसारीक सजावटहि पूर्ण कशी झाली ? तिने सांगितलें की, ह्या खोलीची सजावट अशीच्या अशीच विकत घेतली. विकत घेतली म्हणजे आपल्या खोलीची मापें घेऊन तीं दोघें दुकानांत गेलीं. त्या मापाच्या सजवून ठेविलेल्या खोल्या पाहून त्यांपैकी एक पसंत केली व त्या खोलींतील सजावट फर्निचर, पडदे, इतक्या-सुद्धा जशीच्या तशीच आपल्या घरीं करून जाण्याविषयीं दुकानदाराला " ऑर्डर " दिली. दुकानदाराने सर्व सामान आपल्या दोन माणसांबरोबर पाठवून देऊन खोली बनवून दिली ! आहे कीं नाहीं मजा ? हें असं काय इकडे हिंदुस्थानांत त्यांना मिळणार होतें ? मुलांना मराठी येणार नाही, हिंदू संस्कृतीचा गंध राहणार नाही, नातेवाईकांबद्दल आपुलकी वाटणार नाही, इत्यादि गोष्टींमुळें त्या जोडप्याला हिंदुस्थानांत यावेंसें वाटे. परंतु ज्या तऱ्हेने त्यांची राहणी बनली होती त्या सर्वांचा विचार करतांना मला तर ते लोक इकडे आले तर परत गेल्याखेरीज खात्रीने राहणार नाहीत असें वाटलें.

अशाच दुसऱ्या एका मैत्रिणीकडे मला खास आपलीं भजीं व चिवडा खाण्याचा योग आला. खाद्य-पेयांवर आणि तेहि आपल्या परिचयाचे पदार्थ खाण्यावर महाराष्ट्रीय लोकांचा विशेष जोर दिसला. पापड, खिचडी,

अशा गोष्टींविना त्याचें चालत नाही असें मला तरी आढळलें. पोषाखाचेंहि तेंच. घरीं साड्या नेसणेंच त्या पसंत करीत. पिकॅडिली चौकांत नऊवारी नेसलेल्या एकदोन महाराष्ट्रीय बाया पाहिल्याचें नवलवृत्त मी माझ्या महाराष्ट्रीय मैत्रिणीकडूनच ऐकलें आणि आश्चर्य म्हणजे नान्सीने मला तो नेसल्याचा प्रकार खाणाखुणा करून समजावून दिला व त्याला काय म्हणतात तें विचारलें. तेव्हा माझी हसून हसून मुरकुंडी वळली.

मला भेटलेलीं सर्व महाराष्ट्रीय जोडपीं शिकलीं-सवरलेलीं होतीं. बरेच दिवस इंग्लंडमध्ये वास्तव्य करूनहि हिंदुस्थानांत जाण्याला अधीर झालेली होतीं; परंतु हिंदुस्थानांतील बेकारी, रहाणीमानाच्या व अर्थातच पगाराच्या गोष्टी ऐकल्या कीं, नाउमेद होऊन आपला परत येण्याचा बेत बदलणें त्यांना आवश्यक वाटे. ज्या महाराष्ट्रीय लोकांनी तेथीलच स्त्रियांशीं विवाह केलेले होते त्यांची द्विधा मनःस्थिति केविलवाणी वाटली. धड तेथें रहाणें अवघड वाटे व परत हिंदुस्थानांत येणेंहि त्यांना अवघड वाटे. इंग्लंडांतील ऐष-आरामाची-गरिबी हिंदुस्थानांत अभावाने वाट्यास येणाऱ्या श्रीमंतीपेक्षां त्यांना अधिक बरी वाटल्यास नवल तें काय ?

युनियन सेटल्मेंटच्या स्त्रियांचा उरक दांडगा. त्या ठिकाणीं फसलेल्या मुलींचीं मुलें वाढविण्याचें फार महत्त्वाचें कार्य चालू असलेलें दिसलें. अशा मुलांमुलींनी केलेल्या हस्तव्यवसायाच्या वस्तु व निष्पाप मुलामुलींनी करून दाखविलेले नाच पाहून फार आनंद वाटला. माझ्या डोळ्यांत तर अश्रु उभे राहिले. निष्पाप निरागस भाव असणारीं मुलें -- ज्यांना आपल्या-पुढें आयुष्यांत काय प्रकारची समस्या उभी आहे ह्याबद्दल संपूर्ण अज्ञान आहे -- पाहून भडभडून न आलें तरच नवल ! वास्तविक इंग्लंडमधील बहुजन समाजाचा अशा मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कितीतरी पुढारलेला आहे. आईबापांच्या कृत्यांचा जाब मुलांना द्यावा लागूं नये, एवढें कळण्या-इतपत प्रत्येकजण सुधारलेला आहे -- तरीहि माझ्या मनाला रुखरुख वाटत होती की, मोठे झाल्यावर ह्या मुलांचें कसें होईल ?

इंग्लंडमधील वृद्ध लोकांची परिस्थिति बऱ्याच वेळां केविलवाणी आढळते. तरुण पिढीला अडगळीसारखी वाटणारीं वृद्ध जोडपीं सरकार-कडून मिळणाऱ्या थोड्याफार भत्त्यावर उपजीविका करीत असतात.

अशा लोकांना बसल्या ठिकाणीं खानावळींत न जातां कढत कढत जेवावयास मिळावें म्हणून युनियन सेटलमेंटच्या स्त्रिया "मील्स ऑन व्हिल्स" (Meals on wheels) म्हणजे "चाकांवरून अन्नवाटप" इतक्या पद्धतशीरपणें करीत की, खरोखरी समाजकार्य करावयाचें आहे अशांनी त्यांच्यापासून धडा घ्यावा. दररोज दहा हजार गरमागरम ताटें अशा वृद्धांच्या घरोघरीं पोहोंचविण्याची जबाबदारी ह्या संस्थेने अंगावर घेतलेली आहे. त्याचप्रमाणें फावल्या वेळी वृद्ध स्त्रियांना तेथें येऊन कांही उद्योग करण्याची सोय करण्यांत आली होती. अशा वृद्ध स्त्रिया दुपारच्या वेळी विणणें, भरणें, शिवणें, रंगविणें अगर इतर कांही उद्योग करीत व पैसे मिळवीत. हिंदुस्थानांत चांगल्या चांगल्या योजना, अभिनव कल्पना ह्यांचा प्रत्यक्षांत खेळखंडोबा पाहिला म्हणजे मुकाट्याने प्रसिद्धिविन्मुखपणें काम करणाऱ्या इंग्लंडांतील अशा संस्थांची आठवण येते. सर्वांगाने धड, बुद्धीने शाबूत अशा बुद्धिजीवी लोकांचा हिंदुस्थानांत हटकून होणारा कोंडमारा पाहिला की, ज्यांना खरोखरीच कोणाच्या तरी आधाराशिवाय जगणें अशक्य आहे अशा दुबळ्या वृद्धांना व सर्वस्वी पराधीन अशा पंगु मुलांना वर आणण्यासाठी युनियन सेटलमेंटसारख्या संस्थांची धडपड किती मोलाची आहे ह्याची खात्री पटते. राष्ट्राच्या संपत्तीला खऱ्याखुऱ्या अर्थाने जपणें कितीतरी मोठ्या प्रमाणावर स्त्रियांच्या संघटनेला करतां येईल, ह्याची प्रचीति मला आली; परंतु विधायक कार्यक्रमाच्या अभावीं अतिशय मौल्यवान ठरणाऱ्या मदतीचा हात येथील सधनवर्गीय स्त्रियांकडून बाकीच्या स्त्रियांना मिळत नाही. इंग्लंडमध्ये मी जितक्या म्हणून बायकांच्या संस्था पाहिल्या त्या सर्वांनीच सर्व क्षेत्रांत लुडबुड केलेली आढळून आली नाही; तर जें मर्यादित कार्यक्षेत्र निवडलेलें असेल त्यांत भरीव अशी कामगिरी व दाखवितां येतील अशा ठळक परिणामाच्या गोष्टी जरूर केलेल्या दिसल्या.

मला भेटलेल्या स्त्रियांचा व त्यांच्या मंडळांचा धावता परिचय येथील भगिनींना आपल्यापुढील कार्याच्या रूपरेषेची ओझरती कल्पना आणून देण्याइतपत किंवा कार्य करावयाला खरा किती वाव असूं शकतो किंवा आहे ह्याचा अंदाज यावयाला उपयोगी पडेल अशी मला आशा आहे.

● ● ●

# ७

## आठवणींची करितां मृगया....

माझा पहिला बेत डिसेंबरमध्ये परत येण्याचाच होता; पण तसाच कांही योगायोग होता की, मी आणखी तीन महिने तिकडे राहूं शकलें. डिसेंबरच्या महिन्यांत कांही कांही हिंदी विद्यार्थी मला भेटले व वटावा (Exchange) संबंधी कांही नवे नियम निघाल्यामुळे आपली फार कुचंबणा होणार असें म्हणत होते. मला खरं म्हणजे ह्याची कांही तितकीशी कल्पना नव्हती. मला वाटलें की विद्यार्थी म्हणून जे लोक इंग्लंडला आले होते त्यांना ठराविक रकमेचा वटाव मिळत असे व नवीन नियमांमुळे त्या वटावाच्या रकमेंत थोडीफार कपात झाली असणार एवढेंच. मी विद्यार्थी म्हणून गेलेली नव्हतें. तेव्हा मला काय तसली अडचण असणार नाही; परंतु जानेवारी १९५७ रोजीं हिंदुस्थानांतून श्री. नानांचें पत्र मला आलें की, वटावावर येणाऱ्या नियंत्रणामुळे त्यांनी घाईघाईने ३१ डिसेंबरला रु. २,००० (दोन हजार रुपये) लॉइडस बँकेंत भरून टाकले आहेत. इकडे मी माझ्या लंडनच्या लॉइडस बँकेंत जाऊन चौकशी केली तर ह्यापुढे एक पैहि हिंदुस्थानांतून इकडे पाठविली जाणार नाही व जमा करता येणार नाही असें मला कळलें. आता मात्र माझी पंचाईत झाली; परंतु श्री. नानांनी ३१ डिसेंबरला भरलेले पैसे माझ्या नांवावर जमा झाले ही एक

नशिबाचीच गोष्ट ! ह्या त्यांच्या तत्परतेमुळे मला आणखी दोनतीन महिने राहतां येण्याची शक्यता निर्माण झाली. माझ्याकडे जे शिल्लक पैसे होते ते व हे आताचे रु. २,००० एवढ्या पैशांत माझा कारभार ह्यानंतर आटोपून मला परत गेलें पाहिजे, हें नक्की झालें; तरी रोज दोन पौंड, आठवड्यांतून ४ पौंड असल्या कांही किरकोळ तरतुदी-नियंत्रणाचा फायदा घेऊन श्री. नाना मला थोडेफार पैसे पाठवीतच; परंतु तें खरें नव्हे. डिसेंबरचा शेवटचा आठवडा व जानेवारीचा पहिला आठवडा मीं फार फिकिरींत काढले. हिंदुस्थानांतून आलेले पैसे मला मिळणार नाहीत, असें हायकमिशनरच्या ऑफिसमध्ये सांगत व डिसेंबर ३१ला जमा झालेले मिळतील; पण यानंतर कांही मिळणार नाही, असें बँकेचे लोक सांगत. नातेवाइकांकडून पौंडस् मिळण्याची आशा करण्यांत अर्थच नव्हता. कारण त्यांनाहि पंचाईतच पडलेली होती; परंतु देवाच्या कृपेनें माझ्या नांवावर पैसे चढले व मी आणखी तीन महिने रहावयाचें ठरविलें. लेबर मिनिस्ट्री (Labour Ministry) ने कांही सेवानिवृत्त फौजी अधिकाऱ्यांना निवडलें होतें व त्यांच्यासाठी नव्या नेमणुका करण्यापूर्वी एक Administration Course आखला होता. मी असल्या एखाद्या अभ्यासक्रमाच्या शोधांत होतेंच. त्यामुळे या कोर्सला मला प्रवेश मिळावा म्हणून खटपट सुरू केली. ह्या कोर्ससाठी परदेशीय लोक घ्यावयाचें नाहीत व बायकांना घेण्याचा तर प्रश्नच उरत नाहीं, असें मला कळलें. तरीहि ज्या कॉलेजमध्ये तो शिक्षणक्रम शिकविला जाणार होता त्याच्या प्रिन्सिपॉलना जाऊन भेटलें. त्यांनी मुलाखतींत मला सांगितलें की, "तुम्हाला आमचें इंग्रजी कितपत झेपेल, याचा मला अंदाज करतां येत नाही. तेव्हा ज्युनिअर लोकांसाठी जूनपासून ९ महिन्यांचा हाच अभ्यासक्रम पुन्हा सुरू होईल त्यांत तुम्हीं प्रवेश मिळवा." ह्यानंतर मी जूनपर्यंत येथे नाही. मला एप्रिलमध्ये परत गेलेंच पाहिजे व इंग्रजीमधून शिकण्याचा आम्हा भारतीयांना सराव आहे, असें सांगून मीं त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला व "प्रयोगाखातर घेण्यास हरकत नाही," असा शेरा मारून मला प्रवेश देण्यांत आला. माझ्या पूर्वीच्या कोर्ससाठी सगळ्या मुलीच–त्यांतहि माझ्यापेक्षाहि लहान वयाच्या होत्या. आता ह्या कोर्ससाठी सगळेच पुरुष. सगळेच केवळ इंग्लिश व वयाने व अनुभवाने माझ्यापेक्षा एकजात मोठे.

एके काळीं गाजविलेली अधिकाराची धुंदी त्यांच्या वागण्यांतून अजूनहि डोकावतांना दिसे. आम्हाला तीन महिन्यांत नऊ महिन्यांचा अभ्यासक्रम पुरा करावयाचा होता. त्यामुळे वर्गांतील अभ्यासाव्यतिरिक्त घरीं करावा लागणारा अभ्यासच फार असे. आमचे विषय होते -- Evolution of Modern Industry; The nature of Management; Work Measurement and Method Study; Book-keeping and Accountancy; Economic Aspects of Industry and Commerce, Office Organisation and Business Law.

प्रोफेसर्स म्हणजे एकेक कसलेले, व्यासंगी व आपापल्या विषयावर प्रभुत्व असलेले होते. असल्या विवक्षित प्रकारच्या अभ्यासक्रमासाठीं तितक्याच तयारीचे शिकविणारे अध्यापकहि लागतात, कारण शिकणारे विद्यार्थी पुरे मुरब्बी व अनुभवी असल्याने शंकाकुशंका किंवा प्रश्न विचारले जात ते मामुली कधी नसायचे. इंग्लंडमधील धंदेशिक्षण महत्त्वाचें; जितकें प्रात्यक्षिक तितकेंच पुस्तकी ज्ञानहि परिपूर्ण दिले पाहिजे हा कटाक्ष. माझ्या या अभ्यासक्रमासाठीं विषय बरेच, सखोल अभ्यास व त्यामानाने वेळ अल्प असल्यामुळें प्रोफेसर्स फार तयारीचें व गंभीरवृत्तीचें होते. एकेक तास, एकेक व्याख्यान, म्हणजे माहितीपूर्ण व महत्त्वाच्या गोष्टींनी ठासून भरलेले असे. वर्गांत मी घेतलेलीं टिपणें आज वाचून पाहिली तरी मला मी त्या वर्गांतच आहे कीं काय असें वाटून तन्मयतेने अभ्यास करावासा वाटतो. "Nature of Management" ह्या विषयाला एक रशियन प्रोफेसर होते. विषय इतका कठीण पण ते इतका सोपा करून त्याची उकल करीत कीं पुस्तके वाचतांना ती त्यांच्या इतक्या सोप्या भाषेत कां लिहिली नाहीत असेच आम्हाला वाटे. "Book-Keeping and Accountancy" ह्या विषयाने मला फार त्रास दिला. सर्वांत मजेचा तास "Business Law" चा. ह्या विषय शिकविण्यासाठीं प्रो. ऑलिव्हर नांवाच्या स्त्री-प्रोफेसर होत्या. त्या दिसण्यांत किरकोळच, पण रेखीव बांधा व तीक्ष्ण नजर यामुळे वर्गावर फार छाप बसवीत. त्यांचा तास सर्वांनाच आवडे, माझ्या पाहाण्यांत आलेल्या शिक्षणव्यवसायी महिलांमध्यें मिसेस ऑलिव्हर मला सर्वांत आवडल्या. ह्या शिक्षण-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
आठवणींची करितां मृगया... वि: ..........११९
अनुक्रम ..................

क्रमामध्येंहि व्याख्यानी कार्यक्रमाबरोबर निरनिराळ्या ठिकाणांना देण्यांत आलेल्या भेटींचा (Visits) समावेश होताच. भेटी देण्याच्या कार्यक्रमामध्ये मी लक्षांत रहाण्यासाठीं स्थळें पाहिली. स्थळें म्हणणें बरोबर होणार नसेल तरी पहाण्यासारखे कारखाने (Concerns) पाहिले. अशा मध्यें ब्रुक बॉण्ड टी चा डेपो, पॅस्कल्स स्वीटस फॅक्टरी, यांचा उल्लेख करणें जरूर आहे. चहासारखी वस्तु–नुसता माल आणावयाचा, त्यावर कांही औषधें टाकावयाची व पुडे बांधून रवाना करावयाचे. इतका साधा व्यवहार पण त्याकरितां इतकी चोख व्यवस्था ठेवावी लागते हें मला माहिती नव्हतें. बरेचसे कारखाने पाहिल्यानंतर त्यांत उपयोगांत येणारी मशिनरी त्याच प्रकारची असते असे आढळलें. उदाहरणार्थ, आपल्या आरे मिल्क कॉलनींत दुधाच्या बाटल्या भरण्याचें जें मशिन आहे तेंच चहाचे पुडे ठराविक मापाने भरण्यासाठीं, तशाच सारखे चॉकोलेटचे पुडे भरण्यासाठीं आढळून येतें. तयार करण्याच्या क्रियेमध्यें वस्तूची एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत होणारी हालचाल व त्यासाठीं योजिलेली नोकर-वर्गाची बचत करणारी यंत्रसामुग्री अेकाच प्रकारची असते. फरक इतकाच कीं, बाटल्यांना बुचें लावण्याची सोय असेल तर 'चहाच्या पुडयांचा वरती कागद दुमडून पुढें ढकलण्याची सोय असेल. पेपरमिंट, चॉकोलेटस, आंतमध्यें फळांची जेली व वरून साखरेचें आवरण असलेल्या गोळ्या ह्या करण्याची अवाढव्य क्रिया पाहिली कीं, हें सारें फार सोपें आहे अशी खात्री पटते. एका बाजूनें पाणी, दुसऱ्या बाजूनें साखर भटटीवरील भांडयांत येऊन पडणार, त्याचा रस होणार, त्यांत दुसऱ्या नळींतून ज्या तऱ्हेचा स्वाद पाहिजे, त्याचें मिश्रण मिसळलें जाणार व लांबवर मार्ग आखलेला आहे त्यांतून तो रस लगदा होईपर्यंत थिजत जाणार, नंतर मोठ्या फिरणाऱ्या नळींतून लांब लांब गोड मिश्रणाचे गोळे आंत ढकलले जाणार, नळीच्या अरुंद तोंडांतून पटापट गोळ्यांच्या आकाराचे ठिपके ठिबकणार. त्या ठिपक्यांना थंडगार हवेंतून पॅकिंगच्या वाटेवर लावल्यानंतर आपोआप कागद गुंडाळला जाऊन माणसाच्या हस्तस्पर्शाशिवाय गोळ्यांचा ढीगच्या ढीग निर्माण केला जाणार. मशिनरी चालवितां येते म्हटल्यानंतर ह्यांत अवघड काय आहे ? बहुतेक अशा प्रकारचा माल बनविण्यासाठी जवळ

जवळ तीच तत्त्वें लागू पडणारीं यंत्रें वापरलीं जाणार व तीं चालू करणें व बंद करणें ह्याचबरोबर ती बिघडली तर नीट करतां येणें, येवढें समजलें तर कारखाना चालविणें अगदी सोपें ! ज्या कोणी ह्या कारखान्याचा आराखडा तयार केला, यंत्रणा तयार केली, कमींतकमी श्रमांत जास्तींत जास्त वेगाने उत्पादन करण्यासाठी युक्ति योजिली त्याची बुद्धिमत्ता अलौकिक ह्यांत वाद नाही. पण त्या पद्धतीने कारखाना चालविणें हें अशक्य वाटावें हीच नवलाची गोष्ट. पण तसें आहे खरें. हें वाटतें किंवा दिसतें तितकें सोपें नाही, हेंच आम्ही पाहून घेतलें. Powersamas ची फर्म आम्ही पाहिली. तेथेंहि हेंच. सगळीं यंत्रें. हिशेब ठेवण्याची, पगार मोजण्याची, देण्याची, मांडण्याची, सगळी सोय यंत्रांनीं कार्डावर पाडलेल्या भोंकांत केलेली. पण तें सर्व शास्त्र इतकें किचकट वाटतें कीं, आपल्या हिंदुस्थानांत सर्वसाधारणपणें असली पद्धत येण्यास अजून ६०–७० वर्षें सहज हवींत. (तोपर्यंत इकडे आणखी कांही नवीन व्यवस्था शोधून काढतील ती वेगळीच). पंचकार्ड सिस्टिमचा (Punch Card System) प्रचार व प्रसार करण्यासाठी ह्या फर्मचा आटापिटा चाललेला असतो. त्यासाठीं जरूर तीं प्रात्यक्षिकें सिनेमाद्वारा शिक्षण, ट्रेनिंग कोर्सेस, कोर्स झाल्यानंतर नोकरी मिळवून देणें इत्यादि कामें आनुषंगाने आलींच. पण अशा यंत्रावर दीडदीड हजार लोकांचे पगार केवळ कांहीं तासांत हिशेब करून दिले जातात, हें कोडॅक कॅमेऱ्यांच्या कारखान्यांत पाहिल्यानंतर मात्र मला फार आश्चर्य वाटलें व त्या यंत्र शोधून काढणाऱ्या लोकांची शाबास वाटली. Powersamas च्या Punch Accounting System ने मला भुरळ घातली हें नक्की. लंडन प्रेस एक्सचेंज ह्या Advertising Agency च्या ऑफिसमध्ये आम्ही दिवसभर राहणार होतों. ह्या जाहिरात-युगामध्ये जाहिरातवाले कायकाय करूं शकतात, ह्याचें प्रात्यक्षिक म्हणजे लंडन प्रेस एक्सचेंजचें कार्य. मी ह्या सर्व ठिकाणांचें सविस्तर वर्णन करूं म्हटलें तर एक निराळेंच पुस्तक तयार करावें लागेल. पहाणार तरी किती आणि लिहिणार तरी किती ! ह्या ओझरत्या वर्णनावरून थोडीशी कल्पना आली तरी पुरे.

निरनिराळ्या औद्योगिक धंद्यामध्ये मालक व मजूर यांचे तंटबखेडे असणारच. ते चालतच राहणार ; पण अशा भांडणांना अशी मुरड घालतां

येईल, ह्या घटकांचे संबंध एकोप्याचे कसे राहतील, यासंबंधीं कांही महत्त्वाचें मार्गदर्शन करणारी संस्था आम्ही पाहिली. वेस्ट मिनिस्टर ॲबे, पार्लमेंट हाऊसेस, ह्या सर्व इमारती आतापर्यंत पाहून झाल्या होत्या. मीं कोर्ट कसें चालते हेंसुद्धा प्रो. ऑलिव्हरबरोबर पाहून आलें होतें. मी पार्लमेंट हाऊसेस पाहिलीं त्यावेळीं अँथनी ईडनच्या राजीनाम्याबद्दल खळबळ उडालेली होती. त्याच्या राजीनामा देण्याबद्दल कोणाला हळहळ वाटली नव्हतीच. त्यांतून प्रकृति-स्वास्थ्यासाठी निवृत्त झाल्यामुळे "झालें गेलें होऊन गेलें," असें म्हणून त्याच्या प्रकृति-स्वास्थ्यासाठी लाभदायक प्रार्थनाच सर्वांनी एकमुखाने व्यक्त केल्या. ईडन स्वाभिमानामुळें राजीनामा देईल, हें अगदी उघड दिसत होतें; पण तो कधी, एवढाच प्रश्न होता. इतकी कडक टीका झाल्यानंतर एकहि इंग्रजी माणूस जनतेची म्हणून म्हटली जाणारी अधिकाराची जागा अडविणार नाही. स्वतःचें असें रहावयास घर नाही ! अशा परिस्थितींतहि ईडनने सत्तेचा मोह धरला नाही. जबाबदारी पेलण्याइतकेंच अपयश तोलण्यामध्ये खऱ्या इंग्लिश माणसाची कसोटी लागते आणि त्याला ईडन अपवाद ठरला नाही. निकृष्ट परिस्थितीला भिऊन निघतील तेवढे दिवस निघतील, ह्या विचारसरणीने जोडे खाऊनहि खुर्चीला चिकटणारे चिवट लोक हिंदुस्थानांत कसे इतके निर्ढावून राहतात, असें आश्चर्य येथील जाणत्या इंग्लिश लोकांनी कैकवेळां व्यक्त केलें.

राजकीय पक्षांतील लोकांना पेट्रोलवर निर्बंध असतांना सवलती कशा दिल्या, ह्यासंबंधी कडक टीका येथील वर्तमानपत्रांत झाली व हाऊस ऑफ कॉमन्सच्या लोकांना ती चांगलीच झोंबली. त्या वर्तमानपत्राच्या संपादकावर गंभीर आरोपाचें दडपण आलें. त्याने "तिखट" शब्द वापरून सभागृहाचा जर मी नकळत अपमान केला असेल तर जरूर माफी मागतों; परंतु खरें तें लिहिल्याबद्दल जर सभागृहाला राग आला असेल तर मी माझ्याशी प्रामाणिक राहिलों एवढेंच सांगतों" असें भाषण केलें. त्याने माफी मागितल्याबरोबर वातावरण निवळलें व त्याच्यावर कोणतीहि कारवाई न करण्याचें ठरलें. पण वर्तमानपत्रांतून सगळीकडे निर्भीड वाणीला वर्तमानपत्रें पारखीं व्हावयास पाहिजे असतील तर तें केव्हाहि शक्य नाही, हें

ठसविण्याची वेळ परत आली आहे, असें वर्तमानपत्रकारांनी बजाविलें. वर्तमानपत्रांतून होणाऱ्या टीकेची किंवा भांडणाची पातळी फार वरची यांत संशय नाही.

परतण्याचे वेध मला लागल्यामुळे मीं "पाहण्याचा" धडाका लावला होता. इतके दिवस पाहूं पाहूं म्हणत मागे ठेवलेलें आलबर्ट म्युझियम पहाण्यास बघतां बघतां पुरे पाच दिवस लागले हें म्युझियम पाहतांना एक गंमत झाली. माझ्याबरोबर एकदोन इंग्रज बाया होत्या. म्युझियममध्ये हिंदी विभाग (Indian Section) बघतांना एके ठिकाणी साखर-कारखान्याची मांडणी केली होती तेथे आलों. पूर्वी साखर काढण्याची गावठी पद्धत कशी होती व हळू हळू सुधारणा होत होत आता कारखाने कसे अद्ययावत् पद्धतीने चालतात अशासारखें कांही दाखविलेलें होतें. हीं सर्व चित्रें (Models) मातीचीं होतीं. उसाच्या मळयांत, पागोटें बांधून लांडें धोतर नेसून, उकिडव्यानेच काम करणारे हिंदी मजूर हुबेहूब केले होते. माझ्या-बरोबरीच्या त्या दोन बाया, "Look, look, your India is like this! ......" असें म्हणून मोठ्या कुतूहलपूर्वक हें सर्व पहात होत्या आणि बोलतां बोलतां मला म्हणाल्या कीं, तुझ्या घरच्या लोकांचे तूं जे फोटो दाखविलेस ते लोक असें दिसत नाहीत हें कसें काय ? म्हणजे अशाच एखाद्या लांडें धोतर घालून मुंडासें बांधलेल्या काळ्या माणसाची मी मुलगी असेन, अशीच त्यांची कल्पना होती काय ? त्यामुळेच त्यांना मी इतकी छान वाटत होतें कीं काय ? माझ्या नवऱ्याचा फोटो पाहून, "He doesn't look, like an Indian!" असें सर्वजणी म्हणत होत्या; म्हणजे त्यांनी माझ्या नवऱ्याबद्दल कशा प्रकारची कल्पना केली होती ? आम्ही जेव्हा स्वतःला मध्यमवर्गीय म्हणून संबोधितों तेव्हा बहुसंख्य लोक आम्हा हिंद-वासीयांसंबंधीं ह्या अशा प्रदर्शनांतील चित्रें पाहून कल्पना करतात कीं काय ? हे सर्व विचार माझ्या मनांत येऊन गेले.

ग्रेस, मेरी, मारिएल्डा यांनी हिंदी राजेरजवाड्यांचे फोटो कोठे कोठे बघितले होते व तशीं सजलेली धेंडें मुंबईला जातां-येतां वाटेत दिसत असतील व त्यांतील कांही माझ्या ओळखीचे असतील असें त्यांना वाटलें

होतें. डोक्याला भरजरी शेला, अंगावर मोत्याचे सर, अशा थाटांतील माझ्या नवऱ्याचा फोटो नसल्याने साहजिकच "Oh! he looks like a man and not an Indian!" असें त्या म्हणाल्या. तेव्हा माझी हसून हसून मुरकुंडी वळली. नान्सी, ऑड्री, ल्यूसी ह्या साधारण शिकल्या-सवरलेल्या मुलींना हिंदुस्थानबद्दल बरीच माहिती होती. निदान असल्या विक्षिप्त कल्पना तरी त्यांच्या डोक्यांत खास नव्हत्या; पण सर्वसाधारण इंग्लिश लोकांना हिंदुस्थानबद्दल फारच अज्ञान असल्याचें मला आढळून आलें. आपल्याकडील गोऱ्या मडमेकडे वळून वळून पहाणाऱ्या अडाणी बायकांइतक्याच इथल्या गोऱ्या मडमा ह्या बाबतींत अडाणी किंवा अज्ञानी दिसल्या.

व्हिक्टोरिया राणीचा केन्‌सिंग्टनचा प्रसिद्ध राजवाडा आमच्या शेजारींच. राजवाड्यांत व्हिक्टोरिया राणीला ती "राणी" झाल्याचें सांगितलें गेलें ती तिची खोली, नंतर ज्या ठिकाणीं तिने आपल्या प्रधान-मंडळाची पहिली बैठक घेतली ती जागा हें सर्व पहावयास मिळतें. व्हिक्टोरिया राणीची प्रत्येक गोष्ट इतक्या काळजीपूर्वक जतन करून ठेवलेली आहे कीं, तिच्या अंगड्या-गलोत्यापासून ते अगदी राज्यारोहणाच्या पोषाखा-पर्यंत प्रत्येक पोषाख तिथे आहेच. तिच्या नंतरच्या सर्व राजे-राण्यांच्याहि अनेक वस्तु, त्यांचीं छायाचित्रें, सगळं कांही आहे. ह्या राजवाड्याच्या मैदानांत शिरल्याबरोबर एक गोलाकृति मोठेंच्या मोठें तळें आहे. त्यांत हंस विहार करीत असतात. भोंवताली दाट वनराजी, बाग, फुलें व प्रशांत वातावरण आहे. तळ्याकडे तोंड करून बसलेला व्हिक्टोरिया राणीचा पुतळा आहे. तेथे आपण बसलों कीं, ह्या तळ्याच्या कांठी येऊन बसण्याची राणीची संवय वर्षानुवर्षें झाली तरी अजून मोडली नाही कीं काय, असा भास निर्माण होतो. मी गेलें त्या दिवशीं फार थंडी पडली होती. क्वचित फिरणाऱ्या रंगेल जोडप्यांखेरीज त्या तळ्याच्या आसमंतात् कोणीच दिसत नव्हतें. सकाळचे दहा वाजले तरीहि जणू सहा साडे-सहा वाजल्यासारखें सगळें वातावरण थिजलेलें होतें. मी राजघराण्यांतील राण्यांच्या मेळाव्यांत थंडपणें बसून विचार करीत होतें. राजवाड्यांत प्रसिद्ध रशियन नर्तकी पाव्हलोव्हा हिच्या वैयक्तिक वस्तु व नाचाचीं उपकरणें इत्यादीचें प्रदर्शन भरलेलें होतें. तें उघडण्याची मी वाट पहात होतें. रविवार असल्यामुळे

प्रदर्शनाची व्यवस्था ठेवणारे लोक चर्चमध्ये जाऊन आल्याखेरीज प्रदर्शन उघडणार नाहीत, ही माझी खात्रीच होती. कितीहि सुशिक्षित लोक असोत, उच्च-पदाधिकारी असोत प्रत्येक रविवारीं चर्चमध्ये गेल्याशिवाय राहणार नाहीत. आमच्याकडील सुशिक्षितपणाच्या कल्पना किती निराळ्या आहेत? देवळांत जाणें सुशिक्षित माणसाला झेपणारें नाही. एखाद्या ऑफिसरने देवापुढे नमस्कार करून भाविकपणें उभें राहणें ही कल्पनाच विनोदाची वाटते. याच्या उलट देवाबद्दल भक्तिभाव उघडपणें दाखविण्याची लाज तर राहोच; पण कित्येक वेळां तो खेळ किंवा नुसता देखावाच होत आहे कीं काय इतकें वाटावें, अशा तऱ्हेने हें चर्चसंबंधीचें प्रेम दाखविलें जातें. प्रत्येक इंग्लिश विचारवंताच्या मनांत ख्रिस्तासंबंधी किती अंशाचा आदर असतो हें अजमावणें कठिण. कारण एक गोष्ट सर्वजण कटाक्षाने टाळतात आणि ती म्हणजे दुसऱ्याच्या भावना जाणून अशा संबंधीं हेटाळणीने बोलणें. असो. मी हा राणीचा राजवाडा बघावयासाठी गेलें त्यावेळीं अचानकपणें मला एक चांगलें प्रदर्शन पहावयास मिळालें.

रशियन नर्तकी मादाम पाव्हलोव्हा हिचीं डेगास ह्या प्रसिद्ध चित्र-काराने काढलेलीं चित्रें मीं पाहिलीं होतीं. आंत शिरतांच डेगासने केलेलीं अनेक रेखाटने दुरूनच मला दिसलीं व माझें औत्सुक्य वाढलें. पाव्हलोव्हा ही मागच्या पिढींतील अप्रतिम नर्तकी. जगांतील कलाप्रेमी लोकांना तिने अक्षरशः वेड लाविलें होतें. रशिया, इंग्लंड ह्यांचे राजकीय संबंध लक्षांत घेतां ह्या रशियन नर्तकीचें इंग्लंडच्या राणीच्या राजवाड्यांत मांडलेलें प्रदर्शन खरोखरीच कौतुकास्पद होतें. इंग्लंडच्या खिलाडू वृत्तीचें तें द्योतक होतें. कलेसाठी कलावंताने कष्ट तर घ्यावयालाच पाहिजेत; पण कला-विकासासाठी बौद्धिक पातळी वरची असणें आवश्यक आहे, हा त्यांचा सिद्धान्त असल्यामुळे विकृत स्वरूपांत कला दृष्टीस पडत नाही. नाटकांमधूनहि स्वाभाविकपणा, आत्मविश्वास व वैयक्तिक वैशिष्टय दिसून येतें. ह्याचें कारण नाटककाराने काय परिस्थितींत व कशासाठी ते लिहिलें आहे, हें शिकविल्याखेरीज नाटक बसवावयालाच घेत नाहीत. १८ व्या शतकांतील नाटकांत अठराव्या शतकांतील वेषभूषा असावी, हें तर इकडे दहा वर्षांचें पोरहि सांगेल. आधुनिकतेची छटा (Touch) देण्याचा मोह टाळण्यांतच

त्यांच्या पदरांत अर्धें अधिक यश पडतें. नाटकांत काम केलें नसतें तर जगण्याची पंचाईत होती, अशा परिस्थितींत ज्यांनी नाटकांत काम करणें सुरू केलें अशा नट-नटयाहि पुढें विपन्नावस्थेस पोचलेल्या दिसत नाहीत. त्याचें कारण असें कीं, त्या केवळ नटया रहात नाहीत; तर त्यांचें व्यक्तित्व (Personality) बदलून जातें व आपोआप त्या काळाबरोबर पुढे जात रहातात. एक भूमिका केली कीं तीच जन्मभर करीत बसल्या असें होत नाही. मनाची उंची वाढल्यामुळे दुसऱ्या प्रकारच्या भूमिका करण्याची स्वाभाविक आकांक्षा निर्माण होऊन नव्या नव्या नाटकांत नव्या भूमिका करून त्या सदैव पुढे राहूं शकतात. "पुढे येणें" एक वेळ सोपें; परंतु "पुढे राहणें" कठीण, ह्याची त्यांना बरोबर जाणीव असते. हें सगळं सांगायचं कारण पाव्हलोव्हाच्या यशाचें मर्म ध्यानांत यावें.

पाव्हालोव्हा उत्तम नाचत असे एवढें मला माहिती होतें. परंतु प्रदर्शन भरविण्यासारखें त्यांत काय आहे, हें मला कळेना ! आंत शिरतांच प्रवेशद्वारीं तिचें भव्य तैलचित्र लावलें होतें. कमनीय बांध्याच्या सडसडीत पाव्हालोव्हाने इतक्या कलाप्रेमी लोकांना स्फूर्ति दिली कीं त्यांच्या कलाकृति पाहून मी चकित झालें. इतकीं सुंदर चित्रें (Sketches) मीं चित्रांच्या प्रदर्शनांतहि पाहिलीं नाहीत. पुढच्या हॉलमध्ये पाव्हालोव्हाचें प्रत्येक नृत्यातले पोषाख (तारांच्या सांगाड्यांवर) घातल्यानंतर कसे दिसत असतील तसे सजवून ठेविले होते व शेजारीं त्या विशिष्ट नृत्यांतील फोटो ओळीनें लावून ठेविलेले होते. "Pavalova in Dying Swan, Pavalova in Christmas, Pavalova as Cleopatra, Pavalova in Coppela" एकेका नृत्यांतील फोटो म्हणजे एकएक रत्न असल्यासारखें वाटे. उपमा द्यावयाची म्हणून नाही; पण अक्षरश: ती भिंगरीप्रमाणें फिरत असे. "Butterfly Dance" मध्ये फुलपांखरासारखीं हलकीं पावलें टाकीत असे आणि Dying Swan मध्ये हंसासारखी रुबाबदार फिरत असे जगांत जेथे जेथे ती गेली तेथे तेथे तिने लोकांना वेड लावलें. १० वर्षांची पाव्हालोव्हा १६ वर्षांची, २० व्या वर्षी, ४७ व्या वर्षी, आपल्या "my Home" मध्ये, असे तिचे फोटो पाहून मला तिच्याबद्दल जिज्ञासा उत्पन्न झाली. कोणी तिच्या पायांचा अभ्यास केला, कोणी तिचीं रेखाटनें केलीं,

तर कोणी चित्रें रंगविलीं, पुतळे बनविले. ह्या सर्व कलाकृति त्या प्रदर्शनांत आणून एकत्रित ठेविल्या होत्या. Ballet Dance साठी एक विशिष्ट प्रकारचे बूट लागतात त्यांच्या असंख्य जोड्यां तिच्यासाठी बनविण्यांत येत व त्यांतून बॅडमिंटनला पट्टीचे चिकित्सक खेळाडू ज्याप्रमाणें फूल (Shuttle cock) निवडून घेतात त्याप्रमाणें ती कांही जोड्या निवडून काढी.

पाव्हालोव्हा स्वतः कलावंत होती. पुतळे करण्याचें वेड तिला होतें. आपल्या स्वतःच्या नाचांतील नृत्यकौशल्य दाखविणाऱ्या actions मध्ये तिने पुतळे बनविले होते ते नांवाजण्यासारखेच होते. प्रत्येक हाडाची आणि स्नायूची तिला पुरेपूर माहिती होती. आपल्या हॅम्पस्टेड येथील संगमरवरी प्रासाद-तुल्य घरांत लांबवर पसरलेल्या खाजगी तलावांत हंस पाळण्याचा तिला छंद होता. हंसाची प्रत्येक हालचाल तिने आत्मसात् केली होती. पाव्हालोव्हाचा जगभर सन्मान झाला. हिंदुस्थानांत मुंबई व कलकत्ता येथे अनुक्रमें "अेक्सेलसिअर" व "एम्पायर" थिएटरांत तिचे कार्यक्रम झाले होते. हें प्रदर्शन पाहून आल्यानंतर मी "With Pavalova all round the World" हें पुस्तक आणून वाचलें तेव्हाच माझ्या मनांतील खळबळ थोडी कमी झाली. खऱ्या कलावंताची जातच कलावंत असते. खिलाडू इंग्रजी लोक पाव्हालोव्हाचें कौतुक करण्यांत दंग झालेले पाहून मला हें पटलें. परंपरेचा वारसा सांगणाऱ्या इंग्रज राजे-राण्या शेजारच्या दिवाणखान्यांत पत्त्यांतल्या डावांत हार खाऊन बसल्यासारख्या दिसत होत्या आणि ॲना पाव्हालोव्हा नृत्यकलेची राणी आपल्याच धुंदींत नाचत नाचत होती, थकली होती, आणि हंसाप्रमाणें पंख मिटून डौलदारपणें पडली होती. पाव्हलोव्हाला नाचतांना मी बघण्यापूर्वीच ती मरून गेली म्हणून मला वाईट वाटत होतें. मराठी रंगभूमीच्या सम्राटाचें–बालगंधर्वांचें–कौतुक केलेल्या महाराष्ट्रांतील माझ्यासारख्या महाराष्ट्रीय मनाला कलावंताचें कौतुक जगभर असेंच होतें, हें पाहून आनंद तर वाटलाच; पण त्याच वेळीं आनंदाने माझे डोळे भरून आले.

लंडनमध्येहि सांगण्यासारखी आणखी एक गोष्ट मी बघितली आणि ती म्हणजे सिनेरॅमा हॉलिडे (Cinerama Holiday). अशा तऱ्हेचा सिनेरॅमा जगांत तीनच आहेत. ह्या सिनेमांत पडदा म्हणजे एका वेळेस

माणसाच्या दृष्टीच्या कक्षेंत जेवढा प्रदेश येऊं शकतो. (Range of Eye-view) तेवढा मोठा म्हणजे साध्या सिनेमाच्या पडद्यापेक्षा तिपटीने तो मोठा असतो तीन चित्रें एकाच वेळीं तीन कॅमेऱ्यांवर घेऊन दाखविण्याच्या वेळीं ती तीन "प्रोजेक्टर्स" मधून बाहेर फेंकली जातात तिन्ही चित्रें मिळून अगदी खूप भव्य देखावा निर्माण केला जातो तो Three Dimensional आणि रंगीत असतो व बघण्याच्या मर्यादेपर्यंत त्याची कक्षा असल्यामुळे पडद्याचा पडदेपणा नाहीसा होऊन प्रत्यक्ष बघत असलेल्या दृश्यांत आपण भाग घेत आहोंत, ते सगळे प्रत्यक्षांत अनुभवीत आहोंत, असा आभास उत्पन्न होतो. सिनेमांतील लोकांपैकीच आपण एक आहोंत अशी अद्वैताची भावना किंचित्‌काल निर्माण होते व फार मजा वाटते एक मजेदार अनुभव येवढें खरें.

आम्ही मैत्रिणीमैत्रिणी एकदा साऊथ एंड ऑन सी (South End on Sea) ह्या समुद्रकांठच्या विहारस्थानीं गेलों. तेथे समुद्रकिनाऱ्यापासून आंत मलभर विद्युत-रोषणाईने फुललेल्या विश्रामस्थानांत (Holiday resort) आलों होतों. दिव्यांच्या उघडझापीमुळे होणाऱ्या आभासाचा फायदा घेऊन सायकलवरून मुलगी चालली आहे. मेरीच्या पाठीमागून तिचें कोंकरू धावतें आहे, छत्र्या उघडून तीन मुली चालल्या आहेत व वरून पाऊस पडतो आहे, असलीं बिजलीचीं आकर्षक चित्रें तेथे रात्रभर प्रकाशलेलीं दिसत. लहान मुलांना घेऊन जाऊन सबंध दिवस अशा ठिकाणी काढणें सोपें पडावें म्हणून सर्व सोयी तर येथे आहेतच; पण इतक्या प्रकारचे खेळ व खेळणीं पहावयास सापडतात कीं, लहान मुलांबरोबर मोठीं माणसें त्यांत रंगून जात. क्रीडा-गृहाच्या मंडपांत प्रत्येक ठिकाणीं स्वयंचलित तिकिटें देणाऱ्या यंत्राची व्यवस्था करून ठेवली असल्याने (Slot machines) खेळणाऱ्या लोकांची गर्दी, व्यवस्थापक, तिकिटवाले, आरडा-ओरड असलें कांही तेथे नव्हतें. मोटारींची धडक, मेरी-गो-राउंड, भुतांचें घर इत्यादि आमच्या प्रदर्शनांतून आढळणारीं सर्व आकर्षणें तेथे होतीं. आम्ही तीन साडे-तीन मैल आंत गेलों ती छोटी आगगाडी तर इतकी छान होती कीं, त्यांतून उतरूं नयेसें वाटे. ती आगगाडीहि पण विजेच्या रोषणाईने शोभविलेली, रस्त्याच्या दोनहि बाजूला विजेच्या दिव्यांच्या माळा, खांब, सिग्नल्स वगैरे दिव्यांनी मढविलेले.

समुद्राच्या पाण्यांत दूरवर गेलेल्या जमिनीच्या सुळक्यावरून ह्या अशा नटलेल्या रस्त्यावरून आगगाडी आंत घुसली कीं, इंद्रनगरीचीच आठवण व्हावी. आम्ही मोठ्या बायकासुद्धां तिथे खेळतां खेळतां संध्याकाळपर्यंत दमून गेलों. इंग्लंडमध्ये सर्वांत मोठा विजलीरोषणाईचा मेळावा ब्रायटन येथे आहे. तेथेहि मी जाऊन आलें. ब्रायटनला चांगल्या रंगीत शंख-शिंपल्या मिळतात, असें कोणी सांगितलें होतें; परंतु मुंबईच्या जुहूप्रमाणें अनेक जणांनी येऊन येऊन सगळ्या शिपा व शंख संपवून टाकल्या असाव्यात. मला कांही मिळालें नाही. आम्ही ब्रायटनला गेलों तेव्हा माझ्याबरोबर हिंदी लोक होते. त्यांत गाण्याचें शौकीनहि कांही होते. तेव्हां त्यांच्यापैकी एकाकडे टेप-रेकॉर्डर होता. त्यावर त्यांनी माझीं एकदोन गाणीं नोंदलीं. माझ्या आवाजाची पहिली नोंद येथे व्हावयाची होती तर!

आतां मी जाण्याच्या मनःस्थितींत असलें तरी जमेल तेवढें व तितकें पहाण्याचा कार्यक्रम करीतच होतें. अशाच एकदां चेरिंग क्रॉस येथील एका हॉटेलमध्यें आम्ही गेलों होतों. संध्याकाळच्या ज़ेवणाचा थाट सर्वच हॉटेल्समधून भपक्याचा असतो. खातां-पितांना गप्पा मारतांना समोरील स्टेजवर चालू असलेला ऑर्केस्ट्रा पहाणें किंवा कोणाचें गाणें ऐकणें ही पद्धत तिकडील बऱ्याचशा ठिकाणीं आहे; परंतु मी गेलें होतें त्या हॉटेलमध्यें स्टेजवर तीन सुंदर कारंजीं उडत होतीं, व भोवताली उपवनाचा देखावा सजविलेला होता. गंमत अशी कीं, आर्केस्ट्राचे सूर जसें खालीं वर किंवा गंभीर, चंचल वाजत त्या प्रमाणांत कारंजीं जोरांत, हळू, कमी उंचीवर किंवा जास्त उंचीवर त्याप्रमाणें उडत. वाऱ्याच्या योगे कारंजाच्या धारा वाकड्या सरळ करून जणू मानवी आकृति भावनोत्कटतेने नाचत आहेत असा, आभास त्यामुळे उत्पन्न केला जाई. आर्केस्ट्रावर वाजणारे नैराश्याचे सूर किंवा उत्कंठा वाढविणारे उच्च पट्टींतील सूर ह्यांच्या जोडीला कारंजाची चलबिचल पाहिली कीं, जणूं जिवंत समजदार नृत्यकाराचें नृत्य आपण पहात आहोंत असा भास होई मी खाण्यापेक्षां पहाण्यांतच रंगून गेलें. नाच संपल्यावर क्षणार्धांत एका धीर गंभीर ठोक्यासरशा तीनहि धारा जमिनीच्या पोटांत गेल्या व आम्हांला आमच्या तंद्रीतून खाडकन जाग आली. थोडा वेळ गेल्यानंतर दुडुदुडु धांवणाऱ्या मुलाप्रमाणें, खुदुखुदु हंस-

णाऱ्या बालकांप्रमाणें कारंजाचे थुईथुई नाच ऑर्केस्ट्राच्या अतिसूक्ष्म तारांच्या निनादावर सुरू झाला. पाण्याच्या धारांमध्यें किती पाणीदारपणा असूं शकतो त्याचा प्रत्यय आला. हा पाण्याच्या धारांचा नाविन्यपूर्ण नाच मला फार आवडला.

लंडनमध्ये मी असतांना आयडीयल होम एक्झिबिशन भरलें होतें. मी ठरल्याप्रमाणें लवकर परतण्यासाठीं निघूं शकलें असतें तर हें प्रदर्शन पहाणें मला जमलेंच नसतें; पण माझें निघणें थोडें लांबल्याकारणाने मला ह्या प्रदर्शनाला जाता आलें आणि बरं झालं कीं, एक अतिसुंदर संधि गमावतां गमावतां माझ्या हातीं लागली. प्रदर्शनाचें उद्‌घाटन राणीने केलें हें उचितच झालें. हें प्रदर्शन होतें अतिशय टोलेजंग आणि विस्तीर्ण. जातां क्षणींच एक सुंदर कारंजें आणि उंच उंच वेलींनीं मढविलेला खांब. तेथील सर्व वेलीफुलें कृत्रिम होतीं हें मला शेवटपर्यंत कळलें नाहीं. प्रदर्शनांत घरेंच्या घरें बांधून ठेवलेलीं होतीं व प्रत्येक घरासमोर आंत जाणाऱ्या लोकांचा 'क्यू' होता. आपल्याला कशा तऱ्हेचें घर पाहिजे, कशा सोईने बांधलें पाहिजे व कमींत कमी जागेचा जास्तींत जास्त फायदा घेणें हें उद्दिष्ट कसें साध्य होईल, ह्या दृष्टीने प्रत्येकजण ह्या चार खोल्या, पांच खोल्या, दोन खोल्या पहात होता. बायकांचें लक्ष सोयीगैर-सोयीकडे व पुरुषांचें किंमतीकडे व वापरलेल्या सामानाकडे असे. ह्या बाब-तींत सगळीकडे बायका सारख्याच, पुरुषहि तसेच. ह्या घरांतून हिंडतांना आपापसांत झालेले संवाद फार मनोरंजक होते. प्रत्येकजण जणूं आपल्या घरांतील माणसें त्या त्या जागेंत बसवून मनांतल्या मनांत नवें बिऱ्हाड मांडीत होता आणि कसं काय वाटेल ह्याचा अंदाज घेत होता. घडीच्या कॉटस्, भिंतींतील व न दिसणारीं खुबीचीं कपाटें, एकेका फर्निचरच्या सामानाचे तीनचार उपयोग असलें सारें कांही त्या प्रदर्शनांत होतें. जाहि-रातबाजी तर होतीच होती. परंतु निरनिराळे प्लॅन्स विकण्याची कल्पना तेथे फार आवडली व लोकांना मार्गदर्शक झाली. मी इंग्लंडमधील कौंटी कौन्सिलने बांधलेलीं घरें, कॉलनीज हें सर्व व्यवस्थित पाहून आलेली होतें. त्यामुळे मला तेथे बांधण्यांत आलेल्या घरांच्या रचनेचें तितकेसें आश्चर्य वाटलें नव्हतें ; परंतु आर्थिक प्राप्तीच्या मानाने घर बांधण्याचे आराखडे

कसे तयार करतां येतील किंवा किती वार्षिक प्राप्तीमध्ये किती जास्तींत जास्त जागा घेतां येईल, ह्याची अतिकिचकट विचक्षणा ऐकतां ऐकतां मी कंटाळून गेलें. ह्यापेक्षा आपल्याला झेपेल त्यापेक्षा थोड़ी कमीच जागा घेऊन आर्थिक तोंडमिळवणी सोपी केलेली काय वाईट, असा चमत्कारिक व्यावहारिकपणा खास भारतीयांना शोभेल, असा विचार माझ्या मनांत डोकावून गेला. अर्थशास्त्राचा काय अन् कशाचाच काय अति कीस काढला तर मनःस्तापच जास्त होतो आणि झालेल्या फायद्याचा मानसिक आनंद त्यांत केव्हाच लुप्त होतो, ही साधी गोष्ट त्यांना नक्कीच माहिती असली पाहिजे; परंतु जास्तींत जास्त फायदा पदरांत पाडून घेण्याच्या नादांत माणूस नकळतच खोल खोल जात असतो.

ह्या प्रदर्शनांत स्वयंपाकघरांत, दिवाणखाने, जेवणाच्या खोल्या, कोठीच्या खोल्या वगैरे प्रत्येक गोष्टीबद्दल कमालीची माहिती बारकाईने पुरविली होती ; पण सर्वांत नयनमनोहर आणि थकल्या जीवाला दिलासा देणारा भाग म्हणजे बगीचा-विभाग. माझ्या आयुष्यांत मला कधी बाग करण्याचा आनंद लुटतां आला नाही. शाळेच्या वाफ्यांतून काय दोनचार भेंड्यांचीं रोपें आणि घरांतील कुंडींतून सदाफुलीचीं रोपें लावलीं असतील इतकेंच. जास्तींत जास्त म्हणजे दिवाळींतील किल्ल्याच्या डोंगरावर अळिवाचे शेत उगवून काढलें असेल तेंच. ह्याखेरीज बागेशी कधी माझा संबंध आला नाही; पण रोममध्यें हिंडल्यापासून बागांबद्दल भलतीच आवड उत्पन्न झाली होती. फुलांचीं नांवें माहिती नसणें, कोणकोणत्या ऋतूंत काय काय पेरावयाचें, बीं-बियाणें, कलमें ह्या सर्व गोष्टींबद्दल संपूर्ण अज्ञान मला असावें, ह्याची मला फार खत वाटूं लागली होती. ह्या माझ्या दुःखावर डागण्या देण्यासाठीच कीं काय, परंतु त्या प्रदर्शनांत दिव्यांच्या मंद उजेडांत इतकी मोठी प्रचंड बाग उठविली होती कीं, शिरतांक्षणींच येथे २–४ तास बसलेंच पाहिजे अशी जबरदस्त इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. जरा वेळाने बसल्याबसल्याच शेजारपाजारचे मोठमोठे गगनचुंबी वृक्ष बघत व त्यांवर चढविलेल्या वेलींवरचीं फुलें न्याहाळत असतां मनांत विचार आला की, निव्वळ पटांगण असलेल्या जागेवर भरलेल्या ह्या प्रदर्शनांत येवढी मोठी बाग जमिनींतून उठविणें कसें काय शक्य झालें असेल ? ही जर

आधीपासूनच ह्या जागेवर होती तर इतकी सुंदर बाग पाहून येण्याविषयी इतक्या दिवसांत कोणीच कसें मला सांगितलें नाही ? काय सुंदर कारंजीं, एका ठिकाणीं झुळझुळ वहाणारा झरा, कित्येक तऱ्हेचीं फुलें, उन्हाळी गारव्याचे मांडव (समर हौसिस) इतकेंच काय पण खाली पडणारा पाचोळाहि तेथे होता आणि मध्येच वाऱ्याच्या झुळुकाहि येत होत्या. गार गार आणि शांत शांत – सर्वत्र प्रसन्न !! छे ! इतकी सुंदर फरसबंदीच्या वाटांची भव्य बाग ज्या माळ्यांनी उठविली त्यांची कमालच म्हटली पाहिजे. इतक्यांत एका कुंडीतील झाडांच्या फुलांतून इलेक्ट्रिकचे बल्ब्स लावलेले मला दिसले. त्या दिव्यांच्या उजेडामुळे सबंध झाडाला शोभा आली होती. परंतु तें पहातां पहातां कसा कोण जाणे माझ्या मनांत विचार आला कीं, हें सर्व उपवन कृत्रिम तर नसेल ? आणि खरेंच, बारकाईने निरीक्षण करतांच मला त्याचा पडताळा आला. म्हणजे येवढी मोठी वृक्षराजी, फळें, पानें, फुलें, कारंजीं, झरा सारें कांही कृत्रिम होतें. यांचा दरवळणारा सुगंधहि कृत्रिमच होता तर. आतां मात्र खरी कमाल झाली ! ही सर्व बाग खोटी आहे, हेंच मला खोटें वाटूं लागलें. जेथे जेथे म्हणून पानाफुलांची आरास होती ती सर्व अशीच कृत्रिम होती. खऱ्या बागेचा आभास उत्पन्न करून अगोदर सत्य-सृष्टींतला आनंद झाला आणि नंतर कृत्रिमतेचें सत्य समजल्याबरोबर ह्या मानवी कौशल्याची परिसीमा पाहून मानसिक आनंदाची परमावधि झाली. तीन-चार मैल परिघाच्या परिसरांत चार-पांच तास हिंडहिंड हिंडल्याचें सार्थक झालें आणि खरीं झाडेंफुलेंहि पारखून घ्यावीं अशी गोंधळलेली अवस्था झाली ! अजूनहि कोणी कागदाचीं फुलें, कापडाच्या फुलांचा गुच्छ, रेशमाचा हार अन् असलेंच कांही करण्याची गोष्ट काढली कीं, मला त्या बागेची आठवण येते आणि कोणी कितीहि उत्कृष्ट नमुना माझ्यापुढे ठेवला तरी तो बोजड वाटतो.

इकडे मी अशी हिंडत होतें आणि तिकडे माझ्या परीक्षेच्या निकालाचा दिवस जवळ जवळ येत चालला होता. नशिबाने मला चांगले गुण मिळाले होते. एका विषयांत मी पहिली आलें असून दोन विषयांत दुसरी व सर्व विषयांत मिळून ६८ टक्के मार्कस मिळाले. सर्वांना सानंदाश्चर्य वाटलें. ज्या तऱ्हेने कॉलेजमध्ये माझे कौतुक झालें त्याला तोडच नव्हती. मला

समाधान वाटलें. आता मला हिंदुस्थानांत परत जावयाला पाहिजे. येथे राहण्यासारखें आणखी कांही कारण उरलें नव्हतें. जसजसा हिंवाळा उघडून हवा चांगली पडूं लागली तसतशी इंग्लंडमधील मुक्काम वाढविण्याची इच्छा अधिकाधिक बळावूं लागली; पण वटावाचा प्रश्न आ वासून पुढे उभा असल्यानें तो विचार सोडून देणें भाग होतें. मी माझ्या कॉलेज-सह-कार्‍यांचा निरोप घेतला. दाटल्या गळ्यानें आणि भरल्या डोळ्यानें असल्या तिर्‍हाईत परकीय लोकांचे निरोप घ्यावयाला मी काय पहिल्यांदा सासरीं निघालेली नवी नवरी होतें कीं काय? पण खरोखरच मला माहेर सोडून निघाल्यासारखें वाटत होतें. वास्तविक परक्यांच्या देशांतून मी स्वदेशीं निघालें होतें. परकीयांच्या सहवासांतून स्वकीयांच्या सान्निध्यांत जाणार होतें. ज्यांची मला ओढ लागली होती त्या माझ्या परिवारांत हक्कांच्या जागीं चाललें होतें. हें सारें माहीत असूनहि मला वाईट वाटत होतें. कळलेल्या गोष्टी कळविणें सोपें असतें तर विचार आणि भावना हा फरक कशाला राहिला असता? मला माझीं माणसें भेटावीं अशी तहान लागली होती; पण इंग्लंड सोडून जावयाची इच्छाहि नव्हती.

• • •

८

# परतीचे वेध

इंग्लंड सोडतांना मला वाईट वाटण्याचें खरं म्हणजे कारण नव्हतं. कारण मी रहावयाचें ठरविलें होतें त्यापेक्षां जास्त दिवस मला रहावयाला मिळालें होतें. पाहीन वाटलें होतें त्यापेक्षा जास्त पहाणें मला जमलें होतें. घ्यावयाच्या गोष्टी मनासारख्या मिळाल्या होत्या. शिवाय परततांना मी सात-आठ देशांमधून हिंडून घरीं जाणार होतें; पण इतकं सगळं समजत असूनहि मला इंग्लंड सोडतांना वाईट वाटत होतं. आता इतक्या दिवसांनंतर जेव्हा मी विचार करतें तेव्हा मला असें वाटतें कीं, मला रहावेंसें वाटत होतें ह्याचें मुख्य कारण म्हणजे मला तें विवक्षित वातावरण सोडण्याचें जिवावर आलें होतें. प्रामाणिकपणें सांगावयाचें म्हणजे इतक्या चांगल्या तऱ्हेनें माझी लहानपणापासून जपणूक आणि वाढ झाली असली तरीहि मुंबईच्या आयुष्यांत नोकरी पेशांत मला तितकेसें मोकळें कधीच वाटलें नव्हतें. ऑफिसमधला दर्जा, सर्वमान्य पद्धतीचें उच्च शिक्षण ह्या गोष्टींचा आणि माणसासारखी वागणूक किंवा स्वतःची जीवनविषयक दृष्टि बनविण्याची ताकद ह्यांचा परस्पर कांही एक संबंध नाही, अशी खात्री मला पटली होती ती बहुतेक बाहेरच्या जगांतील माझा ज्यांच्याशी संबंध आला असा विविध क्षेत्रांतील अधिकारी वर्ग पाहूनच. हिंदुस्थानांत

असतांना हाताखालील लोकांना साधें बसा म्हणून सांगण्याइतपतहि माणुसकी मला तरी कित्येक वड्या वड्या पगारदारांजवळ दिसली नव्हती. नेहमीच्या व्यवहारांत "कृपया" (Please) हा शब्द सुद्धां वापरण्याची सवय करावी, असें ज्यांना वाटलें नाही अशांच्या हाताखाली मीं काम केलें होतें. स्वत:चें मन स्वत: वनविण्याची कुवत नसल्यामुळे कोणत्या तरी सोम्या-गोम्याच्या सल्ल्यानुसार कोणाचें कितीहि नुकसान करण्याचें धाडस ज्यांच्या अंगीं सत्तेच्या जोरावर यावें असले घाडशी खेळ मीं वघितल्यामुळें इंग्लंड-मध्ये मला अगदी निराळ्या जगांत आल्यासारखें वाटलें. आर्थिक सुस्थितींत हिंदुस्थानांत राहाण्यापेक्षा जरा कमी पैशांत पण इंग्लंडमध्येच रहावें असें वाटावें, इतकी चांगली वागणूक मला मिळत होती. इंग्लंड-मध्यें रंगद्वेष आहे, भारतीयांना हिडिस-फिडिस करतात, ह्या गोष्टी मला कशा खऱ्या वाटाव्या ? माझ्या देशांत कारण नसतांना हिडिस-फिडिस करणारे लोक मीं पाहिले होते, अगदी पाहिजे तितके पाहिले होते. त्यांच्या धसमुसळ्या वागणुकीच्या पद्धती मीं इतरत्र कोठेहि अनुभवल्या नाहीत. माझ्याशी असें नव्हे; पण कोणालाच अशी वागणूक मिळाल्याचें माझ्या वघण्यांत आले नव्हते ! कित्येक कचेऱ्यांतून व कार्यालयांतून जाऊन आलें, व कित्येक मोठ्या (म्हणजे अधिकाराने मोठ्या) लोकांना भेटून मी त्यांच्या-तील खरा मोठेपणा पाहूं शकलें. पण सुशिक्षितांच्या अहंगंडाने पछाडलेले कोणी मला आढळले नाहीत. "बाई" म्हणून मान देणें ह्याला मी हपापलेली कधीच नव्हतें ; पण तसें करतांना समाजाची जी एक घडण आपोआप वनते तिच्यांतील मार्दव माझ्या अनुभवाला पुरेपूर आलें असल्याने मला इकडे अगदी वेपर्वाईने बायकांना वागविणाऱ्या पुरुषवर्गाची कीव वाटे. तिकडे जाऊन आलेले, वघून आलेले लोकहि परत हिंदुस्थानांत आल्यानंतर हें सारे व्यवस्थितपणें विसरून जातात हें पाहून मला जास्तच विषाद वाटे.

ह्या लिहिण्याच्या ओघांत एक आठवण सांगतें. आम्ही एकदा एका Co-operative College च्या सुट्टीतील अभ्यासक्रमावर (Holiday Camps) गेलों होतों. आमचा मेळावा दीड दिवसापुरता होता व तेवढ्या वेळांत आम्हांला तीन हप्त्यांनी व्याख्यानमाला होती. शनिवारीं दोन वाजतां जमून ओळख करून देण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर चहापाणी होऊन चार

वाजतां पहिलें व्याख्यान झालें. रात्रीं तेथेच जेवण व झोपण्याची व्यवस्था पण त्याच कॉलेजवर होती. मुली ७–८, त्यांची व्यवस्था खालच्या मजल्यावर होती व मुलें २२–२५ असल्याने त्यांची झोपण्याची व्यवस्था पहिल्या मजल्यावर होती. सकाळीं न्याहारीसाठी पुन्हा सर्वजण एकत्र येणार होतों. सकाळचा ६–६॥ चा सुमार असेल, तेव्हा माझ्या खोलींत मी पडल्या पडल्या कोणी उठलें कीं काय, अशी चाहूल घेत होतें. तेवढ्यांत कानांवर बाचाबाची ऐकूं आली. भाषणांत एक स्त्री व एक पुरुष सामील होती. स्त्रीच्या आवाजांत "You Indian, . ...." असले शब्द रागाने उच्चारल्याचे ऐकतांच मीं कान टंवकारले. दुसरी व्यक्ति भारतीय तरुण असून त्याची माझी काल रात्रीं थोडीशी ओळख झाली होती. त्यामुळे माझी जिज्ञासा जागृत झाली. मी झटकन उठून कपडे करून बाहेर आलें व अधिक चौकशी करतां मला असें आढळून आलें कीं, आमच्या खोल्या झाडण्यासाठी किंवा आमची सर्व जेवणखाण्याची, झोपण्याची व्यवस्था ठेवण्यासाठी जी मोलकरीण नेमलेली होती ती त्या भारतीय तरुणावर उखडली होती. कारण काय तर पट्टयापट्टयांची लांडी चड्डी व वरती गंजिफ्रॉक एवढाच काय तो पोषाख करून तो गृहस्थ आपल्या खोलीबाहेर पडला आणि इतकेंच नव्हे तर "अमुक अमुक व्यवस्था कोठे आहे? नाश्त्याची तयारी कोणत्या खोलींत आहे?" अशासारखी कांही चौकशी करण्यासाठी जिना उतरून ह्या मोलकरणीशी बोलावयाला आला. "इतक्या ओंगळ पोषाखांत एक त्रयस्थ बाईपुढे येण्याला तुला शरम कशी वाटली नाही?" अशी सुरवात करून त्या मोलकरणीने त्याची खरडपट्टी काढावयास प्रारंभ केला. हिंदी लोकांच्या नेहमीच्या संवयीनुसार त्याने वादविवाद किंवा बाचाबाची करण्यास आरंभ करताच ती आणखी खवळली. "तुम्ही तुमच्या देशांत कांही करीत असाल. आमच्या देशांत आमच्या पद्धति प्रचलित राहणार! अगोदर सभ्य कपडे घालून नंतर माझ्याशी बोलावयाला ये!" अशी तिने गर्जना करताच तो हिंदी मनुष्य खजिल होऊन पुटपुटत वर निघून गेला. वरती त्या सगळ्या विद्यार्थ्यांची ह्यावर काय चर्चा झाली असेल, ह्याची वाचकांनीच कल्पना करावी. आपल्या देशांत एखाद्या मोल-करणीची अशी ठासून बोलण्याची प्राज्ञा झाली नसती. कारण बायकांच्या

मनाची पर्वा करण्याचें बाळकडू पुरुषांना नाही व आपल्याला अमुक एक तऱ्हेची वागणूक पुरुषांकडून मिळाली पाहिजे मग तो कोणत्याहि पेशाचा असो, कोणत्याहि व्यवसायाचा असो, अशी शिकवण स्त्रियांना नाही. हिंदुस्थानांतील चालीरीती लक्षांत घेऊनसुद्धा त्या भारतीय तरुणाचीच चूक होती असें मला अजूनहि वाटतें. बायकांसमोर अत्यंत ओंगळवाणे कपडे घालून सर्रास वावरणारा आपला पुरुषवर्ग किंबहुना सुशिक्षित म्हणविणारा पुरुषवर्ग जेव्हा मी पहातें तेव्हा मला ह्या प्रसंगाची आठवण येते. रात्रीं झोपण्याचा पोषाख जो असेल तो तसाच्या तसा घालून झोपण्याच्या खोलींतून सैंपाकघरापर्यंतहि कोणी इंग्लिश माणूस येणार नाही उलट रात्रीचे पट्टचापट्टचाचे लेंगे घालून खुशाल रस्त्यांतूनहि वावरणारे " पाश्चात्य लोकांचें अनुकरण करतों,' असें म्हणविणारे कितीतरी लोक मी इकडे पहातें. बायकांपुढें आपण कसें यावें, हा विचार तर त्यांच्या मनांत कधीच येत नाही.

रस्त्यांतून पचापच थुंकणें ही गोष्ट अशीच. कोणाहि माणसाकडून तसें वर्तन घडल्याचें माझ्या पहाण्यांत नाही. पण रुमालांत नाक शिंकरणे ही गोष्ट मात्र त्यांच्याकडे सर्वत्र दिसून येते. कित्येकांना ह्या बारीकसारीक गोष्टी वाटतील, पण प्रत्यक्ष व्यवहारांत ह्यांनाच महत्त्व असतें. चालतांना दुसऱ्यांना उपसर्ग पोचूं नये, अशी आपल्याकडे कित्येकजण काळजी घेतात ? कुत्र्याचा पट्टा हातांत धरून जावें अशा तऱ्हेनें छत्री फरफटत मागून ओढीत नेत चालणारे लोक, पाठीमागून तितक्याच घाईने येणाऱ्या लोकांचा कधी विचार करतात ? वरच्या मजल्यावरून धाडकन कांहीहि भिरकावून देणारे लोक इतरांचा विचार करतात असे कोण म्हणेल ? बसच्या वरच्या मजल्यावरून ऐटींत खाली थुंकणाऱ्या लोकांना किती आणि काय शिकविणार ? बसमध्ये दोन माणसांच्या जागेवर शरीराचा जास्तींत जास्त मोठा आकार करून बसणाऱ्या माणसाला शेजारीं एका माणसाला बसावयाचें आहे हें काय माहीत नसतें ? स्त्रियांच्या राखीव बाकावर बेदरकारपणें बसणारे लोक शेजारी स्त्रिया उभ्या राहिलेल्या खुशाल बघूं शकतात! सार्वजनिक वाहनांतून किंवा उद्यानांतून शिट्ट्या घालीत, गाणीं म्हणणारे लोक नेहमीच मवाली वर्गांतले असतात असें कोठे आहे ? ह्या सगळ्याच्या मुळाशी

दारिद्र्य हें नाही; तर अनास्था, दुसऱ्याबद्दल बेपर्वाई हेंच आहे. आजपर्यंत असें वागलेलें चालत गेलें आणि तें बंद पाडण्याची कोणाला आवश्यकता वाटली नाही. अजून वाटत नाही. ज्यांना वाटते त्यांचें कांही चालू शकत नाही. कसेंहि असो, परंतु अशाच कित्येक बारीकसारीक समजल्या जाणाऱ्या वागणुकीच्या बेपर्वाईने प्रत्येकाचें दैनंदिन जीवन कितीतरी कटकटीचें होत आहे आणि परिस्थितीने गांजून गेलेल्या लोकांना अशा वातावरणामध्ये किती गुदमरल्यासारखें होतें हें मध्यमवर्गीयांना तरी मी सांगावयास नको.

इंग्लंडमध्ये हे असें कांही मला आढळलें नाही, कोठेच नाही. मुलींना नटण्याथटण्याचा षोक असेल त्यापायीं पैसे खर्च करीत असतील. त्या बाहेरच्या औद्योगिक जगांत आपली किंमत वाढावी म्हणून, जास्त काटे-कोरपणे आपली शान ठेवीत असतील; परंतु पुरुषहि स्वतःच्या वागणुकी-बद्दल किंवा कपडचालत्याबद्दल (appearance, get up) तितकेच आस्थेवाईकपणाने लक्ष घालीत असल्याचें दिसतें. बायकांच्या बाबतींत पुरुष जास्त औदार्याने विचार करीत असतात, वागत असतात, "ह्या बायांत कांही दम नाही उगीच इकडे तिकडे लुडबुड करतात; घरांत गप्प कां रहात नाहीत?" अशा विचारसरणीचे लोक तेथे रहात नाहीत असें नाही. अगदी स्त्रियांबद्दल म्हणजे त्यांच्या गृहोद्योगाखेरीज इतर कोण-त्याहि खटपटीबद्दल ज्यांना तुच्छता वाटते असा पुरुषवर्ग तेथेहि आहे; परंतु व्यवहारांत वागतांना ते बरोबर बायकांसंबंधी आदर दाखवून वागतील. मुद्दाम नाही; बायकांवर इंप्रेशन (Impression) मारण्यासाठी म्हणून नाही, परंतु त्यांना तसेंच शिक्षण आहे म्हणून! लहानपणापासून त्यांना असेंच कांही वाढविलें आहे की, स्त्रीशीं ते तुच्छतापूर्वक वागणार नाहीत. स्त्रियांच्या स्वभावांतील नैसर्गिक चांगल्या गुणांबद्दल त्यांना नेहमीच आदर आहे. इंग्लंडमध्ये मी होचें तोपर्यंत मला उर्मटपणें बोलणारा इंग्रज माणूस आढळला नाही आणि उलट हिंदुस्थानांत जो जितका दर्जाने भारी तितका वागायला हलका हा माझा अनुभव आहे. आपल्याला या बाबतींत अजून फारच शिका-वयाचें आहे.

सतारीच्या तारांवरून बोटें फिरावी इतक्या सहजपणें फिरत्या जिन्यावरून उंच टाचांचे बूट घालून सफाईदारपणें धावणाऱ्या इंग्लिश मुली मी पाहिल्या कीं, स्वतःचें मरतुकडें शरीर सावरीत ढकलीत कशाबशा गाडींतून उतरून ऑफिसला रेटून जाणारा चर्चगेटवरील मुलींचा तांडा माझ्या डोळ्यापुढे उभा राही. इंग्लिश मुलींच्या अंगांतील गुणांपेक्षा आमच्या मुलींच्या अंगांत कमी गुण आहेत असें मला म्हणावयाचें नाही व तसें मला वाटतहि नाही; पण इंग्लिश मुलींच्या पाठीशीं जो अज्ञात शक्तीचा जोर आहे त्यामुळे त्यांच्यांत दिसून येणारा आत्मविश्वास सर्व बाजूंनी वेंगून गेलेल्या आमच्या स्त्रियांचे ठायीं नाही, हें मात्र सत्य आहे. कदाचित् परीक्षा देण्यांत, विचार करण्यांत आम्ही इंग्लिश स्त्रियांपेक्षां कांकणभर पुढेंच असूं; परंतु नीटनेटकेपणा, चटपटीतपणा व उठावदार व्यक्तिमत्त्व ह्या बाबतींत आम्ही त्यांच्या पासंगासहि पुरणार नाही. पारोसें असून आंघोळ केल्याप्रमाणें दिसणें, सुरेख नसून आकर्षक भासणें व त्रेधा तिरपट न उडतां चटपट व्यवहार करणें ह्यापैकी आपल्या मुलींना कांही जमत नाही. म्हणूनच त्या अशा लोकांमध्ये उठून दिसल्या तर नवल तें काय? ह्याचें कारण केवळ आमचें समाजांतील स्थान. दुसरें कांही नाही. तरीहि मी येथे अभिमानानें सांगूं शकतें कीं, असल्या दडपशाहींतहि ज्यांनीं आपला मार्ग काढला त्या भारतीय स्त्रिया परदेशीयांवर चांगलीच छाप पाडतात. संधीच्या अभावीं काळोखांतच राहणाऱ्या आणि पिचणाऱ्या लोकांमध्यें स्त्रियांची संख्या फार मोठी आहे. गरजेपोटीं जन्माला आलेली लाचारी माणसाला दुसऱ्या जगांत जाईपर्यंत सोडीत नाही. इंग्रज लोकांनी आम्हांला व्यापाराच्या मिषाने येथे येऊन कसें फसविलें, हा इतिहास आपल्याला नवीन नाही. तरीहि इंग्रज लोक सामान्य माणसाच्या जीवनांतील व्यवहारामध्ये फार प्रामाणिक व दक्ष आहेत. मोड मोजून घेण्याची जरुरी नाही. माल उलटापालटा करून पारख- ण्याची आवश्यकता नाही. घासाघीस घालावयाला नको. सर्व व्यवहार एका प्रामाणिकपणाच्या पोटीं किती सोपे असतात. पहिल्यांदा मी ऑड्री- बरोबर वाण्याच्या दुकानांत गेलें तर मला किती आश्चर्य वाटलें होतें. एवढ्या दुकानांत फक्त एक माणूस. आंत शिरतांना गिऱ्हाइकाने एक

तारेची टोपली उचलावयाची दोन्ही बाजूला मालाच्या पिशव्या भरून ठेविलेल्या असतात, त्यांतून एकएक उचलून आपल्याला पाहिजे तो माल गोळा करावयाचा व दुसऱ्या दारांतून बाहेर पडतांना त्या माणसाजवळ ती टोपली द्यावयाची. अशी जिन्नसांची टोपली मिळाली कीं, तो मनुष्य बिल तयार करतो व मालाचें बांधलेलें पुडकें तुमच्या हातीं देतो, किंवा घरपोंच पाहिजे असल्यास तशी व्यवस्था करतो. सारा व्यवहार किती सोपा, किती साधा ! मोठ्या साठ्यांत वुचकून वुचकून माल मोजीत वसण्याची आणि वांधण्याची पद्धत इंग्लंडमधील वाण्यांकडे, मांस-विक्रेत्यांकडे नाही. त्यामुळे सुटसुटीतपणा जास्त व प्रामाणिकपणाहि तितकाच असल्यामुळे सर्वांना अशा व्यवहारांत त्रास होत नाही.

आमच्या Business law च्या एका तासाला वर्गामध्ये प्रो. ऑलिव्हर बाईंना एका विद्यार्थ्यानें एकदा सल्ला विचारला होता. तो तास मला चांगला आठवतो. इंग्लंडमध्यें मांस किंवा मांसाचे पदार्थ स्वच्छ तयार मिळतात व अशा मध्येच सॉसेजिसचा समावेश होतो. एका विवक्षित कंपनीच्या ट्रेड मार्कचे सॉसेजिस त्या विद्यार्थ्यानें खरेदी केले होते व सकाळीं न्याहारीबरोबर खातांना त्याच्या दाताखालीं एक-दोन हाडांचे तुकडे लागले. अर्थात् असल्या गोष्टी चालवून घ्यावयाला सॉसेजिस कांही फुकट आणलेलें नव्हतें. त्या विद्यार्थ्यानें कंपनीला पत्र लिहिलें कीं, तुमचा माल खात्रीचा म्हणून आम्ही विकत घेतों आणि अशा तऱ्हेचे हाडांचे तुकडे त्यांत निघाले ते सोबत पाठविले आहेत. तरी आपलें ह्यावर काय म्हणणें आहे ? कंपनीच्या प्रॉडक्शन मॅनेजरने ताबडतोब दिलगिरी प्रदर्शित करून त्याला भेटीसाठी बोलाविलें. भेटीला जाण्यापूर्वी त्याने प्रो. ऑलिव्हरबाईंना विचारलें कीं, मी काय अटींवर तडजोड करूं ? मला २५ पौंड नुकसानभरपाई मिळावी, अशी माझी अपेक्षा आहे. त्यावर प्रो. ऑलिव्हरबाईंनी आम्हांला इतक्या मनोरंजक गोष्टी सांगितल्या कीं, धंद्यांतील बारीकसारीक तंत्राचें तें अंतरदर्शन फारच उद्‌बोधक वाटलें. आमच्या त्या विद्यार्थ्यानें पाच पौंडांवर ही भानगड मिटवावी असा त्याला सल्ला मिळाला. दुसऱ्या दिवशीं त्या विद्यार्थ्यानें कंपनीच्या लोकांनी आपले तज्ज्ञ अधिकारी किती कसोशीने माल बाजारांत पाठवितात, ह्याची खात्री करून

देण्यासाठीं त्याला कसें फॅक्टरीमधून फिरवून आणलें व अशाहि परिस्थितींत एका नोकराच्या ढिलाई व हलगर्जीपणामुळें हाडांचे तुकडे कसे मिसळले गेले असतील, ह्याबद्दल त्याची कशी समजूत पटवून दिली, याचें वर्णन केलें. इतकेंच नव्हे तर त्या मॅनेजरने कंपनीचें लक्ष अशा महत्त्वाच्या गोष्टींकडे वेधून घेतल्याबद्दल त्या विद्यार्थ्याचे आभार मानले आणि खरोखरीच त्याला कांहीं रक्कम देऊं केली ! इंग्लिश लोकांची धंद्यांतील सचोटी ही अशी आहे. ह्या वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टी मी सांगत नाही. माझ्या डोळ्यादेखत घडलेल्या गोष्टींच्या आठवणी आहेत कीं, ज्या माझ्या मनावर वेळोवेळीं कोरल्या गेल्या.

ह्या इंग्रज लोकांच्या देशांत सपाटून पैसे घेणारे दुकानदार आहेत. ते फसविणारे लुच्चे आहेत असें मी म्हणणार नाही; पण अवाच्या सवा भाव लावणारे आहेत हें नक्की. साधीच गोष्ट. आपल्याकडे चप्पल शिवायला दिली तर आपण काय विचारतों कीं किती पैसे घेशील ? पट्टा तुटला असेल तर एक आणा फेकतों, जास्तींत जास्त मागून किती मागेल, दोन आणे. हें आपल्याला अनुभवाने माहीत झालेलें असतें. पण हा माझा अनुभव इंग्लंडमध्ये सपशेल तोकडा पडला. इंग्लंडमध्यें रस्त्या-रस्त्यांच्या किंवा गल्ल्या-गल्ल्यांच्या तोंडावर आपल्या इकडे जसे चांभार बसलेले दिसतात तसे आढळत नाहीत चपला शिवून घेण्याचेंहि दुकान असते. अगदीं थाटामाटाने मांडलेलें, व्यवस्थित नटविलेलें, सजविलेलें असतें. अशा दुकानांत आपले फाटके सॅण्डल्स (आणि तेहि इकडून नेलेले असले तर) बाहेर काढावयाचीहि लाज वाटते. परंतु पादत्राणाच्या किमती येथें इतक्या जबरदस्त आहेत कीं, मला हिंदुस्थानांतून नेलेली एक जोडी नीट करून घ्यावी, असा मोह उत्पन्न झाला. मीं आपल्या सॅण्डलस नीट बांधून नेल्या. फारशी दुरुस्ती करावयाची नव्हतीच; पण एक पट्टा शिवावयाचा होता व टाचेच्या खालीं थोडें झिजलें होतें तेथें कातडें मारावयाचें होतें. बस्स ! आमच्या हिंदुस्थानी अंदाजाप्रमाणें फारतर त्याचें ६ पेन्स व शिकस्त म्हणजे १ शिलिंग घ्यावा. परंतु तीन दिवसांनी मी ती जोडी परत आणावयास गेलें तों काचेच्या खिडकींत तिच्यावर ७ शिलिंग व ६ पेन्सचें झक्कपैकीं बिल लटकावून दिलेलें ! माझा विश्वासच बसेना. एवढासा पट्टा शिवण्याबद्दल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


आणि टीचभर कातड्याचे तुकडे मारण्याबद्दल रु. ४॥ म्हणजे काय ? ह्यानंतर मात्र बूटजोडी दुरुस्त करून घ्यावयाची नाही; असा कानाला खडा लावला. पोर्ट सैयदवरून येतांना इतक्या सुंदर सॅण्डल्स मला फक्त १२ रुपयांना मिळाल्या होत्या आणि इंग्लंडमध्यें नुसता पट्टा शिवायला रु. ४॥ पडले! सगळे उद्योग सोडून चांभाराचेंच दुकान थाटलें तर काय वाईट ? ह्या पट्टे शिवून, बकलें लावून घेण्याची मी इतकी धास्ती घेतली कीं, शेवटीं निघतांना एक जोडी फेकून दिली; पण दुरुस्त करून घेतली नाही.

ह्याच इंग्लंडमध्यें मी रु. ८५ ला एक हॅण्डबॅग खरेदी केली. खरं म्हणजे मूर्खपणा. मला वाटलें कीं, आतां येथे घेतली नाही तर वाटेंत इतर कोणत्या देशांत घेणार ? फ्रान्स, जर्मनींत तर कातड्याचे जिन्नस आणखी महाग ! नंतर मध्यपूर्वेतील देशांमध्यें सुबक गोष्टी कशा मिळणार ? हीच हॅण्डबॅग मीं घेतली आणि त्यांत माझे महत्त्वाचे कागदपत्र, बांगड्या, साखळी, घड्याळ, फाउन्टनपेन, कानांतील कुड्या व डूल, प्रवासी हुंड्या पासपोर्ट इत्यादि सर्व वस्तु ठेविल्या. ही माझी नेहमीचीच संवय होती. जें जें कांहीं महत्त्वाचें म्हणून होते तें तें मी जवळ बाळगीत असें. अशाच एका सभेला जाऊन ती आटोपल्यानंतर मी माझ्याच तंद्रींत घरीं येण्यासाठीं निघालें. छोटी पर्स होती. तींत थोडीफार मोड होती. ती पर्सच खिशांत टाकली व बोलतबोलत आम्ही बाहेर पडलों. चांगले पंधरा मिनिटें थांबल्यावर बस मिळाली. ती घेऊन मी घराच्या निम्म्या वाटेवर आलें आणि छातींत धस्स झालें! हातांत मोठी हॅण्डबॅग नाही! घड्याळांत रात्रीचे नऊ वाजलेले. मी सभेच्या जागीं परत जाईन म्हटलें तर तो हॉलहि बंद झालेला असणार. मला काय करावें सुचेना. मला ब्रह्मांड आठवलें. त्या हरवलेल्या हॅन्डबॅगमधील वस्तु पुन्हा पुन्हा आठवून मी बेचैन झालें ! काय करावें ? घरीं जाऊन ताबडतोब फोन केला तर हॉलवरील पहारेकरी बदललेला होता. त्याने दुसरा माणूस जेवून येईपर्यंत आपण कांही सांगू शकत नाही हा खुलासा केला. तो यावयाला अजून दीड तास होता. माझें जेवणांत, गप्पांत, वाचनांत कशा कशांत म्हणून लक्ष लागेना. सारखे डोळे भरून येत. माझ्या

बावळटपणाची, कसल्यातरी तंद्रींत नेहमी वसण्याच्या सवयीची मला इतकी चीड आली कीं, विचारावयाची सोय नाही. मी तो दीड तास नुसता घड्याळ निरखून काढला. पुन्हा फोन केला. त्या पहारेकऱ्याने आपण ती बॅग उचलून तेथील एका अधिकारी बाईच्या स्वाधीन केल्याचें सांगितलें तेव्हा फोनवरसुद्धां माझा गळा दाटून आला. "तुम्ही निश्चित असा, विश्रांती घ्या व सकाळीं ९ च्या सुमारास त्या बाई तुम्हाला भेटतील. त्यांच्याकडे येऊन आपली बॅग घेऊन चला" अशा प्रेमळ शब्दांनी दिलासा इंग्रज पहारेकऱ्याखेरीज कोण देणार? मी रात्रभर आनंदानेच जागी होतें. मला त्या पहारेकऱ्याचें कौतुक वाटलें; इंग्लिश लोकांचें वाटलें, इंग्लंड देशाबद्दल आपुलकी फार जवळची वाटू लागली. सकाळीं माझी बॅग जशीच्या तशी, आंतील एकूण एक वस्तूंसकट, अगदी होती तशी परत मिळाली! माझा पासपोर्ट आंत असल्यानें ही माझी आहे कीं नाही, हा प्रश्नच उद्भवला नाही. त्या बाईने मला हॅन्डबॅग तर दिलीच; पण त्याचबरोबर एका परदेशीय स्त्रीला, "आमच्या इंग्लंडमध्ये हरवलेली वस्तु सहसा नाहीशी होत नाही" ही गोष्ट अशा अभिमानाने सांगितली कीं, मला माझ्या बावळटपणाची फारच खंत वाटली! आमच्या लुच्च्या देशांत आमचें कसें होणार? इकडे आपलें ठीक आहे. तेथे काय झालें असतें असा विचार चाटून गेला.

ह्या अनुभवाने तरी मी शहाणी व्हावें ना? पण छे, तसं झालं तर मग आमचं तें वैशिष्ट्यच काय? पुन्हा एकदा मी कोटाच्या खिशांत टाकावयाची छोटी पर्स, घरून कॉलेजला जातांना वेंधळ्यासारखी पाडलीच. कोठे पडली ईश्वर जाणे! स्टेशनांत पडली, कीं रस्त्यांत कीं कॉलेजांत? मला कांही आठवेना; पण आठवून आठवून मी चॉकोलेटसाठी एक नाणें टाकलें तेथपर्यंत माझी स्मृति खेंचीत आणली. त्यानंतर मात्र कांही आठवेना. तेव्हा तेथेच कोठे तरी ती पर्स पडली असावी, अशा अंदाजाने रेल्वेच्या लॉस्ट प्रॉपर्टी ऑफिसला मीं कळविलें. पर्समध्ये माझा रेल्वेचा पास, पांच पौंड ह्या महत्त्वाच्या गोष्टी व बाकी चिल्लर होती. ह्यावेळेस माझी पर्स मिळणार, ह्याबद्दल मला मागच्या अनुभवामुळे बरीचशी आशा होती. शिवाय मागच्या वेळेप्रमाणें माझें सर्वस्व त्यांत नव्हतें. त्यामुळे मी जरा निर्धास्त होतें. तरीहि रोज जाण्यायेण्याचा खर्च मला

करावा लागणार होता. दोन दिवसांत मी लॉस्ट प्रॉपर्टी ऑफिसमध्ये सकाळ-संध्याकाळ चकरा घातल्या; पण कांही नाही. मीं आता आशा सोडली व पुन्हा दोन दिवसांनी मला वाटलें कीं, पहावें तर खरें एकदा जाऊन! म्हणून परत गेलें तों मला माझा नंबर पाहून थांबावयाला सांगण्यांत आलें. जरा वेळाने एका कागदाच्या पिशवीत माझी पर्स बांधलेली, त्यावर एक चिठ्ठी, त्यांत किती पैसे सापडले व सीझन तिकिटचा नंबर इत्यादि तपशील लिहिलेला. पाकीट दाखवून माझ्याकडून तेंच माझें असल्याबद्दल खातरजमा करून घेण्यांत आली व पैसे व सीझन तिकिट परत देण्यांत आलें. मी इतके दिवस काढीत आलेल्या तिकिटांचे नंबर लिहून ठेविलेले होते ते त्या सीझन तिकिटाबरोबर दाखविले तर माझे तिकिटाचे सर्व पैसे रेल्वे मला परत देणार होती आणि ह्या माझ्या अजागळपणाबद्दल रेल्वेच्या लॉस्ट प्रॉपर्टी खात्याला जें काम पडलें होतें त्याबद्दल मला पांच शिलिंग बिल आलें होतें. मी खुषीने पांच शिलिंग दिले व बाकीचे पैसे व पाकीट घेऊन इंग्लिश लोकांना प्रामाणिकपणाबद्दल धन्यवाद देत घरीं गेलें. हिंदुस्थानांत छत्री गेली तर पुन्हां नजरेला पडत नाही, सायकल गेली तर गेलीच! रोख पैशा-बद्दल बोलावयालाच नको, अशी अवस्था आहे. तेव्हा इंग्लंडमधील लोकांच्या प्रामाणिकपणाबद्दल जितकें लिहावें तितकें थोडेंच. वावळट लोकांचें इंग्रजांच्या राज्यांत निभावून जाईल; पण आमच्या देशांत बेरक्या लोकांचीहि चोरट्या भुरट्यांशीं धडगत नाही. इंग्रज लोक कोणाचें पडलेलेंहि फुकट घेणार नाहीत आणि शोधून परत दिल्याचे श्रमहि फुकट करणार नाहीत.

दोन वेळेला अशी अद्दल घडली तरी मला पुरली नाही. एकदा मी अशीच इंडिया ऑफिसमध्ये जाऊन कांही काम करून आलें. त्या दिवशीं खास शाकाहारी जेवण घ्यावें, असा विचार करून मी तशा एका हॉटेलमध्ये गेलें. तेथे ऑर्डर वगैरे देऊन कांही वाचीत होतें तेवढ्यांत आणखी दोन भारतीय लोक माझ्या शेजारींच येऊन बसले. मी एकटीच असल्याने साह-जिकच त्या मुलीने कोण कोठली, चौकशी केली. तीहि मुंबईचीच होती. मग आमच्या गप्पांना किती रंग आला असेल कल्पनाच करा. मी अगोदर तेथे गेलेली असल्याने माझें जेवण त्या दोघांच्या अगोदर झालें व त्यांचीं ताटें येईपर्यंत माझें जवळ जवळ झालें होतें. त्यानंतर माझें बिल देण्या-

साठी मी कोटाच्या खिशांत हात घातला; पण माझें छोटें पाकीट तेथे होतेंच कोठे? माझ्या छातीत धस्स झालें. खुशाल जेवण वगैरे करून मी ऐटींत जाण्यासाठी निघालें अन् बिलाचे पैसे देण्यासाठी पैसेच नाहीत? माझें पुन्हा पुन्हा हॅण्डबॅग उघडून बघणें व कोटाचे खिसे तपासणें, ह्यावरून त्या दोघांना माझी तारांबळ कशाबद्दल आहे हें समजलें असावें. माझ्याकडे प्रवासी हुंड्या (Travellers' chaques) होत्या; पण मला त्या इंग्लंड-मध्ये मोडावयाच्या नव्हत्या. बँकेंत चेक देऊन पैसे घ्यावेत तर वेळ संपून गेली होती. वास्तविक इंग्लंडमध्ये एक सोय चांगली आहे कीं, एका बँकेंत खातें असेल तर तिच्या कोणत्याहि आणि कोठल्याहि शाखेंत आपण पैसे भरूं शकतों वा काढूं शकतों; परंतु बँका बंद झाल्या होत्या! तेव्हा आता तो प्रश्नच नव्हता. माझ्या छोट्या पर्समध्ये पैसे होते आणखी माझा पास होता. मी आठवूं लागलें तों ऑल्डविच्च्या ऑफिसमध्ये मी कांही तिकिटें व पाकिटें खरेदी केलीं होतीं व तेथेच एका टेबलावर पत्र लिहून तेथल्याच पेटींत टाकलें व तडक हॉटेलमध्ये आलें, इतकें मला आठवलें. मी पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन येतें तोंपर्यंत माझ्या जिनसांवर लक्ष ठेवा, असें त्या मुलीला सांगून मी पोस्ट ऑफिसमध्ये गेलें. मला आशा होती कीं तें पाकीट एखाद्या भल्या गृहस्थाने पोस्ट मास्तरजवळ दिलें असेल. मग मला खाणाखुणा विचारून तो तें परत देईल; पण छे! तेथे कोणीच तें पाहिल्याचें सांगेना! तेव्हा निराश होऊन मी परत हॉटेलमध्ये आलें. हॉटेलमध्ये येतांना माझ्या मनांत हज्जारदां विचार आला असेल—बरा कीं वाईट, खरा कीं खोटा कोण जाणें—पण मला आपलें वाटे कीं, ह्या ऑल्डविच्च्या भागांत जर एतद्देशीय लोकांची आहे तितकी वहिवाट नसती, थोडक्यांत हा भाग जर मुख्यत्वेंकरून ब्रिटिश लोकांच्या वर्दळीचा असता तर तें पाकीट खात्रीनें चोरीस जातें ना? ऑल्डविच्च्या पोस्ट ऑफिसांत मी कितीतरी इतर देशीय लोक बघितले होते. तसे नेहमीच असत. त्यामुळे तेथे हरवलेलें पाकिट न सापडणें व इंग्लिश लोकांकडून दोनदा तें परत मिळाल्याचा ताजा अनुभव ह्यांची सांगड घालतांना माझी तशी समजूत झाली तर काय नवल? असो. मी हॉटेलमध्ये परत आलें तों त्या मुलीचें व तिच्या मित्राचें जेवण आटोपलेंच होतें. मी तिला सर्व हकीगत

सांगताच तिने मला एक पौंड विनासंशय, बिनतक्रार दिला व माझ्या मनावर, तेवढयाच त्या ओळखीवर कायमचें शिक्कामोर्तब करून ती निघून गेली. तिचा पत्ता मी टिपून घेतला होता. त्या पत्त्यावर मी दुसऱ्या दिवशीं आठवणीने पैसे पाठवून दिले. तेवढेहि जर माझ्या हातून झालें नसतें तर माझ्याइतकी कृतघ्न मीच. मला त्यावेळीं तिने दिलेला तो पौंड माझ्या दृष्टीने पन्नास पौंडांच्या ठिकाणीं होता. परक्या देशांत पंधरा मिनिटेंहि पैशाविना काढणें किती मुष्किल असतें हें मला त्या दिवशीं पटलें.

इंग्लंडमध्ये दुसरी एक विशेष गोष्ट जाणवली. ती म्हणजे ही कीं, मजुरीचे दर वयोमानाप्रमाणें ठरविलेले असतात. वयाच्या १५ वर्षांपर्यंत आठवड्याला ३ पौंडस्, नंतर २५ वर्षांपर्यंत ५ पौंडस् आणि नंतर ८ पौंडस् कमींत कमी वेतन दिलेंच पाहिजे, असा नियम कित्येक ठिकाणीं आहे. विशेषत: इंग्रज कामगारांच्या बाबतींत तो कांटेकोरपणें पाळतातच, असें मला कळलें. माणसाची मिळविण्याची ताकत वाढो न वाढो; पण मनासारखें जगावयाचें असेल तर त्याच्या गरजा वाढत्या वयाबरोबर निश्चितपणें वाढलेल्या असतात. त्यांतून विवाहित असेल तर खात्रीनेंच जास्त वेतन देणें, हें मालकाचें कर्तव्य आहे, अशा भूमिकेवरून ह्या वेतन-मर्यादेच्या तत्त्वाकडे पाहिलें म्हणजे त्यांत बरेंच तथ्य आहेसें वाटतें. जरुरीइतके पैसे इंग्लंडमध्ये मिळतात. तेथें काम करून पोट भरणाऱ्यांना महागाई भासत नाही, ह्याचें मुख्य कारण वेतनश्रेणीचें वर सांगितलेलें तत्त्व हेंच होय.

कोणत्या ना कोणत्या कारणाने कांही ना कांही प्रसंगाने इंग्लंडमध्ये आपण असेंच रहात जावें; म्हणजे रहाणें घडत जावें, असें मला वाटूं लागलें; पण राणी एलिझाबेथ फ्रान्सला जाणार, हें वृत्त वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्यापासून तिच्या स्वागतासाठी पॅरिसला कसकशी तयारी चालू आहे, वगैरे वगैरे वर्णनें खुलवून खुलवून वर्तमानपत्रांत येऊं लागलीं होतीं आणि आपण केव्हांतरी जाणारच; तर राणी तेथें असतांना तरी जावें; म्हणजे जास्त गंमत पहातां येईल, असा विचार करून मी परतीचें तिकिट झटपट मिळेल तर बरें, असा प्रयत्न करूं लागलें. प्रश्न होता मला नऊ देशांमधून प्रवासाची परवानगी (Visa) मिळविण्याची. ही जबाबदारी प्रवासी एजंटावर न सोपवितां मीच घेतली. दोन दिवसांत परराष्ट्र कचेऱ्यांचीं ऑफिसें पालथीं

घालून जरूर ते परवाने (Visa) मिळविले. एक सीरिया देश सोडून सगळे परवाने मला मिळाले होते. सीरियन कौन्सलचें लंडनमधील ऑफिस मध्यपूर्वेतील पेटत्या राजकारणामुळे बंद करण्यांत आलें होतें. तेव्हा तो प्रवास-परवाना मीं तुर्कस्थानांत घ्यावा किंवा मग मला दोन्ही देशांच्या सीमेवरहि मिळूं शकेल, असें मला प्रवास-एजंटांनी सुचविलें होतें. मीं जाण्याचा दिवस २ एप्रिल हा ठरविला होता व त्या अंदाजाने पुढील देशांतील वास्तव्याचा कार्यक्रम आखून ठेविला होता; परंतु २ एप्रिलला मी निघूं शकलें नाही. माझ्या लंडन ते मुंबई ह्या प्रवासाचें भाडें हिंदुस्थानांतील चलनी रुपयांत भरावयाचें, असें आमचें ठरलें होतें. जास्त वटाव मिळण्यासाठी मीं रिझर्व बँकेला लिहून प्रयत्न केला होता; परंतु मला पाहिजे तितके पौंडस् न मिळतां फक्त २५ पौंडस् मिळण्याची व्यवस्था झाली. अर्थात् रुपयांत तिकिट काढणें माझ्या दृष्टीने सोयीचें होतें. हिंदुस्थानांतून हा सर्व कार्यक्रम ठरल्याप्रमाणें निश्चित झाल्याच्या तारेची वाट मी पहात होतें. एकदाची ती मी वाट पहात असलेली तार तारीख ५ ला आली व मी ९ एप्रिलला लंडन, इंग्लंड सोडून निघण्याचें ठरविलें. मुंबई सोडल्यापासून बरोबर सात महिन्यांनी मी आता इंग्लंड सोडणार होतें. मि. ऑडी, मि. ओल्गा, मि. नान्सी, मी आणि माझ्या अनेक मैत्रिणी निरवानिरव केल्याप्रमाणें बोलत होतों. इंग्लंडमधील शेवटचे कार्यक्रम आखीत होतों. पुन्हा या मुली मला भेटणार नाहीत, पुन्हा येथील कांही पहातां येणार नाही, ही आलेली संधि संपली आहे, अशा भावनेने मी क्षणाची विश्रांति न घेतां उद्योग करीत होतें, इकडे तिकडे जात होतें.

मी जाणार, म्हणून मला जेवणाचीं आमंत्रणें सुरू झालीं होतीं. भेटी देणें-घेणें सरावाचें होत चाललें होतें. चालला दिवस तत्परतेने मी टिपून घेत होतें. माझें सामान-सुमान बांधून-भरून मार्गाला लागलें सुद्धा. आता फक्त एक छोटी बॅग व मी एवढेंच बाकी राहिलों होतों. आता मी इंग्लंड नक्कीच सोडणार---नव्हे मला हिंदुस्थानांत जाण्याकरितां निघणें जरुरीचें आहे---या विचाराने मला रडूं येई. मला कोणाचा निरोप घेणें म्हणजे संकट वाटे, मला रडूं आवरत नसे. कदाचित् हें वाचून बऱ्याच परदेशगमन करून आलेल्या लोकांना आश्चर्य वाटेल; पण मी इंग्लंडच्या वातावरणांत

इतकी सुखावलें होतें, रुळलें होतें कीं, मला माझ्या मैत्रिणींना सोडून येतांना खरेखुरें वाईट वाटलें. खरेदीची धडपड तुटपुंज्या पैशामुळे बरीचशी थांबली होती. तरी मधून मधून मला हुक्की येत असे. नानांसाठी एक सुरेख टाइपरायटर व माझ्यासाठी सिंगरचें मशिन घेण्याचें माझ्या मनांत घोळत होतें.

मीं टाइपरायटर घेतला ती घटना गंमतीची. मी रेमिंग्टनचा पोर्टेबल टाइपरायटर पहात होतें. किंमती भरमसाट; पण मला नवाच घ्यावयाचा होता आणि जुन्याच्या किंमतींत मिळावा ही अपेक्षा होती. बरींच दुकानें पाहिलीं. ठिकठिकाणचीं मशिन्स मीं पाहिलीं, पण माझ्याजवळील पैशांत नवा टाइपरायटर बसेना; पण एका दुकानदाराने मात्र एका युगोस्लोव्हियन मुलीचा फोन नंबर दिला. त्या मुलीने "सेक्रेटरीशिप"चा कोर्स पुरा केल्यावर आपल्या देशांत आपल्या उपयोगीं पडेल म्हणून मला पाहिजे होता तसलाच पोर्टेबल टाइपरायटर खरेदी केला होता. तिन तो घेऊन मायदेशीं जाण्याचें ठरविलें; परंतु युगोस्लोव्हाकियाच्या कस्टम्सच्या नियमाप्रमाणे त्या टाइपरायटरच्या किंमतीइतकी जकात त्यावर बसणार होती. म्हणून ती मुलगी तो विकण्याच्या विचारांत होती. मीं फोन करून भेटीची वेळ मुक्रर केली व ग्लौस्टर रोड स्टेशनवर भेटण्याचें ठरविलें. मुद्दा होता तो आम्ही एकमेकींना ओळखावें कसें ? तेव्हां तिने हातांत तांबडें फूल धरून स्टेशनाबाहेर उभें रहावें व मी निळचा रंगाची साडी नेसून तेथे जावें असें ठरलें. मला ओळखणें तिला फारसें कठिण नव्हतेंच. कारण साडीवाल्या मुली आणखी कोठून असणार ? तिला मात्र मी तिच्या हातांतील तांबडया फुलामुळेच ओळखूं शकलें. तिला घेऊन मी हॉटेलमध्ये गेलें. तिच्याकडे बिल वगैरे होतेंच. तिला टाइपरायटर विकणें भाग होतें. मी घ्यायला उत्सुक होतें. मी माझ्या बजेटपेक्षां जरा जास्त किंमतीवर सौदा पक्का करून घरीं आलें. नवा टाइपरायटर जवळ जवळ निम्म्या किंमतींत आणि वर जुना (Second hand) असा शिक्का कस्टम्ससाठी मारून मला आणतां आला !

मी अशाच चमत्कारिक गोष्टी विकत घेण्यासाठी कुठे कुठे हिंडत असें. तेव्हा एका दुकानदाराने "तुमच्याकडे हिंदुस्थानांत तयार झालेले व हिंदी पद्धतीचें जडजवाहीर विकावयाचे असेल तर मी घेईन." असें केव्हा

तरी एकदा मला सांगितलें होतें. माझ्या अंगावरचे दागिने पाहून त्याने तसें विचारावें म्हणून त्याचा मला त्याचा राग आला होता. पण, "तुमच्याकडे विकाऊ नसतील तर तुमच्या ओळखीपैकी कोणाचे असतील तर त्यांना सांगा. आमच्या इकडे पूर्वेकडील देशांत तयार झालेल्या जडजवाहिरांच्या दागिन्यांना चांगलाच भाव आहे," असें त्याने आर्जवून सांगताच, "पुढे पाहूं," असे म्हणून मी बाहेर सटकलें. तरीहि अंदाज म्हणून माझ्या चार मोत्यांच्या बांगडयांना तो किती पैसे देईल, हें विचारून ठेविलेच. सिंगरचें शिवण्याचें मशिन घेण्याच्या वेळीं ह्या बांगडयांचा उपयोग झाला. एकतर माझी परत फिरण्याची वेळ आली होती. हिंदुस्थानांत आल्यानंतर असल्या दागिन्यांना तोटा नव्हता; म्हणजे दुर्मिळपणा नव्हता. मला शिवण्याचें यंत्र घ्यावयाचेंच होते. शिवाय मी इतक्या देशांतून फिरणार होतें कीं, जास्तींत जास्त पैसे माझ्या हातीं राहतील तितकें बरें असें मला वाटणें साहजिकच होते. जास्तींत जास्त देश पाहणें व जमेल तेवढी खरेदी करणें हें माझें धोरण होतें. बांगडयांच्या बदल्यांत शिवणाच्या यंत्राच्या दोन-तृतीयांश किंमत परस्पर भागली व हा सौदा मला फार फायदेशीर वाटला.

हिंदुस्थानांत जाण्याचे वेध मला लागले होते, तसतशी इंग्लंडमध्ये अधिक काल राहण्याची इच्छा तीव्र होत होती. "ह्या गोठल्या हवेला कां चांगले म्हणूं मीं ?" हा विचार जुना होऊन मला इकडची हवा आवडूं लागली होती. लंडनमध्ये पाय ठेवतांना मुंबईपेक्षा फारसें निराळें मला वाटलें नव्हतें आणि आतां लंडनशीं तुलना करतां मुंबई तर काय आहे, कांहीच नाही अशी भावना बळावूं लागली होती. थोडक्यांत म्हणजे परतण्याचें माझ्या जिवावर आलें होतें. पण परीक्षेला बसण्याची तयारी असो वा नसो, ती परीक्षेचा दिवस येतोच; त्याप्रमाणें माझ्या निघण्याचा दिवस जवळ जवळ येत होता. ४ मे ह्या माझ्या लग्नाच्या वाढदिवशीं मी हिंदुस्थानांत पोहोंचेन अशा बेताने मीं निघण्याचा दिवस ठरविला; परंतु मी ठरविलेल्या गोष्टी मी ठरविल्या तशा झाल्या--घडल्या असत्या तर मग वैशिष्टय तें काय राहिलें ? मी ४ मेला हिंदुस्थानांत नाहीच येऊं शकलें. जातांना अनपेक्षितपणें घडल्या अशाच घटना माझ्या परत येण्याच्या प्रवासांत घडावयाच्या होत्या, हें मला कसें ठाऊक असणार ?

१

# पॅरिस कीं इंद्रनगरी

लंडनला स्टेशनवर पोहोंचवायला माझ्या तीन मैत्रिणी आल्या होत्या. नान्सी, रोझ आणि ऑड्री. खरं म्हणजे मी जाणार म्हणून मला तर अवघड वाटतच होतें; परंतु पंधरा दिवस प्रत्येकाचा टेलिफोन, जेवणाचीं आमंत्रणें, सिनेमाला जाणें, वस्तूंची भेट आणि अदलाबदल ह्या निरोप घेतांना अपरिहार्य अशा गोष्टी करतांना किती तरी वेळां माझे डोळे ओलावले होते. डॅडींनी स्वतःच्या हातांनी फुलें रंगवून केलेली एक छोटी शाल मला आठवण म्हणून दिली. ममीने एक सुंदर स्वेटर दिला. " रडू नको, नीट जा. एकटी आहेस, सांभाळून रहा, " असें सांगतांना ममीच किती तरी रडत होती ! मला खरेदी करावयाची होती, त्यासाठी प्रत्येकजण आस्थेने माझ्याबरोबर येण्याची तयारी दाखवी. होस्टेलमध्ये सगळ्या मुली मी घरीं जाणार म्हणून जातां-येतां माझी चौकशी करीत. ' परत आपण भेटूं न भेटूं ' ही कल्पना इतकी प्रभावी आहे कीं, माणूस नकळत उदार होतो, सढळ हातांनी खर्च करूं लागतो, दुसऱ्यासाठी आपोआप मृदु बनतो. गाडी सुटतांना निरोप घेणें अवघड वाटेल म्हणून नान्सी व रोझ अगोदरच डोळे पुशीत बाहेर पडल्या, ऑड्री मला धरून शेवटपर्यंत उभी होती. गाडी हालतांच तिने मला मिठी मारली. आम्ही

नकळत भरल्या डोळ्यांनी एकमेकींच्या डाव्या गालाचें चुंबन घेऊन दूर झालों आणि याच क्षणीं कायमच्या जवळ आलों म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाही. दुरून हात उंच करून रुमाल हालवीत गाडीकडे पाहणारी ऑड्री अजून माझ्या नजरेसमोर आहे. देणग्यांच्या ओझ्यापेक्षां हें प्रेमाचें हलकें ओझें दूर सारणें भारी भारी अवघड आहे; परंतु ह्या ओझ्याच्या दबावाने माणूस दमत नाही, त्याला उमेद येते, जोर येतो !

इंग्लंडमधील माझ्या पुऱ्या सात महिन्यांच्या वास्तव्यांत मी किती पाहिलें होतें, किती मोकळें जीवन जगलें होतें, वाचलें होतें, हिंडलें होतें, वागडलें होतें ! किती जणांशीं माझा परिचय झाला होता ! कधी कोणाची आयुष्यांत तोंड-ओळख नाही, अशा कितीएक जणांची माया लावून घेतली होती ! मनांत असेल तर काय काय होऊं शकतें; पण माणूस कधी मनावरच घेत नाही. माणसें जोडणें हें खरं म्हणजे फारसें अवघड नाही ! पण हें उमगायलाच वेळ लागतो, अनुभव लागतो, प्रसंग यावा लागतो.

इंग्लंड सोडून मी निघालें खरी; पण अजून मन मागेंच रेंगाळत होतें. आगगाडींतून फोक्सटनला जाऊन खाडी ओलांडून कॅलेला जावयाचें आणि थेट पॅरिस. गाडींतून बाहेर पहातें तों सकाळचे नऊ वाजून गेले तरी उन्हाचा पत्ताच नव्हता. सकाळींच आगाखान वारल्याची बातमी वाचली होती; तशांत हवा इतकी गोठलेली, धुकटलेली आणि त्यांतून लंडनवर सदाचेंच धुरकट आवरण ! मला अगदीच चमत्कारिक वाटत होतें. ढगांच्या मातकट रंगामुळे वातावरण गढूळ वाटत होतें. तरीहि मीं पुन्हा पुन्हा दूरवर नजर टाकून लंडनचें शेवटचें दर्शन घेत होतें – डोळ्यांच्या कोरी त्या धुरकट काजळाने भरीत होते. बोटींत बसून इंग्लंडचा किनारा सोडला आणि पाऊस पडायला सुरवात झाली. दूरवर दिसणारें इंग्लंड पेंगुळलेल्या स्थितींतच पडलें होतें. जणूं आम्ही बोटींत बसून चाललों, ह्याचा त्याला पत्ताच नाही. लंडन नगरीचें शेवटचें दर्शन वसंतसेना जलधारांनी भिजल्यासारखी दिसावी तसेंच झालें. धुक्याच्या शालींत समुद्राच्या लाटा कुशींत घेऊन लुकलुकणाऱ्या दिव्यांचा शालू पेहरून निजलेली लंडन नगरी आता लांबून अगदी छान दिसत होती. इंग्लंडला येतांना "तें बघा, तें बघा," करून पाहिलेल्या ( White cliffs' of dover) ना

वळसा घालून आमची बोट सपाटयाने कॅलेच्या दिशेने जात होती. ह्या वेळेपर्यंत पाऊस इतका जोरांत पडूं लागला होता कीं, माझ्याखेरीज आणखी कोणी क्वचितच डेकवर असावें! मीहि कांही कालानंतर आंत गेलें.

पॅरिसचें जें ओझरतें दर्शन आठ महिन्यापूर्वी घडलें होतें त्यावरून कांही फारशी उत्सुकता मला वाटत नव्हती; पण वाचलें होतें तें आणि पाहिलें होतें यांचा मेळ कसा घालावा, ह्याचा मी मनांत विचार करीत होतें. कॅलेला पोचून पॅरिसच्या गाडींत बसून निघालें तरी डोक्यांत विचार मात्र लंडनचेच! रात्रीं ८ वाजतां आमची गाडी पॅरिसला आली. मी पॅरिसमध्ये राहणार होतें ती जागा पॅरिसच्या रेल्वे-स्टेशनपासून सात-आठ स्टेशनें लांब उपनगरांत होती. पॅरिसलाहि लंडन-मुंबईसारखीं उपनगरें आहेतच. तेव्हा मला लोकल टयूब गाडींत बसून व्हिक्टरह्यूगो ह्या स्टेशनवर जाणें जरुरीचें आहे, अशी माहिती गाड़ींतील एका फ्रेंच शाळकरी मुलाने दिली. पॅरिसमध्ये या वेळेस मी एकटीच होतें. बरोबर किरण नव्हती; पण तिचे चोर, लुच्चे हे शब्द माझ्या मनावर इतके बिंबले होते की, त्या मुलालाच कांहीतरी गोडगोड बोलून आपल्या बरोबर न्यावें, असा मीं विचार केला. सुदैवाने त्या मुलाला माझ्या रहाण्याच्या ठिकाणापासून फारसें दूर जावयाचें नव्हतें. त्यामुळे तो माझ्याबरोबर येण्यास तयार झाला. आम्ही टयूबमध्ये बसलों आणि ह्यूगो स्टेशनवर दाखल झालों. पॅरिसच्या टयूबमध्ये फ्रेंच जनता-समुद्राचें प्रथम दर्शन मला घडलें. कलकलाट, मोठ्याने बोलणें, ढिलाईने म्हणा किंवा प्रशस्तपणाने म्हणा वावरणें, ह्या गोष्टींची माझी संवय पार बुजून गेली होती. त्यामुळे पॅरिसच्या त्या बदलत्या वातावरणाचा ढंग मला फारच अनपेक्षित वाटला. टयूबमध्येंहि बसायच्या जागा कमी व उभ्यानेच जाणारे लोक जास्त--म्हणजे इंग्लंडमधल्यापेक्षां कितीतरी विरुद्ध!! एक मात्र टयूबची गंमत की, कोणत्याहि स्टेशनवर जावयाचें तरी एकाच दराचें तिकिट, बदललेले दर नाहीत. एकदां तिकिट काढलं की, कोठेहि बसावयाचे व कोठेहि उतरावयाचे. फक्त बाहेर पडलें की, तिकिट खलास. प्लॅटफॉर्मवरहि सोय अशी की, गाडी स्टेशनांत येऊन दारें उघडलीं म्हणजेच प्लॅटफॉर्मवरचे दरवाजे लोकांना आंत शिरण्यासाठी किंवा बाहेर जाण्यासाठी उघडावयाचे. गाडी निघून गेली की, त्या फाटकांपलीकडे

लोकांना थांबणें भाग पडे ! बाकी गाड्यांचे डबे वगैरे आपल्या इकडल्या सारखे. लंडनच्या ट्यूबची त्यांना सर नाही. असो. आम्ही दोघेजण व्हिक्टर ह्यूगो स्टेशनवर उतरलों. त्याचे बोजे त्याच्या पाठीवर व माझे माझ्या हातांत अशा आमच्या स्वाऱ्या निघाल्या. आपलीं ओझीं आपणच वाहून नेण्याची सवय मला आतां करावयालाच पाहिजे होती. कारण हमाल वगैरे करण्याची युरोपखंडामध्ये सोय नाही. डाव्या-उजव्या हातांत बॅग बदलीत बदलीत, खांद्यांना झोके देत आम्ही मीं बरोबर आणलेल्या पत्त्यावर येऊन पोहोंचलों. बाहेरून एक सरळसोट बिनखिडक्यांची भिंत व तिला एकुलतें एक बंद दार आणि त्या भिंतीपलीकडे पंधरा-वीस हातांवर दुमजली मोठीशी पण भीति वाटण्याइतकी शांत शांत इमारत दिसत होती. आम्ही धीर करून घंटा दाबली. बऱ्याच वेळाने दुरून टकटक आवाज येऊन दार उघडलें गेलें. एक वृद्धा दरवाजांत उभी होती. तिने आमच्याकडे बघितलें; पण "आंत या" असें म्हटलें नाही. मी तिच्याशी बोलूच शकत नव्हतें; कारण मला तिची भाषाच येत नव्हती. माझ्या बरोबरच्या मुलाने तिला फ्रेंचमधून मला काय म्हणावयाचें होतें तें सांगितलें. ती आम्हाला तेथेच; पण जरा आंतल्या बाजूस उभे करून त्या इमारतीच्या आंत गेली. मला त्या होस्टेलच्या मुख्य व्यवस्थापिकेला भेटावयाचें होतें. तिला ही बाई जाऊन मी आल्याची वर्दी कळविणार होती. ती गेली आणि मी तशा त्या काळोखांत भोवतालच्या आवाराचा अंदाज घेतला. खड्यांची वाळू घातलेल्या अंगणांत दूरवर छोटा बगीचा व दोनचार पुतळे दिसत होते. उजव्या हाताला कांही बैठ्या इमारती होत्या व डाव्या हाताला पाचपन्नास यार्डांवर एक इमारत दिसत होती. त्याला लागूनच ती बाहेरून दिसणारी दुमजली इमारत होती. आता कोठे त्या ठिकाणी कांही वस्ती असावी असें वाटत होतें. इतका वेळ शुकशुकाट होता तेथे जाग आल्यासारखी वाटत होती. मला एक पांचच मिनिटांत ती आंत घेऊन जाण्यासाठी परत आली. मी त्या मुलाचे आभार मानले व त्या बाईबरोबर आंत गेलें. माझी विचारपूस अगदी अगत्याने झाली व दुभाषी म्हणून एका खास बाईला पाचारण करण्यांत आलें. तिच्या मध्यस्थीने मीं सर्व सांगितलें, विचारून घेतले व मला ताबडतोब जेवणाच्या हॉलमध्ये घेऊन जाऊन जेवणाच्या पंगतींत

सामील होण्याविषयीं सूचना मिळाली. मला थकवा तर आलाच होता; पण भूकहि लागली होतीच. मी माझ्या छोटचा खोलींत सामान पाठवून जेवणघरांत जातांना एका बाकावर बाहेर एक छोटचाशा चणीची वामनमूर्ति मुलगी बसलेली मला आढळली. तीहि लंडनहून आली होती व तिलाहि पॅरिस बघून परत जर्मनीला जावयाचें होते. तिलाहि एका चौघींच्या खोलींत जागा मिळाली व आमची दोघींची गट्टी झाली. आम्हांला दोघींना मिळून पॅरिस बघणें सोपें जाणार होतें हें तर खरेंच; पण तिला फ्रेंच व इंग्लिश दोनहि भाषा येत असल्याने मला फार आनंद झाला. ह्या मुलीचें नांव "छा!" खरं म्हणजे तिच्या नांवाचा मला बरोबर उच्चार शेवटपर्यंत करतां आला नाही. तिचें सोपे नांव "छा" हें तिने मला सांगितलें व मी त्याच नांवाने तिला अजूनहि संबोधतें. "नान" म्हणजे पाव आणि लेट म्हणजे दूध येथपासून तिने मला फ्रेंच शब्दांशीं ओळख करून द्यावयाला सुरवात केली. फ्रेंच, जर्मन आणि इंग्लिश अशा तिन्ही भाषांमध्ये वेळ पडेल त्याप्रमाणें बोलून ती आम्हांला काय पाहिजे तें मिळवून घेऊं शकत असे. जेवणघरांत आम्हीं प्रवेश करतांच आमच्या भोवती मुलींचा गराडा पडे. माझ्या साडीमुळे माझ्या भोवती जास्त मोठें कडें असे. नव्या मुलींच्या जुन्याच प्रश्नांना झाली पुन्हां सुरवात. फ्रेंच मुली मात्र बऱ्याच भाबडचा वाटल्या. स्पॅनिश मुलींचा उथळपणा किंवा इंग्लिश मुलींचा भारदस्तपणा त्यांच्यांत नसला तरी स्वप्नाळू डोळचांच्या भावनावश फ्रेंच मुलींना स्वतःचें असें व्यक्तिमत्त्व तर खासच आहे. जेवणाचा थाट घरगुती; पण अन्न उत्तम प्रकारचें. इंग्लिश लोकांना खाण्याच्या बाबतींत कांहीच कळत नाही असं इटालियन आणि फ्रेंच लोकांनी म्हणावं, इतकी तफावत त्यांच्या जेवणावरून सहज समजून येते. दूध, लोणी, ताजी ब्रेड (Non), भरपूर भाज्या व मोठा कप भरून कॉफी अशा जेवणावरून उठतांना साहजिकच मला इंग्लंडला इतके दिवस खाल्लेल्या सवयीच्या बेचव अन्नाची आठवण झालीच. जेवण होऊन आम्ही आमच्या खोल्यांतून गेलों. मला खास गरम पाण्याची सोय होती; पण बाकीच्या मुलींना गार पाणीच वापरावयाचें होतें. मीं पहिल्याने पिशव्या भरून घेतल्या व बिछान्यांत नेऊन ठेविल्या.

मला रात्रीं आंघोळ करण्याची संवय झालेली आणि येथे गरम पाण्याची वानवा. मला 'खास' म्हणून दिलेल्या गरम पाण्यांत आंघोळ होणें शक्यच नव्हतें. थंडी तर इतकी जबरदस्त होती की, जेमतेम स्पंजिग केलें तरी पुष्कळ ! होतें नव्हतें तें पाणी स्पंजिग संपल्यावर तोंड गार पाण्याने धुणें प्राप्तच होतें. पॅरिसच्या पहिल्या रात्रीं मी ज्या गार पाण्यानें तोंड धुतलें तसलें पाणी मला वाटतें फक्त ध्रुवप्रदेशांतच असूं शकेल. तोंडावर पाणी मारलें मात्र आणि सगळ्या शिरा तरारून उठल्या ! माझा रंग बदलून तेवढ्यांत चेहेरा काळानिळा पडला असणार व "सावळाराम" झाला असणार म्हणून मीं आरशांत पाहिलें. इतकें गारेगार पाणी आयुष्यांत पहिल्यानेच माझ्या चेहऱ्याला लागलें होतें.

सकाळीं उठून कोठे कोठे जावयाचें, ह्यासंबंधीं माझे व "छा"चे बेत सुरू झाले. ती माझ्यापेक्षा जास्त जागरूक दिसली. तिने कितीतरी नकाशे आणि माहितीपत्रकें जमविलेलीं होतीं. आम्ही आयफेल टॉवरच्याच जवळपास रहात होतों. म्हणून उठल्याबरोबर पहिल्याने तोच पाहून घ्यावयाचा, असें ठरवून आम्ही झोपीं गेलों.

सकाळीं उठून नास्ता घेऊन आम्ही दोघी हातांत नकाशे व छोटया माहितीपत्रकांच्या चोपड्या घेऊन पॅरिस पहावयाला बाहेर पडलों. सातआठ मिनिटांतच आयफेल टॉवरजवळ आलों १८५३ सालीं पॅरिसला जें जागतिक प्रदर्शन भरलें होतें व ज्याचें राणी व्हिक्टोरियाच्या हस्तें उद्घाटन झालें होतें, त्या प्रदर्शनाच्या निमित्ताने फ्रेंच स्थापत्य शास्त्रज्ञांनी हा ८०० मीटर्स उंचीचा म्हणजे १,१०० फुटांहून अधिक उंच असा लोखंडी मनोरा उभा केला. आजतागायत जशाचा तसाच तो उभा आहे. जगांतील नऊ आश्चर्यामध्ये मानाचें स्थान पटकावून बसला आहे. सुवेझ कॅनॉल, सेंट पीटर्स चर्च, आयफेल टॉवर आणखी कितीतरी गोष्टी मी बघणार होतें. ह्या बघायला मिळणें भाग्याची गोष्ट तर खरीच. आम्ही आयफेल टॉवरच्या पायथ्याशी आलों व वर जाण्यासाठी लिफ्ट आहे तिचें तिकिट काढलें. आयफेल टॉवरच्या डोक्यावर जाण्यासाठी तीन विजेचे पाळणे आहेत. वर जायला तीन मिनिटें लागतात. हे पाळणे इतके कौशल्यपूर्ण आहेत की, फ्रेंच इंजिनियरांचें कौतुक करावें तितकें थोडेंच असें वाटतें. वर जातांना

विमानांतून जातांना जसें वाटत असेल तसें वाटतें. आम्ही वर पोहोचलों तों भुरूभुरू वर्फ पडत होते आणि तें बर्फ खालीं पडेपर्यंत त्याचें पाणी होत होतें. म्हणजे किती उंचावर आम्ही होतों ह्याची कल्पना वाचकांनी करावी. आयफेल टॉवरच्या तीन विजेच्या पाळण्यांच्या टप्प्यांवर चौफेर गॅलरी आहे व त्यापैकी पहिली खूप मोठी व वरची त्या मानानें लहान असून सर्वांत शेवटची तर अगदीच लहान आहे. ह्या सर्वांत शेवटच्या गॅलरीवर आयफेलचा राजमुकुटाकृति घुमट आहे व तेथे छोटीं छोटीं पांच-सात दुकानें आहेत ह्या दुकानांत केवळ आयफेलसंबंधी चित्रें, वस्तु, फोटो, नकशीच्या कोरीव वस्तु मिळतात. खुद्द आयफेलच्या माथ्यावरील दुकानांतून ह्या वस्तु खरेदी करण्यासाठी प्रवासी लोकांची नेहमीचीच गर्दी येथे असते. आयफेलच्या अत्युच्च टोकांवरून मीं पॅरिस शहराकडे नजर टाकली मात्र आणि झोपेतून डोळे खाडकन उघडावे तसें मला झालें. पॅरिस म्हणजे काय, ह्याची खरी कल्पना मला तेव्हा आली. खाली वाहणारी धीर गंभीर सीन नदी, दूरच्या क्षितिजावर दिसणारा आर्क द ट्रायम्फ (Arch the Triumph), नेपोलियनचें स्मारक, ऑपेरा थिएटर, एक ना दोन, ठळक ठळक अशाच मुळी ४०–५० इमारती आम्ही इतक्या उंचीवरून सहज ओळखूं शकत होतों. नेपोलियनसारखा जगज्जेता छोटा वाटावा, अशी काय जादू ह्या उंचीवर जाण्यांत भरली आहे ! इतक्या अफाट विश्वदर्शनानंतर खाली हिंडणारी माणसें अगदीच मामुली स्वरूपाचीं, कृमिकीटक वळवळल्यासारखीं वाटावी, इतकी क्षुद्रता माझ्यांत कशानें उत्पन्न झाली तर केवळ मी एक हजार फूट उंचीवर गेलें म्हणून ! मीं खाली यऊन वर मान करून पाहिलें आणि माझ्या स्वतःच्या अस्तित्वाचा पोकळपणा तेव्हांच ध्यानांत आला. कोणाचेंहि गर्वपरिहरण त्या माणसाला टाचेखाली चिरडून, सत्तेखाली भरडून, कधीहि करवून आणूं नये. त्याला उदात्त अशा वातावरणांत वरच्या थरांत नेऊन ठेवावें, आपोआप तो लीन होतो. मनुष्याचे मनोव्यापार किती चमत्कारिक असतात !

पॅरिसमध्ये पाहाण्यासारखें पुष्कळच आहे. लूव्हरीच्या राजवाडयांत फेरफटका करतांना तेथील प्रसिद्ध आर्ट गॅलरी पहात असतांना पाय दमतात. डोळे मिटतात; पण माणूस विसाव्यासाठीं थांबत नाही कीं,

डोळयांना विश्रांति देत नाही. मोनालिसाचें प्रसिद्ध चित्र येथें आहे. प्रसिद्ध फ्रेंच चित्रकार आंग्रे (Ingre) ह्याच्या सुप्रसिद्ध कलाकृति तेथेंच आहेत. त्या मला फारच आवडल्या, पण खरें म्हणावयाचें म्हणजे फ्रान्सच्या नामवंत चित्रकारांनीं काढलेलीं अव्वल दर्जाचीं चित्रें फ्रांसच्या बाहेरच आहेत असें मात्र मला वाटलें. फ्लॉरेंस, रोम, लंडन, पॅरिस येथें एकापेक्षां एक सुंदर चित्रप्रदर्शनें पाहून झाल्यानंतरहि मला तसेंच वाटत राहिलें. डिगास, पिकॅसो, ह्यांचीं दुर्मिळ चित्रें मला व्हर्सायच्या राजवाडयांत पहावयास मिळालीं. पण पॅरिस हें चित्रकारांचेंच गांव आहे. नॉटरडॅम चर्चच्या शेजारच्या पुलावरील फुटपाथवर एखादी छोटीशी पेटी व कागद घेऊन बसलेले चित्रकार पांच-दहा मिनिटांच्या अल्पावधींत तुमची छबी कागदावर उतरवून देतात, तेव्हा त्यांच्यांतील फरेंच रक्त किती रसिक व कुशल आहे याची खात्री पटते. नेपोलियनचें स्मारक म्हणजेच Invalide बघण्यासारखें आहे, त्यांत वादच नाही. पॅरिसला आलेला प्रत्येक प्रवासी कमींतकमी दोन-तीनदा तरी येथें येऊन जात असणारच. नेपोलियनवर फ्रेंच जनतेचें निरातिशय प्रेम आहे. ह्या स्मारकाच्या पायथ्यावर रोज येऊन बसणारे कित्येक लोक आहेत. विषण्ण मनाने ह्या स्मारकाकडे पहात असतांना त्यांच्या डोळयांत एकाएकीं अश्रू उभे रहातात. फ्रेंच लोक भावनाप्रधान आहेत. ५०–६० पायऱ्या चढून गेल्यानंतर संगमरवरी चौफेर भव्य गॅलरीच्या मध्यभागीं खालच्या बाजूस बांधलेली नेपोलियनची समाधि कायम सूर्यप्रकाशांत राहील, अशी प्रकाश-योजना ह्या इमारतींत केलेली आहे. निळया तावदानांतून येणाऱ्या निळसर प्रकाशाने असें कांही गंभीर व शांत वातावरण तेथें निर्मित झालें आहे कीं, माणूस आपो-आप अंतर्मुख बनतो व विचार करतां करतां विनम्र होऊनच बाहेर पडतो. नेपोलियनच्या समाधीभोवती वर्तुलाकार भिंतीवरून त्याच्या आयुष्यांत घडलेल्या महत्त्वाच्या घटनांची दृश्यें कोरलेलीं आहेत. त्याचप्रमाणें त्याच्या संबंधीचा गुणगौरवपूर्ण मजकूरहि खोदलेला आहे. ह्या स्मारकाच्या पिछाडीस असलेल्या आवारांतील ( हें आवार इतकें मोठें आहे की, मला वाटतें त्यामुळेंच त्याची झाडलोट व्यवस्थित होत नसावी) एका मोठया इमारतींत नेपोलियन-विषयक वस्तूंचें प्रदर्शन भरवून ठेविलेलें आहे.

ह्या प्रदर्शनांत त्याची तरवार, टोपी, तपकिरीची डबी, फांसे, पत्ते आदि कितीतरी वैयक्तिक वस्तु आहेत हें स्मारक बघण्यासाठी प्रवासी मंडळी येतात त्यापासून जें उत्पन्न मिळतें त्यांतून युद्धांत निकामी झालेल्या सैनिकांच्या पोषणाचा खर्च करण्यांत येतो.

लूव्हरीचा राजवाडा, नेपोलियनचें स्मारक, व्हर्सायिचा राजवाडा, टयुलेरीज गार्डन्स बघतांना वारंवर मला अॅबटचें " नेपोलियन " व स्टिफन झ्वाइगचें " मेरी अॅन्टोनेट " या दोन पुस्तकांची आठवण येत होती. ह्या दोनहि पुस्तकांतील वर लिहिलेल्या स्थळांचीं वर्णनें कितीतरी तोकडीं, अपुरी आहेत ! लूव्हरीचें वर्णन कोणीहि चांगल्या प्रकारें करूं शकलेलें नाही. ह्यांतच त्याच्या सौंदर्याची कल्पना येईल. भव्यपणांत रोममधील इमारती जास्त मोठ्या असतील; परंतु आकर्षकपणा आणि सौंदर्यदृष्टि फ्रान्समधील इमारतींत, बगीचांत रस्त्यांत ओसंडून वहात आहे. " I cannot wait long to come back," असें इंग्लंडची राणी म्हणाली तें म्हणूनच. तिचा बकिंगहॅम पॅलेस केवळ त्यांत तिचें वास्तव्य आहे म्हणूनच राजवाडा म्हणावयाचा, विंडसरचा राजवाडासुद्धा लूव्हरचा राजवाडा ह्यांच्याबरोबर 'Not for competition' चेंच लेबल लावून बसेल. गरीब लोकांची पिळवणूक करून पॅरिसचें वैभव फ्रेंच राजे-राण्यांनी वाढविलें आहे हें खरें असेल; पण तेंच वैभव व तीच पुण्याई आज फ्रान्सला शतकानुशतकें पुरत आहे व अजूनहि कित्येक शतकें त्या राष्ट्राला " पहिल्या दर्जाचे सौंदर्यपूर्ण राष्ट्र " म्हणून कीर्ति देण्यास पुरणार आहे. एकच नाहीतर अनेक सुंदर इमारती, मोठ्या तर खऱ्याच; पण खऱ्याखुऱ्या अर्थाने आदर्श बांधकामाचे नमुने म्हणून कायम बघितल्या जाव्यात अशा इमारती मैलोन् मैल लांब रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभ्या आहेत. इंग्लंडची राणी आलेली असल्यामुळे सर्व इमारती चकचकीत करून त्यांना रंग वगैरे देऊन ठिकठिकाणी चौकाचौकांतून, रस्त्यारस्त्यांतून सजावट आणि रोषणाई केल्यामुळे आधीचेंच नटवें पॅरिस शहर आणखीनच नटूनथटून बसल्यासारखें वाटलें. वास्तविक पॅरिस हा राजेराण्यांचा गांव. एखादी राणी आली काय अन् गेली काय, पॅरिसच्या दिमाखांत त्यामुळे कितीसा फरक पडणार ?

आर्क द ट्रायम्फ (Arch the Triumph) च्या डोक्यावरून मी खालीं पाहिलें तों मरीन लाईन्सच्या रस्त्याएवढ्या दोन–चार गल्ल्या व त्याहून मोठे झाडांच्या कमानींनी एकजात आच्छादिलेले बारा रस्ते मिळून सोळा रस्ते ह्या आर्क द टायम्फच्या चौकांतून पॅरिसमध्ये घुसतात असे दिसलें. तेव्हा तो चौक किती मोठा असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. ह्याच आर्क द ट्रायम्फच्या संगमरवरी चबुतऱ्यावरून नेपोलियन व मराया लुइझा ह्यांच्या लग्नाची मिरवणूक निघाली होती आणि प्रत्येक महत्त्वाच्या शुभ प्रसंगीं ह्याच ठिकाणी समारंभ झालेले होते. ह्या विजयकमानीला लूव्हरशी जोडणाऱ्या एका रस्त्यावर टूलेरीजच्या गार्डन्स आहेत. "बंगले नवे नवकोनी फुलबाग वगीचे भवतीं" हें गाणे Marching song सारखें आपल्याशींच गुणगुणत मीं पॅरिस हिंडलें. पायीं हिंडून हिंडून जमेल तितके बघितलें. पायांत जोर आणि डोळ्यांत प्राण आणून भटकणें व पहाणें एवढाच एक उद्योग केला. टच्यूलेरीजच्या गार्डन्समधून दृष्टि पोहोंचणार नाही, इतक्या दूरवर पसरलेल्या हिरव्यागार गालिच्यावरून मनांतल्या-मनांत भरजरी पोषाख व राणीचा थाट करून काल्पनिक राजेघराण्याचे मुजरे घेत घेत जातांना आपोआप मारी अॅन्टोनेटला शोभावा असला ताठपणा माझ्यांत आल्यासारखें मला वाटलें. त्यांतून नुकतेंच डेव्हिडचें नेपोलियनला राज्याभिषेक झाल्यावेळचें दृश्य दाखविणारें अति मोठें चित्र मी पाहून आलें होतें. लूव्हरीचा राजवाडा तर मागेच उभा होता. गेली पंधरा मिनिटें तर नुसतें त्याचें पाठीमागचें पटांगण ओलांडीत होतें आणि आतां ह्या १५–२० दोनशे फूट लांबीच्या आणि दोनदोन इंच उंचीच्या बैठ्या पायऱ्या चढून टच्यूलरीजच्या गार्डन्समध्ये नुकताच प्रवेश केला होता. डावीकडे आणि उजवीकडे अंतराअंतराने मागेपुढे जिकडे तिकडे चहूंकडे पुतळे आणि कारंजीं होतीं. नळींतून उडते तसल्या झारीच्या बोंडाला इकडे कारंजें म्हणत नाहीत. कधी काळीं पाहिलेलें शनिवारवाड्यांतील पाकळ्यांचें प्रसिद्ध कारंजें आठवून मला हसू आलें. दुतर्फा शंभर दोनशे यार्डांपर्यंत झाडांच्या वृक्षराजी पहात पहात एका मनोरम तळ्याशीं येऊन मी उभी राहिले. दोन फोटो घेतले. बनारसी कापडांचें ढीगच्या ढीग तपासून शेवटीं कोठे जरीच्या कापडाचा खिशासाठी तुकडा घ्यावा त्याप्रमाणें टीचभर कॅमेरांत मी तें अवघें सौंदर्य

टिपण्याचा केलेला हास्यस्पद प्रयत्नच होता तो. टयूलरीज् गार्डन्समध्ये इतक्या भव्य ठिकाणाला भयाणपण येणार नाही, इतपत गर्दी होती. फ्लॉरेन्समधील बागांमधला शुकशुकाट किंवा लंडनमधील हाईड पार्क-मधला उल्लूपणाहि तेथे नव्हता. मालकिणीच्या गैरहजेरींत हलक्या पावलांनी निर्भयपणें पण कांहीशा दुजाभावाने हिंडणाऱ्या नोकर-दासीसारखी संथ हालचाल होती. निदान मला तरी तशी वाटली. प्लेस डी कंकॉर्ड (Place de Concard) हा पॅरिस मधला सर्वांत मोठा चौक. ह्या चौकांत सोळाव्या लुईचा वध करण्यांत आला. आर्क दि ट्रायम्फ आणि लुव्हरी यांमध्ये असणाऱ्या ट्यूलेरीज गार्डन्समधील सर्वांत गजबजलेला भाग होय. ह्या बागेंतच आर्क दि ट्रायम्फसारख्या दिसणाऱ्या आणखी-दोन चार कमानी आहेत; पण आर्क द ट्रायम्फ ही सर्वांत मोठी आहे. मोठें आणि सुंदर हें पॅरिसचें वैशिष्टच आहे!

लक्झेंबर्ग गार्डन्स (Luxemburg Gardens) म्हणून एक मोठी बाग पॅरिसमध्ये आहे. तिच्या विस्तत परिसरांत एक लहानसें तळें आहे. त्याचाच घेर १००० मीटर्सवर आहे. कारंजीं उडताहेत, फुलें फुलताहेत, झाडें डुलताहेत, पक्षी किलबिल करताहेत, स्वच्छ उन्हें पडलीं आहेत, हंस बागडत आहेत हें असलं काव्यांत वाचलेलें वर्णन मूर्त स्वरूपांत पहावयाचें असेल तर पॅरिसच्या बगीच्यांतून हिंडावें. फुलें, झाडें, हंस, तळें, त्यांच्या सांनिध्यांत दगडहि सुंदर दिसतात. मग ह्या तळ्याच्या भोवती दोन्ही बाजूंना फ्रान्सच्या राजघराण्यांतील २८ राजे–राण्यांचे पुतळे दूरदूर अंतरावर उभे राहून बघत आहेत त्यांचें वर्णन काय करावें? झेन अलसनाम नामक राजपुत्राची गोष्ट ज्यांनी अरेबियन नाइटस-मध्ये वाचली असेल त्यांना त्यांतील १३ पुतळे ते हेच असें वाटलें असतें. परंतु त्या गोष्टींत शेवटचा पुतळा म्हणजे जिवंत राजकन्या होती. तसें मात्र ह्या बागेंत कोणीहि नव्हतें पॅरिसचें वैभव "गत वैभव" आहे, ह्याची जाणीव ह्या अतिसुंदर मानव-निर्मित प्रासादामुळे जास्त तीव्रतेने होते आणि ह्या अशा अफाट बगीच्यां-मुळे पटते.

बुलोन गार्डन्स (Boulogn Gardens) म्हणजे गंधर्व नगरींतील यक्षकिन्नरांचें क्षणभर विरंगुळा वाटावा म्हणून क्रीडा करण्याचें उद्यान.

पुष्कळ फुलझाडें आहेत असे मीं लिहिलें तर दुतर्फा पसरलेल्या लाखों झाडांच्या सावलीच्या मंडपाचें वर्णन मीं केलें असें का होईल ? एक छोटीशी संथ नदी वाहते आहे असे म्हटले तर मुळामुठा नदीपेक्षा जास्त कल्पना दिल्या-सारखें कसें होणार ? छोटचा छोटचा बोटींतून वल्हीं मारीत लोक जात आहेत म्हटलें तर त्यांत काय, असली सहल आम्हीहि संगम ब्रिजवर करतों. शिवाय वत्सला-हरण सिनेमांत नाही का दाखविलेलं ? असं वाचक म्हणतील. तेव्हां मला वाटतं तें सर्व शब्दांनी वर्णन करण्यापलीकडचं आहे. इटली-मध्येहि इतक्या छान बागा मीं पाहिल्या (लंडनमध्ये तसलं कांही नाहीच); परंतु चौकोनी रंगीत ठोकळ्याचा सुंदर बंगला बांधणें आणि सापडलेल्या दगडांतच थोडासा फेरफार करून त्याची सुबक मूर्ति बनविणें ह्यांत जो फरक आहे तोच इटली व फ्रान्स येथील उद्यानांत आहे. एकापुढे एक कवडचा लावून त्यांची माळ करण्यांतहि कौशल्य आहे; पण कधी कधी सरळ डाव टाकून झाल्यावर आपल्या आपणच त्या कवडचा कांही विशिष्ट रचना दाखवून देतात तो नमुना प्रयत्न करूनहि आपल्याला सुचणार नाही. बुलोनच्या गार्डन्स या अशा आहेत. त्यांत तळ्यांतून सौंदर्य वहात होतें कां हंसांच्या रूपांत तरंगत होतें, घनदाट वृक्षांच्या सावलींतून उन्हाच्या कवडशांतून तें उतरत होतें कीं आकाशापर्यंत पोहोंचलेल्या उंचच उंच खोडांतून सरसर वर जात होतें हें मी कसं सांगू ! रंगी बेरंगीं फुलांच्या ताटव्यांतून ते फुलत होतें कां पारंब्यांतून ओघळून वहात होतें; टुमदार बोटींच्या रूपांत संथ पाण्यावर प्रतिबिंबित होत होतें कीं पक्ष्यांच्या थव्यांतून उडत होतें; कोंवळ्या पानांच्या भरगच्च पालवींतून सळाळत होते कीं चौखुर हिंडणाऱ्या हरिणांच्या पायांतून दौडत होते हें मला सांगतां येणार तरी कसें ? चित्रलेखेने उषेला अनिरुद्धाचें चित्र काढून दाखवून ओळख पटविली. माझ्या हातांत लेखणी असली तरीहि चित्र काढणें मला शक्य होत नाही. सृष्टिसौंदर्याचें कलाकारांनीं चितारलेले अनेक देखावे मी पाहिलें आहेत. पण "पण ते हे नव्हेत" असेच मला सांगावें लागेल. "स्वर्ग कल्पनेंतला" जर भूतलावर आला तर त्याचें साधें वर्णनहि करतां येऊं नये अशी खंत वाटेल असा कालिदासासारखी कवीच येथें हवा. परंतु एवढं मात्र मला वाटतं कीं, असलं कांहीतरी अद्भुत

चांदण्याप्रमाणें झिरपणारें सौंदर्य पहाणें हे अनुभविल्या खेरीज कल्पनासुद्धां चांगल्या सुचणें शक्य नाही.

फ्रेंच लोक या अशा वैभवांतून मोठ्या डौलाने, दिमाखाने इंग्रजांप्रमाणें वावरत असतील अशी जर कोणी कल्पना केली तर अगदीच चुकीची आहे. या लोकांना लहानपणापासून अशीच सौंदर्यदृष्टि आलेली आहे. अशीच सौंदर्यमुक्ति त्यांच्या अंगीं बाणली आहे कीं, ते अगदीं सहजपणें ह्या सर्व जगांतून वावरत असतात–जणूं आपणच कांहीं जगप्रसिद्ध सौंदर्यखाणींतून रहात आहों, जात आहों, वावरत आहों याची त्यांना जाणीवच नसावी. गरीब लोकांजवळ पैसा नसतो म्हणजे काय नसतें आणि तो कां नसतो व ते मग करतात तरी काय, हा प्रश्न मारी ॲन्टोनेटला स्वत:ला कधी करावासा वाटला नाही व केलाच तर त्याचें उत्तर कधी सापडलें नाही. बरोबर तसेंच येथील लोकांचें झालें आहे. वैभवाची संवय माणसाची घमेंड घालविते कीं काय कोण जाणें !

खरं म्हणजे इतिहासावरून असंच दिसतं कीं, कांहीशा जुलमी व रसिक पराक्रमी राजांनींच राज्यें केली. बाकीच्या सोज्ज्वळ व व्यवहारचतुरज्ञ राजांनी सिंहासनावर बसून आयष्य वेचलें. आपल्याकडे मोगल राजांना हें असलं कांही दिव्य, विलासी जीवन कंठण्याची कल्पना होती व त्यांनी बऱ्याच गोष्टी त्याप्रमाणें केल्या. अद्वितीय इमारती व मनोरे बांधले कीं, जे आज ते नामशेष झाले तरी त्यांचें स्मरण सदोदित करून देत आहेत. अगदीं गरीब जनतेचे शिव्याशाप घेऊनहि त्यांनी या गोष्टी केल्या, पण त्या आजतागायत ताजमहालप्रमाणें ठामपणें उभ्या आहेत, ही गोष्ट नाकबूल कशी करतां येईल. अशाच कांही चमत्कारिक कल्पना माझ्या डोक्यांत 'पॅलेस डि व्हर्सेल्स' पहात असतांना येत होत्या. लक्झेंबर्गची बाग व लूव्हरीच्या राजवाड्याची मोठी आवृत्ति मिळून पॅलेस डी व्हर्सेल्स. १२०० चौरस एकर जमिनीवरील हा इंद्राचा राजवाडा सगळा पहाणें अशक्यच. त्यांतील चित्रांचें प्रदर्शन व मारी ॲन्टोनेटच्या खोल्या वगैरे पहावयाला स्टिफन झ्वाइगचें पुस्तक वाचून आलेले असल्याने फारच मजा वाटली. आर्ट गॅलरींतील माणसें सजीव होऊन जर ह्या राजवाड्यांत आत्तां अवतीर्ण झाली तर काय गंमत होईल अशी गंमतीची कल्पना करीत

मी दालनामागून दालनें हिंडत होतें. सोळाव्या लुईचा दरबार हॉल, मारी अॅन्टोनेटच्या खोल्या, तिचा नृत्याचा हॉल हीं सर्व एकापेक्षा एक सुंदर आहेत हे सांगावयास नकोच. ह्याच नृत्याच्या हॉलमध्ये आदल्या दिवशीं इंग्लंडच्या राणीच्या सन्मानार्थ जंगी खाना देण्यांत आला होता सोन्याच्या मुलाम्याने रंगविलेल्या एक जात सारख्या सव्वीस खांबांच्या ओळींतून चमचमणारी हंड्या झुंबरें व मेणबत्यांच्या जागत्या ज्योतींच्या जोडीला बिजलीच्या दिव्यांची सोबत आणि अशा थाटामध्ये झालेली राजेराण्यांची मेजवानी मनांतल्या मनांत रंगवीत मी आपण कधीं काळीं घर बांधलें तर काय काय करावें बरें असलें बेत आखीत होते. माणसाचें मन किती दिलदार आहे. विचार करण्याच्या अवस्थेंत माणसाला भान रहात नाही. सारे कांही शक्य वाटतें. अशक्य असें कांही वाटतच नाही.

माझी खरी निराशा झाली ती बॅस्टीलचा तुरुंग पाहून. बॅस्टीलच्या चौकांत जाण्यासाठीं मी जवळ जवळ चार मैल चालून गेलें आणि पाहिलें काय तर एका चौकांत एक उंचच उंच खांब उभा केलेला. शेजारीं सगळीं मजूर वस्ती, आणि काळचा कुळकुळीत इमारतींचा बुजबुजाट. या ठिकाणीं इतका मोठा बॅस्टीलचा तुरुंग उभा होता आणि त्याचा आतां मागमूसहि उरलेला नाही. ह्या दोन्हीहि खऱ्या गोष्टींबद्दल आश्चर्य वाटते. नॉटरडॅमच्या चर्चमध्यें तेवढी निराशा झाली नाही. कारण अपेक्षाच फारशा नव्हत्या. अंधारलेल्या जुन्या बांधणीच्या चर्चमध्यें केवळ पुरातन असण्यापलीकडे दुसरें कांहीं उल्लेखनीय क्वचितच. नाही म्हणावयाला खिडक्यांवर रंगीत कांचेची तावदानें फार सुरेख व नक्षीदार होती. लंडनच्या वेस्ट मिनिस्टर अॅबेमध्येंहि अशाच प्रकारचीं तावदाने आहेत. जुन्या चर्चेस-मधून मला वाटतें सजावटीची हीच एक पद्धत त्या वेळीं प्रचलीत होती.

नेपोलियन व जोसेफाईन ह्यांचा प्रसिद्ध खाजगी मॅमलझॉन राजवाडा आम्ही बघितला. पॅरिसमध्यें नेपोलियनचें म्हणून जें कांहींचें आहे तें सर्व अगदीं निष्ठापूर्वक जपणूक करून ठेविलेलें आहे. ह्या मॅमलझॉन राजवा-ड्यांत जोसेफाईनने प्रसिद्ध मॅमलझॉन गुलाबाची लागवड केली होती (किंवहुना तिने जी गुलाबाची कलमें निर्माण करविली ती मॅमलझॉन गुलाब ह्या नावानेंच प्रसिद्ध पावली). तिची गाण्याबजावण्याची खोली, तिच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि:
क्रमांक ........ नों. दि:

वाद्यांसहित तशीच जतन करून ठेवण्यांत आली आहे. त्यांत तिचा पियानो आहे. भिंतीवर जोसेफाईनचें ऐटदार पण शालीन असा भाव व्यतीत करणारें तैलचित्र लावलेले आहे. नेपोलियनची कामकाज करण्याची खोली त्याचप्रमाणें ज्या खोलींत नेपोलियनने जोसेफाईनला आपला घटस्फोट घेण्याचा निश्चय सांगितला ती खोली. नंतर ज्या व्हरांड्यांतून बेचैनपणें तो येरझाऱ्या घालीत हिंडत असे त्या सर्व जागा बरोबरचें फ्रेंच गाईडस आपल्याला दाखवितात. नेपोलियनच्या हुषारीचें, शौर्याचें, नेकीचें कौतुक फरान्समध्यें सर्वत्र आपल्याला ऐकावयाला मिळतें. लहानपणापासून मला नेपोलियन फार आवडे. भावे यांनीं लिहिलेले नेपोलिनचें चरित्र वाचून मला त्याच्याबद्दल अत्यंत भक्ति उत्पन्न झाली होती. त्या नेपोलियनचें रहातें घर, त्यांच्या वस्तु, टोपी, तलवार, तपकिरीची डबी, पोशाख अशा सगळ्या वस्तु पाहून माझा गळा दाटून आला. सर्वांना स्फूर्तीचें स्थान असणाऱ्या नेपोलियनच्या स्मारकास पायथ्याशीं "ही भिकारडी नोकरी एक दिवस ठोकरून सोडून देईन," इतपत शौर्याचीं प्रतिज्ञा करणेंहि आपल्याला अवघड वाटावें याबद्दल जीवाला खंत वाटली. People are born great हेंच खरें.

स्वित्झर्लंडप्रमाणेंच फ्रान्समध्येहि प्रवासी जनांची दाटी फार व त्यामुळें जनतेंत कुतूहल कमी. कर्कश बोलणाऱ्या स्पॅनिश मुलींच्या पुढे मृदु उच्चार करणाऱ्या स्वप्नाळू डोळ्यांच्या फ्रेंच मुली निराळ्याच दिसतात. इंग्लिश लोकांचा नीटसपणा व वागण्या-बोलण्यांतील सफाई जर्मनी सोडला तर इतर युरोपियन देशांतून दिसत नाही. थोडासा भोंगळपणा जो पुष्कळ वेळां मनुष्यप्राण्याला जास्त शोभणारा वाटतो, तसा विस्कळितपणा फ्रेंचामध्ये आहेसें दिसतें. दोन खोल्यांत टुमटुमीत संसार करण्याची फ्रेंच लोकांची मनीषा नाही व तें त्यांच्या रक्तांतहि नाही. अघळपघळ राहणी, भरपूर खर्च (असेल पैसा तर पैसा, नसेल तर फूटपाथवरहि चित्रें काढीत किंवा लकेऱ्या मारीत जीव रिझवण्याची कला) व घसघशीत डामडौल असा थाट त्यांना आवडतो. त्यांचीं मनें इंग्लिश लोकांइतकी अजून तरी कृत्रिम व यांत्रिक युगाला शोभतील अशीं धातूचीं व हिशोबी झालेलीं नसावींत. सांगितलें तर आश्चर्य वाटेल; पण फ्रेंच बायका—सर्वसाधारण

फ्रेंच वायका—फॅशन करणाऱ्या दिसणार नाहीत. रंगरंगोटी न केलेल्यांचें प्रमाण उलट जास्त आहे. इटलीबद्दल फ्रान्समध्यें अजूनहि मित्रत्वाची भावना आहे. इकडे अत्तरांच्या बाटल्या आपली कल्पना असते तितक्या प्रमाणांत खरोखरीच आहेत. बुधलेच्या बुधले भरून विविध प्रकारचीं अत्तरें विकलीं जातात, आणि तीं विकत घेणारे लोकहि त्यांना भेटतात. आंघोळीचें मात्र नांव नाही. आंघोळ करण्याची जरुरी नाही, अशी एक भावना दृढ होऊन गेली आहे कीं काय, कोण जाणे! पाणी न पितां ते मद्य (Wine) पीत असतात. पॅरिसमध्यें सकाळचा बाजार भरविण्याची पद्धत फार चांगली आहे. चौकांत असा बाजार भरणार असेल तेथें कायम स्वरूपाचे स्टॉल्स उभे करून ठेविलेले असतात. सकाळचे सहा वाजले की लॉरीमधून माल आणून स्टॉल्स भाडयाने घेतले असतील ते लोक आपलीं दुकानें मांडतात व १२ च्या ठोक्याला उरलेला माल परत लॉऱ्यांमध्ये घालून सर्वजण निघून जातात. म्युनिसिपालिटीची गाडी येऊन रस्ता स्वच्छ करून जाते.

पॅरिसला मी जाऊन आलें म्हणून ज्यांना ज्यांना मीं म्हटलें, त्या बहुतेक सर्वांनी मला विचारलें कीं, तेथें नग्ननृत्य पाहिलें का? ह्या नग्ननृत्याबद्दल एतद्देशीयांना भलतेंच कुतूहल आहे असें दिसतें! इंग्लंडमध्यें अशा तऱ्हेच्या रेव्ह्यूमध्यें (Revue) मी गेलें होतें. रेव्ह्यू बघायला जाणें ह्यांत कांही विशेष आहे असें मानलें जात नाही; तरी फार चांगली अभिरुचि आहे असेंहि सर्वसाधारणपणें ज्यांना आपण सभ्य म्हणूं (respectable) अशांमध्यें मानलें जात नाही. माझ्या थोडयाफार चित्रकलेच्या छंदामुळें नग्न स्त्री पहाणें ह्यांत मला कांही नवीन वाटण्यासारखें नव्हतें. शिवाय इटलींत शिरल्यापासून असंख्य पुतळे व अगणित चित्रें सारखीं नजरेखालून जात असल्याने नग्नाकृति पाहणें यांत कांही फारसें वाटण्यासारखें नव्हतें परंतु स्टेजवर अशा स्त्रिया येऊं शकतात व श्वास रोधून लोक त्यांच्याकड पाहूं शकतात, हें दृश्य पहाण्यासारखें होतें खास. थिएटरचा पडदा वर गेल्यानंतर थोडाफार फार्स (farce) सुरू करतात. ह्यांत चांगले नीटनीटके कपडे घालून वरून सभ्यतेचें आवरण व्यवस्थित बसवून निकृष्ट दर्जाच्या कोटया विनोदांनी भरलेलीं भाषणें सुरू होतात व सभ्यपणाचें आवश्यक व नाइलाज म्हणून चढविलेलें कवच ज्यांना रोजच्या व्यवहारांत त्रासदायक

झालेलें असतें असा प्रेक्षकवर्ग हास्यरसांत व रंगेल आनंदांत मश्गुल होतो. ह्या मोठ्या रंगभूमीवर मध्यभागीं आंतल्या बाजूस एक छोटेसें स्टेज व त्यापुढे झिरझिरीत छोटासा पडदा असतो व पुढल्या बाजूस गाणें-बजावणें नाच चालू असतांना हा मागचा छोटा पडदा कधी वर जातो म्हणून प्रेक्षक चुळबुळ करीत असतात. शेवटीं कार्यक्रमाच्या मुख्य भागाला सुरवात होते. सगळीकडचे दिवे मालविले जातात. छोटा पडदा हालल्यासारखा वाटतो व निमिषार्धांत एक आपटबारासारखा आवाज होऊन त्या छोट्या स्टेजवर नग्नसुंदरीचें दर्शन होतें ! अशा रेव्ह्यूमध्ये त्या बाईला हालचाल करण्याची मनाई आहे. तिने पुतळ्याप्रमाणे निश्चल राहिलें पाहिजे. एखादे मिनिट तसें गेल्यानंतर परत पडदा पडतो व अर्ध्या मिनिटांत दुसरी पोझ घेऊन ती सुंदरी दाखविली जाते. कधी ह्या स्त्रिया एकाहून अधिक असतात व अत्यल्प वस्त्र घालून मोठ्या स्टेजवर थोडी हालचाल करण्याची त्यांपैकी एखादीला मुभा देण्यांत येते. स्टेजवरील दृश्यांपेक्षां स्टेजबाहेरील दृश्य ह्यावेळीं पहाण्यालायक असतें. अधाशीपणें त्या नग्न आकृति वा आकृत्यांकडे बघणाऱ्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांच्या नजरा पाहून माणूस आणि जनावर यांत किती थोडें अंतर आहे, किंबहुना अजून माणूस हा प्राणीच आहे हें अगदीं खरें पटूं लागते. अवघ्या वीस वर्षांच्या त्या स्टेजवरील तरुणींच्या मनांत त्यावेळी काय विचार असतील असें मनांत येतें न येतें तोंच तिचा करुण व घाबरलेला गोरामोरा चेहरा पाहून केवळ पोटासाठीं कसली ही " कलासेवा," " काय हा षोक ", असा विचार मनांत आल्याखेरीज रहात नाही. गंमत तरी अशी की, निर्ढावलेल्या स्त्रियांना पहाण्यांत प्रेक्षकांना स्वारस्य वाटत नाही व नवशिक्या मुली पाहतांना त्यांच्या स्थितीकडे पाहून कींव येते. एक चमत्कारिक पण अविस्मरणीय अनुभव म्हणून ह्या रेव्ह्यूची मला आठवण राहील. परंतु पुनः पुनः जाऊन बघण्यासारखें मला तरी त्यांत इतकेसें कांहीं वाटले नाही ! पाण्यासारखा पैसा ओतून असे रेव्ह्यू दाखविले जातात व प्रेक्षकांनाहि ते पाहण्यासाठी तसेच पैसे द्यावे लागतात. पॅरिसमध्ये निश्चल राहण्याचें बंधन नसून स्टेजवर हालचाल करण्याची पूर्ण मुभा आहे. म्हणून जिभल्या चाटून बघणाऱ्या फाजील रंगेल लोकांना ती एक मेजवानीच वाटत असेल यांत शंका नाही.

पॅरिसहून मी निघणार होतें त्याच्या आदल्या दिवशीं माझ्या ओळखीच्या एका फ्रेंच कुटुंबाकडे मी चहासाठी गेलें होतें. मला इतक्या दिवसांत वर्तमानपत्र वाचतां आलेलें नव्हतें व वेळहि झालेला नव्हता. तेव्हा तेथें वर्तमानपत्र बघतांच मी सहज काय बातमी आहे म्हणून त्या गृहस्थांना विचारलें. त्यांनी रेल्वे-कामगार दुसऱ्या दिवशीं रात्रीं १२ च्या ठोक्याला जेथल्या तेथें गाड्या थांबवून सर्व फ्रान्सभर संपावर जाणार असल्याची बातमी वाचून सांगितली व दुसऱ्या दिवशीं फ्रान्स सोडण्याचा माझा बेत बदलून मीं त्याच रात्रीं निघावें, असा सल्ला दिला. मी बघण्यांत "दंग", वर्तमानपत्रें फ्रेंच भाषेंत असल्याने तीं वाचतां येत नाहीत, लोक बोललेलें समजत नाही, तेव्हां ठरल्याप्रमाणें कार्यक्रम होणार नाहीत ही शंका मनांत येतेच कशाला ? बेमुदत संपाच्या भानगडींत मी अडकून पडलें तर माझा सगळाच घोटाळा व्हावयाचा ! त्यापेक्षा एक दिवस अगोदर जर्मनींत जाऊन पोहोंचलें तर काय वाईट? असा विचार करून मी घरीं आलें. माझ्या कल्पनेप्रमाणें गाडी रात्रीं दहा वाजतां होती; पण बघते तों तिची वेळ ८–२५ वाजतां. घड्याळांत वाजलेले ७–४५, मला सामान आवरून टॅक्सी करून पॅरिसच्या स्टेशनवर जावयालाच अर्धा पाऊण तास सहज लागणार. शिवाय जेवण वगैरे व्हावयाचें तें लांबच राहिलें. मी होस्टेलवर आलें. जेवण वगैरे रद्द करून माझें बिल भरून टाकलें व त्या लोकांचा जेमतेम निरोप घेऊन टॅक्सींत बॅगसकट स्वतःला लोटून दिलें व जोरांत, "स्टेशनवर नेऊन गाडी गांठून दे" म्हणून त्या टॅक्सीवाल्याला सांगितलें. टॅक्सीवाला मोठा भला माणूस दिसला; पण नको तेथें traffic tights आडवे येत त्याला तो तरी काय करणार ? मी स्टेशनांत पोहोंचले तो ८–२२ झालेले. मला नुसती बॅग घेऊन गाडींत चढावयाचें होतें. तिकिटें वगैरे सर्व तयार होतींच; पण स्टेशनचे आवार इतकें मोठें, व त्याला प्लॅटफॉर्म्स इतके विपुल होते कीं, मी कोणत्या प्लॅटफॉर्मवरून गाडी जाते तें बघेपर्यंत गाडी गेली सुद्धां ! गाडी पकडण्याच्या नादांत टॅक्सीवाल्याला पैसे देऊन टाकलेले, जेवण झालेलें नाही, पुढची गाडी १० वाजतां, म्हणजे दोन तास स्टेशन-वरच बसावें लागणार. कारण पुन्हां परत घरीं जाऊन येण्यांत कांही अर्थच

नव्हता. खिशांत फ्रेंच पैसा अगदींच थोडा. सगळ्या कोटांचे सगळे खिसे तपासून नाणीं गोळा केलीं व स्टेशनवरच थोडासा अल्पोपाहार करून माझ्या बॅगशेजारीं बाकावर १०।। च्या गाडीची मार्गप्रतीक्षा करीत बसलें. पॅरिस सोडतांना वाईट वाटत बसावयाला वेळ मिळालाच नव्हता. आतां स्टेशनवर आपलें कायकाय पहावयाचें राहिलें, ह्याबद्दल रुखरुख वाटत राहिली. अजून एखादा सहज आठवडा रहावयाला मला आवडलें असतें; पण पॅरिसहून म्यूनिचला जाणारी ८-२५ ची थेट गाडी सकाळीं ९ वाजतां मला म्यूनिचला नेणार होती. तेव्हा ही १०।। ची गाडी फारतर १२ ते १२।। पर्यंत म्यूनिचला जाईल, असा मनाशीं हिशोब घालीत संपाच्या तडाक्यांतून तर सुटलें, असा विचार करीत मी गाडीत बसलें. तिकिटचेकर आला. इंग्लिशच्या नांवाने भोपळ्याएवढें पूज्य; परंतु त्याच्या एकंदर बोलण्यावरून व हावभावावरून मी ज्या गाडींत बसले होते ती गाडी थेट म्यूनिचला जात नाही येवढा उलगडा झाला. स्ट्रॅटसबर्गला मला गाडी बदलावी लागणार होती. मीं म्हटलें ठीक आहे. जर्मनीच्या हद्दीलगत स्ट्रॅटस्बर्ग आहे. संप झाला तरी कसेंहि त्याच्या आंत जर्मनींत पोहोंचूं शकूं! सकाळीं सात वाजतां स्ट्रॅटस्बर्ग आलें. आमची स्वारी बॅग लोंबकळवित खाली उतरली. उरलेल्या पैशांत मोजून मोजून चहा, केक्स खाल्ले व तुटपुंज्या फ्रेंच ज्ञानावर इंग्लिशची सांगड घालीत स्टेशनवर रेल्वेमार्गाने नकाशे, बोर्डस लावले होते ते पाहूं लागले. म्यूनिचला थेट जाणारी गाडी दुपारीं १।। वाजतां दाखविलेली. इतका वेळ ह्या स्टेशनवर काढणें मला अवघड वाटत होतें. शिवाय कुठूनतरी जर्मन हद्दींत गेलें कीं, जर्मन पैसा घेतां येणार होता आणि मग माझी कोठेंहि थांबण्याची तयारी होती. आतां काय करणार? तेवढ्यांत माझ्या डोक्यांत एक कल्पना आली. मी ज्या गाडीने जाणार होतें तिच्या मार्गावरील एक स्टेशन "खेल" हें दहा मिनिटांनी दुसरी एक गाडी सुटणार होती त्या गाडीच्या मार्गावर पण दाखविलेलें होतें. "खेल" हें जर्मन हद्दींत होतें. तेव्हा मीं विचार केला कीं, स्टॅटसबर्ग-ऐवजीं "खेल" स्टेशनवर थांबून १।। ला स्ट्रॅटसबर्गहून सुटणारी गाडी खेल स्टेशनवर पकडतां येईल. फ्रेंच हद्दीपेक्षां "खेल" येथे गेलेलें काय वाईट? विचार मनांत आला मात्र, लगेच बोजा उचलला. कोणाला विचारावयाचें-

सवरावयाचें नव्हतेंच मला. पाहिजे तिकडे मी जाऊं शकणार होतें. मी सरळ समोरच्या गाडींत चढलें. 'खेल'ला गाडी येतांच जीव भांड्यांत पडला. सुदैवाने जर्मन चेकर भेटला. त्याला उत्तम इंग्लिश येत होतें. त्याने मला खेलवरून आणखी २–३ गाड्या बदलून म्युनिचला लवकर कसें पोंचतां येईल, हें समजावून दिलें. दुपारीं चार वाजता मी म्युनिचला पोहोंचलें. कालची ८–२५ ची गाडी पॅरिसला चुकली नसती तर सकाळीं ९ वाजतां मी म्यूनिचला पोहोंचलें असतें. त्याऐवजीं जगाला वळसा घालून थांबत, बदलत मी दुपारीं ४ वाजतां म्युनिचला पोहोंचलें. जर्मन पैसे म्युनिच स्टेशनवर घेतले आणि ज्या बाईकडे मी म्युनिचला राहणार होतें त्यांना फोन केला. मी माझ्या ठरलेल्या दिवसापेक्षां एक दिवस आधीं म्युनिचला आलेली असल्यामुळे त्या बाई स्टेशनवर मला नेण्यासाठी येणें शक्यच नव्हतें! मी त्यांना फोन केला तेव्हा त्यांना आश्चर्यच वाटलें व "Oh! Darling!" असा त्यांचा प्रतिसाद फोनवर ऐकतांच मला अंगावर दुप्पट मांस आल्यासारखें वाटलें. इतका वेळ बोजे वाहून वाहून दुखणारे खांदे जादूची कांडी फिरल्याप्रमाणें थांबले; पण अजून माझ्या पायाला दिलेली किल्ली संपली नव्हती. त्या बाई म्युनिचपासून चांगले १२–१५ मैलांवर रहात होत्या. म्हणजे अजून मला प्रवास करावयाचा होताच तर. कांही हरकत नाही; पण आतां थोडक्यावर आलें, असें कळतांच दमलेल्या घोड्याला मुक्कामावर जाण्यासाठी टांच मारावी त्या वेगाने मी भराभर सामान घेऊन तरा तरा गाडी पकडून (Munich Plannegg) नांवाचें सुंदर जर्मन खेडें गाठलें. ती माउली गाडी घेऊन स्टेशनवर आलीच होती. तिने सामान मोटारींत टाकतांच मला विमानांत फेकल्याइतकें हलकें वाटलें व घरीं जाऊन प्रेमळपणाने माझें खाणें-पिणें करून छोटयाशा सुशोभित खोलींतल्या हातभर उंची गादींत देह टाकल्याबरोबर मला तेव्हाच झोप लागली.

● ● ●

# १०

# म्युनिक आणि इस्तंबूल

रूथने मला जेवण्याकरितां म्हणून उठविलें तेव्हा रात्रीं आठ-साडे आठचा सुमार असावा. मला २–३ तास इतकी शांत झोप लागली होती कीं, ८।। ला जाग आली तेव्हा मी रात्रभर झोपून सकाळीं उठलें आहें कीं काय, इतकें ताजेंतवाने वाटत होतें. रूथ स्वत: इतकी हंसतमुख आणि आतिथ्यशील होती कीं, तिचा हात पाठीवर फिरतांच कोणालाहि कितीहि शीण आला असला तरी तो विरून जावा. मी माझ्या खोलीशेजारीं स्वतंत्र असलेल्या स्नानगृहामध्ये स्नान वगैरे आटोपून कपडे बदलून खालीं आलें, तो माझ्यासाठी टेबलावर रूथचे वडील व रूथ जेवणाची तयारी पुढयांत घेऊन वाटच पहात होते. जेवण स्वतः रूथ करी. तिचें स्वयंपाक-घर लख्ख, तिचें जेवणघर छोटेंसें; पण स्वच्छ, रूथ स्वत: अगदी सोज्वळ, रूथचे वडील प्रेमळ—सारें वातावरण कसें देवघरासारखें वाटलें. उगीचच तेथे भारल्यासारखें मला झालें होतें. कांहीच कारण नसतांना निर्भयपणा आल्यासारखा वाटत होता व कोणीतरी आवती-भोवती आपल्या भोवतीं रक्षण करीत हिंडत आहे, असा भास घडोघडी होऊं लागला. रूथच्या वडिलांशी माझी ओळख झाली. त्यांना ऐकूं कमी येत होते; पण नजर तीक्ष्ण होती. वाचनाचा साहजिकच छंद जडलेला. त्यामुळे माझ्याशीं बोलण्या-

सारख, मला सांगण्यासारखें त्यांच्याजवळ पुष्कळच होतें. रूथ व डॅडी ह्यांनी तत्त्वज्ञानाचा फारच सखोल अभ्यास केलेला होता व योग-सामर्थ्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता; इतकेच नव्हे पण पुढे पुढे रूथने मला तिची ह्या योग-सामर्थ्यावर किती प्रगति झाली होती, हें सांगितलें तेव्हा तर मी चकितच झालें. योगानंदमहाराजांची ती निस्सीम शिष्या होती. तिने त्यांना प्रत्यक्षांत पाहिलें नव्हतें; पण त्यांचें दर्शन तिला तिच्या घरीं वरचेवर होई असें ती मला सांगे. इतकेंच नव्हे परंतु त्यांचें एकमेकांशीं मूक संभाषण होत असे. त्यांनी तिच्याकरवीं आपल्याला आपल्या मृत्यूनंतरहि कार्य करून घ्यावयाचें आहे, अशी समज तिला दिलेली होती. 'एक हिंदी मुलगी तुझ्याकडे रहावयास येणार आहे,' हें त्यांनी माझी व रूथची ओळख होण्यापूर्वी अगोदर महिना पंधरा दिवस तिला सांगून ठेविलें होतें, असें रूथने मला सांगितलें. रूथच्या डोळ्यांस अशी एक विशिष्ट झाक होती कीं, तिने तुमच्याकडे बघितलें तर ती एकदम आंत खोल शिरून हृदयाचा ठाव घेते कीं काय, असें तुम्हाला वाटेल. कपटी मनाचा थांग तिला तेव्हांच लागेल, असें दुसऱ्या व्यक्तीला वाटावें. इतक्या भेदक नजरेने ती बघूं शके; पण एखाद्या व्यक्तीबद्दल खात्री झाली तर रूथ इतक्या प्रेमळ नजरेची बाईच जगांत नाही, असं माझ्याप्रमाणे अनेकजण तुम्हाला सांगतील. मी तिच्या घरीं पोहोंचण्यापूर्वींच रूथला माझा लळा लागलेला असल्याने माझा तिच्याकडील मुक्काम सर्वतोपरी सुखाचा व आनंदाचा झाला. माझें रूथवर जणूं मोठीच बहीण असें प्रेम जडलें. तसं पाहिलं तर रूथच्या आणि माझ्या वयांत पंचवीस वर्षांचें अंतर असावें. तिची एकुलती एक मुलगीच माझ्याएवढी व तिला तीन मुलें (म्हणजे रूथचीं नातवंडें) होतीं. रूथचा नवरा लढाईमध्ये देशासाठी लढतांना मृत्यु पावला होता. त्याच्या मृत्यूनंतर अपुरें राहिलेलें घर बांधून पैशाची व्यवस्था, मुलाचें लग्न वगैरे सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून रूथने स्वत:ला व तिच्या वडिलांना नीटपणें राहता येईल, इतपत स्वास्थ्य निर्माण करून ठेविलें होतें. ती फार श्रीमंत नव्हती; पण खाऊन-पिऊन सुखी होती, तत्त्वज्ञानाला वाहून घेण्यासाठी रिकामी राहण्याइतकी सुखी होतीच होती. भगवद्गीतेवर तिने मला विचारलेले प्रश्न—माझीं उत्तरें—योगाभ्यासाबद्दल तिचा ध्यास आणि

मला नसलेला गंध—आमचीं संभाषणें म्हणजे केवळ मजेदार होतीं. मला तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करण्याचें कां जमलें नाही, असें राहून राहून वाटे.

डॅडी मला कांही वाचून दाखवीत, कांही उपदेश करीत आणि वयाने ८६ वर्षांचा असलेला तो गृहस्थ अखंडपणें ज्ञानपान करीत बसलेला पाहून माझी मलाच लाज वाटली. नुसत्या खाण्यापिण्याने माणूस जीवन जगत नाही. देहाने जगला तरी समाधानाने जगण्यासाठी त्याला आणखी कांही खाद्य लागतें. आपल्याकडे खाण्यापिण्याची तरतूद करतां करतांच माणूस टेकीला येतो; मग ज्ञानलालसा, बुद्धिपिपासा अशासाठी कोणाला आच लागणार ? रूथच्या वडिलांना मी फार आवडू लागलें. कारण एक श्रोता मिळाला आणि दुसरें म्हणजे, मी फार लहान आहे; तेव्हा तिला अनुभवी सल्ल्याचें शिक्षण देऊन वळविणें सहज शक्य आहे, अशासारखें त्यांना वाटत असावें. " तुझा साधेपणा उल्लेखनीय व पौर्वात्य संस्कृतीबद्दल ज्या आपल्या कल्पना होत्या त्यांच्याशीं मिळता-जुळता आहे," असें तीं दोघें मला वारंवार म्हणत. कांही वेळां जाणतेपणा, कर्तेपणा या गुणांपेक्षां बालिशपणा व मोकळेपणा लोकांना जास्त आवडतो, हा अनुभव मला जर्मनींत आला.

रूथ दिसायला सुरेख होती, असायला शाहाणी होती, बोलायला गोड व स्वभावाने प्रेमळ पण करारी होती. तिला साडी नेसण्याची आत्यंतिक इच्छा आणि हौस. आयुष्यांत कधी पुरी होईल असें तिला वाटलें नव्हतें आणि आता मी तिला भेटल्यानंतर तिने तें हितगुज सांगतांक्षणींच तिला आवडली ती साडी मीं तिला सरळ सरळ देऊन टाकली. इतकेंच नव्हे तर नेसायला शिकविली, नेसवून दिली, सुरेखसा ब्लाऊज बक्षिस दिला व आणखी एखादी साडी हिंदुस्थानांतून जमेल तेव्हा पाठवून देईन असें आश्वासन दिलें. रूथने मला फक्त कडेवर घेऊन नाचविलें मात्र नाही. तिला इतका आनंद झाला आणि तिचा आनंद पाहून मला जो आनंद झाला तो प्रसंगच अवर्णनीय. रूथ साडी नेसल्यानंतर राजघराण्यांतील घरंदाज राणीसारखी दिसत होती. अजूनहि केव्हां केव्हां ती तीच तीच साडी हौसेने

समारंभाला नेसून जाते व आपल्या भोवती कसा इतर स्त्रियांचा गराडा पडत असतो ह्याचीं वर्णनें मला लिहिते.

रूथला जर्मन शास्त्रीय संगीताचें वेड. हिंदी संगीत मी गाऊन दाखवितांच तिला असें कांही भारल्यासारखें झालें कीं, दुसऱ्या दिवशी मुलीच्या टेप रेकॉर्डवर माझीं तीन गाणीं रेकॉर्ड करून घेऊन माझा आवाज आपल्या मुठींत तिने बंदिस्त करून ठेविला. हिंदी गायन पद्धतींत हृदयाला हेलकावे देणारे कांहीतरी गूढगुंजन आहे ह्याचा पडताळा तिलासुद्धा आला. मी इतक्या देशांत इतक्या तऱ्हेचा स्वरविलास पाहिला; पण हिंदी संगीताची सर कशालाहि नाही. आपण भारतीय खरोखरीच भाग्यवान कीं, आपल्यासारखें संगीत आपण पूर्णपणें चाखूं शकतों. ज्याला हिंदी संगीत रुचत नाही, आवडत नाही, थोडेंहि कळत नाही तो दुर्भागीच नाही तर काय ?

रूथचीं तीन नातवंडें रूपी, उनवेली व मनवेली मला एक दिवस भेटायला आलीं व आपल्या घरीं आम्हांला घेऊन गेलें. जर्मन लोकांचें दुसरें घर मी माझ्या घराप्रमाणें आंतपर्यंत जाऊन हक्काने बघून आलें. जर्मन स्त्रिया घरांत किती कष्ट करतात, हें मी डोळ्यांनी पाहिलें. रूथ व तिच्या मुलीच्या तोंडून हिटलरच्या अमदानींत कसा कारभार होता, त्याचीं वर्णनें ऐकत रंगून गेलें. स्वार्थत्याग म्हणजे काय, देशप्रेम कशाला म्हणतात, ह्याचीं जागतीं चित्रें डोळ्यापुढे त्या उभ्या करीत असतांना तल्लीन होऊन गेलें. जर्मन लोक स्वभावाने व्यवहारी; पण अगदी सरळ व प्रामाणिक वाटले. इंग्लिश लोकांना खरे प्रतिस्पर्धी जर्मन लोकच आहेत. दुर्धर परिस्थितींतून अनेकदां जावें लागूनहि जर्मन लोक बिलकुल दीनवाणें, उदासवाणें किंवा हताश झालेले दिसत नाहीत. अविरत कष्ट हेंच त्यांचें ब्रीदवाक्य दिसतें. ते जरी थोडेसे लुच्चे असते तरी त्यांनी इंग्लिश लोकांना टक्कर दिली असती; परंतु ते फारच चांगले आहेत. निर्हेतुक चांगुलपणामुळे जर्मन लोकांचें हाडवैर असें कोणाशीच नाही; परंतु धूर्तपणा व कावेबाजपणा ह्यांच्या अभावामुळे त्यांना फार दुःख भोगावें लागलें.

जर्मनींत प्रामुख्याने पहिल्या प्रथम भासणारी गोष्ट म्हणजे स्वच्छता. मकरपुऱ्यातील फरसबंदी स्वच्छ नसेल इतके स्वच्छ, लख्ख येथील रस्ते आहेत. आगगाडी पुलावरून जातांना तींतून दूरवर पाहिलें कीं, हे रस्ते

सूर्यकिरणाप्रमाणें दूरवर प्रकाश पाडीत चालल्याप्रमाणें वाटतात. जर्मनींत जंगलें पुष्कळ आहेत; परंतु जंगलें म्हणजे आपल्याला वाटतें तशीं नाहीत; तर उंचच उंच झाडांची दूरवर पसरलेलीं सदा हिरवीगार; परंतु हिंस्त्र श्वापदांविरहित अशीं आकर्षक जंगलें आहेत.

रूथच्या खेड्यांतून म्युनिकला जाणें सोपें होतें. मी एकदोनदा तिकडे फेरफटका करून आलें. म्युनिकला वस्तु फार चांगल्या मिळतात. आपल्याकडे काश्मिरची वेलपत्ती कलाकुसरीचें जसें वैशिष्टय आहे त्याप्रमाणें सुंदर सुंदर लेसेस बनविणें हें म्युनिकचें वैशिष्टय आहे. सुरेख बाहुल्या, लेसेस, घरगुती वापरतां येणाऱ्या एका ठराविक लाकडापासून आणि वेतासारख्या गवतापासून केलेल्या वस्तु खूप मिळतात. मीं म्युनिकला थोडीफार खरेदी केली आणि एक हातघड्याळहि खरेदी केलें. जर्मन खेळणीं फार सुंदर असतात. कोणताहि जिन्नस बाजारांत पाठवितांना अतिशय बारकाईनें तपासणी करून पाठविलेला असतो तेव्हां बिनधोक खरेदी करावा. म्युनिकमध्ये हिंडावयाला फार मजा वाटली. पॅरिससारखा अति गजबजलेला व अस्ताव्यस्त बाजार येथे आढळला नाही.

म्युनिकमध्ये उल्लेख करण्यासारखी आणखी एक गोष्ट मीं पाहिली. ती म्हणजे Red Baloon नांवाचा उत्कृष्ट सिनेमा. मी इंग्लंडमध्ये असतांना हाच चित्रपट खास पॅरिसहून मागविण्यांत येऊन केवळ राजकुटुंबियांना दाखविण्यांत आला होता. राणी व तिचीं दोन मुलें ह्यांना दाखविण्यासाठी जागतिक फिल्म फेस्टिव्हलमध्ये अद्वितीयत्व पावलेला हा सिनेमा इंग्लंडमध्ये जनतेला दाखविण्यांत आला नव्हता. फक्त वर्तमानपत्रांतून त्याचा बोलबाला चाललेला होता. तो चित्रपट फ्रेंच लोकांनी काढलेला. ह्यांत नायक एक सहा वर्षांचा मुलगा व तो एक वाक्यहि बोलत नाही. गोष्ट अगदी साधी कीं, त्याला एक फुगा घेऊन दिलेला असतो व तो त्याचा जीवश्चकंठश्च मित्र बनून शाळेंत घरींदारीं त्याची कशी सोबत करतो व त्याच्या त्या भावनांची वडिलधाऱ्या जाणत्या म्हणविणाऱ्या भोंवतालच्या व्यक्तींना अगदीच कशी कल्पना नसते!! फुगा आणि मुलगा ह्यांचें संगनमत प्रेक्षकांना स्पष्ट उमगतें व ह्या हृदयस्पर्शी गोष्टींत ते कसे रंगून जातात. शेवटीं गल्लींतील मुलांना त्या मुलाचा फार हेवा

वाटत असतो. तीं त्या दोघांच्या पाठीस लागून तो फुगा हरतऱ्हेने ताब्यांत घेण्याचा प्रयत्न करतात. तो मुलगा व फुगा त्या प्रतिस्पर्धी मुलांशीं चांगलाच सामना देतात; पण शेवटीं फुगा जखमी होतो व त्याला घाम फुटतो आणि हळूहळू त्यांतील हवा जात जात तो लेचापेचा होत असतांना त्याचा जणू मृत्यूच होत आहे हें पाहून मुलाच्या बरोबर प्रेक्षकहि हुंदके देऊं लागतात इतका सुंदर चित्रपट आजतागायत माझ्या पाहण्यांत नाही. " चुरगळलेला पतंग " ही भावकथा श्री. अत्रे ह्यांनी ह्याच गोष्टीवरून लिहिली असल्याचें मला स्मरतें. तीहि गोष्ट फार छान आहे; परंतु "Red Baloon" हा सिनेमा मात्र अविस्मरणीय आहे. मुलांच्या मनो-व्यापारांची आपण किती उपेक्षा व अवहेलना करीत असतों हें त्या पडद्यावर बघून आपली आपल्यालाच लाज वाटते. या सिनेमावर लिहीत बसावयाचें म्हटलें तर दहा पानें सहज लिहून होतील.

रूथच्या सहवासांत माझे दिवस जात होते तें मला कळलेंहि नाही. चार दिवसांपूर्वी आमची ओळख झाली आहे, हें आम्ही कबूलहि केलें नसतें. माझा जाण्याचा दिवस आला तेव्हां रूथला आणि तिच्या वडिलांना फार वाईट वाटलें. मला तर भडभडून रडूं येईल कीं काय, अशी भीति वाटे. मला रूथच्या घरीं भेटायला तिने ओळख करून दिलेल्या मैत्रिणी आल्या होत्या व रूथ आणि तिची मुलगी तर म्युनिक स्टेशनवर येऊन मला गाडींत चढवून मग परत येणार होत्या. त्या दोघीजणी माझी सोय व्हावी म्हणून आल्या; पण मी माझा आयत्या वेळी कांही तरी गोंधळ करण्याचा खाक्या सोडला पाहिजे ना ? म्युनिकला गोंधळ होण्याचें कारण नव्हतें. तिकिट बरोबर होतें. गाडीची वेळ माहीत होती, रूथ बरोबर होती, दाराशीं मोटार होती; परंतु व्हावयाचा तो गोंधळ झालाच ! लंडन-पासून म्युनिकपर्यंतचें तिकिट वापरून झाल्यामुळे मी तें पुस्तक माझ्या छोट्या बॅगमध्ये न ठेवतां मोठ्या बॅगेंत टाकून दिलें. थॉमस कुकने मला थेट बसऱ्यापर्यंतच्या तिकिटांचें एक पुस्तकच तयार करून दिलें होतें. कोणी गाडींत तिकिटें पाहण्यासाठी आलें तर पासपोर्ट आणि तें पुस्तक मी पुढे करीं. तिकिटचेकर पाहिजे तो भाग नेमका फाडून घेई किंवा तपासल्याची खूण करून पुढे निघून जाई. म्युनिकच्या पुढील प्रवासाचीं तेवढीं तिकिटें

हातांत सज्ज ठेवून मी ११-२० ला म्युनिकच्या प्लॅटफॉर्मवर आंत जाऊं लागलें आणि चेकरने मला आडविलें कीं, "जेथपासून प्रवास सुरू झाला तेथपासूनचें तिकिट दाखवा !" तें पुस्तक मोठ्या बॅगेंत होतें आणि ती तर मी रूथबरोबर आंत गाडींत पाठवून दिली होती. मी चेकरला "मला आंत जाऊं दे, मी तुला तें तिकीट आणून देतें," म्हणून सांगण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! आतां काय करणार? गाडी सुटायला फक्त दहा मिनिटेंच राहिलीं होतीं. तितक्यांत मी अद्यापि कशी आलें नाही, म्हणून उतावीळ झालेल्या रूथने आगगाडीच्या डब्यांतून मला तिकिट चेकरशीं हुज्जत घालतांना पाहिलें मात्र आणि ती ताबडतोब तेथे आली. तिला मी सर्व हकीगत समजावून दिली परंतु रूथ तरी ती मोठी बॅग तिकिटचेकरपर्यंत आणणार कशी ? शेवटी तिने त्या तिकिट चेकरला सांगितलें कीं, "हिच्याकडे सर्व कांही आहे. तुम्ही आंत गाडींत चला, आणि तिच्याजवळ तिकीट नच सापडलें तर ती सर्व पैसे भरील," तेव्हां कोठे त्याने मला आंत जाण्यास परवानगी दिली. परंतु या गोंधळांत इतका अवधि गेला कीं, जेमतेम डब्यांत येऊन जागेवर बसतें न बसतें तोंच गाडी सुटली. लहान-सहान, क्षुल्लक गोष्टी वाटतात; पण त्यांच्याकडे दुर्लक्ष झालें तर कशी अडवणूक होते, ह्याचा नुकताच पुरेपूर अनुभव आल्याने सर्व कागदपत्र मोठ्या बॅगेंतून काढून लहान हात-बॅगेंत घालावयाचें ठरविलें. ह्या सगळ्या घाईंत ज्या रूथच्या घरीं माझे दिवस माहेरवासांत गेले तिचा मनाजोगा निरोपहि घेण्याचें मला सुचलें नव्हतें. गाडी हालली तेव्हा आमची ताटातूट होत आहे हें आमच्या ध्यानांत आलें. पाण्याने भरलेल्या डोळ्यांमध्ये एक-मेकींच्या हेलावणाऱ्या हृदयांचीं प्रतिबिंबें पहात पहात आम्ही निरोप घेतला आणि जणूं काय स्वतःचें घर सोडून मी आतां कोणा दुसऱ्याकडे जात आहें, अशा जड अंतःकरणाने जर्मनी सोडली.

जर्मनीची सरहद्द ओलांडून मीं ऑस्ट्रियांत प्रवेश केला आणि पुन्हां एकदा स्वित्झर्लंडची आठवण करून देणारें सृष्टिसौंदर्य दिल खेचून घेऊं लागलें. दूरवर दिसणारा आल्प्स पर्वत, त्याच्या शिखरांवरील शुभ्र बर्फाचे थर, एरवी धबधब्याप्रमाणें खालीं कोसळणारे; पण आतां थंडीमुळे बर्फाच्या रूपाने चांदीच्या रसाप्रमाणें जणूं खालीं कोसळणारे शुभ्र प्रवाह,

एरवी खळखळा वाहणाऱ्या अवखळ पण आतां थिजलेल्या प्रवाहामुळे गर्भवतीच्या चालीने चालणाऱ्या नद्या, अशा या नितान्त रमणीय सृष्टिसौन्दर्यांतून, जंगला-खेड्यांतून रस्ता झपाट्याने कापीत आमची गाडी पुढे जात होती. भोवताली जणूं कांही पहाण्या-सवरण्याला तिला सवडच नव्हती. एफेल टॉवरवरून खेळण्यांतील आगगाडी एवढी दिसणारी ती हीच गाडी, आल्प्स पर्वताच्या माथ्यावरून मुंगीसारखी भासणारी ती हीच गाडी, आणि नऊ राष्ट्रांना बगलेंत घालून हजारों माणसांना त्यांच्या त्यांच्या घरीं पोचविणारी ती हीच गाडी, जर्मनींतील आगगाड्या इतक्या लहान आहेत व छान चालतात कीं, मखमलीवरून मोत्यांचे सर ओवळून सोडून द्यावे! जर्मन लोकांची शाब्बास आहे. पुन्हां कधी मी युरोपांत गेलें तर खात्रीने जर्मनींत राहीन, इंग्लंडबद्दल पुस्तकांत वाचीन, इटलीबद्दलचीं स्वप्नें रंगवीन व स्वित्झर्लंडमध्यें सुट्टी घालवीन, ऑस्ट्रिया ओलांडून युगोस्लाव्हियांत आलें. बेलग्राडला उतरलें मात्र आणि हिंदुस्थानच्या सीमेवरच येऊन पोचल्यासारखें वाटलें. मूर्तिमंत दारिद्र्य ! संवय नसलेल्या डोळ्यांना कसें भासतें, याचा उत्तम अनुभव युगोस्लाव्हियांत आला. तेथील शेतकरी वगैरे आपल्याकडील शेतकऱ्यांसारखेच, शेतकीची पद्धतीहि तशीच. लोकांची रहाणी, बच्यांची गर्दी, आळशांचें तांडे, निरुद्योगी टवाळांचे थवे, कळकट लोकांचे पुंजके, सर्व कांही अगदी आपल्या परिचयांतल्यासारखें. बेलग्राड स्टेशनबाहेर पडतांच रस्त्यांत ट्रॅमच्या मार्गांवर गबाळेपणाने उभे राहून किंबहुना रस्त्यांतच फतकल मारून बसलेले कांही लोक पाहिले तेव्हा ह्याच ट्राममधून थोड्या वेळाने भेंडीबाजारांत पोहोंचूं, असेंच मला वाटलें. थोडक्यांत म्हणजे पश्चिमेचा गार वारा थांबून पूर्वेचे उष्ण भपकारे सुरू झाले. नवकोनी बंगले आणि हिरवे गार बगीचे गडप झाले अन कशींबशीं जीव धरून उभीं राहिलेलीं घरें जिकडे तिकडे दिसूं लागलीं. रंगीबेरंगी प्रकाश पाडणाऱ्या किणकिण्या आवाजाचीं नकशीदार झुंबरें केव्हांच मालविलीं आणि मिणमिणत्या दिवल्यांचा कारभार चालू झाला. भरतनाट्यम् नृत्यावर पडदा पडला आणि जेजुरीचा गोंधळ सुरू झाला. मंद मधुर सुगंधी अत्तरांच्या सुवासांत वावरणाऱ्या दिव्यांगना गुप्त झाल्या आणि

आतां दिसल्या त्या कडकलक्ष्मी वावरूं लागल्या. जयजयवंतीच्या आळवणी विरल्या आणि कडकडलेल्या ढलप्यावर थाप बसली. स्वप्न-सृष्टींत रंगलेल्या माणसाला जाग यावी तशी मला जाग आली. प्रेमपत्रे लिहिण्याऐवजीं मृत्युपत्र लिहिण्याचा व्यवहार करावयास बसावें तसें कांहीसें मला झालें.

बेलग्राडची पिक्चर गॅलरी सोडली तर तेथें फारसें बघण्यासरखें कांही नाहीं.; म्यूनिकला मीं पिक्चर गॅलरी बघितली होती तीच चांगली; पण चित्रांच्या प्रतिकृति विकत मिळाल्या नाहीत. बेलग्राडच्या एकंदर स्वरूपावरून पिक्चर गॅलरीसंबंधी फारशी अपेक्षा नव्हती, त्यामुळेंच कीं काय पण मला तेथील कांही चित्रें फारच आवडलीं. "कोंबडयांची झुंज" हें चित्र तर मी कमींतकमी अर्धातास पहात राहिलें. बेलग्राडहून मी इस्तंबूलला आलें त्यावेळी माझ्याबरोबर जे लोक होते ते अमेरिकन्स किंवा अमेरिकेंत बरेच दिवस राहून आलेले होते. दोन गृहस्थ अमेरिकेचे रहिवाशी व एक इराणी बाई अमेरिकेंत राहिलेली. नवऱ्याशीं घटस्फोट घेऊन पुन्हा आयुष्याची सुरवात करण्यासाठी आफ्रिकेच्या उत्तर टोकाला वळसा घालून कैरोवरून काबूलला जाणारी होती. दुसरी एक स्विस मुलगी होती. तिचें एका अमेरिकन मुलाबरोबर लग्न ठरलेलें होतें व तीं दोघें आपले पुढचे बेत ठरविण्यांत गर्क होतीं. आपलें आयुष्य हें प्रयोग करण्याची कर्मभूमि असून एकामागून एक असे लग्नाचे प्रयोग करणारे त्या इराणीबाईसारखे लोक पाहिले कीं, आपण किती तोलून मापून आणि ठराविक पट्टीवरून चालत आहोंत असें मला वाटे. कोणाशींहि चटकन् लग्न करून घेणें, वाटल्यास मोडून मोकळें होणें, घर आज येथे तर उद्या तेथे, मुलें असल्यास त्यांच्या नशिबावर त्यांना सोडणें, पैसा मिळत गेला तरी त्या उलाढालीबद्दल धैर्यानें व्यवहार करणें इतका पक्केपणा अंगीं असणाऱ्या बायका आपल्या इकडे क्वचितच पहावयास मिळतात. इतकें मात्र खरें कीं, अशा लोकांशीं बोलणें फार चित्तहर्षक असतें. मी एकटीने जगाशीं टक्कर दिली असें मला वाटत होतें. तें अगदीच खोटें होतें. माझ्या मानानें त्या इराणी बाईच्या बेदरकारपणाची कमालच म्हटली पाहिजे. मुसलमानी संस्कृति कुठें, अमेरिकन संस्कृति कुठे, इराण कुठे, युनायटेड

स्टेटस कुठे–श्रीमंती ह्या समान गुणावर जगांत कोणीहि एकत्र येऊं शकते ह्यांत संदेह नाही.

इस्तंबूलला आम्ही पोहोंचलों तों पाऊस. मी ज्या लोकांकडे उतरणार होतें त्यांना मी कोणत्या गाडीने येतें हें कळविलेलें नव्हतें, फक्त मी त्या आठवड्यांत येणार येवढें माहीत होतें. मी स्टेशनवरून फोन करतांना मिसेस टोझानने कसें घरीं यावयाचें तें सांगितलें. इस्तंबूलला, एडनला पाहिल्या तसल्याच डॉज आणि शेवरोलेटच्या टॅक्सीज पुष्कळच आहेत. मी एक टॅक्सी घेऊन माझ्या जवळच्या पत्त्यावर नेण्यास ड्रायव्हरला सांगितलें. तो पत्ता बहुधा त्याला माहीत असावा. मोठ्या आदराने मान लववून मला सलाम करून त्याने एका संगमरवरी प्रासादासमोर गाडी उभी केली, दारांत दोघे नोकर होतेच. त्यांनी मी येतांच माझें सामान वगैरे उचलून आंत नेलें व मी संगमरवरी जिन्याच्या पायऱ्या चढून एका मोठ्या दिवाणखान्यांत प्रवेश करतें न करतें तोंच दुसऱ्या तसल्याच जिन्यावरून मिसेस टोझान खाली येत होत्या. आम्ही एकमेकींना न्याहाळून घेतलें आणि गप्पांना सुरवात झाली. सकाळचे दहा वाजले होते आणि त्यांच्याकडे जेवणासाठी कांही लोक यावयाचे होते. तेव्हा मिसेस टोझान सकाळपासून फार उद्योगांत होती. मला दुसऱ्या मजल्यावरच्या छोट्या खोलींत घेऊन गेली व माझा म्हणून जो रहाण्याचा भाग होता (Suite) तो तिने मला दाखविला.

टोझान कुटुंब हें इस्तंबूलमध्ये फार प्रसिद्ध दिसलें. त्यांच्या घरांत–– घर कसलें! तो राजवाडाच––बसून बाहेर बास्फोरसच्या सामुद्रधुनीचा सुंदर प्रदेश दिसतो. संगमरवरी जिन्याच्या पायथ्याशीं सुंदर बाग दिसते. निरभ्र आकाश, पक्ष्यांचा किलकिलाट, रंगी-बेरंगी फुलें यांवरून दृष्टि फिरूं लागली कीं, वृत्ति उल्हसित होते. घरांत उंची फर्निचर म्हणजे बडोद्याच्या राजवाड्यांत सोन्याच्या मुलाम्याने मढविलेल्या खुर्च्या मी पाहिल्या होत्या. तसल्याच टेबल-खुर्च्या, भारी अन्टॉयनेटची कपाटें, टेबलें पाहिलीं होतीं तसलीं कपाटें, बसावयाचे सोफासेटस, दिल्लीच्या मोंगल राजांच्या वैभवांतून दिसणारे कोरीव कामाचे केवळ नमुनेच असे विलायती पलंग एक ना दोन असें कितीतरी सामान तेथे होतें. मोंगल बादशाहाचीच जणू अशी सजविलेली, शिसवीच्या लांकडाची कोरीव महिरपी लावून मांडव

घालावा तशा प्रकारें नटविलेली, मि. टोझान यांची खोली म्हणजे कलाविलासाची परमावधीच होती. माझ्या खोलींतलें टॉयलेटचें टेबलच कमींत कमी १।। ते २ हजार रुपयांचें सहज होतें. त्यावर केवढा मोठा आरसा, त्या आरशाभोवती दुर्मिळ अशा चिनी मातीच्या चिमण्यांनी मढविलेली केवढी तरी वेलपत्ती आणि उंची उत्तम चकाकणारे टीकचें लाकूड-- असल्या आरशासमोर बसून मी कसली सौंदर्यसाधना करणार होतें कोणास ठाऊक ! खिडक्यांना पडदे, उंची उंची जाळीदार कापडाचे व शिवाय जाडजूड मखमलीचे जडजड जरीचे गोंडे लावून सुशोभित केलेले लावले होते. एकसंध काचेंतून कोरून काढलेली छोटीशी तपकिरीची डबी, चिनी मातीचा एकसंधी सुंदर पुतळा, सोन्याच्या मुलाम्याने नटलेल्या सिंहाच्या पाठीवर रेलून बसलेल्या संगमरवरी बाईची पुतळा व त्या खालीं एक भलें मोठें घड्याळ, पोवळ्यांच्या मूर्ति, मोत्याच्या शिंपल्यांची नकशी केलेलीं अगणित पात्रें, उंची काचांचें (Cut-glass) पेले, फुलदाण्या, उत्तमोत्तम चित्रें, वीतभर पाय आंत जाणारे सुखद स्पर्शाचे पर्शियन गालीचे, अशा एक ना हजार प्रकारच्या वस्तु घरभर आकर्षक रीतीने मांडलेल्या दिसल्या. इतका सुंदर राजवाडा, इतकी सुंदर संगमरवरी फरसबंदी; पण मिसेस टोझानच्या पायाचा स्पर्श म्हणजे जमिनीलाहि जणूं पर्वणीच वाटावी, इतकी गालिचांनी आच्छादून टाकली होती. आमच्या घरीं सुंदर वस्तु चोहोंबाजूंस सदैव असण्याची, पहाण्याची संवय मला होती; तरीसुद्धां टोझान दंपतीने कलात्मकतेने सजविलेला तो प्रासाद पाहून मी थक्क झालें. इतकें असूनहि त्या राजवाड्याला "घरपणा" होता. बनारसी बुट्ट्यांचा झोकदार शालू नेसूनहि एखादी सुंदर तरुणी घरांतच आपण असल्याइतकी सहजपणें वावरावी तसला सहजपणा तेथे दिसत होता. बिलोरी आरशांत पडणाऱ्या आपल्या प्रतिबिंबाकडे पहात पुढे पुढे जातांना प्रत्येक महालांत जणूं मिसेस टोझान आपली छाप ठेवीत ठेवीत चालली आहे असें वाटे. बोराएवढ्या खऱ्या मोत्यांचा कंठा अगदी सहजगत्या गळ्यांत घालून घाऱ्या डोळ्याची, किंचित् जाड्या आवाजाची परंतु वयाने आहे त्याहून कितीतरी कमी उमर दाखविणारी मिसेस टोझानची मूर्ति माझ्या नजरेसमोर अजून आहे. मि. टोझान अगदी साधे नम्र व शांत गृहस्थ आहेत.

त्यांच्या आयुष्यांत अशा कांही गोष्टी घडल्या कीं, त्या लाखांत एखाद्या-च्याच वाटयाला येतील. इस्तंबूल शहर ज्या सात टेकडयांच्या आसमंतांत वसलें आहे. त्या टेकडयांसकट पलीकडचा बॉस्फरसाचा मुलूख त्यांच्या मालकीचा होता. तेथें त्यांच्या राहण्याच्या घरांत खास षोकाखातर हरणें पाळून हरणांची शिकार करण्यासाठी जंगल अगदी परसदानी होतें. बॉस्फ-रसच्या राजवाडयाच्या मानानें सध्याचें आमचें हें रहातें घर कांहीच नाही," असें मिसेस टोझाननें मला सांगितलें. इंग्लंड, इराण, तुर्कस्थान आदिकरून सर्व राजघराण्यांतील लोकांचा त्यांच्याशीं संबंध येत असल्यानें इतपत घर रहावयास पाहिजेच, असा त्यांचा दृष्टिकोन होता. मिस्टर टोझान ह्यांना फारसें इंग्लिश येत नव्हतें. मिसेस टोझान उत्तम इंग्लिश जाणीत होत्या, सकाळींच उठून टाइपरायटर घेऊन पत्रें काढणें, वाचलेल्या पुस्तकांवर नोटस तयार करणें, मि. टोझान ह्यांचा सर्व इंग्लिश पत्रव्यवहार बघणें, अशीं कामें करण्यांत ती दंग असे. तरुणपणीं ती फारच धडाडीची आणि दिसायला सुरेख असली पाहिजे, असा मीं कयास बांधला. इतकीं मोठीं माणसें हिंदुस्थानांत माझ्या परिचयाचीं झालीं असतीं तर--पण तें शक्यच नाही. कारण जरा कोठे रु. ७०० ते १००० पगार नाही मिळाला तर स्वत:ला आभाळांत अधांतरी चालणाऱ्या धर्मराजाप्रमाणें समजणारे लोक मीं पाहिले होते. त्यांच्यांत हा विनय यावा कसा? लक्ष्मी मिळ-विण्यापेक्षा तिला राबविणें अवघड आहे. स्वत:जवळ किंचित् पैसा आला तर दुसऱ्याकडून लाचारीची अपेक्षा करणाऱ्या हिंदुस्थानांतील धनिक (?) लोकांच्या दरिद्री मनाची कींव न येईल तर काय होईल? सबंध संपत्ति एका बाजूला सोडली तरी मिस्टर व मिसेस टोझान ह्या दोन व्यक्तींना व्यक्ति म्हणूनच किती किंमत होती, तें त्या दोघांची कर्तबगारी, त्यांचें चरित्र ऐकूनच कळण्यासारखी होती. लक्ष्मीला जागच्या जागीं ठेवणारे ते लोक अंगीं तसेच कांही गुण असल्याखेरीज का इतक्या उठावदार व्यक्ति-मत्त्वाचे झाले? असो. इस्तंबूलमध्ये बघण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत त्यांत एक टोझानचें घर आहे एवढें सांगितलें म्हणजे मला वाटतें पुरे आहे.

मी गेलें त्याच दिवशीं सकाळीं जेवणासाठी पांच-सात निवडक मंडळी त्यांच्याकडे येणार होती. तेव्हा "तूं तयार होऊन खालीं ये," असें मि.

टोझानने सांगतांच मी बुचकळ्यांत पडलें. हे काय तऱ्हेचे लोक असतील, ह्याची मला कल्पनाच येईना. मी आपला समारंभी पोषाख करून खालीं आलें. मोठ्या दिवाणखान्यांत आम्ही पाहुण्यांना सामोरें जात होतों व आंत जेवणाची तयारी करण्यांत दोन बबर्जी गुंतले होते. वर्ल्ड प्रेस जर्नलिस्ट टर्किश लॉयर, मँगनीझ ओअरचे धनाढ्य व्यापारी आणि एक टर्किश स्त्री-बॅरिस्टर अशांसारख्या बड्या मंडळीमध्ये बसूनहि मला त्यांच्यापैकी कोणी "अवघडल्या" सारखें वाटेल असें केलें नाही. मी खालच्या मानेने लाचारीने त्यांच्यापुढे वागावें असें अपेक्षिलें नाही. माझी त्यांच्याशी ओळख होऊन आम्ही ३ वाजेपर्यंत गप्पागोष्टी करून ती मंडळी परतेपर्यंत मला अगदीसुद्धां बावरल्यासारखें झालें नाही. त्यांच्यापैकी कोणी प्रेसिडेंट ट्रुमनचा मित्र, कोणी वेंडेल विल्कीचा दोस्त, कोणी ड्यूक ऑफ विंडसरचा नातेवाईक असल्या गोष्टी मला मागाहून कळल्या.

इतकें सारें होतें तरीहि दिपून गेल्यासारखें मला वाटलें नाही किंवा नेहेमी येथेंच राहिलें तर किती छान होईल, असेंहि वाटलें नाही. कारण विचाराल तर कलाकृति जमविणें हें मनोरंजक असलें तरी स्वतः कला आत्मसात् करणें ही गोष्ट कांही निराळ्याच आनंदाची आहे. टोझान दांपत्य उत्तम रसिक असलें तरी कलावन्ताची ओढ किंवा स्वयंनिर्मितीचा आनंद त्यांना असणेंच शक्य नाही. रेकॉर्डस् जमविण्याचा आनंद आणि एखादी तान स्वतःच्या गळ्यांतून मनासारखी निघाल्याचा आनंद ह्यांची तुलना कशी होऊं शकेल? श्रीमंतीशेजारीं सहजता हा संगम फार सुरेख वाटतो हें खरें. अशा प्रासादतुल्य घरांत राहणाऱ्या बाईला साबूदाण्याच्या पापड्या व चिरोट्यासारख्या पातळ पापुद्र्याचीं बिस्किटें खातांना पाहून फारच गंमत वाटते. आपल्या ऐहिक जगांतील स्थानाची पुरेपूर कल्पना असूनहि ह्यापेक्षा आपण पुढे जाणार आहोंत, त्या जगाविषयीचें तिचें कुतूहल पाहिलें म्हणजे पैसा हेंच सर्वस्व होऊं शकत नाही, ह्याची खात्री पटते.

इस्तंबूलच्या रस्त्यांतून फिरतांना मला बघायला इतकी गर्दी जमे कीं, मला फार चमत्कारिक वाटे. हिंदुस्थानी सिनेमा अतिशय लोकप्रिय असल्यामुळे साडी नेसणारी बाई म्हणजे जबरदस्त आकर्षण होतें. राजकपूर, नर्गिस तुमच्या ओळखीचीं आहेत काय, त्यांचें लग्न झाले आहे काय, त्यांना

आमचा नमस्कार सांगाल का, अशा प्रकारच्या विनंत्या करून टर्किश लोकांनी मला भंडावून सोडलें. फिल्मी संगीत तर त्यांना एकदम पसंत. कोणाला रस्ता, बस, ट्रॅम कांही विचारावयाची सोय नव्हती. कारण लगेच पन्नास साठ लोक भोवती जमत आणि भाषेच्या अभावीं कोणाला कांही सांगतां येत नसे. घरींच मी आणि मि. टोझान ह्यांमध्यें मिसेस टोझान दुभाष्याचें काम करी; पण बाहेर नेहमीच मी तिच्याच बरोबर जात असें असें नाही. इस्तंबूलमध्ये दारिद्रय, कळकट लोक, भिकाऱ्यांचे तांडे, कधी डोंगराळ क्वचित् हिरवागार व पुष्कळसा वैराण मुलूख हें सारें पाहून मी पूर्वेकडे फार झपाट्याने जात आहें, ह्याबद्दल शहानिशा करण्याची जरुरी उरली नाही. इस्तंबूलच्या बाजारांत मोत्यांचीं दुकानें, नानातऱ्हेचें उंची जडजवाहीर पाहून फार आनंद वाटला.

इस्तंबूल सोडण्याचें माझ्या जिवावर आलें नाही; पण टोझान कुटुंब परत भेटेल कीं नाही, ह्या साशंकतेने जरा वाईट वाटलें इतकेंच. माझ्याकडे असलेल्या, चहाचा पुडा, उदबत्त्या व आणखी कांहीं खास हिंदी पद्धतीच्या कलाकुसरीच्या–वस्तु त्या दोघांना देऊन टाकून वजन कमी झाल्याच्या आनंदांत बॅग उचलून बघतें आहे तोंच मिसेस टोझान माझ्या खोलींत आली, “ हें तुझ्यासाठी खास टर्कीतील लहानशी भेट (Present) देत आहें ती सामानांत बांध,” असें म्हणाली. खरं म्हणजे आतां काचाच्या पेटींत रहाणारी वस्तुसुद्धां मला जडच होती; परंतु तिच्या आग्रहापुढे कांही नको म्हणेपर्यंत तिने तें पुडकें उघडून माझ्या हातांत कोंबलेंच कांही तरी. तें काय आहे, तें पहाण्या अगोदरच त्याच्या वजनापुढें माझ्या हृदयांत धस्स झालें माझ्या चेहऱ्यावरचा नकोसेपणा लपवितां लपवितां मला थोडें झालें. चांगली ५–६ पौंडाची वजनदार पितळी कठपुतळी घंटा होती. ओझें वाहून वाहून वाकडे झालेले माझे खांदे तिला दिसले नसावेत, हें उघड होतें; नाही तर तिने हें संकट मला घातलें नसते. ती घंटा बॅगेंत टाकल्यानंतर माझ्याच्याने ती बॅग उचलून नुसतें बघण्याचें धाडस झालें नाही. ओझीं वाहणें हा माझा जन्मधर्मच दिसतो आहे. म्यूनिकला जरा स्वास्थ्यामुळे वाढलेलें वजन ओझी वाहून वाहून कमी होत आहे कीं काय, असें मला प्रतिदिनीं वाटे. इस्तंबूलपासून माझा पुढचा मुक्काम खरं म्हणजे **बगदादला होता. पण... ?**

● ● ●

# ११

# तीं रात्र व तो दिवस !

इस्तंबूल सोडीपर्यंतचा कार्यक्रम थॉमस कुक यानें आखून दिलेल्या कार्यक्रमानुसार ठीक चालला होता. पॅरिसला एक दिवसानें घडलेला फरक जर्मनींत जुळवाजुळव करून भरून काढलेला होता व इस्तंबूलला २५ तारखेला गाडी पकडून २९ तारखेला बगदादला पोहोंचून त्याच दिवशीं निघून ३० तारखेला बसऱ्याला जावयाचें व १ तारखेला 'डमरा' या बोटींत बसून १० मे ला मुंबई गाठावयाची इतकेच राहिलें होतें. ४ मेच्या ऐवजीं मी १० मेला मुंबईत पोहोचेन एवढाच बदल झाला होता.

गाडींत जागा चांगली मिळाली. टोरेस एक्सप्रेस आठवड्यांतून दोनदांच इस्तंबूल ते अलेप्पो अशी जाते व तिनेच बगदादला जातां येते. बगदाद ते बसरा ही गाडी पण ह्या दोन गाड्यांच्या वेळांना जोडून मिळते. मी लंडनहून बेत आखीत होते तेव्हा अलेप्पोला उतरून खाली दमास्कस येथे राहून नंतर पुढे जावें असा विचार होता. परंतु ज्यांच्याकडे मी दमास्कसला राहीन असें वाटत होते ते लोक स्वित्झर्लंडला रहावयास गेले असल्याचें कळल्यामुळे मी दमास्कसला रहाण्याचा बेत रद्द केला.

मी अलेप्पोला पोहोचावयाच्या आधींच आदल्या दिवशीं रात्रीं दहा वाजतां आमची गाडी टर्की व सिरिया ह्यांच्या सरहद्दीवर थांबली. ज्या


स्टेशनवर ही हद्द आहे तें अल्तमन सबाका हें स्टेशन अगदीच छोटेसे आहे व फक्त टर्कीश लोकांच्या हातांतून ती गाडी सिरियन लोकांच्या हातांत सोपवावयाची व सर्व उतारूंचे पासपोर्टस तपासावयाचें हें महत्त्वाचें काम तेथे उरकून घेण्यांत येते. पासपोर्ट तपासणाऱ्यांची डब्यांतून गर्दी झाली. लंडनमध्ये दोन दिवसांत आठ देशांचा व्हिसा मिळविण्याचा विक्रम मी केला होता; पण सिरिया व्हिसा मला मिळालेला नव्हता, ह्याची मला आठवण झाली. परंतु थॉमस कुकच्या प्रतिनिधीने मला सांगितलें कीं, "सिरियन सरकारची लंडन येथील कचेरी बंद असल्याकारणाने तुम्हांला गाडींतल्या गाडींत शिक्का मारून ते व्हिसा देतील. शिवाय तुम्ही सिरियांत रहाणार नसल्याने, जमिनीवर उतरणार नसल्याने (transit visa) तशी हरकत येणार नाही." सुएझ प्रकरणामुळे जी तेढ निर्माण झाली होती त्या भानगडींत जॉर्डन, सिरिया वगैरे देशांनी लंडनमधील आपापल्या कचेऱ्या बंद करून टाकल्या होत्या त्यामुळे त्या राष्ट्रांचा व्हिसा मिळविणें लंडनमध्ये आतां अशक्य झालें होते. माझे हें सर्व म्हणणें मी सिरियन पासपोर्ट चेकर्सना सांगितलें परंतु "व्हिसा नाही म्हणजे तुम्हांला जाऊं देतां येणार नाही. व्हिसा देण्याचा आम्हांस हक्क नाही." असें त्यांनी निक्षून सांगितलें. रात्रीं १०॥ ची वेळ आणि व्यवस्थित अंथरून घालून मी वर बर्थवर ताणून देण्याच्या विचारांत पडलेली अशा वेळीं मिणमिणत्या दिव्यांनी जेमतेम उजळलेल्या त्या झोपडीवजा स्टेशनवर भरल्या गाडींतून माझी बॅग व छोटी प्रवासी पिशवी घेऊन उतरतांना मला काय वाटलें असेल ह्याची कल्पना वाचकांनीच करावी. खालीं उतरून उभी राहिलें आणि पाहिलें तो डाव्या बाजूला टर्की व उजव्या बाजूला सिरिया अशी हुतूतूची हद्द घालून आमची गाडी उभी व रुक्ष चेहेऱ्यांचें मुर्दाड टर्क्स आणि हताश मुद्रेचे कर्तव्यदक्ष सिरिअन्स अशा खाकी कपड्यांतील ऑफिसर्सच्या गराड्यांत मी उभी. गाडींतले विशेषतः माझ्या डब्यांतील लोक कुतुहलाने खिडकीबाहेर डोकीं काढून माझ्याबद्दलची अनुकंपा एकमेकांशीं व्यक्त करीत कुजबुजत होते. मला भाषा कोणतीच येत नव्हती कीं, आतां काय करणार हेंहि ठरविणें अशक्य होतें. डोकें सुन्न झाले होते; पण का कोण जाणे मी डगमगले नाही, भ्यालें नाही. सरकारी नियम म्हणजे नियम;



क्रूर सिंहाकडून गुलामांच्या व ख्रिश्चनांच्या चिंधड्या उडविण्याचा खेळ रोमन राजे ज्या नाट्यगृहांत पहात असत तें इटलींतील नाट्यगृह



लेखिकेच्या समवेत भारतीय साडी परिधान केलेली पाश्चात्य मैत्रीण




सीरियन व्हिसा नसल्यामुळे ज्या स्टेशनवर सौ. विजया जोशी यांना उतरविण्यांत आले ते अल्तमन सबाका स्टेशन व अन्य संबंधित ठिकाणांचा नकाशा—प्रकरण ११

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ...... ...... वि:

हा खाक्या कां मी पाहिल्याने बघत होतें थोडाच ? जसें हिंदुस्थानांत तसेंच इतरत्र. जें आमच्या सरकारी कारभारांत तसलेंचें असल्या मुसलमानी राष्ट्रांच्या कारभारांत दिसलें तर नवल तें काय ? लोकांसाठी कायदे, नियम असतात तेव्हा सारासार विचार वापरणें अधिकाऱ्यांना भाग पडते तेथेच कारभाराचें कौशल्य आहे हें मी इतक्या क्लिष्ट अभ्यासक्रमांत कित्येक वेळा तरी शिकलें होते, पण नियमांसाठी नियम, किंबहुना नियमांसाठींच माणसें असल्या आडमुठी धोरणाचें कित्येक हुद्देदार (!) मी मुंबईत पाहिले होते, तसलेच आज येथेहि माझ्या वाट्यास आले, त्याला कोण काय करणार ? सिरियन व्हिसा ठोकून घेतल्याखेरीज मला कांही ठरवितां येणार नव्हते. उगीच चिडण्यांतहि फायदा नव्हता, रडण्यांत तर नव्हताच नव्हता. मी अगदी शांत चित्ताने आल्या परिस्थितीला तोंड देण्याचें ठरवून त्या झोपडीवजा स्टेशनच्या इमारतींत प्रवेश केला. मला त्या हद्दीवरून परत उलटें टर्कींत जाऊन सिरियन व्हिसा घेणें प्राप्त होतें व त्यानंतर सोयीची गाडी पकडून पुढचा प्रवास करावयाचा होता. आठवड्यांतून फक्त गुरुवारी व रविवारी इस्तंबूलवरून सुटणारी टौरस एक्सप्रेस मला एकटीला त्या काळचाकुट्ट "अल्तमन सबाका" असल्या विचित्र नांवाच्या स्टेशनांत, राकट लोकांच्या मेळाव्यांत सोडून खुशाल निघून गेली. अशोकवनांतील सीतेचें चित्र माझ्या त्यावेळच्या करुण स्थितीचेंच द्योतक ठरेल नाहीतर काय ? गाडी निघून गेल्यानंतर तर मला भलताच भयाणपणा वाटू लागला. त्या प्रचंड गर्दीने भरलेल्या गाडींत फक्त मलाच जागा नव्हती. सर्वजण पुढे निघून गेले आणि मी परतीच्या गाडीची वाट पहात आणखी एकदीड तास एकलकोंडी तेथे बसून रहाणार होतें. माझ्या डोळ्यावर आलेली झोप केव्हांच उडून गेली होती; पण तरीहि आतां थकव्यामुळे, शिणल्यामुळे मला झापड आल्यासारखें वाटत होतें. मी एक पुस्तक डोळ्यासमोर धरून, डोक्यांतल्या विचारांच्या काहूराशीं झगडत तेथे बसून राहिले. इतक्यांत ज्याला साधारण मोडकेतुडके इंग्लिश येत होते असा सिरियन गार्ड माझ्या चौकशीला आला. त्याचें ते अर्धें मोडके इंग्लिश त्यावेळी मला शेक्सपिअरच्या इंग्लिशपेक्षांहि मधुर वाटत होते. मी त्याला एका पाठीमागून एक भराभर

प्रश्न विचारावयास सुरवात केली, त्याला काय विचारूं आणि काय नको असें मला झालें होतें. मीं मजजवळ असलेला ॲटलास ( नकाशाचें पुस्तक) काढला. मला "मर्सिन" ह्या टर्किश गांवी जाऊन तेथील सिरिअन कौन्सिलला भेटून व्हिसा घ्यावयाला फारतर दहा पंधरा मिनिटें लागतील लगेच परत येण्यासाठीं सोयीची गाडी असेलच, तिने ह्या स्टेशनवर येऊन उद्यां रात्रीं याच वेळेस पुढचा प्रवास तुम्हाला करतां येईल" असें उत्तेजक वर्तमान मला सांगत होता. मला त्यानें १–१॥ तास सोबत तर केलीच पण "उद्यां तुम्ही परत याल तोपर्यंत पुढच्या गाड्यांचें वेळापत्रक बघून ठेवितो" असें आश्वासनहि देऊन टाकलें. आतां माझी सर्वांत मोठी अडचण म्हणजे माझ्याजवळ टर्किश नाणीं मुळीच नव्हती. सिरिअन नाणीं नव्हतीच नव्हती. जर्मन नाण्यांना ह्या देशांतून फार मागणी, माझे प्रवासी चेक्स पौण्डांत होते, परंतु ते बदलून घेण्याची अडचण होती. भोवतालचे लोक तर असे दिसत होते कीं, पैसा खिशांतून बाहेर काढावयाची भीतीच वाटावी. तरीहि नाइलाज म्हणून मीं माझ्याकडे फक्त थोडीशी जर्मन नाणीं आहेत बाकी कांही नाहीं असें सांगून ५० जर्मन मार्कस् देऊन सिरिअन नाणीं व टर्किश नाणीं घेतली. पुढें हिशोब करताना मला त्या गार्डने या नाण्यांच्या बदलाबदलीच्या व्यवहारांत फसविल्याचें समजून आलें पण ते कळूनहि त्यावेळीं फायदा नव्हता. मला त्या इंग्लिश समजणाऱ्या एकुलत्या एक प्राण्याचा इतका उपयोग होता कीं जे थोडेसे पैसे अशा रीतीने मला गमवावे लागले त्याबद्दल मीं फारसें वाईट वाटून घेणार नव्हतें. मीं मार्सिनहून दुसऱ्या दिवशीं परत येईपर्यंत माझें जिन्नस व बॅग सांभाळण्याचीहि त्याने तयारी दर्शविली. पण कां कोण जाणें त्याने देऊं केलेल्या मदतीचा स्वीकार करण्यास माझें मन तयारच होईना. वास्तविक जो बोजा वाहण्याचा मीं धसका घेतला होता, नव्हे जन्मभर धसका घेतलेला आहे, ते तेथें टाकून जाण्याचा मोह फार मोठा होता. शिवाय त्यांत मौल्यवान अशा कांहीच वस्तु नव्हत्या. टोझान बाईच्या घंटेप्रमाणें व जाडजूड वजनदार कोटाप्रमाणें प्रवासांत बरोबर ठेवण्यास त्रासदायक असणाऱ्या जिन्नसा मात्र बऱ्याच होत्या. पण कांहीहि झालें तरी आतां माझी आणि माझ्या वस्तूंची फारकत होऊं द्यावयाची नाही असा मीं

निश्चय केला होता. फारतर माझी बॅग मला माझ्याबरोबर मार्सिनला नेऊन मिरवून परत आणावी लागेल ह्यापेक्षां जास्त काय होईल असा विचार करून तें सर्व सामान घेऊन मी मार्सिनला जाणारी म्हणून जी गाडी आली त्यांत बसलें. सामान बरोबर घेतलें तें किती बरें केलें हें पुढें समजलेंच, कारण मीं परततांना ह्या मार्गानें आलेच नाही. दुसऱ्या मार्गानें पुढें गेले. बरोबरचें सामान जर मीं अल्तमन सवाकाला ठेवलें असतें तर पंचाईतच झाली असती.

पांगुळगाड्याचीच बहीण शोभेल अशी ती गाडी आली. मी व माझ्याबरोबर सोबतीला (Escort) दिलेला टर्की पोलीस व त्याचा एक नोकर एवढे तिघेजण आम्ही माझ्या डब्यांत शिरलों. माझ्याबरोबर संरक्षणासाठी दिलेला तो पोलीस चांगलाच प्यालेला होता. त्याच्याच-पासून मला संरक्षण हवें होतें. तो कसलें माझें संरक्षण करणार ! पण सरकारी नियम येथेंहि आडवा आलाच. बाईमाणसाला संरक्षण द्यायला हवें; हें त्याचें कर्तव्य होते. मग तें त्यांना बजावलेंच पाहिजे ! आमच्या सरकारी नोकरींत चाकोरी (Proper Channel) म्हणून असाच एक प्रकार आहे. एखाद्या वरिष्ठ अम्मलदारानें आपल्या हक्कांची नीट अम्मलबजावणी केली नाही, अथवा त्यांत कसूर केली अशी जर तक्रार उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडे करावयाची असली तर ती तक्रार त्या अम्मलदारामार्फतच पाठविली पाहिजे म्हणे ! अशा प्रकारचा शिरस्ता व्यवहारांत कितीहि जाचक आणि बोचक व हास्यापद वाटला तरी तो नियम आहे त्याप्रमाणें झालेंच पाहिजे. या दारुड्या पोलिसाचें संरक्षण अशाच प्रकारचें होतें. मी माझ्या डब्यांत सामान टाकून त्या दोघांसमवेत बसलें खरी पण मला प्रशस्त वाटेना. इतकेंच नव्हे तर धोक्याचें वाटूं लागलें. बरें ते डबेहि असे कीं, दोनच बाकांचें छोटे छोटे व त्याला एक दार, दोन खिडक्या, बाहेर पॅसेज. पसेजमधून शेजारच्या तसल्याच दुसऱ्या डब्यांत जाण्याचा रस्ता. मी सरळ दार उघडून शेजारच्या डब्यांत जाऊन एकटीच बसलें व दार बंद करून आंतमध्यें बाकावर आडवी झाले. दर पांच मिनिटांनी काचेच्या दरवाज्यांतून चारपांच माणसें माझ्याकडे बघून जात. रेल्वेचे गणवेश घातलेले कोणीतरी लोक मुद्दाम तिकिट तिकिट

करून दारावर थापा मारीत. मध्येच गार्ड नाहीतर पासपोर्ट ऑफिसर आपला रुवाब दाखवीत. या सर्व प्रकारांनीं मी चिडून गेलें होते व आंतूनच तिकिट आणि पासपोर्ट हातांत धरून मी दाखवीत असें व दार उघडण्याचें साफ नाकारीत होतें. माझें शेजारच्या डब्यांतले सामान उतरवून ते लोक पसार झाले तरी वेहेत्तर पण दार उघडावयाचें नाही असा मी निर्धार केला. गाडी रें रें रें रें करीत मार्ग आक्रमीत होती. सदर्न मराठा रेल्वेची गाडी तरी पुष्कळ बरी अशी त्या गाडीची चाल होती. अर्ध्यापाऊण तासाच्या चालीनंतर पंधरा वीस मिनिटांची विश्रांति घेत घेत पहाटे दोन वाजतां ती एका स्टेशनवर थांवली. बाहेर काळोख. तेव्हां खिडकीबाहेर पाहूनहि कांही समजणार होते अशांतला भाग नव्हता. तेवढ्यांत एकजण येऊन मला खुणा करून दार उघडण्यास सांगू लागला. मी तशीच पडून राहिले व त्याला जा जा अशा खुणा करून परतवून लाविलें. तेवढ्यांत आणखी एकजण आला व मला उलट खुणा करून दार उघडण्यास सांगू लागला व दारावर धक्के मारूं लागला. मी दार उघडलें. तो मला कांही सांगण्याचा प्रयत्न करीत होता. आतां सरावानें मला त्यांच्या खुणा थोड्याथोड्या समजू लागल्या होत्या. "ही गाडी मार्सिनला जात नाही. सामान घेऊन तुम्ही खाली उतरा व येथेंच थांबा" असें तो मला सां त होता. अरे बापरे, म्हणजे ( २–२॥ ) तासांच्या प्रवासानंतर अजून मार्सिनचा पत्ताच नाही तर. पण आतां कांही उपाय नव्हता. पुन्हा एकदां सामानासकट आमची स्वारी खाली उतरली. उतरणें भागच होतें. शेजारच्या डब्यांतून तो 'हापिसर' व त्याचा नोकर केव्हांच कोठें तरी उतरून निघून गेले होते. त्यांनीं सामान नेलें नाही हीच त्यांची कृपा. खरं म्हणजे तें सामान इतकें जड होते कीं त्यांनी नेलें असतें तरीहि मी पीडा गेली म्हटले असते. पण म्हणूनच ते मात्र मला वाहण्यासाठीं राहिलें होतें. माझ्याजवळ पैसे होते तरीहि ते बाहेर काढणें मुष्किल होतें. त्या सर्वांची पैशांवरील प्रीति पाहतांच मी पैसे नाहीत हाच एक ठेका धरला होता. मी हमाली देईन ह्या आशेने कोणी कोणी लोक माझें बोजे उचलीत होते. परंतु एकदां चलन (Currency) नाही असे म्हणतांच तेंच धृपद पुढें चालविणें मला प्राप्त

झालें होते. ज्या स्टेशनवर मला ह्या आपद्धर्मामुळें उतरावें लागलें होते त्याचें नांव होते इसलाहिएढ. तेथें साधारण खालच्या दर्जाचें म्हणतां येतील असलेच टर्की लोक भोवतालीं वावरत होते. मी पैसे देत नाही ही खात्री झाल्यावर तो घोळका पांगावयास सुरवात झाली. एक म्हातारा टर्क स्टेशनमास्तर तेवढा तेथें उतरला. तो फार भला माणूस होता. "मी तुम्हांला येथून मार्सिनचे तिकिट काढून देईन व परत याल तेव्हां मला पैसे दिलेत तरी चालेल" असे त्याने मला खुणा करून सांगितलें. ऑफिसची खोली उघडून एकुलत्या एका रुंद बाकावर मला विश्रांति घेण्यास सांगून तो बाहेरच्या तारयंत्राच्या कटकट्या खोलींत जाऊन कांहीतरी लिहीत मला सोबत करीत बसला. बसण्यासाठी म्हणून खास स्टेशनमास्तरसाठी असणारी चपटी काळी उशी मोठ्या आस्थेने मला आणून दिली. (अर्थात् मी तिला शिवणेंहि अशक्य होतें). बेभरंवशी, मधूनच लुप्त होणाऱ्या बिजली-दिव्याच्या खोडकरपणामुळे एक रॉकेलची चिमणी माझ्या सोबतीला देऊन त्याला जेवढी शक्य होती तितकी सोय त्याने केली. सकाळीं सात वाजेपर्यंत गाडीची मार्गप्रतीक्षा करीत, सताड डोळे उघडे ठेवून मी जागत बसले. माझ्या आयुष्यांत मी घालविलेल्या विलक्षण आणि चित्तथरारक रात्रींमध्ये आणखी एका रात्रीची भर पडली. मला आदल्या दिवशीं कोणी सांगितलें असतें कीं, माझी अशी परवड होणार आहे तर मला तें खरें वाटलें नसतें. जानकीरामांच्या मृत्यूच्या काळरात्री-इतकी हृदयद्रावक नसली तरी तितकीच रोमांचकारी घटनांनी परिपूर्ण भरलेली ती रात्र होती यांत संशय नाही. जानकीरामांच्या कथेंत माझ्या-कडे दुय्यम भूमिका होती; तरीसुद्धां ती वठवितांना मी थकून गेलें होतें. आता ह्या रात्रीं नायिकेची भूमिका माझ्याकडे होती व परकीय मुलुखांत, विक्षिप्त लोकांच्या संगतींत, भिन्नलोकांच्या सानिध्यांत, की ज्या लोकांची भाषा मला पूर्ण अपरिचित होती अशा बिकट अवस्थेंत मी येऊन पडलें होतें. दगडाखालीं सापडलेला माझा हात कसातरी सुरक्षित सोडवून घ्यावयाचा हेंच माझें त्यावेळीं मुख्य काम होते. माझ्याप्रमाणेंच पंधरा-वीस दिवसां-पूर्वी आणखी एकदोन भारतीय असेच अडकून पडले होते व त्यापैकीं एक विद्यार्थी होता. "ते पुरुष असूनसुद्धा त्यावेळीं इतके भांबावून गेले होते

कीं त्यांना रडूं कोसळलें, आणि तुम्ही बाईमाणूस, न रडतां चर्चा कशी करतां याचेंच मला आश्चर्य वाटतें," असे त्या अग्यानने, सीरियन गार्डने सांगितलें तेव्हा कोठे मला एकटीने प्रवास करणें म्हणजे काय तें कळलें. "तुम्ही मध्य आशियांतून जाऊं नका. तुम्हाला फार त्रासदायक होईल, ह्या इशाऱ्यांचा अर्थ मला आतां कळला होता. तरीपण मी या मार्गाने आल्याचें मला मुळीच वाईट वाटत नव्हतें. ह्या अशाच अनपेक्षित घटनांमधून जाऊन माणूस तावूनसुलाखून निघतो. पुण्याचें तिकिट काढून कोणीतरी दादरला बसवून द्यावयाचें व पुणें स्टेशनवर कोणीतरी उतरवून घ्यावयाचें, असल्या प्रवासाला "एकटीने प्रवास केला" असे जेथे म्हणतात त्या देशांत माझ्या मध्य-आशियांतील प्रवासाची धाडसांतच गणना होईल हें नक्की !"

मी त्या खोलींत असलेल्या टर्कीदिशाच्या मार्सिन गांवावर बोट ठेवून किती वेळांतरी कसें जाणार व कुठे जाणार याचा अदमास करीत ३० तारखेपर्यंत बगदादचा टप्पा कसा गाठता येईल तें पहात होतें. मोजक्या दिवसांची बोटांवर मोजदाद करीत होतें. गाड्यांच्या वेळा आठवून आठवून प्रवासक्रम आखीत होतें. विमानमार्गें, आगगाडीने, टॅक्सीने, निरनिराळ्या टप्प्यांपासून निरनिराळीं वाहनें मिळवून मी १ तारखेची बोट बसऱ्याला अजूनहि गाठूं शकेन. ह्या भ्रमांत 'नेपोलियनने सैन्याच्या हालचाली कशा ठरविल्या असतील, आपल्याला एवढेंहि जमूं नये ?' असें स्वत:लाच प्रोत्साहन देत, मुंगीच्या पावलाने हालणारा मिनिट कांटा पहात बसलें होतें. बाहेर आता पाऊस पडण्यासहि सुरवात झाली होती. मला टॉयलेट रूम (Toilet room) मध्ये जावेंसें वाटत होतें पण विचारणार कसें आणि कोणाला ? सगळी शब्दसंपदा मातीमोलाची ठरून शेवटी एक बोटाची खूण त्या म्हाताऱ्याला समजली व एक भली मोठी दिसणारी पण उदबत्तीचा प्रकाश टाकणारी बॅटरी घेऊन तो माझ्यापुढे चालूं लागला. चांगले १२०–१५० यार्ड गेल्यानंतर पुढें जावे कीं नाही असा मला संशय येऊं लागला. तो माणूस खाली मान घालून पुढे पुढे चाललाच होता. पाय दबकत होते माझेच. काय हें ? माझी मलाच लाज वाटली कीं, इतका सज्जनपणा त्या माणसाने दाखवूनहि माझ्याकडून साधा विश्वासाचा भाव त्याला मिळूं नये ? पण पुन्हा वाटे नको ! आपण कशाला धोका पत्करा ? असे विचार

मनांत येत असतांना पुढे होऊन मी त्याच्या हातांतली बॅटरी घेतली व त्याला तेथेच उभे रहाण्यास सांगून एकटीच पुढे जाऊन ती पिवळट रंगाची बैठी खोली गाठली उद्देश हा की दिवा माझ्या हातांत असलेला बरा व त्यालाहि शेवटपर्यंत येण्याची तसदी नको. मी परत येईतों तो तेथेच उभा होता. परत येताच आपल्या जागेवर बसला. मी माझ्या जागेवर बसले. भाषण नाही, बोलणें नाही, कांही नाही ! घड्याळांत फक्त दहा मिनिटे झालीं होती. पहाटे चार वाजतांच उजाडले. म्हणून चारपासून साडेपांच पर्यंत वेळ जातां जाईना. चहाचा विचार करणें म्हणजेहि मूर्खपणा. पसे देऊन कांही विकत घेऊन खाण्याची चोरी. तेव्हा पिशवींतलें संत्रें काढून खाल्लें व एका पायावर दुसरा पाय टाकून हातांत पुस्तक उघडें ठेवून पुनश्च वाट बघण्याच्या सरावाच्या पवित्र्यांत बसून राहिलें. गाडी यावयाची तेव्हां आली व तिकिट काढून त्या भल्या माणसाने माझ्या हातांत दिलें. मी ग्रॅटीस (Gratis) आभारी आहें, हा तोंडपाठ असलेला एकमेव शब्द तीनतीनदां निरनिराळ्या सुरांत म्हणून त्याचें नांव लिहून घेतलें. त्या सज्जन माणसानेहि " मार्सिन, पासीपोटर, तमाम तौरस"—म्हणजे मार्सिनला जाऊन पासपोर्ट घेऊन खुशाल पुन्हा तौरस गाडी पकडा व निःशंकपणें चला, असें मोठ्या प्रेमाने मला सांगून निरोप दिला. सामान कोणीतरी डब्यांत टाकलेंच होतें, मी आज कोठे असावयाची ती कोठे आहे, असा खिन्नपणें विचार करीत झोपाळलेल्या डोळ्यांनी शून्यांत बघत होतें. तो अग्यान पोर्टर, हा म्हातारा स्टेशनमास्तर अशांसारखीं सज्जन माणसें सगळीकडेच असतात; पण त्यांच्या जोडीला त्या दारुड्या पोलिसासारखे लोकहि सर्वत्र आहेतच. सज्जन लोकांच्यामुळे जग चाललें आहे ह्याचा प्रत्यय आला. माझ्या वाटणीस आलेला हा अभावित सज्जनपणा मीहि असाच कोणाकडे तरी कधीतरी चालू करावा, इतपत कर्तव्याची जाणीवहि न होईल तर पालथ्या घागरीवर पाणी पडल्याचाच प्रकार म्हणावयाचा!

सीरियन कौन्सलला भेटल्यानंतर मला आतांपर्यंत झालेल्या त्रासाची हकीकत सांगून सरहद्दीवर कोणीतरी खऱ्याखुऱ्या गोष्टींची पारख करून पासपोर्टवर शिक्के मारूं शकेल, अशा प्रकारच्या कार्यक्षम व अधिकारपूर्ण अधिकाऱ्याची किती आवश्यकता आहे, हें सांगावयाचें ठरविलें. त्या ठिकाणीं

अशा प्रकारच्या तारतम्यपूर्वक अधिकाराचा उपयोग करण्याची सवड अधिकारीवर्गाला नसावी! हें काय सरकार आहे कीं थट्टा ? उगीच नाही ह्या मध्य-आशियांतील हे देश अद्याप मागासलेल्या स्थितींतच राहिले आहेत. एकजात लुच्चे व धोकादायक लोक, अशी मनांतल्या मनांत त्या लोकांची वासलात लावून टाकली व मार्सिन येण्याची वाट पहात बसलें.

ही गाडी ग्रीसमधून थोडी जाते, पुन्हां टर्कीत शिरते. ग्रीसमध्ये गुलाब फार सुंदर होतात. मला वाटतें जेथे जेथे सफरचंद मिळतात तेथे तेथे गुलाब फुलतातच. काश्मीरप्रमाणें टर्कींतहि ह्या दोन्हींचे वैपुल्य आहे. माझी साडी पाहून बाया थबकत, मुली माझ्याजवळ बसण्यासाठी धडपडत व एकीने मला भीतभीत दोनचार गुलाबाचीं सुंदर फुलें दिलीं. बऱ्याच वेळानंतर डोळ्याला इतकें छान दृश्य पहावयास मिळालें होतें. तशा त्या अवस्थेंतहि मला फुलांनी चांगली सोबत दिली. आमची ढकलगाडी एक नाही, दोन नाही, चांगली सात तासांच्या रखडपट्टीनंतर त्या प्रसिद्ध मार्सिन गांवी येऊन उभी राहिली. आतां माझ्या बरोबर कोणीहि नव्हतें. फक्त दोन बोजे सावलीप्रमाणें होते व ते मलाच वाहून न्यावयाचे होते. पण आतां मी पैसे बाहेर काढून खर्च करूं शकत होतें. हमालाच्या स्वाधीन बोजे करून तडक सीरियन कौन्सलकडे व्हिसा घेण्यासाठी मी निघालें. हमालाने अदबीनें बोजे ठेवून धावत जाऊन वेळेला व प्रसंगाला न शोभणारी दोन घोड्यांची सुरेख नक्षीदार गाडी माझ्यापुढे आणून उभी केली. त्यांत चढण्यापूर्वी "पसे किती"? हा नेहमीचा खिजविणारा प्रश्न माझ्या मनांत आलाच. पण आतां त्याने कांहीहि मागितलें असतें तरी मी दिलें असतें. तडक तडक करीत मी कौन्सिलच्या ऑफिसांत तर आलें. तेवढ्या त्या अवधींत मार्सिन शहर फार सुंदर आहे हें मीं पाहून घेतलें. समुद्र-किनारी, उघड्या व्हरांड्याच्या रंगीबेरंगी फुलांनी सजविलेल्या कमानींनी व झाडांनी सुशोभित झालेल्या लांबच्या लांब बागा व लांब सडका, सडकांवरून भुर्र-कन जाणाऱ्या अमेरिकन लोकांच्या मोटारगाड्या — मीं तेव्हांच ताडलें कीं, हा "साहेबांचा गांव" आहे. अशा त्या सुंदर गांवांतून सुंदर बग्गीतून समुद्राची हवा खात खात जातांना आतांपर्यंत वेंगून गेलेल्या माझ्या जिवाला कितीतरी हुरूप आला. मी दहा मिनिटांत व्हिसा घेऊन मोकळी होणार,

हा विचार मनाला आणखीच सुखवीत होता. इतक्यांत त्या ऑफिसमध्ये जाऊन पहातें तों निर्विकार चेहऱ्याचा, निर्बुद्ध डोळ्यांचा कराकरा कागदावर लिहिणारा कारकून पहाताच माझा चेहरा साफ पडला. पुन्हां ती कुडमुडी भाषा, इंग्लिशचा गंध नसलेलीं भयानक माणसें, गर्दी व गोंधळ. त्यांनी दिलेला मसुदा (form) मला वाचतां येईना, म्हणून भरतां येईना! मी म्हणत होतें तें त्यांना समजेना ! त्यांच्या म्हणण्याचा मला उमज पडेना! सगळ्यांच्या तोंडांत एकएक भडकावून द्यावी, इतका मला संताप आला होता. पण करणार काय --?

कोणाला प्रवासांत नवींनवीं माणसें भेटतात, नव्या ओळखी होतात, नव्या गोष्टी आढळतात. मला मात्र नवे प्रसंग भेटतात. आजपर्यंत मला असेच किती प्रसंग अनुभवावे लागले कीं, जे केवळ कथाकादंबऱ्यांतून वाचले तर शोभून दिसतील. अशाहि आणीबाणीच्या वेळीं ज्यांना देवाने जणूं कांही पाठविलें आहे अशीं माणसें मला भेटून माझा निभाव लागत आलेला आहे. आज जिला मी माझी मैत्रीण किंबहुना बहीण म्हणूं शकेन अशी एक अमेरिकन बाई त्या रुक्ष ऑफिसांत मला भेटली. तिला फ्रेंच येत होतें, इंग्लिश तर येतच होतें. इटालियन येत होतें आणि टर्कींत रहात असल्याने तीहि भाषा तिला समजत होती. तिने मला माझी माहिती विचारून तो मसुदा भरण्यास मदत केली व आपण सकाळीं ९॥ वाजल्यापासून तो आतां २॥ वाजेपर्यंत व्हिसासाठी बसून आहोंत, हें धक्का देणारें वर्तमान तिने सांगितलें. तिच्यावरोबर दुसरीहि एक अमेरिकन बाई होती व त्या दोघींना सुट्टीसाठीं (Holiday trip) सीरियांत जावयाचें होतें. अलेप्पोला जाऊन त्या बीरूट ह्या गांवी विमानाने जाणार होत्या. सकाळचा नास्ता झाल्यानंतर त्या तेथे येऊन फॉर्म भरून बसून होत्या ! हें ऐकल्यानंतर ती दोन घोड्यांची झकास गाडी मी उभी करून ठेवणें शक्यच नव्हतें. तेव्हा त्याला रजा देऊन मी त्या दोघींकडून आगगाड्यांच्या वेळेसंबंधी माहिती मिळते का तें पाहूं लागलें. बग्गीवाल्याने मला आडवायाचें तें आडविलेंच व दुप्पट पैसे घेतलेच. कुठेहि गेलों तरी टांगेवाल्याची जात तीच ! मी पाकिस्तानी असें लिहून दिलें तर मला लवकर व्हिसा मिळेल, मी लिहिलेली हिंदु ही जात आमच्या मान्य यादींत (Approved

list) दिसत नाही, असा निरोप त्या कारकुनाने मला सांगतांच माझें पित्त खवळलें. तुमची जर यादी अपुरी असेल तर तो दोष माझा नाही. पाकिस्तान व हिंदुस्थान हीं दोन वेगळीं राष्ट्रें असतांना मला मी पाकिस्तानी असें खोटें लिहून देणें शक्य नाही, असें मी ठासून सांगतांच त्या कारकुनाने माझा पासपोर्ट पुन्हा एकदा आंत नेला व सीरिअन कौन्सलने स्वत:च्या हाताने खास नोंद करून दिली कीं, स्पेशल केस करून ह्या बाईना मी व्हिसा देत आहें वगैरे वगैरे. तो मजकूर अजून माझ्या पासपोर्टावर आहे.

त्या मेमसाहेबांच्या पुढे पुढे करणारा एक अरब फ्रेंच व टर्किश भाषा उत्तम बोलत होता व त्यामुळे फिलिस, मी व तो अरब ह्यांच्यामध्ये दुभाष्याचें काम करीत होती. मी काय म्हणें तें ती त्याला फ्रेंचमधून सांगे, तो टर्की भाषेंतून कोणाला तरी तें विचारून समजून घेऊन परत तिला फ्रेंचमध्ये सांगे व ती मला इंग्लिशमध्ये कथन करी. असें बऱ्याच वेळां संभाषण होऊन शेवटी असें ठरलें कीं, मार्सिन व मीं ज्या ठिकाणीं सरहद्दीवर उतरलें होतें तें अल्तमन सबाका ह्यांच्या मध्यावर अडाना नांवाचें मध्यवर्ति स्टेशन आहे त्यावर जावें तेथून पुढची गाडी पकडून कोठे जावयाचें तें ठरवावें. अडाणा येथे फिलिस रहात होती. तेव्हा तिच्याकडे ती मला घेऊन निघाली. इंग्रजी बोलणारी हिंदी मुलगी टर्कींत त्या दोघींना पहिल्यानेच भेटली होती. त्यामुळे त्यांना फार गंमत वाटत होती. मी इतक्या ठिकाणांवरून एकटीच हिंडत हिंडत आलें व परत हिंदुस्थानाला निघालें आहे, हें नवल वर्तमान ऐकून त्यांना आश्चर्य वाटलें. मार्सिन ते अडाणा हा प्रवास त्यांच्या सुंदर कॅडिलेकमधून फार सुखाचा झाला. फे गाडी सुरेख चालवीत होती. मला त्या आरामशीर मोटारींत इतकी झोप येऊं लागली कीं, ही गाडी अशीच मुंबईपर्यंत, निदान बसऱ्यापर्यंत गेली तर किती बरें होईल, अशा वृथा परंतु गोड स्वप्नांत मी रंगून जाऊं पहात होतें. रस्ताहि थेट, निर्धास्तपणें जावें अशी सोबत, व्हिसा मिळालेला व बोट मिळण्याची आशा उत्पन्न झालेली, अशा अवस्थेंत इतका वेळ हिसके खात असलेलें शरीर आणि मन ताबडतोब पेंगुळलें.

फिलिसच्या घरीं आम्ही पोहोंचलों तों पांच वाजले होते. अडाण्या-वरून इस्कंदरन ह्या गांवावरून टॅक्सीनें अलेप्पोला जावें व तेथून आणखी एक टॅक्सी करून बगदादला जातां येतें. ह्या मार्गे गेल्यास १ तारखेला बसऱ्याची बोट पकडण्याची आशा वाटूं लागली. फिलिसने मला तेवढ्यांतल्या तेवढ्यांत आरामशीरपणा देण्याची कोशीस केली. एका मोठ्या दिवाण-खान्यांत समोरासमोर मोठे म्हणजे भिंतीच्या आकाराएवढे मोठ्या सोनेरी चौकटींत बसविलेले आरसे लावले होते. उत्तम जेवणाचें टेबल व त्यावर मौल्यवान कांचेचीं पात्रें. मला जें काय तिने खाण्यास वाढलें, पिण्यास दिलें तें अगदी भारी गोड वाटलें. आम्ही गप्पा मारीत बसलों. जेमतेम दोन तास एकत्र होतों. तेवढ्यांत तिने मला तिची कितीतरी माहिती दिली. तिचा नवरा कोणीतरी बडा होता, हें मला न सांगतांहि कळण्यासारखें होतें. त्या दोघांनी आपली गाडी बाहेर काढून मला स्टेशनवर नेलें. तिकिट काढून गाडींत चढवून इस्कंदरनला एका चांगल्या होटेलचा पत्ता देऊन माझा निरोप घेतला. तो अरब माणूस होता त्याला इस्कंदरन येथे रात्रीं १० वाजतां स्टेशनवर व दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्या हॉटेलवर जाण्या-विषयीं फिलिस आणि तिचा नवरा यांनी बजावून ठेविलें होतें. तो अरब केव्हाच बसने पुढे निघून गेला होता. फिलिस मला पुन्हा भेटणार नाही, असेंच मला तेव्हा वाटलें. मला रहाण्याविषयीं ती फार आग्रह करीत होती. पण मला १ तारखेची बोट पकडण्याची घाई झाली होती. त्या देवतातुल्य बाईचा निरोप घेऊन मी अज्ञात अशा आणखी एका गांवीं जाण्यासाठी निघालें, मी टर्कीमध्ये आंत आंत जात पुष्कळच हिंडत होतें. ॲटलासमध्ये कोठकोठून वळसा घालीत आहे हें पहाणें फारच करमणुकीचें वाटत होतें. इस्कंदरहून नव्या गाड्या कोणत्या मिळतील, नव्या वेळा, नवी स्टेशनें, टॅक्सीचे प्रवास, बगदाद, बसरा व १ तारखेची बोट ह्यांचा पुन्हा पुन्हा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत मी मनांतल्या मनांत घोटाळ्यांत पडत होतें. इस्कंदरन चांगल्या चार तासांनी आलें, परंतु नशीब की, तो अरब स्टेशनवर येऊन थांबलेला होता. त्या सर्वस्वीं अनोळखी मुलुखांत त्या किंचित् तोंड-ओळख झालेल्या अरबाचा मला आधार वाटावा, अशीच ती वेळ होती. पाऊस पडत होता. आम्ही एक घोडागाडी करून निघालों. मीं देवाचें नांव

घेतलें आणि त्या अरबाबरोबर त्या टांग्यांत चढलें. तो टांगेवाल्याशेजारीं व मी मागें माझ्या सामानासकट असे बसलों. अमेरिकन बाया मला सकाळीं मार्सिनला भेटल्यापासून माझी देवावरची श्रद्धा फारच वाढली होती. मी आतां कुठेहि व कशाहि परिस्थितींत जाण्यास चांगलीच धीट झालें होतें. तो अरब आला नाही तरी काय करावयाचें, हें माझें ठरलें होतें; परंतु त्याला पाहिल्यावर बरें वाटलें हें मात्र नक्की. आश्चर्य म्हणजे जेवढें जेवढें अडाण्याला फिलिसच्या मध्यस्थीने बोलणें झालें तेवढेंच. त्यानंतर आतां आमचें संभाषण होणें अशक्यच होतें. त्याला त्या बाईने सांगितलें होतें तें तो करीत होता. मी मला त्या बाईने सांगितलें त्याप्रमाणें तो करतो आहे की नाही, हें मुकाट्याने पहात होतें. घोडागाडी एका छानदार होटेलपाशी उभी राहिली. इंग्रजी बोलणारा मालक सकाळी ७॥ पर्यंत येणार नव्हता तेव्हा मी कांही बोलण्याचा प्रश्नच उरला नाही. त्या अरबानेच काय तें सांगितलें. सकाळीं आलेप्पोला जाणारी टॅक्सी बघून देण्यासाठी येईन, असें सांगून अरब गेला. मी माझ्या सुरेख अशा खोलींत जाऊन स्वच्छ आंघोळ केली. फारसें खाण्याची इच्छा नव्हतीच. दूध वगैरे प्यालें आणि रेल्वेच्या फाट्यापासून आहें तरी कुठे, याचा नकाशावर बघून अंदाज घेण्यास सुरवात केली. मला मुंबईहून निघतांना श्री. नानांनी मुद्दाम ॲटलास विकत घेऊन दिला होता. त्यावेळी मला तो अतिरेकीपणा वाटला, पण त्याच ॲटलासचा चांगला उपयोग ह्या "टर्कीला वळसा" ह्या प्रकरणांत मला झाला. जवळ असलेले पैसे, विमानापासूनची टॅक्सी वगैरेसुद्धा सर्व वाहनें व १ तारखेपर्यंत बसऱ्याला पोहोचण्याच्या धांदलीत त्यावर होणारा खर्च. बसऱ्यापर्यंत हातांत असलेलीं सर्व सेकंड क्लासची तिकिटें व रिझर्वेशन्स की, जी मी इतर मार्गांनीं गेलें तर केवळ फुकट जातील, त्या सर्वांचा शांतपणें बसून विचार करतां मी १ तारखेच्या बोटीसाठी इतकी घाई कारण नसतांना करतें आहें, असें मला वाटूं लागलें. इतकें करूनहि जर कांही तासांच्या प्रवासातील खोटीमुळे माझी व बोटीची चुकामूक झाली तर जवळचे पैसेहि संपलेले आणि फुकट थांबण्याची वेळ आलेली, असें होण्याचा फार मोठा संभव होता. त्यापेक्षा हा धडपडाट थांबवून सरळ एक आठवड्यानंतर निघणारी पुढची बोट म्हणजे ता. ७ ची मिळवावी व त्याप्रमाणें थॉमस कुकला बगदादला

तार द्यावी असें मी मनाशीं योजून झोपीं गेलें. उद्याची बगदादला जाणारी थेट टॅक्सी जर थोडक्या पैशांत मिळाली तर बरें नाही तर खुशाल अलेप्पो येथे पुढची टौरस एक्प्रेस येईपर्यंत थांबावयाचें असें मीं ठरविलें.

सकाळीं ८ वाजतां तो आज्ञाधारक अरब हजर झाला. तोंपर्यंत आमचा इंग्रजी साधारण अंदाजाने समजणारा व दडपून बोलणारा मालकहि आला व त्यांनी अलेप्पोपर्यंतची टॅक्सी बघून दिली. तडक बगदादला जाणारी टॅक्सी माझ्यासाठी तो अरब शोधीत असतांनाच एका इराकी तरुणाने त्याला पाहिलें. त्यालाहि बगदादला जाण्याची माझ्या इतकीच निकड होती. तो इराकी तरुण त्या अरबाबरोबर आमच्या हॉटेलवर आला व अलेप्पोहून टॅक्सी मिळाल्यास आपण दोघे बरोबर जाऊं, आपल्याला खर्चाच्या दृष्टीनेहि तें ठीक पडेल असें विनवूं लागला. तो म्हणाला की, आतापर्यंत त्याने तीनदां आलेप्पो ते बगदाद प्रवास केला पण केव्हाहि त्याला थेट टॅक्सी मिळाली नाही. प्रत्येक वेळीं अलेप्पोहून दमास्कसला जाऊन तेथून बगदादला जावें लागलें होतें. त्याने हें सांगतांच तीस तारखेच्या आंत टॅक्सीने पळून मला इतकें मोठें अंतर काटून बोट पकडतां येईल हें अशक्य आहे, हें मी समजून चुकलें. आतां असलेला पैसा अशा वेड्यावाकड्या प्रवासावर खर्च न करतां जवळ आहेत त्या तिकिटांचा वापर करून अलेपोहून पुढच्या "टौरसने" बगदादला जावयाचें हा विचार मीं पक्का केला. अलेप्पोला आम्ही टॅक्सीने चार तासांत आलों तो इराकी तरुण दमास्कसमार्गें बगदादला गेला व मी फिलिसच्या सल्ल्यानुसार बॅरन होटेल ह्या सुंदर हॉटेलांत जाऊन राहिलें. हें होटेल खरें श्रीमंतांसाठीच आहे, परंतु भाषा न जाणणाऱ्या सीरियन लोकांच्या गल्ल्यांतून असणाऱ्या हॉटेलांत केवळ थोड्याशा पैशाच्या बचतीसाठी राहण्याचा मोह मला पडणेंच शक्य नव्हतें. त्या बॅरन होटेलमध्ये उतरल्यानंतर माझ्या जिवांत जीव आला. आतां मी येथे दोन दिवस राहून पुढची गाडी पकडून बगदादला जाईन. नव्या बोटीवरचें तिकीट काढण्याविषयीं थॉमस कुकला सांगेन, सारें सारें कांही करूं शकेन, हा विश्वास मला होता., बगदादमध्ये रहाणाऱ्या त्या इराकी तरुणाची ओळख झाल्याने बगदादला मला कसलीच अडचण पडणार नाही, हेहि विचार डोक्यांत आले. ह्या इराकी तरुणाची बायको ऑस्ट्रियन होती व तो तिला पहिल्यांदाच बगदादला

घेऊन जाणार होता. तिचें बाळंतपण इस्कंदरनमध्ये न व्हावें म्हणून तिला विमानाने बगदादला पाठवून देऊन तिच्या अगोदर बगदादला पोहोचण्याची तो कोशीस करीत होता.

ज्या ज्या देशांतून मीं रहाण्याचें ठरविलेलें होतें तेथे तेथे माझा प्रवास चांगला तर झालाच; पण न ठरविलेल्या प्रदेशांतून, देशांतून, गांवांतूनहि माझी उत्तम सोय झाली. मी खऱ्याखुऱ्या हौशी प्रवाशाप्रमाणें हवी तिकडे हिंडलें व नुसतीच देश ओलांडून न येतां प्रत्येक देशांत राहून आलें. हा दैवाने आखलेला कार्यक्रम सुरस आणि चमत्कारिक नव्हता असें कोण म्हणेल ? मार्सिन हें दोन तासांच्या अंतरावर आहे,चटकन् व्हिसा घेऊन पटपट गाड्या पकडून सटसट बगदादला जाऊन, झटकन् बोट पकडण्याच्या गप्पा करून मला उल्हसित करणारा अय्यन, आमच्या देवजी तांदूळवाल्या सारखा दिसणारा परंतु निर्व्याज अंतःकरणाचा सज्जन म्हातारा इब्राहीम स्टेशन-मास्तर, अमेरिकन बाया, बिन अडविणारा इस्कंदरनच्या हॉटेलचा मॅनेजर, म्हटल्याप्रमाणें चोख काम बजाविणारा अरब आणि बगदादला कोणीच ओळखीचें नाही, असें म्हणतांच धावत येणारा इराकी तरुण हीं सर्व देवाने धाडलेलींच माणसें नव्हतीं का ? बगदादला पोहोंचेपर्यंत तीन ते चार तास कसे काढूं, अशा फिकिरींत मी अल्तमान तबाका येथे असतांनाच चांगला बहात्तर तासांचा कंटाळवाणा प्रवास करण्याची शक्ति माझ्यांत कोठून आली ? असा मी विचार केला की, मेरी अॅण्टोनिएटने ३८ वर्षे तुरुंगांत कशीं काढलीं ह्याचें आश्चर्य वाटेनासें होतें. असली शक्ति देव आपोआप देतो. असें प्रसंग माणसाच्या व्यक्तित्वाला झिलई आणतात, अशी आपली समजूत असते; पण माझी पक्की खात्री झाली आहे की, अशा घटना माणसाचा आत्मविश्वास नाहीसा होण्यास कारणीभूत होतात. वास्तविक २६ एप्रिलची भयाण रात्र माझ्या वाट्यास येण्याचें कांही कारण नव्हतें. माझा कांही विलक्षण अपराध झाला होता असेंहि नव्हतें, तरीहि माझ्या ठरविण्यानुसार गोष्टी होण्याऐवजीं कोणीतरी अज्ञात शक्तीच माझा पत्कर घेऊन काम करीत होती असें मला खचित वाटूं लागलें होतें. तरीहि घडलेल्या घटनांच्या ढोबळ रंगांचें आविष्करण मीं केलें आहे. सूक्ष्म, लहान-

सहान, भिन्न, वैचित्र्यपूर्ण, छाया किंवा छायाचित्रणाच्या नाजूक छटा मला सविस्तरपणें सांगतां आलेल्याच नाहीत.

आलेप्पोला पहाण्यासारखें फारसें कांहीं नाहीं; परंतु खाण्यासारखें खूप. बाजारांत हिंडून पाहिलें तो बैठ्या ओटयावर बसलेलीं सीरियन दुकानदार कुटुंबें, आंत आंत, बोळांतून, गल्ल्यांतून दुकानें, अनवाणी जाणारे लोक, बुरखेवाल्या, निरर्थक गूढ वातावरण निर्माण करणाऱ्या सीरियन स्त्रिया, सगळें वातावरण लहानपणीं अरेबियन नाइटसमध्यें वाचलें होतें तसेंच आढळलें. दुकानांतून आपल्याकडे शेंगदाणे किंवा डाळतांदूळ भरून ठेवतात तसल्या पोत्यांतून अक्रोडाचा गर काढून शेरावारी विकत घेण्याची पद्धत पाहून मला फार मजा वाटली. एक अक्रोडांची पिशवी व दुसरी पिस्त्यांची व शेरभर सफरचंदें असा माझा आहार होता. कारण त्यांच्या मसालेदार मांसाहारी खाद्यपदार्थांना कसला तरी वास येई व त्यामुळें तें अन्न मला आवडत नसे. खाण्याचे हाल इंग्लंड सोडल्यापासून माझे कोठेहि झाले नाहीत. मंगळवारीं रात्रीं ११॥ वाजतां टौरस एक्सप्रेस येणार होती. मी रविवारीं आलेप्पोला आलें. त्याच रात्रीं माझ्या अमेरिकन मैत्रिणी बीरुतला जाण्यासाठीं आलेप्पोला येऊन पोचल्या होत्या व मी ज्या होटेलमध्ये उतरलें होतें तेथेच त्या राहण्यासाठीं आल्या. त्यांचे बरोबर अमेरिकन कौन्सलहि प्रवास करीत होता. त्याने गाडी दोन ते अडीच तास उशिरा येणार असल्याचें वृत्त सांगितलें. मी जाईपर्यंत आम्ही सर्वजण गप्पा मारीत बसलों होतों. अमेरिकन मैत्रिणींच्या सहवासांत माझे दिवस चांगले गेले. फिलिस व फे ह्यांचा निरोप घेऊन रात्रीं दोन वाजतां मी स्टेशनवर आलें. गाडी चांगली तब्बल दीड तास उशिरा म्हणजे जवळ जवळ साडेतीन वाजतां स्टेशनमध्यें आली. गर्दी म्हणजे इतकी बेसुमार होती कीं, मद्रास मेलसुद्धा कितीतरी बरी! गाडी इतकी भरून आली होती कीं, सांगतां सोय नाही आणि सेकंड क्लासचे डबे तर हाताच्या बोटावर मोजण्याइतके मोजके. त्यामुळें रिझर्व्हेशन असलें तरी तें लोकांनी मानलें पाहिजे ना? सगळाच गोंधळ! परंतु तेवढ्यांत इंग्लिश जाणणारा सीरियन पोलीस ऑफिसर भेटला. त्याने मला मीं मागची टौरस सोडली त्या गाडीवर पाहिलेलें होतें व लगेच

ओळखलेंहि. माझी चौकशी केली व आपल्या बहिणीबरोबर स्वतःच्या खास राखून ठेविलेल्या डब्यांत तिला सोबत करण्याविषयीं सांगून माझी सोय केली. अशीं भावडीं माणसें असतात, म्हणून जगांत चांगुलपणा अनुभवास येतो. ह्याचें एकदां प्रत्यंतर आलें. ह्या डब्यांतून माझा प्रवास फार सुखाचा झाला. तो पोलिस-ऑफिसर प्रवास करणार नव्हताच; पण त्याची बहीण, तिचीं दोन मुलें, मावशी व मावशीचा नवरा आणि मी इतकींजणं डब्यांत होतों. त्यांना अरेबिकशिवाय दुसरी भाषा येत नव्हती. खुणांनीं आम्ही इतके बोललों आणि मला तर त्या प्रवासांत इतके अरेबिक शब्द येऊं लागले कीं, आणखी चारआठ दिवस त्यांच्या सान्निध्यांत काढले असतें तर मीहि सहज बोलण्याइतपत भाषा शिकलें असतें असें वाटूं लागलें.

अलेप्पोहून बगदादलाच मीं १ तारखेला पोहोंचणार होतें तेव्हां १ तारखेची बसऱ्याची बोट मिळणें शक्यच नव्हतें. पण पुढची बोट ७ तारखेला होती तोपर्यंत उलट थांबत थांबत प्रवास करणें भाग होते. बगदादला आतां माझ्या ओळखीचें कोणी तरी होतेच. तेव्हां आधी तेथे पोहोंचून मग बसऱ्याला कधी जावयाचें तें ठरवूं, असें म्हणून मी पुन्हां एकदा देवावर भार टाकून निःशंकपणे झोपी गेलें.

● ● ●

# १२

## बगदाद–बसरा–मुंबई

आगगाडींत बसल्यानंतर तिच्या लयबद्ध चालीच्या तंद्रींत मला पाळण्यांत झोपल्यासारखें वाटूं लागावयाचे. मी कॅले सोडल्यापासून सारखी थोड्या थोड्या दिवसांच्या अंतराने आगगाडींतून प्रवास करीतच होतें. तेव्हां शरीराला आणि मनाला ती एक लहान मुलासारखी संवयच झाली होती. इकडे तिकडे हिंडवून पाळण्यांत टाकलें की, लहान मूल जसें पटकन झोपून जातें, तसें माझें होई. त्यांतून पॅरिस ते इस्तंबूल हा ओरिएंट एक्सप्रेसचा प्रवास आणि इस्तंबूल ते अलेप्पो हा आधींच तीन दिवसांचा व माझ्या वाट्यास आलेला जवळ जवळ आठवड्याचा प्रवास आणि अलेप्पो ते बगदाद हा तीन दिवसांचा प्रवास हे त्यांतल्या त्यांत जरा जास्तच दीर्घ होते. आगगाडींत प्रवास करणें मला फार आवडतें आणि खरोखरीच मला तिच्यांत बसावयाचा कंटाळा येत नाही, हें ह्या प्रवासांत सिद्ध झालें. क्षणांत लंडनच्या आठवणी, क्षणांत मैत्रिणींचीं कुजबुजणीं, कधीं घरांतील लोकांची आठवण; तर मध्येंच त्या रुक्ष आणि नकोशा झालेल्या ऑफिसमधल्या पाताळयंत्रीपणाच्या कथा ! मध्येच पॅरिसमधील प्रासादांचीं स्वप्नें तर पुन्हा इटलीमधील रंगेल चित्रांच्या आठवणी अशा एक ना दोन कितीतरी गोष्टी डोक्यामध्ये गर्दी करून सोडीत ! स्वित्झर्लंड-

मधील थंडीची आठवण त्या मध्य-पूर्वेच्या कडकडलेल्या उन्हांतहि पांघरूण नसल्याची जाणीव करून देई. ज्यांना सोडून मी दूरदूर चाललें होतें ती सर्व मित्रमंडळी माझी आठवण काढीत असतील आणि ज्यांना भेटण्यासाठी वितीवितीने गाडीची प्रत्येक भक्, भक् मला हिंदुस्थानाकडे खेचीत होती ती सारी जिवलग नातेवाईक मंडळी माझी क्षणाक्षणाने वाट पहात असतील. धनवन्ती मोठी झाली असेल, पुष्कराज मला ओळखील तरी का, माझ्यासाठी आपल्यांतली अर्धी लिमलेटची वडी संध्याकाळपर्यंत राखून ठेवणारा माझा मुलगा कदाचित् मला पाहतांच बुजणार तर नाही ना ? अशा विचारांच्या जोडीला आईची तब्बेत कशी असेल, आपलें घर अस्ताव्यस्त ठेविलेलें दिसेल कीं काय, आपण इतके पैसे खर्च केले तेव्हा नाना काय म्हणतील, अशा सारख्या काळज्या ! असे कितीतरी विखुरलेले विचार आलटून पालटून डोक्यांत घोळ घालीत असत. इंग्लंड सोडल्यापासून मी पुन्हा केस कापलेच नव्हते. त्यामुळे हळूहळू परत हिंदी पद्धतीची केशरचना करणें मला शक्य होऊं लागलें होतें. गोऱ्या लोकांची वस्ती तुरळक होऊं लागतांच हळूहळू स्कर्ट-ब्लाऊजेसहि बॅगच्या तळाशीं जात चालले व साड्या नेसणेंच सोपे वाटूं लागलें. मुख्य म्हणजे साड्यांमुळे मी इतरांना निराळी दिसें व मला अगदीच घरगुती वाटे. युरोप सुटल्यानंतर कडक इस्त्रीच्या चेहेऱ्याने व पेहेरावाने वापरणारे लोक क्वचितच दृष्टीस पडत. पंडित नेहरूंबद्दल मध्यपूर्वेच्या देशांमधून बरेंचसें कुतूहल व खूपच आदर दिसला. त्यामुळे हिंदुस्थानांतील लोक हिंदुस्थानांतल्याप्रमाणें दिसले की साहजिकच त्यांना आवडत असे. अलेप्पोपासून न्यूसाबिनला ती सर्व अरेबिक मित्रमंडळी उतरेपर्यंत माझा १३ तासांचा वेळ फार चांगला गेला. नंतर मी डब्यांत एकटीच होतें. भीति वाटण्याचा प्रश्नच नव्हता. आपोआपच मला भीति वाटेनाशी झाली होती.

आतां आगगाडी अगदीच रखडपट्टीने चालत होती. बाहेर बघण्यासारखे कांहीं नाही, डब्यांत कोणी नाहीं, उकाडा म्हणजे विलक्षण ! तेव्हा कधी एकदा बगदाद येतें, असें मला होऊन गेलें. प्रदेश तर इतका वैराण व उजाड कीं हाडकुळ्या गाई व मेंढ्या जमिनींत माना घालघालून काय खात होत्या यांचें त्यांनाच माहीत ! मधून मधून उंट दिसले कीं बरें वाटे. उंटाचा

सर्वांत मोठा फायदा म्हणजे वाळवंटांत त्याला मारून त्याच्या पोटांतलें पाणी अरब पिऊं शकतात असें आम्ही लहानपणीं सांगत असूं. उंटाला वाळवंटांतील जहाज म्हणतात, हें आमच्या सहजगत्या लक्षांत राही. वास्तविक दिसला उंट की, मार त्याला आणि पी पाणी असं शहाळ्या-प्रमाणें अरब लोक उंटाला मारीत नाहीत. उंट पाणी प्याल्याशिवाय दिवसेंदिवस प्रवास करूं शकतो, हाच त्याचा खरा फायदा होय. आपल्या उंटावर अरबाचें फार प्रेम असते. इतक्या सहज व चटकन केव्हाहि पाणी पिण्यासाठी उंटाला मारीत नाहीत. अरब लोक फार गरीब आहेत, अगदी आपल्या हिंदुस्थानाइतकें दारिद्र्य इकडे दिसून येतें. क्षितिजापर्यंत मनुष्य-वस्तीचा मागमूसहि दिसत नाही अशा मुलुखांत गाडी थांबली असतांना तीन अरब उतरून पायींच कोठेंतरी चालू लागले. कोठें गेले कोणास ठाऊक! आणि त्यांना कोठे जावयाचें असेल तर किती चालावें लागलें असेल, ह्याची कल्पनाहि मला करतां यईना. ते तिघेजण मात्र जणूं पायाखालची वाट असल्याप्रमाणें एवढें मोठें वैराण वाळवंट खुशाल तुडवीत चालले होते. अशाच वाळवंटांत दूरवर मृगजळ वरचेवर दिसे. बारक्याशा करवंटीसारख्या भांड्याने जमीन खरवडून लोक पाणी (खरं म्हणजे आपल्याला तर तो चिखल वाटतो; पण रेतीमुळे पाणी सहज वरचेवर येतें व रेती आपोआप खालीं बसते) घेताहेत हें दृश्य तर कितीदां तरी बघावयास मिळे. अगदी आसमंतात कुठेहि डोंगर नाही, असा वाळूचा समुद्र बघून मला भारीच आश्चर्य वाटलें. गाडीच्या खिडक्यादारें अगदी धूळ यावयाला वाव नाही इतकीं बंद असतात. कारण वाळूचे भोवरे वारंवार वरवर फिरत जातात व खिडक्यांच्या तावदानांवर वाळूचा मारा होत असतो. इतक्या रुक्ष प्रदेशाला आपला म्हणून रहावयाचें हें वाटतें तितकें सोपें नाही; पण त्याजबरोबर जे तेथेच जन्मले, वाढले, त्यांना तेथेच बरें वाटतें, हेंहि खोटें नाही. इंग्लंडमधील लोकांना तेथल्या थंडीची संवय, पॅरिसच्या लोकांना गार पाण्याची संवय, जर्मनींत दमट, धुकें असलेल्या हवेची संवय, टर्कींत चांगल्या हवेची ही संवयच, सीरियांत रुक्षतेची संवय! माणसाच्या अंगीं सवय लागण्याचा किंवा होण्याचा जो काय धर्म आहे तो खरोखरीच और आहे. ऐषआराम आणि हाल सवयींच्या पोटीं एकच आहेत. ह्यामुळे मला

वाटतं माणसें सुखी रहाण्याला मदत होते. सवयीपोटीं कितीतरी मोठ्या बाह्यात्कारी विषम वाटणाऱ्या गोष्टींमधील विरोध व्यवहारांत कमी भासतो.

अशाच कांहींशा विचारांत मला झोप लागली. रात्रीं मला वाटतं २–३ चा सुमार असेल. मी जागी झालें आणि बघतें तो थंडा कारभार. इंजिनचा आवाज नाही. अंगाई गाण्याप्रमाणें वाटणाऱ्या आगगाडीची लय नाही. डब्यांत तर कोणी नव्हतेच, बाकी वर्दळहि ऐकूं येईना. मला चरका बसला. सीरिया टर्कीच्या मध्यावर कोणीतरी फेकून दिलें आहे कीं काय असें वाटलें. माझा डबाच तर कोठेतरी तोडून सायडिंगला टाकला नाही ना ? कदाचित् मी झोपेंत असतांना हें झालें असेल आणि आंत एक बाई झोपली आहे हें कुणी पाहिलेंच नसेल, कोणाच्या लक्षांतच आलें नसेल ! आतां त्या दुपारीं पाहिलेल्या अरबांप्रमाणें मला तें न संपणारें रुक्ष वाळवंट तुडवित जावें लागणार कीं काय ? आणि मी एकटी जाणार कुठे ? कुठे दिवे दिसत नाहीत कीं मनुष्यवस्ती नाही, भाषा येत नाही आणि विचारावयाचें तरी कोणाला ? या सर्व कल्पना अर्ध्या क्षणाच्या आंत चमकून गेल्या न गेल्या तोच मी ताडकन उठून बसलें. धाडकन आवाज करून खिडकी उघडली व पुढे इंजिन जोडलेले व मागे दुसरे डबे चिकटलेले पाहिल्यावर जीवांत जीव आला. संकटांत एकटें सापडल्याचेंच दुःख जास्त असतें. बरोबरीला चार लोक आहेत भोगणारे, असें पाहिलें कीं, अर्धे दुःख नाहीसें होतें. काय मनुष्य स्वभाव आहे ! मरतुकड्या लंगड्या घोड्याच्या दुडक्या चालीने चालणाऱ्या त्या इंजिनाचा मला दुपारपासून फार राग आलेला होता. त्यांतून त्या इराकी तरुणाने तुर्की सीरियाचीं इंजिनें अगदी भिक्कार ! एकदां गाडी इराकमध्ये शिरली आणि तिला आमचें इंजिन लागलें कीं पहा ! वारा प्यालेल्या तारवासारखी काय धावत सुटते !" असें सांगितलें होतें. इराक ओलांडून चांगले दोनतीन तास झाले तरी इंजिन तारवाच्या गतीने तर राहोच; पण बैलगाडीचाहि वेग घेईना. त्यामुळे मी त्या इंजिनावर चिडलें होतें; पण त्याच इंजिनाला माझा डबा आतां चिकटलेला आहे, हें पाहतांच त्या मुड्यासारख्या थंड एंजिनबद्दलहि मला आपुलकी वाटूं लागली. अशा वाळवंटांतून पायीं चालून मार्ग काटावयाची वेळ म्हणजे पृथ्वीप्रदक्षिणेचे दिव्य करण्याचीच पाळी ! "आग लागो त्या

इंजिनाला !" असें म्हणूनहि उपयोग नव्हता. कारण तेंच करण्यासाठी सातआठ लोक खपत होते आणि त्यांना तें अजून जमलें नव्हतें म्हणून तर सारा थंडा कारभार झाला होता. इंजिन तापून झक् झक् आवाज येण्यास तब्बल अडीच तास लागले. थापलेल्या मातीचीं वसकीं घरें मागें सारीत सारीत एकदाची गाडी बगदादला आली.

मी पॅरिसला गेलें तेव्हा इंग्लंडची राणी आली होती. म्हणून रोषणाई केलेली होती. इस्तंबूलला गेलें तेव्हा आरास व आतषबाजी ! कारण त्यांचा 'रिपब्लिक डे' होता व अफगाणिस्तानचा प्राइम मिनिस्टर तेथे आलेला होता. अलेप्पोमध्ये असतांना ईदचा उत्सव झाला व इराकमध्ये रमझानची सजावट व रोषणाई केली होती. बगदादचें नवें स्टेशन आजच उघडलें होतें व पहिल्या प्रथमच तौरस एक्सप्रेस नव्या स्टेशनांत आली होती. स्टेशनवर बगदादची पार्टीहि अजून लागावयाची होती. इराकमध्ये बहुतेकांना इंग्रजी येतें, ही त्यांतल्या त्यांत आणखी एक समाधानाची गोष्ट होती.

येथील हॉटेल्स फार महाग वाटलीं. मी स्टेशनवर आल्यानंतर त्या इराकी तरुणाला फोन केला व तो ताबडतोब आला. त्याच्या मदतीने एका बऱ्याशा हॉटेलांत खोली मिळवून राहिलें; पण झोपण्याखेरीज एरवी फारशी मला ती वापरावीच लागली नाही. माझ्या "अडाण्याच्या" अमेरिकन मैत्रिणीने बगदादला असलेल्या एका अमेरिकन गृहस्थांचा पत्ता मला दिला होता. त्यांना फोन करून मी कळवितांच संध्याकाळच्या जेवणाचें निमंत्रण मला त्यांनी दिलें व नेण्यासाठी गाडी पाठविली. हे गृहस्थ रॉकफेलर फौंडेशनचे चेअरमन होते व रिवाजाप्रमाणें जेवतांना मला कोणी जोडीदार पाहिजे म्हणून त्यांनी त्यांच्या एका इंजिनियरलाहि बोलाविलें होतें. ती दोघें नवराबायको व आम्ही दोघें मिळून चौघांनी खूप गप्पा मारल्या व मी बगदादला होतें तितके दिवस माझे या लोकांच्या सहवासांत फारच चांगले गेले. बगदादला रमझानच्या उत्सवाची चार दिवस धमाल चालली होती म्हणून सुट्टी होती. थॉमस कुककडे जाऊन मला माझ्या पुढच्या बोटीच्या रिझर्वेशनची खटपट करावयाची होती. जेव्हां ते एंजिनियर गृहस्थ आपल्या कामावर जात तेव्हां त्यांची गाडी घेऊन मी माझीं कामें करून येई. दुसऱ्या दिवशीं ते चेअरमन व त्यांची बायको ह्यांना बाहेर-

गांवीं जावयाचें होतें. तेव्हां मला त्यांच्या कंपनीचें काम दाखविण्याची, हॉटेलवरून आणण्याची व पोचविण्याची सर्व चोख व्यवस्था त्यांनी त्या इंजिनियरच्या करवीं करून ठेविली होती. मी जेवायला त्यांच्याकडे असें. माझा रंग निळा म्हणजे जेवढ्या वस्तु निळ्या रंगाच्या होत्या त्या सगळ्या माझ्यासाठी, असें मी समजावयाचें. माझ्या बाथरूममध्ये सर्व गोष्टी निळसर, प्रकाशहि निळाच, भिंतीवर रोमन बाथ, कारंजीं वगैरेंची सुंदर चित्रें निळ्या-पांढऱ्या रंगाचींच, टॉवेल निळे, इनॅमल निळेंच, पावडरीच्या डब्या, साबणाच्या डब्या सारें कांही निळें ! मला फार फार गंमत वाटली. इतक्या रसिकतेने आयुष्य जगणारे लोक नुसते बघायला मिळाले तरीदेखील आनंद होतो; मग तसे नेहमीच राहिलों तर किती मजा वाटत असेल ? जेवण करावयास नोकर होता. त्याने आम्हांला नाना प्रकार करून घातले. त्यांच्या फॅक्टरीवर मी गेलें होतें, तेथेहि वेळ कसा जाई समजत नसे. आयत्या भिंती, आयते खांब, आयत्या खिडक्या, वगैरे निरनिराळे भाग आणून एकत्र जोडावयाचे व घरें बांधावयाचीं असें इराकच्या सरकारसाठी एक अमेरिकन कंपनीने कंत्राट घेतलें होतें. आपल्याकडील पूर्व-रचित गृहें (Prefabricated Houses) होतीं त्यापैकींच प्रकार, पण अमेरिकन लोकांनी तेथील प्रदेशांत मिळणाऱ्या साधनसामुग्रीचा उपयोग करूनच हे भाग बनविले पाहिजेत व तेथे कॉलनीजच्या कॉलनीज उभारल्या पाहिजेत असें तें कंत्राट ठरलें होतें. मला सॉन्डरसनने स्पंजप्रमाणें पोकळ पण सिमेंट-कॉंक्रिटच्या भिंतीपेक्षां मजबूत आणि वजनानें हलक्या अशा भिंती करतांना दाखविलें. हीं घरें बांधण्यासाठी लागणारे सुटे भाग करण्याचें काम जोरांत चालू होतें. अशाच प्रकारचीं नमुना म्हणून बांधलेलीं घरें इराकी सरकारने मंजूर केलीं होतीं व त्या नमुन्याबरहुकूम सर्व घरें बांधण्याचा त्यांचा संकल्प होता. कुठे अमेरिका, कुठे इराक; परंतु धंदा व पैसा ह्याकरितां भांडवलदारवर्ग कोठेहि जाईल. इराकमधील मजूरवर्गाकडून काम करून घेणें महाकर्म कठिण ! कारण ते लोक इतके आळशी व इतके मंद आहेत कीं, सतत कायम त्यांच्या मागे उभे राहिल्याशिवाय ते जागचे उठतच नाहीत. त्यांना जास्त पैशाचें आमिष दाखविलें तरी फुकट आहे. कारण ते मग कमी दिवस काम करतात व जास्त सुट्ट्या घेतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



अनुक्रम ........ वि: ......

शिवाय त्यांना रहाणीमान वाढविण्याची तेवढीशी आवड नाही. दुसऱ्या कोणी त्यांचें रहाणीमान वाढविलें तर चालेल; पण त्यासाठी ते स्वत: जास्त कष्ट घेण्यास तयार नाहीत. ज्यांना कांही मुळीं नकोच आहे त्यांच्याकडून जास्त काम करून घेणें फारच मुष्किल आहे. हिंदुस्थानांतील मजूर-वर्गाची जवळपास हीच स्थिति आहे. कदाचित् हवेचा तो परिणाम असावा किंवा सर्वसाधारण सगळयाच लोकांच्या दारिद्र्यामुळे त्या दारिद्र्याचीहि मी वर लिहिल्याप्रमाणें सवय झाली असावी. कसेंहि असो, मजुरी करण्याचा जो प्रकार व जी पद्धत मी त्या अमेरिकन इंजिनियराबरोबर दूर उभे राहून अवलोकन केली त्यावरून तें काम करण्याकरितां किती सतत पाहणी करावी लागत असेल ह्याची कल्पना आली. इंग्लंडमध्ये घरें बांधीत असतांना आम्ही पाहिलें होतें; पण ते मजूर किती निराळ्या पद्धतीने काम करतांना आढळले होते ! पूर्व व पश्चिमेंतील हा फरक साहजिकच माझ्या चटकन ध्यानांत आला.

रॉकफेलर फौंडेशनचा चेअरमन कीं, ज्याने मनांत आणिलें असतें तर एखाद्याला उंदराच्या पाठीवरून उचलून हत्तीवरील अंबारींत बसविणें ज्याच्या हातचा मळ होता, त्याला, मला हिंदुस्थानांत मनासारखी नोकरी मिळालेली नाही, हें ऐकून, ती एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे असें वाटलें. एकूण माझा बगदादचा मुक्काम फार थाटामाटाचा व सुखकारक झाला. शेवटचा दिवस मला फार कंटाळवाणा गेला. "बगदादचा लुच्चा, हरून अल रशिद, बेगम झुबैदी, अमीना" असल्या नांवाशीं निगडित असलेलें बगदाद, जुनें बगदाद, अगदी बकाल आहे. नवा भाग तेवढा चांगला आहे; पण तो पाश्चिमात्य पद्धतीवर वसविलेला आहे. सोन्याचा पत्रा मारलेल्या कळसाची एक मशीद मीं दुरूनच पाहिली, खरेदी करण्यासारखें कांही विशेष आढळलें नाही. मीं फारसा प्रयत्नहि केला नाही. बसऱ्याहून ७ तारखेचें रिझर्वेशन बगदादहून मिळेना म्हणून मी फार बेचैन झालें व शेवटीं बसऱ्याला जाण्याचा प्रयत्न करावा असा विचार करून बगदाद सोडलें.

बगदाद सोडतांना घोटाळा झालाच. खरं म्हणजे प्रत्येक मुक्काम सोडतांना आजपर्यंत घोटाळा झालेला होता. रविवारीं संध्याकाळीं सहा वाजतां

बगदादहून बसऱ्याला जाणारी गाडी होती. सोमवारीं बसऱ्याला पोहोचेन व मंगळवारीं बोट मिळेल असा अंदाज होता. स्टेशनवरून आंत जातांच आमचें तिकिट पुस्तक काढून दाखविलें. "राखीव"पणाचा आता उपयोग नव्हता. कारण माझ्या बदललेल्या कार्यक्रमामुळे सगळ्या राखीव जागांच्या तारखा मागेंच होऊन गेलेल्या होत्या. तिकिटें मात्र सर्व तींच चालणार होती. बगदादच्या स्टेशनमास्तरनें पहिला धक्का दिला. तो म्हणजे "सर्व गाडी राखीव तिकिटवाल्यांची आहे. ज्यांच्याजवळ राखीव तिकिटें नाहींत त्या सर्वांना उद्याच्या गाडीनें जावें लागेल" ही घोषणा. हा हिंदुस्थानापेक्षां भयानक कारभार झाला. आतां मी करावें तरी काय ? मला तर बगदादमध्ये मुळींच रहावयाचें नव्हतें, आणि राहून चालण्या-सारखेंहि नव्हतें. पुन्हा सोमवारीं संध्याकाळीं येथून निघून मंगळवारीं पोहोचणार व बोटीचें रिझर्वेशनहि पक्कें झालेलें नाही !—म्हणजे ती बोट चुकली तर आणखी सहा दिवस मुक्काम वाढवावा लागणार. पैशांचा तर चुराडा होत चालला होताच. सहासहा दिवस आणखी रहावयाचें म्हणजे पैसे कुठून आणूं ? ह्या सर्व विचारासरशीं मी निकराने मुख्य स्टेशन-अधिकाऱ्याकडे गेलें व त्याला सर्व हकीकत सांगितली. तेव्हां त्याने परवानगी दिली, परंतु "जागा मिळेल ही खात्री देत नाही. चढावयाची परवानगी देतों, उभ्याने प्रवास करण्याची तयारी ठेवा," असें सांगून त्याने मला एका बऱ्याशा डब्यांत चढवून दिलें. तो इंग्रजी छान बोलत होता. यूरोपचा प्रवास करून आल्यामुळेच तो इतका समंजस झाला असावा. इतर इराकी लोकांसारखा "आखडूपणा" करणारा नव्हता.

मी खिडकींतून तोंड बाहेर काढून दुसऱ्या लोकांचा निरोप घेण्याचा चाललेला कार्यक्रम पहात होते. माझ्या डब्यांत एक सतरा अठरा वर्षांची नाकींडोळीं नीटस, गोरीपान आणि तरतरीत मुलगी बसली होती. तिच्या बरोबर तिची आणिक एक मैत्रीणहि होती. ह्या मुलीला निरोप देण्या-साठीं एक २५–३० वर्षांची मुलगी, एक देखणी व थोराड बांध्याची मुलगी व ५५–६० वर्षाची म्हातारी इतकी मंडळी आली होती. हीं २५–३० वर्षांची मुलगी व डब्यांतली ती सुरेख मुलगी ह्या दोघीहि माझ्याकडे पाहून आपापसांत कुजबुजत होत्या. मी जणूं माझ्या तें लक्षांतच आलेलें

नाहीं असें दाखवीत होतें. शेवटीं त्या सुरेख मुलीने मला आपल्या अर्धवट इंग्लिशमधून आपल्या रिझर्व्ड् डब्यांत बसण्याठीं येतां का असें विचारलें. तिचा डबा म्हणजे चौघींसाठी रिझर्व्ह असतो तसला ! ती, तिची मैत्रीण आणि तिची आई व आणखी एक दुसरीच बाई इतक्याजणी त्यांत होत्या. मी एकटी त्यांच्यांत सहज सामावून गेलें. मग त्या सर्व मुलींशीं माझी थोडयाच वेळांत मैत्री जमली. त्या सुरेख मुलीचें नांव सहिरा व तिला निरोप द्यावयाला आली होती तिची बहीण नहिदा. नहिदा बगदादला मास्तरणीची नोकरी करीत होती व ती आपल्या आईबरोबर रहात होती. सहिरा इंग्लिश जरा जास्त शिकलेली म्हणून बसऱ्याच्या सरकारी शाळेंत तिला जरा बरी नोकरी मिळाली होती. बसऱ्याला बिऱ्हाड करून ती व तिचा डॉक्टर भाऊ रहात होतीं. त्या दोघींचेहि कपडे अद्ययावत् युरोपियन पद्धतीचे व उंची होते. बसरा हें एक पर्शियन गल्फमधील बंदर. या गल्फमध्यें एडनप्रमाणेंच मालावर जकात घेतली जात नसल्यामुळें सर्व वस्तु स्वस्त मिळतात. विशेषत: युरोपखंडांत तयार झालेल्या वस्तूंचा ह्या बंदरांतून अतोनात उठाव होतो. मीं इंग्लंड, पॅरिस वगैरे ठिकाणीं घेतलेले पाहिलेले कपडे किंवा वापरलेल्या जिनसा सहिराच्या अंगाखांद्यावर दिसल्या. इराकी सरकार इंग्रजी शिक्षणाला उत्तेजन देणारें असल्याने सहिरा पुढचें शिक्षण इंग्रजींतून घ्यावें असा विचार करीत होती. ती इराकी मॅट्रिक परीक्षा पास झालेली होती व नहिदा आपल्याकडे व्हर्नाक्युलर फायनल किंवा एस. टी. सी. असते तितपत शिकलेली होती. त्यांना काय म्हणावयाचें आहे हें मात्र मला कळेल इतपत त्या इंग्रजीमधून बोलूं शकत होत्या आणि मी बोललेलें तर त्यांना सहजच समजत होतें. आम्ही ओळख होऊन बोलत होतों तरीहि मधे मधे नहिदा व सहिरा माझ्याकडे निरखून निरखून पहात होत्या. मला चमत्कारिक वाटलें; पण मी कांही बोललें नाही. गाडी सुटतांच नहिदाने मला आवेगाने धरलें व "तूं किती छान आहेस" असें म्हणून ती आईबरोबर झटकन खाली उतरली. हें सर्व मला काय होतें आहे हें कळावयाच्या आंत अर्ध्या सेकंदांत झालें. खरं म्हणजे त्या दोघीहि दिसावयाला अपवादाने सुरेख आहेत हे मला जाणवेल इतक्या त्या सुंदर होत्या. मी तर कदाचित् त्या वेळेला जरा बरी दिसलें असेन.

प्रत्येकच व्यक्ति कधीकधी चांगली दिसते. परंतु त्या दोघी मात्र खऱ्या सुरेख होत्या. "दिसणें" आणि "असणें" ह्या दोन्हींतील अंतर मला कळलें असलें तरी पण तसें उघडपणें म्हणण्याचा वा कृतीनें दाखविण्याचा धीर झाला नाही. पण तीच गोष्ट नहिदानें केली—खुशाल केली. स्तुतीचा परिणाम म्हणा कीं, कसेंहि म्हणा; पण मला त्या मुली फार आवडूं लागल्या.

आतां मात्र इराकी इंजिन आपलें खरें स्वरूप दाखवीत होतें. एका चपळ इंजिनाला चांगले सतरा लांबच लांब डबे जोडलेली गाडी बगदाद सुटल्यावर डौलानें शिटी वाजवीत जाऊं लागली व जर्मनी सोडल्यानंतर खऱ्या आगगाडींत बसल्याचा अगदी बालिश आनंद मला झाला. बगदादच्या आगगाडींतून सूर्यास्त बघतांना माझा प्रवास झपाट्यानें संपत आल्याची तीव्र जाणीव नकळतच झाली. बाहेर बघण्यासारखें कांही नव्हतेंच. दोन्ही बाजूंना दूरच दूर पसरलेलें रुक्ष वाळवंट, क्वचित् मृगजळ व कधीं खारें पाणी, आणि फारतर सृष्टिशोभेसाठी एखादें विखुरलेलें खजुराचें झाड. समुद्राला लाजविणारें विराट वाळवंट पाहून साहजिकच डब्यांतल्या मुलींशी बोलण्यांत वेळ बरा जाईलसें वाटलें असेल तर खरोखरीच नवल नाही. सहीराला मी माझी हकीकत सांगितली. बसऱ्याला उद्यांची बोट मिळाली तर बरें नाहीतर पंचाईत आहे असें तिला वाटलें नाही. ती म्हणाली कीं, "नाही मिळाली तर बरंच होईल. मग तुला आमच्या घरीं आठवडाभर रहातां येईल." बसऱ्याला बी. आय. एस. एन. कंपनीच्या ऑफिसमध्ये जातांच अपेक्षेप्रमाणें बोटींत जागा नाही हें उत्तर मिळालेंच. अर्थात् मला आठवडाभर रहावयाचें नव्हतेंच. त्यामुळे मी ह्याला भेट त्याला भेट असें चालविलेंच होतें. शेवटीं त्या कंपनीच्या ऑफिसमध्ये श्री. पिंटो नांवाचे फार सज्जन गृहस्थ भेटले. त्यांनी पुढील बंदरावर फोन करून दोन जागांचें रिझर्वेशन रद्द करवून मला एक बर्थ मिळवून दिला. श्री. पिंटोंना दोन मुलगे होते; पण मुलगी नव्हती. मुलगी असावी ही फार इच्छा असूनहि ती त्यांची इच्छा पुरी झाली नव्हती. ह्या उतारवयांत मुलगे मोठे होऊन आपापल्या उद्योगाला गेले होते. मुलगी असती तर माझ्याजवळ राहिली असती, हें सांगतांना त्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. कोणाच्या मनाचा "नाजूक कोपरा" कोठें असतो तें सांगतां येत नाही. आपली

मुलगीच जणू आज इतक्या लांब एकटी प्रवास करीत आहे की काय, असें त्यांना वाटलें की काय कोण जाणें. पण त्या सद्गृहस्थांनी "दारा" बोटी-वरील कप्तानासकट सर्वांशीं माझी ओळख करून दिली व माझी नीट व्यवस्था ठेवण्याविषयीं वारंवार बजावून श्री. पिंटोंनी माझ्यावर मोठे उपकार करून ठेवलें हें खासच ! सहिराकडे मला फक्त दोनच दिवस रहावें लागले. मी तुर्कस्तानमध्ये घेतलेली दोन फ्लॉवरपॉटस, पॅरिसमधील एक सेंटची बाटली व इतर किरकोळ वस्तु तिला भेटीदाखल दिल्या. सहीराने मला एक सुरेख अंगठी दिली. मुसलमान धर्माचें लोक असले तरी सुधारणेचें वारें भरपूर प्यालेले असल्यामुळे तिने व तिच्या भावाने आपलें चार खोल्यांचेंच घर पाश्चिमात्य पद्धतीवरच सजविलें होतें. जेवतांना मात्र मला संकोच वाटला; कारण उजव्या डाव्या हाताने किंवा आपल्याच खात्या चमच्याने मध्ये ठेविलेलें अन्न ज्याला जसें हवें असेल तसें त्याने वाढून घेण्याची चमत्कारिक पद्धत तिकडे रूढ असावी असें वाटतें. खर-कट्याचा किंवा उष्ट्यामाष्ट्याचा फारसा विधिनिषेध त्यांना कोणालाच वाटत नव्हता व माझ्याबाबत तसा परकेपणा न दाखविणें म्हणजे माझा सगळ्यांत मोठा बहुमान केल्याची त्यांची भावना दुखविणें मला शक्य नव्हतें. त्यामुळे पहिल्या जेवणाच्या वेळेस मी पुष्कळशी अर्धपोटीच राहिलें व जेवणानंतर पुढे ठेवलेल्या खजूर आणि सुक्या मेव्यांवरच ताव मारला. पुढच्या जेवणापासून मात्र मी शहाणी झालें. पहिल्यांदाच वाढून घेतांना मी मला पुरेल इतकें वाढून घेई म्हणजे पुन्हा कांही घेण्याचीच वेळ न यावी.

मला बोटीवर पोहोचवावयाला सहिरा, तिची मुख्याध्यापिका व एक-दोन मैत्रिणी शाळा बुडवून बंदरावर आल्या होत्या. त्या बसऱ्यासारख्या ठिकाणीं मुंबईच्या बंदरावर ज्या प्रमाणांत लोक उतरवून घ्यावयाला किंवा पोहोचवावयाला येतात तशी गर्दी मुळीच नव्हती. त्यामुळे एवढा घोळका माझ्यासारख्या वयस्थ परक्या बाईला पोहोचवावयाला आला कसा, ह्याचा सगळ्या बोटींतल्या लोकांना अचंबा वाटत होता. आम्हांला, "Goodbye Kiss" करून निरोप घेतांना पाहून कोणालाहि आम्ही कित्येक वर्षांच्या जुन्या मैत्रिणी होतों कीं काय, असेंच वाटलें असणार. प्रवासांत मला ज्या चांगल्या व्यक्ति भेटल्या त्यांत सहिराची तसबीर लागली. मी माझ्या

प्रवासाच्या शेवटल्या टप्प्याची सुरवात करीत होतें. पर्शियाच्या आखातांत बोट घुसली तेव्हां आपण आतां ६००० मैलांचा प्रवास आगगाडीने अंतर कापीत संपविला ह्या विचाराने माझें मलाच आश्चर्य वाटूं लागलें. मुंबईचे वेध लागले. माझ्या मुलांना भेटण्याची एकाएकीं घाई झाली. एक चांगली कादंबरी झटकन् वाचून संपावी, हातावेगळी करावी, तसें कांहीसें वाटूं लागलें. इतक्या दिवसांच्या कालांत हृदयामध्ये कुठेकुठे साचून राहिलेल्या, दडपून ठेविलेल्या, जतन करून ठेविलेल्या साऱ्या साऱ्या आठवणी उचंबळून येऊं लागल्या. पुन्हां आतां इतका स्वैरसंचार करण्याची संधि आयुष्यांत मिळेल की नाही कोण जाणे ह्या विचाराने बेचैनी वाटूं लागली. दहा महिन्यांपूर्वी मुंबई सोडण्याचा विचार इतका असह्य वाटत होता हेंच खोटें वाटे. आतां पुन्हां जुन्या दैनंदिन कंटाळवाण्या ऑफिसमध्ये जाण्याच्या चाकोरीला जुंपून घेण्याचा विचारहि रडूं आणीत होता. मी नव्या सरकारी हुकूमनाम्यानुसार मला ऐच्छिक निवृत्ति मिळावी, असा अर्ज इंग्लंडहून मुंबईच्या ऑफिसला पाठविला होता ! तो जर मंजूर झाल्याची बातमी मीं घरीं पोहोचतांच मला मिळेल तर किती छान होईल ! असा विचार येऊन मला त्यांतल्यात्यांत जरा बरें वाटत होतें. जगांत सर्वत्र सर्वस्वीं अनपेक्षित अशा घटनाहि माझ्या बाबतींत फार सुपरिणामदायक ठरल्या; पण मुंबईचा गुणच असा कीं, मीं साध्यासुध्या इतरांना सहजासहजीं मिळतील अशाहि गोष्टींची अपेक्षा केली तर तिची पूर्ती कधी घडून आली नाही !

बसरा सोडल्यानंतर बोटीवर मला बरी सोबत होती; पण बोटच फार लहान वाटे. तशी कोंकणच्या बोटींपेक्षां बरीच मोठी; पण 'एशिया' बोटीच्या मानानें कांहीच नाही. जातांना नाही म्हटलं तरी मला उत्साह होता--'पुढे काय' ही जिज्ञासा होती ! आता परत मुंबईला जातांना मीं 'गेलेंच पाहिजे' म्हणून चाललें होतें. किती दिवस बाहेर रहाणार ! केव्हातरी त्या जुन्या घाण्याला जुंपून घेणेंच भाग आहे. अशा समजुतदारपणाने मी निघालें होतें. पर्शियन आखातांतील सर्व बंदरें, कुवेट, बहारिन, इत्यादि घेत घेत आम्हीं येत होतों. मात्र बोट सोडून आंत असे कोठेच गेलों नाही. जाण्यासारखं कांही नव्हतंहि. बुडया मारून मोठे शंख, कवडे काढणें, पैसे टाकलेले शोधून आणणें असलीं कामें पाणबुडे लोक करीत तेवढीच काय ती

बंदरांत बघण्यासारखी करमणूक. बाकी वेळ अगदी सुनासुना जाई. मीं तर बोटीवरच्या लायब्ररींतून पुस्तकें आणून बहुतेक सारा दिवस तीं वाचण्यांतच पडून काढीत असें. संध्याकाळीं जरा डेकवर हवा खायची की केबिनमध्ये परत. कराची आलें आणि मला आतां बोटीचा कंटाळा आला. कधीं एकदां मुंबई येते असें आम्हांला झालें. मला तर घरीं जाण्याची, पोहोचण्याची कमालीची घाई झाली! मुंबई येण्याच्या आदल्या रात्रीं तर मला झोपच आली नाहीं म्हटलें तरी चालेल. बसरा ते मुंबई हें अंतर मुंबई ते नेपल्स ह्या अंतराच्या निम्में आहे; तरीहि जातांना आम्हीं अकरा दिवसांत नेपल्सपर्यंत गेलों. येतांना दहा दिवस लागले. दुरून मुंबई बंदराचे दिवे आम्हांला पहाटे चार-साडेचार वाजतां दिसूं लागले. डेकवर आमची धावपळ सुरू झाली. मीं खालीं येऊन लगेच कपडे वगैरे करून, सामान बांधून उतरण्याची तयारी करण्यास लागलें. पहांटेच्या वेळीं मुंबई बंदर दुरून फारच विलोभनीय दिसतें. एवढी मोठी वाटणारी 'गेट वे ऑफ इंडियाची' कमान किती छोटी दिसते! मला तर पॅरिसच्या कमानी आठवून ही कमान खेळांतल्यासारखी वाटली. ताजमहाल हॉटेलची इमारत विशेष डौलदार दिसते. रेडिओ क्लबची तीच गोष्ट. मंदावल्या शुक्र ताऱ्याची फिकटलेल्या चंद्राशेजारीं जी पहाटेच्या वेळीं शोभा दिसावी तसंच कांहीसं मुंबई बंदराच्या इमारतींच्या बाबतींत दिसलं. गेट वे ऑफ इंडियाच्या कमानीपेक्षां बिजलीनें नटलेल्या बंदरांतील इतर प्रचंड इमारतीच लक्ष वेधून घेतात. सहा वाजतां मुंबईच्या अगदी नजीक आमची बोट आली; परंतु नांगर टाकून तेथेच ती झुलत ठेवली होती. आठ वाजतां पायलट येईल तेव्हां ती आंत घेतली जाणार! हें कळतांच आमची आतांपर्यंत केलेली धांदल फुकट आहे, हें आमच्या ध्यानांत आलें. बरोबर साडेसातला आमची बोट धक्क्याला लागली. दुरून दिसणाऱ्या नातेवाइकांना उद्देशून रुमाल हालवितांना हात दुखून आले. तीं सर्व माझ्याकडे व मीं त्यांच्याकडे बघण्यापलीकडे, हात करण्यापलीकडे कांहींच करीत नव्हतों. खाली उतरायाला साडेआठ वाजले असावेत. बाहेर पडतांच माझ्या मुलानें–पुष्कराजनें मला 'आई' म्हणून मिठी मारतांच माझा जीव गलबलून गेला. धनवंती उंच दिसूं लागली होती; पण "नाइलाजानेच आम्ही आईपासून दूर राहिलों,

आम्हांला आई हवीच" ही भावना त्यांच्या चेहऱ्यांवरून मला स्पष्ट दिसली. आईच्या हृदयाची ओळख आईला पटावयालासुद्धां प्रसंग यावे लागतात. मला सगळीजणं आकाराने लहान झालीं आहेत असं वाटूं लागलें होतें. हिंदुस्थानांतल्या लोकांच्या इतकी चणीने लहान माणसें युरोप आणि मध्य पूर्वेत कोठेच दिसली नाही. सात-आठ देश पाहिले तसाच मीं हिंदुस्थान पहात आहें कीं काय, असें मला कितीतरी वेळ वाटत होतें. सर्वांत मीं आल्याचा खरा आनंद व धन्यता कोणाला वाटत असेल तर तीं नानांना ! आणि तें साहजिकच होतें.

मी धष्टपुष्ट होऊन आलें नव्हतेंच; परंतु खात्रीने उजळलें होतें. झालं, एक सुंदर स्वप्न संपलें होतें. कित्येक वर्षांची मनीषा पूर्ण झाली होती. मला ओळखणारे लोक माझ्याकडे वळून वळून पहात होते. 'ह्यांच्या आयुष्यांत कांहीतरी विशेष घडलंय, ह्या युरोपखंडाचा प्रवास करून आल्या आहेत' असंच जणूं त्यांच्या मनांत येत असावं. मला भेटलेल्या मित्र-मैत्रिणींना इंग्लंडमध्ये मीं काय पाहिलं, शिकलें, व करावयाचें ठरविलें आहे, हें सांगतांना मीहि रंगून जाई. भोवतालीं घडणाऱ्या क्षुल्लक गोष्टींचाहि नकळत कां होईना, परदेशच्या प्रवासांत अनुभविलेल्या तत्सम गोष्टींशीं वा घटनेशीं तुलना होईच. पण काळाचा महिमाच असा आहे कीं, दिवस जात होते तसतशी पुन्हां मीं पहिल्या चाकोरीला रुळत होतें. पाय रोवून पुनश्च घाण्याभोवती फिरूं लागलें होतें. तरीहि काळाला एक गोष्ट अजून करतां आली नाही, ती म्हणजे माझ्या मनावर ठसलेल्या, कोरलेल्या, उमटलेल्या स्मृति पुसून टाकणें ही होय. त्या तशा नष्ट झाल्या नाहीत म्हणूनच हीं कोरीव लेणीं खोदणें शक्य झालें. पावसापाण्याच्या माऱ्यांतून अनेक वर्षांच्या निसर्गाच्या घडामोडींना तोंड देऊन, टक्कर देऊन तयार झालेल्या काळ्याभोर फत्तरांवर, खोदण्याचे संस्कार झाल्यानंतर त्याचें जीवन कोरीव लेण्याच्या रूपाने चिरंतन होतें. ज्या प्रकारचा दगड असेल किंवा ज्या प्रमाणांत तो मजबूत असेल त्या प्रमाणांत कोरण्याचें काम नाजूक, ओबड-धोबड किंवा ठाशीव कोरीव होऊं शकतें. स्मृतिपटलावर कोरलेल्या ह्या कोरीव लेण्यांचेंहि तसेंच आहे.

पुष्कळांनी मला विचारलें की, तुम्ही रोजनिशी ठेवीत होतां काय ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.



कित्येकांनी मला विचारलें की, आल्यावरोबरच तुम्हीं कां हें सारें लिहिलें नाही, पण हेंच तर ह्या लेण्यांचें वैशिष्ट आहे. मीं केवळ आठवणींच्या हत्याराने हीं लेणीं तयार केलीं आहेत. तें काम मीं कितीहि वर्षानंतर केलें असतें, केव्हांहि केलें असतें तरी मीं असेंच लिहिलें असतें. ज्या गोष्टींचा ठसा माझ्या मन:पटलावर खोल उमटला असेल त्यांचाच ह्या लेण्यांत समावेश झाला आहे व त्याच वाचणारांना, ऐकणारांना व बघणारांना दखल घेण्याइतपत महत्त्वाच्या वाटतील. आयुष्याच्या घडणींशी ह्या कोरीव लेण्यांचा मिलाफ कसा होत गेला, हें मीं लिहिण्याच्या ओघांत सांगूनच टाकलेलें आहे; पण मागें वळूनच पहावयाचें झालें तर आतांपर्यंतच्या आयुष्यांत जें जें मी मनापासून इच्छिलें, वांछिलें, तें तें थोडयाफार वर्षांच्या कालावधीनें कां होईना पण देवानें मला दिलें आहे असेंच मी म्हणेन. मला हव्या असणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या आड मानवी शक्ति कोणत्या ना कोणत्या रूपाने आली, मला अतोनात त्रास देण्याचा अशा लोकांनी प्रयत्न केला; पण कशा ना कशा तऱ्हेने हीं मानवनिर्मित संकटें दूर झालीं आणि शेवटीं माझ्या मनासारख्याच गोष्टी घडून येत होत्या. कुंडलीमध्ये कितीहि चांगले योग असले तरी मुख्य कसोटी म्हणजे व्यक्ति भाग्यवान हवी. नुसते पैसे, नुसती विद्या, नुसतें आयुष्य किंवा मुलेंबाळें ह्यांचा योग असून उपयोग काय ? ह्या सर्वांचा मेळ सुखस्थानांत व्हावयाला पाहिजे. परदेशगमनाचा योग असणें ह्यांत विशेष असण्यापेक्षां तो कशा प्रकारचा प्रवास होणार आहे, ह्यालाच खरें महत्त्व आहे. माझ्याचबद्दल सांगावयाचें तर ‘तुम्हांला परदेशगमनाचा योग मुळींच नाहीं. १९५० सालीं होता; पण तो चुकला तेव्हां आतां तुम्ही जाणें शक्य नाही ’ असें एका प्रसिद्ध ज्योतिष्याने चक्क भविष्य वर्तवून ठेविलें होतें, आणि त्याच वेळीं ही भविष्यवाणी खोटी पाडण्याचा मीं मनोमन निश्चय करून ठेविला होता. परदेशगमनाबाबतच्या भविष्यासंबंधीं आलेला अनुभव जमेस धरून त्यावेळेपासूत आजतागायतपर्यंत मीं उत्सुकतेने भविष्य असें विचारलें नाही जें घडावयाचें तें होणारच असेल तर विचारून काय उपयोग ?

सोन्यामोत्यांचे अलंकार घालून नटण्याचा हव्यास मला नव्हता आणि तसे त्या प्रमाणावर मला कधी ते मिळालेहि नाहीत. विद्यालंकार जसे

चारचौघींच्या अंगावर असतील त्याच तऱ्हेचे माझ्याहि अंगावर होते, आणि आहेतहि. विशेष नजरेंत भरतील अशा पदव्या किंवा प्राविण्यें माझ्याजवळ नाहीत म्हटलें तरी चालेल. कला हींच माझीं भूषणें असें ठासून म्हणण्याइतका अधिकार मला अजून त्या क्षेत्रांतहि प्राप्त झालेला नाही. कलेची सेवा घडली तरी पुष्कळ; तेव्हा तिला राबविण्याचा विचार लांबच. व्यवसायांत किंवा नोकरींत बढतीची जागा, उच्चस्थान म्हणजेच कांही केवळ मनुष्याच्या आयुष्याची इतिश्री नाही किंवा हजार रुपये पगार म्हणजे 'माणूस' म्हणून त्याचें अंगभूत मूल्य वाढलें असें होत नाही. हें खरें असलें तरी लौकिकदृष्टया ह्या गोष्टींचें इतकें स्तोम माजलेलें असतें कीं, ते "खुर्चींतले नमुने" ज्यांनी पाहिलें आहेत त्यांनाच त्याची कल्पना येईल. अशा " खुर्चींत " बसण्याचाहि मोका मला अजून साधतां आलेला नाही (व साधेल असें वाटतहि नाही). रूपाने, गुणाने, पैशाने सर्व बाजूंनी अगदी सामान्य अनुकूलता असतांनाहि अशीं कोरीव निवडक लेणीं मला घालावयाला मिळालीं, कोणत्याहि प्रकारें डोळे दिपवून टाकण्यासारखें माझ्याजवळ कांही नसतांना हा दुर्मिळ साज माझ्या अंगावर चढला, ह्याबद्दल मीं कितीहि देवाचे आभार मानले तरी ते थोडेच आहेत

जगांत जशीं सुष्ट माणसें आहेत तशींच त्यांच्याच जोडीला दुष्ट अहंकारी माणसेंहि बसलेलीं आढळतात. ज्या कोणाला माझा उत्कर्ष कधी झोंबला, बोचला, वघवला नाही अशीं कांही माणसें व ज्यांनी त्या उत्कर्षाचें कौतुकाने स्वागत केलें असा निकटवर्ती परिवार ह्यांना देवाने हें सारें मला मिळत असतांना पहाण्याचें आयुष्य दिलें ह्यांबद्दल मी त्याची ऋणी आहें.

माझ्यासारख्या अनेक मुली भोवतालच्या परिस्थितीने प्रत्यहीं खचून जात असतील, वेळप्रसंगीं अधिकाराच्या धुंदींत त्यांना कोणी लाथाडून टाकण्याचा प्रयत्न केल्याने त्या नाउमेद होत असतील, कौटुंबिक अडचणी आणि समाजाचीं रूढीबंधनें तोडण्याचें धैर्य ज्यांच्यांत आलें नसेल, वा हातीं घेतलेल्या कार्यांत धीटपणें पुढें पाऊल टाकण्यासाठी धीर देणारें कोणी नसेल, अशांचे मनांत त्यांच्या अंगीकृत कार्यांत त्यांनी नेटाने काम केल्यास त्यांना यश मिळेल, असा आत्मविश्वास अंशतः जरी या कोरीव लेण्यांच्या दर्शनाने निर्माण झाला तरी ही कोरल्याचें सार्थक झालें असेंच मीं मानीन.

११४२२

● ● ●

REFBK-0011422